मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.


वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका


डॉ. यशवंत मनोहर विशेषांक
विदर्भ साहित्य संघाचे
वाङ्मयीन नियतकालिक
युगवाणी
जाने. । फेब्रु. । मार्च २०१८

अनुक्रमणिका



कविवर्य कुसुमाग्रज आणि बाबुराव बागूल यांच्यासोबत (१९९०)




डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते 'सुगावा पुरस्कार' स्वीकारताना सोबत भाई वैद्य, उत्तम कांबळे आणि इतर मान्यवर.



'आम्हीही इतिहास घडवला' या पुस्तकाचे प्रकाशन करताना सोबत एलिनार झेलिएट आणि प्रा. पुष्पा भावे. (३०/११/१९८९)



गिरीश गांधी यांना डी.लिट. मिळाव्याबद्दल सत्कार, सुप्रसिद्ध नाटककार महेश एलकुंचवार आणि गिरीश गांधी यांच्यासोबत.



'जीवनायन' काव्यसंग्रहाला मिळालेला महाराष्ट्र फाऊंडेशनचा पुरस्कार प्रा. रा.ग. जाधव यांच्या हस्ते स्वीकारताना, सोबत फाऊंडेशनचे सुनील देशमुख. (१७ डिसेंबर२००३)


मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघाचे
वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

वर्ष ७२ वे
जानेवारी । फेब्रुवारी । मार्च २०१८

डॉ. यशवंत मनोहर विशेषांक



अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

वर्ष ७२ वे
जानेवारी । फेब्रुवारी । मार्च २०१८

डॉ. यशवंत मनोहर विशेषांक

अतिथी संपादक
डॉ. मोना चिमोटे

संपादक मंडळ
डॉ. मोना चिमोटे
सदानंद बोरकर
डॉ. पद्मरेखा धनकर
डॉ. तीर्थराज कापगते

मुखपृष्ठावरील छायाचित्र
नानू नेवरे, नागपूर

मुद्रितशोधन
दीपक रंगारी

प्रकाशक
विलास मानेकर
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

सहयोग
श्री. प्रदीप दाते
वर्धा

अक्षरजुळवणी, मांडणी व मुद्रण
माधव लोखंडे
मलय ग्राफिक्स
सुभाषनगर, नागपूर
भ्रमण : ९३२६९९९०१५

या अंकाचे देणगी मूल्य : १०० रुपये
वार्षिक वर्गणी : २०० रुपये
त्रैवार्षिक वर्गणी : ५०० रुपये
वि.सा. संघाच्या आजीव
सभासदांसाठी त्रैवार्षिक वर्गणी : ३०० रुपये

पत्रव्यवहार
संपादक युगवाणी
विदर्भ साहित्य संघ
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७
ई-मेल : yugwani.nagpur@gmail.com

- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'युगवाणी'च्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे.
- या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी महाराष्ट्र शासन, म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई तसेच युगवाणीचे संपादक, संपादक मंडळ आणि विदर्भ साहित्य संघाचे पदाधिकारी सहमत असतीलच असे नाही.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

जानेवारी । फेब्रुवारी । मार्च २०१८

डॉ. यशवंत मनोहर विशेषांक



अं त रं ग

संपादकीय

युगवाणीचा 'डॉ. यशवंत मनोहर विशेषांक' वाचकांच्या हाती सोपवत असताना मनात संमिश्र भावनांचे काहूर उठले आहे. डॉ. यशवंत मनोहर यांच्या अमृत महोत्सवी वर्षात संपादक मंडळाने केलेल्या योजनेनुसार हा अंक योग्यवेळी प्रकाशित होतो आहे याचा आनंद होतो आहे. अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आम्ही डॉ. यशवंत मनोहर यांचे 'युगवाणी'तर्फे आणि 'विदर्भ साहित्य संघा'तर्फे अभीष्टचिंतन करतो आणि त्यांच्या नव्या लेखनाकरिता अनेक शुभेच्छा देतो.

काही महिन्यांपूर्वी विदर्भ संघाच्या कार्यकारिणीच्या बैठकीनंतर युगवाणीच्या संपादक मंडळाच्या बैठकीत युगवाणीचे संपादक अनिल नितनवरे यांनी डॉ. यशवंत मनोहर यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त विशेषांक प्रकाशित करण्याची कल्पना मांडली होती. आम्ही सर्वांनी एकमुखाने त्यास होकार दिला होता. त्यादृष्टिने त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील मान्यवरांकडून लेखन मागवणे सुरू केले. या अंकाच्या संदर्भात त्यांचा सातत्याने संपर्क आणि संवाद सुरू होता. अंकांचे काम सुरू असतानाच अचानक अनिल नितनवरे आपल्यातून निघून गेले. त्यांचे ऐन भरात असताना झालेले अकाली निधन मनाला अतिशय चटका लावून गेले. मराठी साहित्यातील एक साक्षेपी संपादक व जाणकार अभ्यासक कायमचा हरवला. आज त्यांच्या अनुपस्थितीत सदर अंक प्रकाशित करावा लागतो आहे, याची खंत मनात आहे.

डॉ. यशवंत मनोहर हे मराठी साहित्य विश्वातील अतिशय प्रतिभावंत व्यक्तिमत्व होय. विशिष्ट भूमिका घेऊन विविध साहित्य प्रकारात त्यांनी केलेले लेखन विलक्षण आहे. कवी, समीक्षक, विचारवंत या नात्याने अवघा महाराष्ट्र त्यांना ओळखतो. अनेकविध पैलूंनी त्यांचे व्यक्तिमत्व समृद्ध आहे. अतिशय कष्टप्रद परिस्थितीशी संघर्ष करीत साहित्याच्या आणि परिवर्तनाच्या चळवळीत अफाट काम करणारे ते एक वैदर्भीय कलावंत आहेत. कवितेपासून सौंदर्यशास्त्रापर्यंत त्यांनी केलेले सर्वच लेखन त्यांच्या विचारदृष्टीनी आणि भाषिक वैशिष्ट्यांनी समृद्ध आहे. त्यातील लय, गती, वेग वाचकांना थरारून सोडतो. त्यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त प्रकाशित होणाऱ्या या विशेषांकात त्यांच्या समग्र साहित्याविषयीची मांडणी समाविष्ट करता आली नाही. मात्र त्यांच्या काव्यलेखनाच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण मांडणी करण्याचा निश्चितच प्रयत्न केला आहे.

या अंकातील लेखांमधून डॉ. यशवंत मनोहर यांच्या आतापर्यंत प्रकाशित झालेल्या अकरा कवितासंग्रहांवरील भाष्य आहे. त्यातून डॉ. यशवंत मनोहरांच्या कवितेची सम्यक चिकित्सा वाचकांपुढे ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. 'उत्थानगुंफा' हा डॉ. यशवंत मनोहरांचा पहिला कवितासंग्रह १९७७ साली प्रकाशित झाला आणि या पहिल्याच संग्रहाने त्यांनी आपली आगळी नाममुद्रा मराठी कवितेवर उमटवली. या संग्रहाचे महाराष्ट्रात सगळ्या लहानथोरांनी मनःपूर्वक स्वागत केले. आश्लेषा महाजन यांनी या अंकातील लेखात 'उत्थानगुंफा' या कवितासंग्रहामधील अर्थसघनता आणि भाव संमिश्रता विस्ताराने मांडली आहे. अशोक बाबर यांनी आपल्या लेखात डॉ. यशवंत मनोहर यांच्या 'काव्यभीमायन' या दीर्घ काव्यावर विस्तृत चर्चा केली आहे. ही चर्चा त्यातील काव्यगुण आणि भारतीय इतिहासक्रमातील संघर्षाच्या संदर्भांनी वैशिष्ट्यपूर्ण झालेली असल्याचे जाणवते.

अनुक्रमणिका

अक्रम पठाण यांचा लेख 'मूर्तीभंजन' या काव्यसंग्रहाचे वाङ्मयीन सौंदर्य उलगडणारा आहे. या संग्रहातील प्रेम आणि परिवर्तनाचे काव्याविष्कार त्यांनी अधोरेखित केले आहेत. डॉ. केशव सखाराम देशमुख यांनी 'जीवनायन'कवितासंग्रहातील प्रतिभेचे विविद आविष्कार व चिंतनाचे संदर्भ टिपले आहेत. सामाजिक, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन महत्ता यांचे त्यांनी केलेले विवेचन उल्लेखनीय आहे. नीरजा यांनी 'प्रतिक्षायन'मधील प्रेमाच्या अनुभूतीचे विविध भावपदर आविष्कृत केले आहेत. डॉ. माधव पुटवाड यांनी 'आदिबंध'मधील मनोहरांच्या अभिव्यक्तीचा अनुभवस्त्रोत आणि त्यांची प्रतिभासंपन्नता यावर मार्मिक चिंतन मांडले आहे. डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी 'स्वप्नसंहिता' या कवितासंग्रहातील अनुभवांची वैशिष्ट्यपूर्णता आणि समकालीन जाणीवा प्रत्ययकारीतेने दर्शविली आहेत. तर डॉ. विलास खोले यांनी 'युगांतर' कवितासंग्रहातील कवितांच्या आशयाभिव्यक्तीची मांडणी केली आहे. अपप्रवृत्तींना आव्हान आणि परिवर्तनासाठी आवाहन यांचे अनेक पैलू त्यातून प्रकर्षाने जाणवतात. डॉ. नागनाथ कोतापल्ले यांनी 'युगमुद्रा' या कवितासंग्रहाच्या मौलिकतेला अधोरेखित केलेले आहे. डॉ. जनार्दन वाघमारे यांनी 'बाबासाहेब...!' या दीर्घ काव्यातून डॉ. यशवंत मनोहरांची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयीची तीव्र संवेदन वैशिष्ट्ये दर्शविली आहेत. त्यातील संवैधानिक मूल्यांची बाजूही उजागर केली आहे. डॉ. यशवंत मनोहरांच्या 'तुरुंग तोडणाऱ्या उठावाची कविता' या नव्या कवितासंग्रहावर 'नव्या माणसाचे घोषणापत्र' म्हणून दा. गो. काळे यांनी केलेले भाष्य अत्यंत महत्त्वपूर्ण आणि त्यांच्या कवितेचे नवे वळण दर्शविणारे आहे.

डॉ. यशवंत मनोहर यांची कविता तर महत्त्वाची आहेच मात्र त्यांनी केलेली दलित आणि आंबेडकरी साहित्याची चिकित्सा व ग्रंथरूपाने केलेली वैचारिक मांडणी देखील मोलाची आहे. अनेक ठिकाणी दिलेल्या भाषणांमधूनदेखील त्यांनी आपली भूमिका मांडली आहे. डॉ. यशवंत मनोहर यांच्या या वैचारिक योगदानाबाबत स्वतंत्र विचार होणे गरजेचे आहे. स्थलमर्यादेमुळे आम्ही या विशेषांकात त्यांच्या कवितेबाबत विस्ताराने उहापोह केलेला आहे. मात्र या अंकात समाविष्ट न झालेल्या मनोहरांच्या इतर साहित्यावर आणखी विचार होणे गरजेचे वाटते.

या अंकात नितनवरे यांच्याशी जिव्हाळ्याची मैत्री असलेल्या डॉ. हेमंत खडके यांचे एक पत्र आहे. अनिल नितनवरे यांच्या अकाली निधनाने त्यांच्या अस्वस्थ करणाऱ्या आठवणींचा चढता आलेख त्यात आहे. त्यातून अनिल नितनवरे यांच्या व्यक्तिमत्वाचे पुढे येणारे पैलू कमालीचे भावपूर्ण आहेत. युगवाणीचे संपादक म्हणून अनिल नितनवरे यांनी केलेले कार्य संस्मरणीय आहे. युगवाणीच्या आजवर झालेल्या प्रवासाच्या गुणवत्तेचा वारसा त्यांनी त्यांच्या संपादनात निरंतर ठेवला. एक जिज्ञासू साहित्यिक आणि तितकाच स्नेहशील माणूस म्हणून मराठी साहित्यविश्वात त्यांची सर्वदूर ख्याती होती. त्यांनी नव्या पिढीला लिहिते केले. आधीच्या पिढीतील अभ्यासकांकडे विविध विषयांवर लिहण्याचा आग्रह धरला. त्यातून साहित्यातील नव्या बदलांचे अभ्यासपूर्ण भाष्य पुढे आले. शिवाय कविता, कथा, ललित निबंध यासारखे उत्कृष्ट ललित लेखनही पुढे आणले. संपादन हा अत्यंत जिकिरीचा भाग बनत चाललेल काळात त्यांनी उत्कृष्ट साहित्य मिळवून लक्षणीय अंक प्रकाशित केले. त्यांच्या या साहित्यनिष्ठेला व स्मृतींना विनम्र अभिवादन!

युगवाणीच्या या डॉ. यशवंत मनोहर विशेषांकाचे मराठी वाचक स्वागत करतील, अशी अपेक्षा आहे.

• • •

अनुक्रमणिका





धगधगत्या ज्वालांच्या उत्थान-कविता

आश्लेषा महाजन

उत्थानगुंफा ह्या मर्मस्पर्शी आणि अर्थसघन शीर्षकाचा कविवर्य यशवंत मनोहर यांचा विद्रोह-कवितासंग्रह १९७७ मध्ये प्रथम प्रकाशित झाला. पुढे त्याच्या आवृत्त्याही निघाल्या. १९८० चे महाराष्ट्र शासनाचे पारितोषिक त्यास मिळाले आणि इतरही अनेक पुरस्कार. १९७७ च्या आसपासचा काळ म्हणजे भारतीय स्वातंत्र्यानंतरचा ३० वर्षांचा उपसा. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वातून साकार झालेल्या भारतीय राज्यघटनेतील नांदीमधील (प्रीयॅम्बल) स्वातंत्र्य, समता, बंधुता, एकता तसेच समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक, गणतंत्र... इत्यादी शब्दांच्या अंमलबजावणीची शहानिशा करण्यासाठी ३० वर्षांचा टप्पा महत्त्वाचा ठरला असणार. स्वातंत्र्योत्तर काळातील स्वराज्याचे सुराज्य करण्याच्या देशकार्यामध्ये तन-मन-धनाने झोकून देणारी ध्येयवादी, समर्पित खूपशी माणसे वयानुसार थकलेली असण्याच्या काळातला हा संग्रह आहे. शिवाय १९७७ हा भारतीय लोकशाहीतील 'इंदिरा-युगा'तील आणीबाणीचा, अनागोंदीचा विस्कळीत, सैरभैर काळ. १९७७ ते २०१७-१८ हा चाळीसेक वर्षांचा कालखंड. मागे वळून बघताना चाळीस वर्षांनंतरही अशा विद्रोह कवितांची आवश्यकता, प्रस्तुतता कालसुसंगत ठरतेय का, हे पाहणे महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवरून सिंहावलोकन करत काळाच्या गुंफेमध्ये दडलेल्या, दडवलेल्या, दडपलेल्या, गाडलेल्या वा नामशेष होऊ घातलेल्या आकांतांचे, टाहोंचे, अस्मितांचे, गाऱ्हाण्यांचे, हक्कांचे,स्वातंत्र्य-समतादि मूल्यांच्या अस्तित्वाचे शाब्दिक उत्थान करणारा श्री. मनोहर यांचा संग्रह पाहणे उचित ठरते.

युगानुयुगांपासून विषम अशा सामाजिक रचिताच्या खालच्या उतरंडीवर उपेक्षेचे, मानहानीचे नि अभावांचे जिणे जगण्याची सक्ती झालेल्या दलितांच्या वेदनांचेच हे प्रखर एल्गार. ह्या संग्रहावर तत्कालीन वृत्तपत्रांतून व नियतकालिकांतून भरभरून समीक्षा लिहिली गेलेली असून 'उत्थानगुंफा : आकलनाचे आलेख'सारखा २०९ पानांचा मान्यवर साक्षेपी समीक्षकांनी लिहिलेल्या लेखांचा संपादित समीक्षाग्रंथ प्रकाशित झालेला आहे. तसेच श्री. मनोहर यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त त्यांच्या विविध पुस्तकांवर साकल्याने समीक्षा-लेखनही होत आहे. ते प्रकाशित होत आहे. विद्रोही कवितांच्या पुस्तकांची समीक्षा आणि त्या समीक्षेची समीक्षा अशा छाननीतून ह्या चिंतनकाव्याला जावे लागत आहे, हेच त्यातील वैचारिक प्रगल्भतेचे यश आहे, असे मला वाटते. पु.ल. देशपांडे, नरहर कुरुंदकर, प्रा.रा.ग. जाधव, डॉ. भालचंद्र फडके, डॉ.म.सु. पाटील, डॉ. अरुणा देशमुख, डॉ.भा.ल. भोळे, डॉ. आशा सावेदकर, प्रा. केशव मेश्राम, जैमिनी कडू, डॉ. रमेश आवलगावकर इत्यादी ३०-३५ विचारवंतांनी 'उत्थानगुंफे'च्या बलस्थानांवर आणि

अर्थातच मर्यादांवरही सविस्तर लेखन केलेले आहे. एखाद्या कवितेवर एवढे भरभरून लिहावेसे वाटणे, बोलावेसे वाटणे हे एकीकडे सुखावह असले तरी आजही अशी विद्रोही भाष्यकविता जनीमानसी, कंठीकपाळी ओरडून ऐकवावीशी वाटते आहे, हे दुःखद आहे; कारण आजही अस्तित्वात असणाऱ्या सामाजिक असमानतेची, जातीय-धर्मीय अनाचाराची, अन्याय-अत्याचाराची ती ग्वाही देत आहे. आधुनिकतेच्या मुखवट्यामागे दडलेली, बुरसटलेली क्षुद्र मध्ययुगीन मानसिकता आजही अस्तित्वात आहे, हे कटुसत्य आहे. 'उत्थाना'साठी ही कविता त्याचीच ग्वाही देतेः

''डोळ्यांपुढे पेटून येतात अंधारगुहांचे महासागर
उपेक्षेने मारलेल्यांच्या अतृप्त अपेक्षांच्या,
ज्वाळा मनाच्या आकाशभर.
दिशा शिलगवितात माझ्या काळजाला,
पूर्व पिढ्यांतील सांगाड्यांच्या तोडलेल्या हातांनी.
आजतागायतच्या वर्णांध न्यायाची सावत्र संतान,
सांगते निर्घृण तुरुंगवासाची कथा.
दाखवतात इथल्या पान्हाचोर संस्कृतीच्या गायीने
मारलेल्या लाथांचे अमीट व्रण,
पाठीवरील ताजे रक्ताळ वळ,
उमटलेले गाठाळ परंपरांच्या प्रहरांनी.
आक्रोशतात माझ्याभोवती,
अंधारातच झोडपून मारलेले पोरके पोरके श्वास,
तेव्हा औट हात देहातही,
उधाणून येतात अनंत जिद्दी वादळे
उत्थानासाठी.''

ह्या संग्रहाचे 'उत्थानगुंफा' हे शीर्षक अनेकार्थाने लक्षवेधी ठरते. काळाच्या काळोख्या गुहेत चाचपडणाऱ्यांना विद्रोह करण्यासाठी जोरजोरात हाका मारणारी ही कविता आहेच; पण भगवान गौतम बुद्धांच्या हजारो मूर्ती ज्या गुंफांमध्ये साकारल्या गेल्या आहेत, त्या गुंफांचेही उत्थान-म्हणजे बुद्ध-तत्त्वज्ञानाचेही (व झाला असल्यास त्याच्या विपर्यासाचेही) उत्थान करणे ही कवीच्या काव्यलेखनामागची प्रेरणा आहे/असावी, असे प्रकर्षाने वाटते.

''मला मान्य नाही,
तुमच्या बोटांपुढची दिशा
मला मान्य नाही,
परंपरांची वर्णपाती नशा.
मला मान्य नाही तुमची दया,
जिच्यावर दिशा डोलतात.
मला मान्य नाही माझे श्वास,
जे तुमच्या बळावर चालतात
मला मान्य नाही तुम्ही
माझ्या पहाटेची आई म्हणून...
मला मान्य नाही मी,
तुमचा कुणी नातलग म्हणून
मला मान्य आहे फक्त आता,
माझ्यापुढची अटळ युद्धभूमी,
जिथे प्रथमच जमीनदोस्त होणारी
तुमची संस्कृती;
तुमचा परमात्मा;
तुमचे अध्यात्म;
तुमची मंदिरे;
ही तुमची समग्र शस्त्रागारे;
आणि त्यांचे लाडके मायबाप तुम्ही...''

'यापुढे' ह्या कवितेतील हा अंश म्हणजे 'उत्थानगुंफे'ची प्रातिनिधिक दवंडी आहे. कवितेची सांगता करताना कवी विजयानंतरचे पहिले निर्मळ आभाळ, माणुसकीचा उन्नत माथा पाहण्याची आशा बाळगतो. ''विद्रोहाची जाणीव हाच जिचा स्थायिभाव आहे, अशी श्री. मनोहर यांची कविता सामाजिक जाणिवेतून येणारा विद्रोह व्यापकपणे मांडणारी चिंतनशील कविता आहे.'' हे नरहर कुरुंदकर यांचे भाष्य सयुक्त ठरते. ही कविता त्या विद्रोहाच्या जाणिवेतून समाजपरिवर्तनाची ज्वाला पेटवण्याचे इंधन पुरवते, हे फार महत्त्वाचे आहे; अन्यथा शब्द बापुडे केवळ बुडबुडे ठरू शकतात. ''मनोहरांची कविता व्यक्तिजीवनाची नाही, वैयक्तिक सुखदुःखाची आर्तता आळवणारी नाही, तर ती चीड आणि त्वेषही एका मनुष्यसमूहाचे वृंदगायन होऊन प्रगटते'' हे पु. ल. देशपांडे यांचे मत महत्त्वाचे व मननीय आहे. ही कविता व्यक्तीकडून समग्र अशा समष्टीचा व्यापक विचार मांडते. 'सहनाववतु...'चे जयघोष करत असतानाच 'सह वीर्यं करवावहै...' म्हणत एकजुटीचे आवाहन करते असे मला वाटते. जुने-पुराणे सारे सारे नाकारणाऱ्या ह्या कवितेबद्दल मी मात्र प्राचीन वैदिक सूक्तांचा उपरोक्त

संदर्भ जाणीवपूर्वक देत आहे; कारण हीही कविता मानव्याच्या अर्थपूर्ण जीवनासाठी विस्तृत अंगण मागते आहे.

युगांच्या जगडव्याळ घुसळणीतून वर येऊन प्रस्थापित झालेली समाजव्यवस्था, त्यातील सामाजिक-राजकीय-आर्थिक हितसंबंध, समाजाचा डोलारा सावरण्यासाठी नियमित करून टाकलेले श्रमविभाजन, त्यातील अन्याय्य गोष्टींपुढची नियतिशरणता वा हतबलता, वर्णांध न्यायाची सावत्र संतान होणे... ह्यातले काहीच कवीला नको आहे. वादळाच्या तडाख्याने सारे रान जमीनदोस्त व्हावे आणि मग पावसाच्या पहिल्या सरीसोबत नव्या बीजांकुरांचे नवे हिरवे शिवार डोलावे, असा संपूर्ण कायापालट कवीला अपेक्षित आहे. त्यासाठी कवी पुनरुक्तीचा दोष पुनःपुन्हा पत्करून 'शाब्दिक युद्ध' आरंभतो आहे. कवीच्या भाषेत अन्याय्य व्यवस्थेविषयीचा पराकोटीचा तिरस्कार ठासून भरला आहे. मनात अन्यायाविरुद्धचा असंतोषाचा भडका उडतो तेव्हा शिवराळ भाषाही कवी वापरतो आहे. इतकी घृणा, इतका द्वेष, इतका विखार, एवढा तीव्र दर्प का आहे? ह्या कवितांमध्ये अंधार, उपेक्षा, भीक, दैन्य, याचना, वंचना, यातना, जखमा, रक्त, मरण, स्मशान, जाळ, अंगार, जुलूम, आसूड, चटके, ऊन, वणवे, लाव्हा, रुक्षता, मृगजळ, दुष्काळ, विष, पराभव, वांझपण, कल्पांत... अशाच प्रतिमा/विशेषणे वारंवार का येतात? याशिवाय कवीच्या मनातील विखार दर्शवणाऱ्या खालील काही पंक्ती वानगीदाखल आपण पाहू;

- *'अडाणी पायांवर उभे सर्वच शतकांचे आंधळे मजले',*
- *कमरेच्या कुंपणाजवळून डोळे बांधून चालणारे विदूषक अध्यात्म',*
- *'तुमच्या अध्यात्माने भीतीचा गाळ थापला माझ्या डोळ्यांवर',*
- *'इथल्या दिशा कधी हळहळल्या नाहीत जखमांच्या पुरांनी',*
- *'जाळ होतो कल्पनाशक्तीचा जेव्हा बघतो निरपराध जळताना',*
- *'हृदयाने माझ्या मागितली एक नजर जिच्यात तिरस्कार नसेल',*
- *'आपल्या पराभवाचे अंतराळ छद्मी हसू हसत आहे',*
- *'शब्दांनी आमुच्या घेतला नव्या दिशांनी पेट',*
- *'आपले शब्द कर्मविपाकासाठी कॅंसर होतील',*
- *'या माळरान डोळ्यांत एका विद्रोही संस्कृतीचे ब्ल्यूप्रिंट मांडू आपण.',*
- *'शब्दांमागील षंढत्वाच्या सोहळ्यात आपलाही मुत्सद्दी टाळ जुळवावा',*
- *'प्रतिगाम्यांचे किल्ले उडवू, उडवू जुलमी शोषक हात',*
- *'माझी कविता उपाशी जन्मांसाठी उपोषणाला बसली आहे',*
- *'मी मला तुमच्यात संपवू इच्छित नाही कधी',*
- *'जोतीबा, तू जायबंदी केलीस भूतकाळातील शोषणाची हेडऑफिसेस...',*
- *'या कवितेतून येणारी हाक शेकोट्यांच्या पेटत्या बनाची आहे',*

या आणि अशा अनेक पंक्तींतून ओसंडून, भडभडून अंगावर येणारा अनावर संताप आक्रंदून काय सांगतोय? इतकी चेतवण्याची, भडकवण्याची भाषा कवीला का स्फुरत राहते? यांतून 'उत्थानगुंफां'मधला अंधार दूर होईल का? ह्याचे उत्तर रूढी परंपरेने हीन-दीन केलेल्या सामाजिक उतरंडीत आहे. त्याविषयीचा हा उद्वेग आहे, कालौघात बहुरूढ होत सर्वसकट थापलेल्या जात्यंध समाजधारणांविरुद्धचा हा जळजळीत विद्रोह आहे. कवीची विद्रोही भूमिका समजून घेणे आवश्यक आहे. मानवतेला दारिद्र्यात खितपत ठेवणाऱ्या भांडवली शोषणव्यवस्थेचा कावा ओळखून शोषितांमध्ये जागृती आणण्याचे काम ही कविता करते. एकामागून एक विचारप्रवण विधानांचा एकसंघ वर्षाव करत ही कविता जाणिवांना मुंग्या आणते! हा शब्दप्रभू, प्रतिभासंपन्न आणि सघन प्रतिमांचा भडिमार करणारा कवी आहे. श्री. मनोहर यांच्या कवितांमधील प्रतिमा हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. इतक्या नानाविध प्रतिमांचा घणाघाती वर्षाव ते करतात, की वाचक थक्क होतो. ह्या कविता म्हणजे नाकेबंदी करणाऱ्या परंपरांविरुद्धचा उग्र प्रक्षोभ आहे, असंतोषाचे उत्स्फूर्त स्फोटक उद्गार आहेत, आक्रमक प्रतिक्रिया आहेत, बेंबीच्या देठातून उसळणारे ज्वलंत उद्गार आहेत. 'वैरी' ह्या कवितेत ते

अनुक्रमणिका

लिहितात :

''ते ग्रीष्म माझे वैरी आहेत,
ज्यांनी इथे प्रामाणिकपणा रुजू दिला नाही.
ते आहेत आपमतलबी बगलबच्चे,
ज्यांनी सत्याचा जन्म उजेडात येऊ दिला नाही.
सैतान असली ते आहेत;
ज्यांच्या शोषक कल्पनांनी भीषण गावकूस घडवले.
कपटी, चांडाळ ते आहेत,
ज्यांनी माणूसपण इथे शब्दांतच सडवले.
ज्या नियमांनी सृष्टीचा हा विद्रूप विकास सिद्ध झाला,
त्यांचा मी जळजळीत निषेध करतो.
ज्यांनी इथल्या सूर्याला; दगडांनाही,
ऐहिक स्वार्थासाठी अध्यात्माचे रंग दिले,
संचित निश्चित केले,
त्या हरामखोर परंपरांवर मी विध्वंसाचा नांगर धरतो.
हे सर्व देव, दैववादी माझे वैरी आहेत,
ज्यांनी अस्पृश्यता अभंग केली, तिची मधुर ओवी केली,
ते शब्दप्रामाण्यवादी सगुण निर्गुण वैरी आहेत माझे,
ज्यांनी मला आजवर मुक्त होऊ दिले नाही.''

प्राचीन भारतीय संस्कृतीतील वर्णव्यवस्थेमुळे, पुराण ग्रंथांमधील विषमतामूलक वचनांमुळे, वंचितांच्या उपेक्षा वर्णन करणाऱ्या कथा-उपकथांमुळे, मिथके-दंतकथा-कहाण्या-लोकगीते-म्हणी-वाक्प्रचारांतील दलितांच्या अवमानकारक उल्लेखांमुळे, कर्मविपाकाच्या सिद्धान्तावर आधारित ग्राम-अर्थरचनेमुळे आपल्या देशात जी भीषण जातीय असमानता निर्माण झाली आहे, ती अनैसर्गिक आहे. माणसांच्या एका हुशार आणि सामर्थ्यशाली समूहाने सामाजिक श्रमविभाजनासाठी चार वर्ण कल्पिले-ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र. श्रमविभाजनाच्या नावाखाली तयार झाली एक चार दांड्यांची, कप्पेबंद, जडशील शिडी. शिडीचा उपयोग वर जाण्यासाठी अथवा खाली उतरण्यासाठी असतो. पण ह्या विक्षिप्त, विपर्यस्त शिडीवर खालच्याला वर जाता येत नाही, वरच्याला खाली येता येत नाही. मधल्यांनाही हालता येत नाही. काळाच्या विवर्तात घट्ट रुतून बसलेल्या ह्या शिडीला धर्म-परंपरा-रूढी-नीती-कर्मसिद्धांत इत्यादींची मगरमिठी आहे. जोडली गेल्यामुळे माणसाच्या प्रगतीतील मोठा अडसर आहे. ही अन्याय्य शिडी मानवनिर्मित आहे. विशिष्ट हितसंबंध जपणारी आहे. कवीला ती शिडी उखडून फेकायची आहे. 'जुने जाऊ द्या मरणालागुन/जाळुन अथवा पुरुनी टाका/सडत न एक्या ठायी ठाका/ सावध ऐका पुढल्या हाका...' ह्या कवी केशवसुतांच्या पंक्तीप्रमाणे कवीला सारे जुने हीन जाळून टाकायचे आहे. ('उत्थांनगुंफा' हा संग्रह कवीने - ''येथील ईश्वरवादी, अध्यात्म व कर्मविपाकशाही यांच्या नावाखाली शकतानुशकते चाललेल्या अमानुष शोषणाचा-जळजळीत आयुष्याने मृत्युलेख लिहिणाऱ्या बाबासाहेब आंबेडकर नावाच्या सर्व दलितांच्या युगप्रवर्तक विद्रोहाला आणि 'माझ्या कवितेला कुळारंभ देणाऱ्या मराठीतील आदिविद्रोही कवी केशवसुतांना...' अर्पण केला आहे. ही महत्त्वाची नोंद.)

ज्या ज्या जुन्या गोष्टींनी अन्याय्य प्रथांची काटेरी कुंपणे बांधली, त्या साऱ्या जुनेऱ्यांना नष्ट केल्याशिवाय नवी, कोरी निरामय पहाट उगवायची नाही, असे कवीला वाटते. आपल्याला मागचे काहीही नको, धर्म नको, देव-देवता नको, उपासनांची अवडंबरे नकोत, यज्ञ-समीधा-मंत्र-ऋचा-अक्षता-आरत्या-कहाण्या नकोत. परंपरांच्या शृंखला नकोत, रूढींचे फास नकोत, जे जे परंपरेने आले आहे, ते ते काही नको... असे कवीला वाटते आहे. कारण जे जे जुने आहे, बहुतेक ते ते सर्व अन्याय्य आहे, विशिष्ट वर्गाच्या हितसंबंधाची जपणूक करणारे आणि खालच्या उतरंडीवर माणुसकीहीन वागणुकीचे कोरडे ओढणारे आहे.

अर्थात काल-परंपरेने प्रवाहित झालेली नि अभिव्यक्तींच्या घुसळणींतून नवनीतासारखी वर आलेली आपली भाषा मात्र कवी नाकारू शकत नाही. 'तुमची भाषा येत नाही', ही पंक्ती कवितेपुरती ठीक आहे. कवीने प्रमाणित भाषा तर वापरली आहेच; पण संस्कृतप्रचुर शब्दांचीही पखरण कवितांमधून आहे; शिवाय प्राचीन वाङ्मयातले व महाभारतातले काही संदर्भ-विद्रोहासाठी का होईना दिलेले आहेत. कवी भाषा नाकारू शकत नाही. कारण भाषा तर अभिव्यक्तिचे साधन आहे! भाषा संस्कृतीला धारण करतेच, हे मान्य आणि स्पष्टच आहे. भाषाच नाकारली तर ही कविता लिहिणार कशी नि वाचणार कोण?

''शोधिली वेड्यापरी ती झूट होती मंदिरे
लपविला माथा परी उरि पेटती ही अंबरे
हा कसा अंधार माझ्या नाचतो डोळ्यांवरी
हरपली वाचा पडुन मी कापल्या रस्त्यावरी...''

ही गझल-अंदाजाची रचना लक्षवेधी आहे. खरे तर, छंदवृत्तांच्या चौकटीत भावनांची ठिपक्यांची रांगोळी काढणारा हा कवी-कारागीर नव्हे. 'कुठलीच कला आपल्याला आनंद देत नाही', असे म्हणत कविता ह्या 'काव्य-कलाकृती'ची ते अभिव्यक्ती करतात. शिवाय 'शोभिवंत कुजकेपणाला तुम्ही म्हणता साहित्य' किंवा 'शब्दांची पूजा करत नाही मी/माणसासाठी आरती गातो...' असे कवीनेच म्हटले आहे.

''जमत नाही मला शब्दांचे नक्षीकाम
दुःख रंगवून रंजक करणारे गुंजनवादी कूळ नाही माझे
ही वंचना उगवली नाही कधी मनाच्या क्षितिजातून
हाडांच्या हुड्यावर जळणारा बेचैन दिवा
माझ्या हिरमुसल्या रक्ताचा आहे...''

असे म्हणणारा हा कवी अपवाद म्हणून कधी क्वचित मीटरमधल्या व 'यमक्या' कविताही लिहून जातो. भावकाव्य लिहिणाऱ्यांची कवीला ॲलर्जी असूनही 'काढिला खणुनि काळोख' सारखी वृत्तबद्ध कविताही हा कवी प्रसंगवशात प्रसवतो. 'होऊनी विद्रोह', 'या भूमीवरती' ह्या तालात म्हणता येईल अशा कवितासुद्धा कवीला लिहाव्याशा वाटतात. काही समयक मुक्तछंद कविताही आहेत. हा विरोधाभास (की रुचिपालट?) बहुधा बालपणापासून कवीच्या मनात मुरलेल्या अंगभूत लयीमुळे घडत असावे. ह्या कवितेतून शब्दांचे नक्षीकाम घडत नसले तरी उपमा-विशेषणांची नि वीर-करुण-अद्भुत-भयानक-रौद्र-बीभत्स ...अशी रसनिष्पत्ती मात्र ओतप्रोत होत आहे. त्यामुळे ही रंजनवादी रंगकाम करणारी कविता नसली तरी कलावादी किंवा कलात्म खचितच आहे. कविता हीच मुळी कलाकृती असते. कला आनंदपर्यवसानी असते. आनंद प्रति+भा साकारल्याचा, निर्मितीच्या अवकाशाचा, जीवनानुभव शब्दबद्ध करण्याच्या ऊर्मीचा, प्रतिमासौंदर्यातून, चकचकीत शब्दांतून विचारवलयांचा एकजिनसी गोफ विणल्याचा!

युगांपासूनची उपेक्षा सहन करणाऱ्या माणसांसाठी विद्रोहाची अशी जळजळीत विखारी भाषा कवीला बोलावीशी वाटते. कारण जे समाजमानसात विरघळलेले आहे, त्यात अनुकूल सुधारणा होणे शक्य नसते. अशा वेळी ते नष्ट करण्याचीच आस लागते. पण ते तितके सोपे नाही. कारण परंपरा मोडायला मोठे धैर्य लागते, चिकित्सक, तार्किक व विवेकी विचारांची ताकद लागते. दुसरे असे की विद्रोहाने जर एखादी रूढी मोडून काढली, तरी त्या रूढी मोडण्याच्या प्रसंगाचा वर्धापनदिन साजरा करण्याची नवी प्रथा पडते. त्या प्रथेचे नियम तयार होतात. ड्रेस कोड, विधी, औपचारिक कार्यक्रमाची नियमावली तयार होते आणि नव्या प्रथेची एक नवी बेडी तयार होते. एका अंधश्रद्धेचा पायबंद केला म्हणून दुसऱ्या अंधश्रद्धेची मुहूर्तमेढ रोवली जाते. सामान्य बुद्धीच्या माणसाला सगुणभक्ती, विभूतिपुजा आवडते, कळते. कुठेतरी श्रद्धा-भक्ती-विश्वास ठेवला की त्याला बरे वाटते. तो त्या भाबड्या माणसाचा स्वतःवर केलेला 'मानसोपचार' असतो. त्यामुळे मूर्तिभंजन कितीही चित्तथरारक असले, तरी मूर्तीचे आकर्षण कमी होत नाही. निरीश्वरवादी माणूसही मूर्तीमधील कलात्मक मूल्याने, त्यातील प्रातिभ आविष्काराने प्रभावित होऊ शकतो. मूर्ती निर्माण करणारा शेवटी माणूसच असतो. माणूस परंपराप्रिय असतो. मूर्तिपूजेला निक्षून विरोध करणाऱ्या गौतम बुद्धाच्याच हजारो मूर्ती त्याच्याच अनुयायांनी त्याच्या हयातीत घडवल्या, हा इतिहास आहे. त्याची कारणे अनेक असून हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. तसेच डॉ. आंबेडकरांचे केवळ पुतळे उभारून नि कार्यक्रम 'राबवून' चालणार नाही, त्यांच्या उक्ती-कृतीचा समन्वय साधत नवे समतेचे युग निर्माण करण्याची कवीची कांक्षा आहे. त्यासाठीच आहे-श्री. मनोहरांच्या ह्या आक्रमक, घणाघाती कवितांची शापवाणी :

'जाताना मुक्याने जाणार नाही, या पसाऱ्याला शाप देऊन जाईन
येताना उत्तरे घेऊन आलो होतो, जाताना प्रश्न घेऊन निघून जाईन.
मला आनंदच देत नाही कुठली कला. सृष्टीच्या नाना लीला.
मी असूच कसा शांत समतोल
छळतात सारी शास्त्रे; पुराणे; वेदांत;
गळा आवळणारे नाना धर्मपंथ...''

विद्रोहाची धार कमी झाली की पुन्हा सांस्कृतिक सपाटीकरण होते, हा धोका ओळखून विद्रोहामध्येही कालसुसंगत नानाविध मोर्चेबांधणी करण्याची आवश्यकता असते. समाजप्रबोधनाचे विविध प्रयोग आवश्यक असतात. त्यासाठी लागणारा आत्मविश्वास शिक्षणातून मिळतो. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा...' हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आवाहन

आजही तितकेच प्रस्तुत आहे. शिक्षणातून मिळणाऱ्या प्रगतीच्या नव्या क्षितिजाच्या कक्षा रुंदावत असताना बुरसटलेल्या, अमानुष, जुनाट कल्पनांना हद्दपार करण्यासाठी कवी शब्दांची शस्त्रे परजतो. कवीने चार्वाक, गौतम बुद्ध, जोतीबा फुले, कार्ल मार्क्स, केशवसुत आणि डॉ. आंबेडकर यांच्याशी कवितेतून अतिशय हृद्य तरी थेट संवाद साधला आहे :

''मार्क्स, काय करावे मार्क्स आम्ही काय करावे?
अर्धेआयुष्य पाठीवर घेऊन तू हद्दपारी भोगलीस
तुझ्या देशाने तुला बाहेर हाकलले
आणि इथे आमचा देशच आम्हासाठी तुरुंग झाला.
आमच्याच देशात आम्ही 'बाह्य' झालो.
आम्हीही हद्दपार झालो असतो तर धन्य झालो असतो मार्क्स!
पण ते झाले नाही, आमचे जन्मच जीवनातून हद्दपार झाले
तू जगू शकलास मार्क्स, पण आम्ही मरूही शकलो नाही, वाचूही शकलो नाही...''

पोटतिडकेने मांडलेले हे कठोर वास्तव, हे भीषण गाऱ्हाणे वाचून सहृदय माणसाचा जीव घुसमटल्याशिवाय राहात नाही. कवी देत राहतो अशी भयाण अस्वस्थता, अशी जीवघेणी घुसमट, की त्या घुसमटीतून फुटून उठावेत अनेक विद्रोही वणवे नि त्यांनी जाळून टाकावीत विषमतेची घनदाट अरण्ये! जनअरण्ये!

भक्तिमार्गाचे लोकशाहीकरण करणाऱ्या संत-परंपरेतून आलेल्या अभंग/ओवीरचनेचा कवी मोजक्या रचनांत आवलंब करतो. तुकोबाच्या अभंगवाणीतला रोखठोकपणा इथेही दिसतो :

''पीडितांना साऱ्या। माझी विनवणी
पेटली धरणी । झोप फेडा ।।
बोलवितो तुम्हा । पोरका आकांत ।
नको धर्मपंथ । खूळ मध्ये ।।
लुटारूंनी देश । खिशात घातला ।
युगधर्म झाला । भ्रष्टाचार ।।
कुणाच्या कृपेने । पाप पुण्य झाले ।
निघाले दिवाळे । उजेडाचे ।।
मागू नका कुणा । यातनांची दवा ।
तुम्हीच पेटवा । दुःखरात्र ।।''

सर्वच पूर्व-परंपरा नाकारणाऱ्या कवीने लोक-परंपरेतून उतरलेल्या व संतांनी लोकप्रिय केलेल्या ओवी वृत्तामध्ये काही रचना केलेल्या आहेत, हे विशेष. शिवाय ''आणि तुमची भाषा मला येत नाही,'' असे म्हणत प्रमाणित, शिष्टसंमत मराठी भाषा तिच्या व्याकरणाच्या नियमांवर हुकूम तसेच विविध उपमा-विशेषणे, रस-अलंकार नि प्रतिमा-रूपके वापरतात, हा विरोधाभास विशेषच म्हणावा लागेल.

'उत्थानगुंफे'चे महत्त्व वादातीत आहे. दलित चळवळीला नि दलित साहित्याला क्रांतीचा सूर्यप्रकाश देणारे हे लेखन आहे. तथापि ह्या कवितेच्या काही मर्यादा आहेत. दलितांवरील अन्यायाचा एकच विषय परोपरीने सांगताना कवितांमध्ये पुनरुक्तीचा अतिरेक होतो. एकारलेपणाने, एकाग्रतेने, आग्रहाने होणाऱ्या दलितांवरील अन्यायाच्या शब्दचित्रणात तोचतोपणा येतो. ह्या कविता परंपरावादी, मनुवाद्यांच्या मुत्सद्दी अध्यात्मावर आगपाखड करतात, त्यात शाब्दिक कसरत दिसते. दलितांवरील अन्याय आणि मनुवाद्यांवर टीका ह्या दोनच अक्षांच्या पायावर संपूर्ण गुंफा तोललेली आहे. ही ''पुनःपुनः पुनरुक्ती'' विद्रोह बिंबवण्यासाठीची ताकद असली तरी ती खूपदा शब्दबंबाळ वाटते. संपूर्ण संग्रहात निराशावादी सूर आणि क्रांती घडवण्यासाठीचा विद्रोह यांची सरमिसळ दिसते. कवीला सकारात्मक काहीच दिसत नाही का? एकूण एक परंपरा बाद कसा ठरतात? काही परंपरांत चांगली मूल्येही असतात. परंपरांचे पुनर्मूल्यांकन होत असते. ते क्वचित स्वागतार्हही असते. उदाहरणार्थ - 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु' किंवा 'तमसो मा ज्योतिर्गमय...' ह्यात काय अन्याय्य आहे? चांगल्याला चांगले म्हणायला काय हरकत आहे? देवता, आदिकाव्ये, दैवते-मिथके यांचा सामाजिक शास्त्रे, मानवशास्त्राच्या तसेच इंडॉलॉजीच्या अंगाने तसेच भाषिक व वैचारिक विकासाच्या अंगानेही अभ्यास होत असतो. सर्वच मनुवादी किंवा सवर्ण कपटी सैतान, चांडाळ, हरामखोर आहेत/असतात, असे सर्रास सरसकटीकरण करून कसे चालेल? काही सवर्णांनी जी समाजाच्या, उत्थानाची, मोठी मानवताधिष्ठित कार्ये केलेली आहेत, त्यावर ह्या कविता डोळेझाक का करतात? प्रतिस्पर्ध्याची रेघ खोडणे हा विद्रोह वाचक समजू शकतो. पण प्रगतीच्या ओघात आपलीही रेघ मोठी नको का व्हायला? मनोहरांच्या ह्या विद्रोही कवितांमधील ध्वन्यार्थ किंवा लाक्षणिक अर्थ ध्यानात घेऊन, अर्थशून्य परंपरांची विदग्ध चिकित्सा

करून मग वाचक-क्रांतिकारकांनी समाज-परिवर्तनाची धुरा उचलली तर ती ह्या कवितांची फलश्रृतीच ठरावी. पण कवितांचा शब्दशः अर्थ घेतला नि प्रस्थापित व्यवस्था उलथवण्याचा, जाळण्याचा, त्यावर थंकण्याचा शब्दशः पवित्रा घेतला तर मात्र विपर्यास होऊ शकतो. सतत सुरुंग पेरत राहण्यापेक्षा समरसतेची, सामंजस्याची, सकारात्मक, आशादायी भाषा कधीकधी माणसाला, वाचकाला हवी असते. अशी भाषा जगण्याची उमेद वाढवते. हा जगण्याची आसोशी वाढवणारा मानसोपचार आहे. कवी जरी 'आंबेडकरांच्या ओठांवर उगवलेला प्रलयंकारी सूर्य' असला तरी त्याच आंबेडकरांची सर्व देशवासियांना सोबत घेऊन पुढे जाण्याची इच्छा होती, हे विसरून कसे चालेल? कवीला इथले सारे परके, परदेशी नि पोरकेच वाटते-

'परके वाटतात भाऊ इथले रस्ते, इथली हवा
चांदणे फुटत नाही मला इथल्या पावसात'
किंवा
'परदेशासारखे वाटते इथल्या माणसांत
असा हरामखोर जन्म इथून वाहून नेताना...'

अशी सारखी तुटलेपणाची अलिप्त भाषा काय पेरते? इथल्या समाजात रहायचे, इथल्या व्यवस्थेला नावे ठेवत त्याचे भलेबुरे फायदे/लाभ घ्यायचे आणि पुन्हा तिला सारखे 'परकी' म्हणायचे, तिला शिव्याशाप द्यायचे, हे कसे? विशेषतः आज १९७७ नंतर ४० वर्षांनी ह्या संग्रहातील कविता तितक्याच प्रस्तुत ठरत असतील, तर मग किंचितही सामाजिक, धार्मिक, जातीय सुधारणा झाल्या नाहीत, असे दुर्दैवाने म्हणावे काय? शिक्षण, सुविधा, कायदा, आरक्षण, जागतिकीकरण यांमुळे आज काही मोजक्या क्षेत्रांतील जातीयवाद विरळ झालेला आहे. खूपशा संस्थांमध्ये तर युनिसेक्सचे वातावरण असते. आंतरजातीय विवाहांतील विरोध कमी झालेले आहेत. सर्व जातीधर्मीयांचा देश-परदेशात शिक्षण व प्रवास वाढला आहे. त्यातून विश्वसमाज घडतो आहे. ह्या छोट्यामोठ्या सुधारणांच्या दिवल्याही महत्त्वाच्या आहेत. कुठेलेही बदल होत असताना त्यांना सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, भावनिक, मानसिक... अशा अनेक पातळ्यांवरच्या मतमतांतरांच्या खळबळाटातून, आचार-विचार-उच्चारांतून जावे लागते. बहुमताचा भलाबुरा रेटाही असतो. एकाचे तुष्टीकरण दुसऱ्याची नांगी ठेचणारे ठरू शकते. राजकारण हा कळीचा मुद्दा असतोच. ह्या गदारोळात एकीकडे तथाकथित संस्कृती-रक्षकांच्या मूलतत्त्ववादी कारवाया चालू असल्या तरी उत्थानगुंफेतला अंधार कमी कमी होत तेजाची वलये फुलत आहेत, हेही डोळ्यांना दिसतेच आहे. अर्थात त्या अंधार पिणाऱ्या प्रकाशाला अनेक उलथापालथींमधून धडपडत जावे लागत आहे. त्यासाठी त्या प्रकाशनाला इंधन पुरवण्यासाठी श्री. मनोहरांची कविता उत्खनन करत राहणार, हेच खरे.

''कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही
सदरहू पीक आम्ही आमच्या आसवांवर काढले
आहे...''

असे जरी कवी म्हणत असला, तरी 'आजचा आणि उद्याचा पाऊस नक्कीच आपल्या गावात सर्वत्र पडेल/ त्याला पडावेच लागेल,' अशी ग्वाही ह्या विद्रोही-कविता देत आहेत.

• • •





काव्यभीमायन : न संपणारी कहाणी

▫ अशोक बाबर

सिद्धार्थ गौतम बुद्ध हा पहिला भारतीय आधुनिक की जो कधी प्राचीन/जुना झालाच नाही तर वेळोवेळी तो आधुनिक/नवा राहिला. एकोणिसाव्या शतकात जोतीराव फुले यांनी सर्वोत्तम आधुनिक म्हणून बुद्धाकडेच अंगुलिनिर्देश केला. तशी ती आधुनिक असण्याची आणि आधुनिकता टिकवून ठेवण्याची बुद्धापासूनची देशी परंपरा आंबेडकरांपर्यंत अधोरेखित करत असताना आपण स्वतःलासुद्धा तपासून घेणे महत्त्वाचे असते. एवढी सगळी आपली देशी परंपरा तपासूनसुद्धा आपण स्वतःच आधुनिक होत नसलो तर आपण आधुनिक साहित्यनिर्मिती कशी करणार? आधुनिक कविता कशी लिहिणार? भारतीय समाजातील कळीचे प्रश्न डावलून आपण स्वतःला आधुनिक म्हणून कसे काय मिरवू शकतो? आधुनिकता ही आपापल्या देशी परंपरेच्या गर्भातच शोधावी लागते. आंबेडकर हे एक असे आधुनिक विचारवंत आहेत की त्यांनी आधुनिकता ही बौद्ध परंपरेच्या गर्भातच शोधली. त्यांच्या देशी आधुनिकतेचा गैरअर्थ काढून, त्यांना 'आधुनिक मनु' संबोधून त्यांचा आपण अपमान करतोय याचेसुद्धा भान न ठेवता त्यांची विदेशी हिंदू परंपरेशी खोटी सांधेजोड करण्याचा प्रयत्न केला. ज्यांना या देशी बुद्ध परंपरेचे भान आहे त्यांनी आंबेडकरांना 'आधुनिक बुद्ध' म्हणूनच पाहिले, अनुभवले आणि आत्मसात केले. असे जे काही मराठीत कवी आहेत त्यामध्ये यशवंत मनोहर यांचे नाव घ्यावे लागते.

यशवंत मनोहर यांच्या उत्थानगुंफा (१९७७) ते युगमुद्रा (२०१६) या संग्रहातील सर्व कवितांनी आपल्या देशी परंपरेचा दाबून टाकलेला एक शूद्रत्वाचा आविष्कार करणारा आधुनिक स्वर निर्माण करून मराठी साहित्याला भाषिक समृद्धी प्राप्त करून देता देता दाखवून दिले की आविष्कार स्वातंत्र्य केवळ राजकीय समाजाशी मर्यादित नसून त्यास नागरी समाजाचेसुद्धा संदर्भ असतात. मनोहरांनी हेसुद्धा दाखवून दिले की प्रत्येक समूहाला, त्या समूहातील घटकाला साहित्यात मानाचं स्थान असतं. मराठीतील स्वदेशी (ब्राह्मणी) परंपरेचा उद्घोष करणाऱ्या व्यक्तिवादाला मनोहरांच्या कविता उतारा ठरल्या. मनोहर त्यांच्या कवितेत 'इथून तिथून नकारात्मक भूमिका घेतात.' हे प्रल्हाद जाधव यांचं म्हणणं तितकसं मान्य करवत नाही; ते यासाठी की समाजातील विविध प्रकारची अस्तित्वात असलेली व्यवस्था नाकारणे हे विद्रोही साहित्याचे ध्येय असते; कारण या प्रस्थापित व्यवस्थावाचकांचे सामाजिकीकरण करतात आणि त्यामुळे सत्ताधारी विचारप्रणालीचे सर्वांना भय निर्माण होते. भारतीय समाजातील स्वदेशी (ब्राह्मणी) आणि विदेशी (हिंदू) व्यवस्था मनोहरांनी नाकारली पण त्यांनी बौद्ध, जैन, वारकरी, महानुभाव, फुलेवादी आणि आंबेडकरवादी या देशी विद्रोही परंपरेशी आपले नाते दृढ केले, आंबेडकरवादी विद्रोहाशी मनोहरांचे

नाते कशा प्रकारे प्रस्थापित झाले होते त्याचे सर्जनशील उदाहरण, त्यांच्या काव्यभीमायन या दीर्घकाव्यामध्ये कशारीतीने आविष्कृत झालेले आहे त्याचा आपण प्रस्तुत ठिकाणी विचार करणार आहोत.

बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणाला २५ वर्षे झाली या घटनेची आठवण जेव्हा मनोहरांना उचंबळून येते तेव्हा ते त्या विमनस्क अवस्थेत दीक्षाभूमीवर त्याच आवेगाने बाबासाहेबांना साद घालतात. हे मनोहरांचे साद घालणे मुदलात त्यांचा वाङ्मयीन आविष्कार म्हणून निर्माण होतो; परंतु सामाजिक पातळीवर त्यांची वाङ्मयीन अभिरुची विद्रोही साहित्याचे एक मानसशास्त्रीय मूल्य म्हणूनच अस्तित्वात येते. इथं विद्रोही कविता ही कसल्याही प्रकारचे सौंदर्यशास्त्रीय मूल्य म्हणून न येता ते केवळ मानशास्त्रीय पातळीवरच राहते. या मानसशास्त्रीय मूल्यांचे स्पष्टीकरण करताना मनोहरांनीच असे नोंदविले आहे की, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी माझ्या मनात ही महाकविता जागविली आणि कागदावर बोलविली.'

काव्यभीमायन वाचून झाल्यावर क्षणात लक्षात येतं की हे दीर्घकाव्य म्हणजे वर्डस्वर्थच्या म्हणण्याप्रमाणे 'spontaneous overflow of powerful feelings... feelings are modified and directed by thought... it takes its origin from emotion recollected in tranquility.' अशा स्वरूपाचे आहे. मनोहर काव्यभीमायनाच्या निळ्या पावसात शिरण्यापूर्वी सांगतात, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी माझ्या प्रतिभेला हाका घातल्या आणि माझ्या मनाला परत एकदा भरती आली. ही भरती एका प्रदीर्घ कवितेतून साकार झाली.' मनोहर मानतात की 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही माझी तडफडही आहे आणि धडपडही आहे.' या तडफडीतून आणि धडपडीतून मनोहरांनी या दीर्घकाव्यात समूहसापेक्ष मूल्यांचे मानवतासापेक्ष मूल्यांमध्ये रूपांतर केले आहे.

'मुक्ती कौन पथे?' या आंबेडकरांच्या आध्यात्मिक आवाजातून व्यक्तीचा प्राधान्यक्रम मनोहरांनी आधुनिक मराठी कवितेत शोधला. ज्या धर्मात व्यक्तीला प्राधान्य नाही तो धर्म आंबेडकांना मान्य नव्हता. व्यक्तीच्या जीवनाला समाजाची जरी आवश्यकता असली तरी समाजाची धारणा हे धर्माचे अंतिम ध्येय असण्याला आंबेडकरांनी नकार दिला. त्याच मुक्तीच्या वाटेवरून मनोहरांनी आंबेडकरांना भीमगाथा लिहून संबोधले :

संगराचे गाव तू, बुद्धाचे नवे नाव तू,
तू शिल्पकार मनस्वितेचा, महानायका!

आंबेडकरांनी त्यांच्या आध्यात्मिक परिभाषेत सांगितले की, 'ज्याप्रमाणे पाण्याचा थेंब समुद्राच्या पाण्यात टाकला असता त्याचा लोप होतो तसा माणसाचा तो केवळ समाजात राहिला म्हणून त्याचा लोप होऊ शकत नाही. त्याचे जीवन स्वतंत्र असते. त्याचा जन्म समाजाच्या सेवेकरिता नसून आत्मोन्नत्तीकरिता आहे.' (अरुण कांबळे, १९९२ : ११६). हीच नेमकी मनोहरांची मनःशक्ती असून ती या दीर्घकाव्यनिर्मितीमधून जन्म घेते, म्हणून हे दीर्घकाव्य आध्यात्मिक संवेदनशीलतेला कवेत घेऊन एका विशाल विचारसरणीच्या आकलन क्षमतेशी जोडलेले आहे. आंबेडकरनिष्ठ समुदायाने आंबेडकरांवर हजारो कविता लिहिल्या आहेत; परंतु त्या कविता समूहातच विरघळणाऱ्या ठरल्या. काही अपवादात्मक नामदेव ढसाळांसारखे कवी आहेत की त्यांच्या कवितेमध्ये असा आंबेडकरांचा आध्यात्मिक स्वर आढळतो. मनोहर हे एक त्यापैकी आहेत. कविता ही समूहापेक्षा व्यक्तिकेंद्रित राहायला पाहिजे असे एकंदरीत मनोहरांच्या कवितांमधून पाहता येते. त्याचा प्रत्यय आपणास काव्यभीमायनमधून येतो.

काव्यभीमायन हे एक नैसर्गिकपणे आविष्कृत झालेले मनोहर यांचे आत्मनिवेदन आहे. आंबेडकरांना साक्षी ठेवून आपल्या अनुभूतीशी इमान राखून केलेले ते एक प्रगट चिंतन आहे की ज्यात स्वतःशी केलेले संवाद जसे आहेत तसे समाजाला केलेले आवाहन आणि आव्हानसुद्धा आहेच. मनोहर त्यांच्या कवितांमधून आंबेडकरांशी अनेक नात्यांनी अनेक स्तरांवरून संवाद साधताना आंबेडकरांचा वास्तववादी विद्रोह आणि केशवसुतांचा रोमँटिक विद्रोह यांचा मेळ घालताना दिसतात. भारतीय संस्कृती ही ब्राह्मण आणि बौद्ध संस्कृतीच्या संघर्षाची असल्याने त्यानुसारच आंबेडकरांच्या प्रेरणेचे विद्रोही साहित्य निर्माण होते. इथे असलेल्या सत्तेच्या संदर्भातच समाजाच्या गरजेनुसार विद्रोह निर्माण होतो आणि मग या विद्रोही साहित्य परंपरेतच मनोहरांची कविता अवतरते. तरीही दोन्ही संस्कृतींचा मेळ घालण्यासाठी सदानंद मोरे म्हणतात त्याप्रमाणे 'केशवसुतांच्या खांद्यावर त्यांना न पेलणारे ओझे द्यावे लागते.' (१९९६ ४३९). वास्तविक

मनोहरांनी काव्यात्म पातळीवर केलेला परंपरापतित मार्ग बौद्ध, जैन, लिंगायत या स्वरूपाचा असल्यामुळे ते सबंध कवितेमध्ये प्रतिमांचे विश्व उभे करून समाजजीवनात काय बिघडले होते, काय अजूनही बिघडलेलेच आहे याचा जमाखर्च विद्रोही जाणिवेतून मांडताना म्हणतात,

वेदनांच्या ओठांनी गावी चवदार तळ्याची गाणी
प्यावे स्वप्नांचे पाणी (काव्यभीमायन,पृ. १९)

मनोहरांची कविता शोषितंच्या जाणिवेमधून निर्माण होते. ही जाणीवच त्यांना मुदलात आंबेडकरांनी करून दिली असल्याने ते आंबेडकरांच्या क्रांतीची काव्यात्म रचना करतात तेव्हा त्यांना भारतीय इतिहासाचे भान सतत मानसिक पातळीवर ठेवावे लागते. उदाहरणार्थ,

तू परमात्म्याचे वस्त्रहरण केलेस तेव्हा फडफडली
वेदांची गुन्हेगार पाने, खदखदले ब्रह्मसूत्राचे अध्याय
आणि मनूच्या वंशवेलीने खचलेली हिंमत गोळा करून
उपहास उधळण्यासाठी चंद्रबळ आणले (पृ. २२).

मनोहरांच्या काव्यात्म जाणिवा अभिजनांविरुद्ध आणि त्यांच्या वाङ्मयीन आदर्शाविरुद्ध नवीन वस्तुस्थितीची मांडणी करीत असतात. या मांडणीमधून अभिजन वर्गाचे साहित्यिक आदर्श दुबळे बनतात. मनोहरांची कविता प्रबळ सत्ताधारी अभिरुचीचे वर्ग विद्रोहाचे उपद्रवमूल्य सिद्ध करतात आणि त्यांनी लादलेली व्यवस्थाच नाकारतात.

आंबेडकरांचे जीवन हे एक महाकाव्यच आहे अशी मनोहरांची मनोमन धारणा असल्यामुळे कोणत्याही विद्रोही साहित्याला तात्कालिक महत्त्व असले तरी मनोहर आंबेडकरांच्या क्रांतियुगाला अभिजात दर्जा मिळवून देताना अशी परिस्थिती निर्माण करतात की त्यांची कविता ही त्या काळातली मध्यवर्ती धाराच आहे अशी विचारधारा प्रगट करून त्यांच्या विद्रोही काव्याला केंद्रस्थानी आणतात आणि इतर साहित्य बाजूला सारतात. उदाहरणार्थ, मनोहर रामायणाला पर्याय म्हणून भीमायन उभे करतात. आंबेडकर स्वतः जरी महायान आणि हीनयान टाळून नवयान म्हणतात त्याला मनोहर भीमायन या स्वरूपात काव्यभीमायनमध्ये सादर करतात. अशावेळी अभिरुचीचा मक्ता आपल्याकडेच आहे अशी अधिकारशाही गाजवणारा वर्ग जय्यत तयारीनिशी या विद्रोहाचा सामना कसा करावा, तो विद्रोह कसा नेस्तनाबूत करावा याबद्दलच्या प्रयुक्त्या शोधून काढतात. मात्र शेवटी या विद्रोहामधली तत्त्वे स्वीकारायची की नाही याचा निर्णय करण्यासाठी मनोहरांनी स्वकीय आणि परकीय या दोन्ही शक्तींना खडसावलेले आढळते. अशा प्रसंगी निर्माण झालेला मनोहरांचा व्यक्तिसापेक्ष काव्यात्म आविष्कार निर्माण होतो तो त्या त्या परिस्थितीतील मानसिक पातळीवरील वेदनांचा विद्रोह असतो.

ए. के. रामानुजन यांनी त्यांच्या Three Hundred Ramayanas या निबंधात तीनशे रामायणेच नव्हे तर तीन हजार रामायणे आपल्या बहुसांस्कृतिक भारतात असू शकतील असा निष्कर्ष काढला आहे. ही रामायणे वेगवेगळ्या काळात, वेगवेगळ्या समूहाने निर्माण केली आहेत. परंतु ब्राह्मणी वसाहतवादाच्या रेट्यात वाल्मीकी रामायण नशीबवान ठरले. पण त्याच काळात बुद्ध रामायण, जैन रामायण आणि तुलसी रामायण यासारख्या कलाकृती निर्माण करून देशी परंपरेने आपला विद्रोह नोंदविला होताच. विद्रोही साहित्य परंपरेलासुद्धा आपली रूपे, शैली, माध्यम, संकेत इत्यादी व्यवस्था प्रचलित वाङ्मय परंपरेत शोधावी लागतात. त्यामुळे वाङ्मयीन शैली आणि तंत्रे प्रगत होण्यास मदत होत राहते. साहित्याच्या इतिहासात वाङ्मयीन विद्रोह हा शैलीच्या पातळीवर स्पष्टपणे आढळतो. वाल्मीकी रामायणाची अभिजनवादी परंपरा असूनसुद्धा ग.दि. माडगूळकरांना पुनःश्च एकदा गीत रामायण रचावे लागते याचे कारण म्हणजे दर युगात सत्ताधारी वर्गाच्या मूल्यांचे प्रभुत्व समाजात दर्शनी समतोल साधण्याचा प्रयत्न करीत असते. जुलूम आणि अनुमती, संस्कृती आणि न-संस्कृती, नियम आणि गोंधळ ह्यामधला समतोल विद्रोही साहित्यातील नव्या मूल्यमापनामुळे बिघडत राहतो. जितक्या प्रमाणात हे मूल्यमापन मूलगामी, तितक्या प्रमाणात विद्रोहाची समतोल बिघडण्याची शक्ती अधिक. कमकुवत विद्रोही चळवळी पुनर्मूल्यमापनाच्या बाबतीत अपुऱ्या पडलेल्या काळात यशवंत मनोहर यांनी गीत रामायणाला एक नवा पर्याय म्हणून काव्यभीमायन निर्माण करून हा वरकरणी दिसणारा समतोल बिघडविल्याचे उदाहरण म्हणून पाहता येते. याला पर्यायी आधुनिकता किंवा देशी आधुनिकता म्हणता येते. बुद्ध, जैन रामायणांचा

अयशस्वी प्रयोग भीमायनच्या निर्मितीने यशस्वी होताना दिसतो तो आंबेडकरांच्या नव्या आधुनिक मूल्यदृष्टीमुळेच मनोहर यांच्या भाषिक आविष्कारात ही आधुनिक मूल्यदृष्टी कोणत्या हेतूने वाचकांनी समजून घ्यायला हवी हे काव्यभीमायनमध्ये अंगभूत आहे. मनोहर आपल्या वाचक वर्गांसाठी नव्या पद्धतीने प्रतिसाद मिळविण्यासाठी खास संदर्भ उघडपणे पेरतात आणि वाचकांचा स्वाभिमान डिवचताना म्हणतात :

अजूनही अंधार होतोच आहे गडद
धिक्कारतोच आहे माझ्या ज्ञातीची कुंपणे ओलांडणाऱ्या विद्रोही संकल्पनांना (पृ. २६).

अभिरुचीचा सत्ताधीश वर्ग त्यांना स्वतःच्या अभिजनवादी संस्कृतीला अनुरूप असा मते बनवणारा वर्ग जय्यत ठेवतो आणि समरसतेचा बहाणा करतो तेव्हा मनोहरांचा विद्रोहसुद्धा तितकाच आधुनिक आणि प्रखर होत जातो. पण या विद्रोहाचं शंभर टक्के श्रेय ते आंबेडकरांना देतात. मनोहर आंबेडकरांना प्रत्यक्ष पाहू शकले नाहीत; पण आंबेडकरांची समग्र विचारसरणी त्यांनी आपल्या अनुभवाशयातून जिरवलेली दिसते. हा मनोहरांचा अनुभवातून आलेला आशय प्रतिगामी कलावादी आणि जीवनवादी मूल्यदृष्टीच्याही पलीकडे जाणारा आहे, प्रतिगामी आणि पुरोगामीवादांच्याही सीमा ओलांडणारा आहे. म्हणजेच प्रतिगामी आणि पुरोगामीच्या मधील सीमारेषा पूर्णपणे नाहीशा झालेल्या आहेत याचा ते स्पष्ट भाषेत समाचार घेतात. पुरोगामी कोण आणि प्रतिगामी कोण? हे ठरविण्याचा जेव्हा निर्वाणीचा क्षण येतो त्यावेळी आपणास आंबेडकरांकडेच धाव घ्यावी लागते तशी ती धाव मनोहरांनी अगदी प्रांजळपणे घेतलेली दिसते. प्रांजळपणा हा दस्तुरखुद्द आंबेडकरांच्या साहित्यातून आणि साहित्य सिद्धांतातून आपणास दृगोचर होतो. मनोहरांच्या कवितेत हा प्रांजळपणा म्हणजे काव्यात्म रूप म्हणूनच येतो. या काव्यात्मक प्रांजळ रूपाबरोबर मनोहर यांचा एक कवी म्हणून सर्वांत अधिक बदल, सर्वांत अधिक विकास झालेला दिसतो तो त्यांच्या नंतरच्या परिपक्व कवितांमध्ये आढळतो.

काव्यभीमायन हे सकृतदर्शनी जेवढे सुलभ काव्य वाटते तेवढे ते सुलभ नाही किंवा मनोहर यांना जे केवळ शब्दप्रभू म्हटले जाते त्या अर्थाने ते शब्दप्रभूही नाहीत किंवा त्यांनी आपण आंबेडकरवादी ठरू किंवा न ठरू याची कधीही पर्वा केली नाही किंबहुना त्यांनी आपल्या निर्मितीचा पान्हा कधी चोरला नाही तर याउलट मनोहरांनी आंबेडकरांच्या शब्दांनी 'माणसे चेतताना, भुसा भरलेले कणे ताठ होताना, बंदिवान रक्त उसळताना, मगरूर वाटा नम्र होताना, लाचार ओसडी बाणेदार होताना, दुःखे संघर्षासाठी उतरताना', इत्यादी अनेकविध प्रतिमांच्या निवडीतून माणसे पाहिली. आंबेडकरवादी चौकट स्वीकारणे म्हणजे कोणत्याही सापळ्यात अडकणे नव्हे. संविधानाच्या चौकटीत प्रतिमा घडविणे म्हणजे सापळा नव्हे. ज्या लोकांनी संविधानाचा अभ्यास केलाय तेसुद्धा जर मनोहरांच्या संविधानाच्या चौकटीला सापळा मानत असतील तर प्रतिगामी आणि पुरोगामी यामधील धूसर का होईना ती रेषा होती तीसुद्धा नष्ट झालीय असे म्हटल्याशिवाय गत्यंतर राहात नाही. खरे तर आंबेडकरवादी प्रेरणेचे साहित्य निर्मिती करणे म्हणजे खऱ्या अर्थाने विद्रोही साहित्य निर्मिती करणे. मनोहरांनी अशा विद्रोही कविता निर्मिती करताना समाजजीवनात काय बिघडले आहे ते दाखवून रोगाचे निदान तर केलेच आहे; पण त्यावर इलाजसुद्धा सांगितलाच आणि स्वतः प्रत्यक्षात इलाज करवून दाखवला. काव्यभीमायनची निर्मिती म्हणूनच दीक्षाभूमीकडे केवळ भावनिक, शाब्दिक अंगाने झाली नसून ती त्यांच्या आंतरिक गरजेतून झालेली आहे. त्यासाठी आपण (मनोहर) आंबेडकरवादी ठरलो तरी कशाचीही पर्वा करण्याची गरज मनोहरांना भासत नाही. जगभरात मार्क्सवादी म्हणून अभिमानाने अनेक लेखक, विचारवंत स्वतःची ओळख करून देतात तर भारतातील कोणताही माणूस संविधानाची फळे चाखत असेल तर त्याला आंबेडकरवादी म्हणवून घेण्याची लाज कसली? अरुंधती रॉय (२०१४:१७) जेव्हा म्हणतात की, 'तुम्हाला जर मलाला युसूफभाईचे नाव माहीत असेल आणि सुरेखा भोतमांगेचे नाव माहीत नसेल तर आंबेडकर वाचा', तेव्हा त्या भारतीय समाजाच्या रोगाचे निदान करून इलाज करू पाहतात. भारतीय समाजाच्या रोगाचे खरे निदान आंबेडकरांनी केले होते आणि त्यांनी सांगितलेला बुद्धाचा मार्ग हा जालीम उपाय होता. धर्मांतर किंवा बुद्धवापसी म्हणजे अतिशय उच्चतम अशी अँटीबायोटिक्स आंबेडकरांनी दिली आहेत की आता किरकोळ औषधांचा काहीही उपयोग होणार नाही. आंबेडकरांनी Annihilation of Caste हे

अत्युच्च अँटीबायोटिक बाहेर काढल्यावर साक्षात गांधींनासुद्धा आंबेडकरवादी व्हावे लागले. गांधींनी सहभोजन तर घडवून आणलेच पण ते आंतरजातीय विवाहाशिवाय अन्य जातीअंतर्गत विवाहास हजर राहात नव्हते आणि ते त्यांनी निक्षून पाळले होते. गांधी शेवटी म्हणाले की 'जात ही आध्यात्मिक आणि राष्ट्रीय विकासासाठी हानिकारक आहे.' राहता राहिला मुद्दा तर तो हिंदू धर्म त्यागाचा. गांधी म्हणाले, 'धर्मशास्त्रे जर विद्यमान अस्पृश्यतेला आधार देत असतील तर मी स्वतःला हिंदू म्हणवणे सोडून देईन असे जे मी म्हणालो होतो तेव्हा मला खरोखरच ते अभिप्रेत होते. त्याचप्रमाणे जर धर्मशास्त्रे आज आपल्याला माहीत आहेत तितक्या हिडीसपणे जातीला पुष्टी देत असतील तर मी स्वतःला हिंदू म्हणविणार नाही.' (आंबेडकर, २०१५ :७५) गांधींचा फाळणीनंतर पाकिस्तानाला राहायला जाण्याचा निर्णय म्हणजे धर्मांतरच म्हणता येईल.

भारतीय समाजाचे दुखणे आंबेडकरांना नेमकेपणाने समजले होते ते जर पाहायला मार्क्स असता तर तोसुद्धा आंबेडकरवादी झाला असता. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनने आंबेडकरांची अँटीबायोटिक्स घेतली असती तर आजचा आजारी भारतीय समाज दिसला नसता. आंबेडकरांनी 'मुक्ती कौन पथे?' या भाषणात आर्थिक उन्नती की धर्मांतर यात धर्मांतराची निवड केली होती. ती निवड त्यांनी आध्यात्मिक उन्नती म्हणूनसुद्धा मानली होती. आज लिंगायत समाज हिंदू धर्मापासून स्वतंत्र होऊ पाहतोय, १९७५ च्या दरम्यान जैन समाजसुद्धा हिंदू धर्मापासून मुक्त झाला होता. लिंगायत बसवेश्वराकडे जाऊ पाहताहेत, जैन महावीरांकडे कधीच गेलेत, आंबेडकरांना केळूसकर या कुणबी (मराठा) विद्वानाने बुद्धाचा मार्ग शिकवला होता. त्याची परतफेड म्हणून आंबेडकरांनी Brahman and Kshatriya and counter Revolution मधून मराठ्यांना बुद्धाचा मार्ग सांगितलाय तो खरा मराठ्यांच्या आणि भारतीय रोगट समाजाच्या मुक्तीचा मार्ग आहे. आरक्षण हा कुणाच्याच मुक्तीचा मार्ग नाही. उलट आरक्षण ही एक आधुनिक गुलामगिरी आहे.

आंबेडकरांच्या विचारप्रणालीच्या आश्रयाखाली साहित्यनिर्मिती रोगट होत नसून रोगमुक्त करणारी आहे. आंबेडकरांना स्वीकारणे म्हणजे संविधानाची चौकट पाळणे किंवा ती चौकट पाळली जात नसेल तर विद्रोह करणे होय. यशवंत मनोहरांची काव्यभीमायनची सर्जनशीलता या प्रकारातली आहे. ही सर्जनशीलता आंबेडकरांच्या बंधनात अडकलेली नसून आंबेडकरांचा विचार वाहून नेऊन दुनियेला मुक्तीचा मार्ग सुचविणारी आहे. मनोहरांना सर्जनाचा पान्हा फुटतोच: पण ते दुसऱ्यांच्या सर्जनालासुद्धा पान्हा फुटायला लावतात. आंबेडकरवादी ठरणे किंवा न ठरणे ही भीती भामट्या मार्क्सवाद्याला किंवा भामट्या आंबेडकरवाद्यालाच असते.

आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतरचा २५ वर्षांचा कालखंड काव्यभीमायनमध्ये उभा करताना मनोहर यांनी आंबेडकरांनी मांडलेल्या भारतीय संस्कृतिसंघर्षातून त्यांचे (आंबेडकरांचे) व्यक्तिचित्रण अधोरेखित केलेले आढळते. हे व्यक्तिचित्रण नवनैतिक जाणिवेतून चितारलेले असल्यामुळे जुनी खोटी नैतिकता आणि नवी खरी नैतिकता स्पष्टपणे दृगोचर होते. मनोहरांच्या शब्दांत सांगायचे झाले तर 'तोंडात चांदीचे चमचे घेऊन येणारांची' ती जुनी नैतिकता आणि 'पायाखाली आग घेऊन येणारांची' ती नवी नैतिकता. या दोन परस्परविरोधी संस्कृतींचा संघर्ष मनोहरांनी नेमकेपणाने व्यक्त करत 'तू जोडलेस आम्हाला जगातल्या दुःखमुक्तीच्या परंपरांशी' असे ठणकावून सांगत स्वतःला ते बुद्ध परंपरेशी जोडून घेतात. माणसाने माणसावर प्रेम करावे या तत्त्वज्ञानातूनच नीतीचा उगम होतो. ही नीती पवित्र आणि सर्वसमावेशक होण्यासाठी आंबेडकरांनी दुर्बल माणसांचे रक्षण करून व्यक्तीच्या विकासाला कशारीतीने अग्रक्रम दिला याचे वर्णन काव्यभीमायनमध्ये असंख्य प्रतिमा आणि प्रतीकांचा वापर करून केल्यामुळे मनोहरांना शब्दप्रभू म्हणून काव्यजगतात मान्यता मिळाली असली तरी या त्यांच्या शब्दांच्या पेरणीत मनोहरांच्या विचारसरणीत आंबेडकरांचा ध्यास अग्रस्थानीचा आहे.

जोतीराव फुले यांच्या साहित्याचा कणा हा नीतीवर आधारित आहे. पुढे आंबेडकरांनीसुद्धा नीतीलाच महत्त्वाचे स्थान दिले. मनोहरांची नवनैतिकता ही फुले आणि आंबेडकरांची नवनैतिकता आहे. फुल्यांनी रामायणातील नीती कशी खोटी, दांभिक, काल्पनिक आणि असंभवनीय आहे हे जसे दाखविले तसे आंबेडकरांनीसुद्धा हिंदुवादाचे गूढ उलगडून दाखविले. राम आणि कृष्णाचेसुद्धा गौडबंगाल आंबेडकरांनी नवनैतिकतेच्या बळावर उघड केले. त्याचप्रमाणे

मनोहरांना वाटतं की 'चौदा वर्षेकुण्या वेड्या आईच्या हट्टाखातर राम हा व्यवस्थेचा कैवारी म्हणून वनवासात जातो त्यावर जे काव्य लिहिले जाते त्याला महाकाव्य म्हणतात' पण आंबेडकरांनी ६५ वर्षेज्या यातना (वनवास) भोगल्या त्यावर मनोहरांना महाकाव्य रचण्याची जी प्रेरणा मिळाली ती त्यांच्या नवनैतिक जाणिवेतूनच मिळाली म्हणून मनोहर रामायणावर प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हणतात :

आणि लाखो वर्षे वनात कुजलेल्या
आम्हावर,
आमच्या खांडवनातील हिरोशिमावर
दोन आसवे ढाळण्याइतकी माणुसकीही
सत्तेपुढे नागवे नाचणाऱ्या
कुणा प्रतिभेने ढाळली नाही (पृ.३९).

रामायणावरील प्रतिक्रियात्मक विद्रोही काव्यरचना काव्यभीमायन या रूपात साकार करीत असताना मनोहरांनी त्यातील सगळा अनुभवाशय वास्तवातून आणि सत्यशोधनातून टिपल्यामुळे त्यात काल्पनिक, दांभिक आणि असंभवनीय अशा कोणत्याही अभिनिवेशी वृत्तींना थारा मिळत नाही. मनोहर स्वतःशी संवाद करता करता आंबेडकरांशीही संवाद करतात. त्यांच्या मूल्यांशी, त्यांच्या संघर्षाशी आणि समाजाशी एकाचवेळी असंख्य प्रतिमा आणि प्रतीकांच्या साहाय्याने सहजपणे व्यक्त होत जातात. 'तू चवदार तळे आणलेस ताळ्यावर', 'मनुस्मृतीचे मढे ठेवले चितेवर', अशा स्वरूपाच्या तालबद्ध प्रतिमांनी हे काव्य खचाखच भरलेले आढळते. आंबेडकरांच्या जन्मापासून ते निर्वाणापर्यंतचे काही प्रसंग, घटना, प्रतिकार, युद्धसदृश संघर्ष इत्यादी प्रकारच्या विद्रोही आविष्कारातून काव्यभीमायन हा एक आधुनिक महाकाव्याचा नमुना म्हणून सादर करण्याचा हा एक मनोहरांचा प्रयत्न आहे.

आंबेडकरांचा जीवनसंघर्ष हा खरे तर महाकाव्याच्या तोडीचा आहे हे कुणालाही नाकबूल करता येणार नाही. महाडचा मुक्ती संग्राम, काळाराम मंदिर संघर्ष, सायमन कमिशनशी झटापट, गांधींशी युक्तिवाद, मनुस्मृतीचा एल्गार, धर्मांतराची दिशा इत्यादी अनेक संघर्षमय कहाण्यांनी भरलेली आंबेडकरांची जीवनगाथा न्यायाच्या संकल्पनेवर उभी राहिलेली आहे याची मनोहरांना पूर्ण जाणीव आहे. त्यांनी अनेक ठिकाणी प्रतिक्रियात्मक स्वरूपाचे काव्यभीमायनमध्ये मांडलेसुद्धा आहे. याच न्यायाच्या संकल्पनेतून आलेली स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही तत्त्वे मनोहरांनीसुद्धा आयुष्यभर उराशी बाळगली आहेत. याही बाबतीत कोणतीही शंका घेता येणार नाही. तथापि मनोहर आंबेडकरांची जीवनगाथा महाकाव्याच्या रूपात, मग ते गद्यमय असो अगर पद्यमय असो! रचण्यात यशस्वी झाले आहेत असे म्हणता येणार नाही. पारंपरिक महाकाव्याचे स्वरूप जरी नजरेआड केले तरीसुद्धा मनोहरांना आंबेडकर समग्रपणे मांडता आला नाही. अत्यंत भावनावेगाने अनेक प्रसंग, घटना, संघर्ष, व्यक्तिगत आणि सामाजिक संदर्भ या काव्यभीमायनमध्ये अपेक्षित असूनसुद्धा त्यांनी ते केवळ भावनिक अभिव्यक्तीला प्राधान्यक्रम दिल्यामुळे त्यांच्या हातून ते निसटले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु भीमायन हे महाकाव्याकडे घेऊन जाण्याचा त्यांचा प्रयत्न मात्र लक्षणीय असा आहे. नवीन पिढीने अशा प्रकारचे भीमायन रचण्याची दिशा देणारे आहे असे मात्र निश्चितपणे म्हणता येते.

आंबेडकरांची जीवनगाथा मांडणारे काव्य असो अगर गद्यातील चरित्र असो ते केवळ भावनेवर आधारलेले नसून त्याला बळकट अशी विचारसरणी अपेक्षित आहे. केवळ भावनेवर आधारलेले जीवनचरित्र (biography) न होता ते गौरवगाथा (hagiography) बनते. आंबेडकरांची बहुतांश चरित्रे ही गौरवगाथेच्या स्वरूपातच सापडतात. मनोहरांनी त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणातून, प्रखर मूल्यभानातून आणि आंतरदृष्टीने आंबेडकर, आंबेडकरवादी आणि भामटे आंबेडकरवादी (pseudo Ambedkarites) यांच्या-विषयीचे सत्यशोधन करून त्याला एका प्रदीर्घ चिंतनाचा आधार दिल्यामुळे काव्यभीमायन हे गौरवगाथा होण्याचा धोका टाळलेला आहे.

आंबेडकर हयात असतानाच धनंजय कीर यांनी आंबेडकरांचे चरित्र लिहिले होते. ते चरित्र आंबेडकरांच्या हातात पडल्यावर त्यांनी त्यातील अनुक्रमणिका पाहिली, काही पाने भराभरा वाचली आणि हसत हसत म्हणाले, 'Dhananjay Keer did meet me twice or thrice for clearing some points in relation to certain eventss, but this is not all that he has written. It is a long...long... very long and an endless story. Nobody knows and nobody can write it. Any how he has made an attempt' (Rattu, 2001 :220).

आंबेडकरांनी धनंजय कीर यांच्याविषयी शेवटी म्हटले तसे मनोहरांच्या बाबतीतसुद्धा आंबेडकर म्हटले असते की, 'Yashwant Manohar has made a better attempt'. अर्थात कीर यांनी लिहिलेले चरित्र कमी महत्त्वाचे नाही. कीरांनी लिहिलेले आंबेडकरांचे चरित्रसुद्धा अत्यंत महत्त्वाचे, 'full length, up-to-date, authentic and interesting biography', अशी टिपणी नानकचंद रत्तू यांनी केलेली आहे. परंतु आंबेडकर जेव्हा म्हणतात की, 'It is a long...long...very long and an endless story' तेव्हा आंबेडकरांची जीवनगाथा, आंबेडकरांचे बनून राहिलेले महाकाव्य अद्यापि संपलेले नाही असा निष्कर्ष जो आताच्या काळात महत्त्वपूर्ण असा ठरतो, त्याविषयीचे चिंतन आपणास काव्यभीमायनमध्ये आढळते. नानकचंद रत्तू यांच्या Reminiscences and Rememberances of Dr. B. R. Ambedkar या पुस्तकाने आंबेडकरांच्या आत्मचरित्राची थोडी का होईना ही उणीव भरून काढली आहे. नानकचंद रत्तू यांनी बाबासाहेबांचे त्यांच्या अनुयायांसंबंधीचे अनुभव कथन केले आहेत त्याहीपेक्षा गंभीर आणि विदारक असे अनुभव मनोहर यांनी काव्यभीमायनमध्ये चित्रित केलेले असल्यामुळे हे काव्य गौरवगाथा न होता आंबेडकरांच्या an endless story च्या कथनास प्रारंभ करते. 'आंबेडकर एक व्यक्ती नसून एक विचार आहे' असे जेव्हा आपण एक ढोबळ विधान करतो ते विधान मनोहरांनी ढोबळ न करता भीमायन ही एक continuous creative process, सातत्याने चालणारी सर्जनशील प्रक्रिया आहे हे सिद्ध करून दाखविले आहे.

आंबेडकरांच्या अनुभवातील आशय आणि मनोहरांच्या काव्यभीमायनमधील आशय यांची तुलना करून पाहता लक्षात येते की आंबेडकरांची एक अभेद्य अशी मानवी साखळी तयार करायची होती; परंतु दुर्दैवाने ती निर्माण होऊ शकली नाही हे खुद्द आंबेडकरांनीच जे नमूद करून ठेवलेले आहे तेच मनोहर आपल्या काव्यभीमायनमध्ये भावनिक पातळीवरून सांगतात. आंबेडकर म्हणाले होते, 'जे काही मी मिळवू शकलो त्याचा फायदा मूठभर सुशिक्षितांनी घेतला आहे. पण त्यांचे विश्वासघातकी वागणे आणि दलित शोषितांबद्दलची त्यांची अनास्था पाहिल्यावर ते फारच नालायक निघाले असेच म्हणावे लागते. ते माझ्या कल्पनाशक्तीच्या पलीकडे गेले आहेत. ते फक्त स्वतःसाठी आणि त्यांच्या व्यक्तिगत फायद्यांसाठीच जगतात. त्यांच्यापैकी एकही जण सामाजिक कार्य करायला तयार नसतो. ते आत्मघातांच्या वाटेने निघाले आहेत. मला आता माझे लक्ष खेड्यातल्या हजारो-लाखो निरक्षर लोकांकडे वळवायचे होते. ते अजूनही हालअपेष्टा भोगत आहेत.' (नानकचंद रत्तू, १९९८ २२८).

आंबेडकरांची ही एक सलग, सातत्यपूर्ण अशी जीवनगाथा मनोहरांनी काव्यात पकडण्याचा प्रयत्न करताना आंबेडकरांचाच अनुभव त्यांनी व्यक्त केला आहे. उदाहरणार्थ,

हे तुझे जगावेगळे बापपण दारूला कळणार नाही
लुटारूला कळणार नाही
दैन्याच्या अज्ञान भांडवलावर
आपल्या नेतृत्वाचे अखंड पीक घेणाऱ्या
एरव्हीच्या नापिकांना कळणार नाही
आयुष्याचा घाऊक व्यापार करणाऱ्या
कुण्या नाम्या-गोम्याला कळणार नाही (पृ.५३)

आंबेडकर जेव्हा त्यांचे स्वतःचे जीवन हे न संपणारे कथानक म्हणून वर्णन करतात, त्याची आठवण काढली तर आपणास गांधी आणि आंबेडकर या दोघांनीही पंचशीलाचे आचरण करूनसुद्धा ज्या वेदना त्यांच्या वाट्याला आल्या त्या वेदनांचे कथानक असेच चालू राहील अशी संतापजनक प्रतिक्रिया मनोहर व्यक्त करतात. गांधींनंतर दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश यांची ही कथा अशीच चालत राहणार. आंबेडकरांच्या नावावर दैन्य, अज्ञान असे भांडवल वापरून आंबेडकरांच्या विचारप्रणालीचाच बाजार करणाऱ्या भामट्या आंबेडकरवाद्यांचा मनोहर समाचार घेतात. यात नामदेव ढसाळसारख्या श्रेष्ठ म्हणून नावाजलेल्या कवींचासुद्धा ते उल्लेख टाळत नाहीत इतके ते भावनावश होऊन व्यक्त होतात. मनोहरांची चीड अशी आहे की वाल्मीकी रामायणाला पर्याय असे भीमायन उभे करण्याची भाषिक आणि प्रत्यक्ष कृती करायची सोडून भीम-शक्ती आणि शिवशक्तीच्या एकीचा नारा लावून नामदेव ढसाळांची कविता बाळ ठाकरेंच्या रूद्राक्षामध्ये गुंडाळली जाते आणि दुर्दैवाने कळस म्हणून ढसाळांना वाल्मीकीशरण कविता लिहावी लागते. आम्हाला ढसाळ हा नामदेव ढसाळ पाहिजे 'वाल्मीकी' ढसाळ नको अशी मनोहरांची एकंदरीत धारणा आहे. त्यातल्या त्यात कळस म्हणजे रावसाहेब

कसबेंसारखे विचारवंतसुद्धा भीमशक्ती आणि शिवशक्तीच्या एकीकरणाचे पोवाडे गातात तेव्हा रामदास आठवले यांच्यासारख्या सामान्य माणसाने आंबेडकरवादी लोकशाही समाजवाद आणि हिंदू राष्ट्रवादाच्या दोन्ही तलवारी एकाच म्यानात ठेवल्यास आश्चर्य का वाटावे? म्हणून Nobody can write Ambedkar's biography ह्याच खुद्द आंबेडकरांच्या विधानाशीच आपणास सहमती दाखवावी लागते, तेव्हा मनोहर म्हणतात :

क्रांतिमंता कुंपणांनीच खाल्ले आहे रे शेत
जे मोहोरत होते तुझ्या घामाश्रमात (पृ.४५)

मनुस्मृतीमध्ये शूद्रातिशूद्रांची नावे तुच्छतादर्शक असावी असा दंडक होता. त्याला आव्हान देऊन आंबेडकरवादी प्रेरणेने तशी नावे न ठेवता 'प्रत्येक लेकराच्या नावात, क्रांतीची, करुणेची आणि बुद्धिवादाची सूत्रे असतात.' असे मनोहर भाबडेपणाने म्हणताहेत असं जरी वाटलं तरी नाव बदलून आंबेडकरद्रोह करणाऱ्यांनासुद्धा ते त्यांच्या खास शैलीतच धारेवर धरतात. जी. के. ऐनापुरे म्हणतात की 'ग्रेस ह्यांच्यावरील संस्कार असतील तर माणिक गोडघाटे ह्यांच्यावरील संस्कार कोणते? (२०१५ :५३) ऐनापुरे पुढे म्हणतात, 'सातत्याने पंचेचाळीस वर्षांपेक्षा अधिक काळ दुःखावर आपल्या कवितेतून बोलणारे ग्रेस बुद्ध परंपरेच्या, तत्त्वज्ञानाच्या आसपासही जात नाहीत (२०१५ : ३६) रावसाहेब कसबेंच्या भाषेत ग्रेस पान्हा चोरतात आणि कसबे दूध मागतात यशवंत मनोहरांकडे. ग्रेसने नावच बदलून नव्हे तर शब्दचलाखी करून आपण आंबेडकरवादी नाही हे दाखविण्याचा आयुष्यभर खटाटोप करून प्रसिद्धी मिळविली आणि त्याचसाठी त्यांनी आयुष्यभर दुर्बोधतेच्या नावाखाली आंबेडकरांचीच फसवणूक केली. मनोहरांची कविता थेट आहे, सुबोध वळणाची आहे, ती सच्ची आंबेडकरवादी आहे. उदाहरणार्थ,

दगडाला दगड, सडक्याला सडके, पशूला पशू
देवाला दगड, आम्ही घाणीला सौंदर्य मानत नाही.
हे आग्रही विवेकशास्त्र तू दिलेस.

मनोहर यांनी आंबेडकरांच्या वैचारिक वारशाचा चिरंतन अंश शोधण्याचा प्रयत्न काव्यभीमायनमध्ये करत असताना जे लोक या आंबेडकरांच्या वैचारिक वारशाला तिलांजली देतात त्यांचा त्यांनी कठोर, शेलक्या प्रतिमांच्या वापरातून समाचार घेतला आहे. उदाहरणार्थ,

चालला आहे मनःपूत वांझोटा बकवास
बरळत आहेत दैनंदिन तोंडे
चालली आहे शेणसड्याची उधळण
क्रांतीच्या नावाने (पृ.२७)

आंबेडकरांचा वैचारिक वारसा शोधत गेलो तर आपणास बुद्ध भारतात सापडतो याची पुरेपूर जाणीव असलेले मनोहर जेव्हा भामट्या आंबेडकरवाद्यांच्या उक्ती आणि कृतीचे सूक्ष्म निरीक्षण करतात तेव्हा त्यांच्या लक्षात आल्यावाचून राहात नाही की हे भामटे लोक सोयीनुसार बुद्ध भारतातून कधी हिंदू भारतात तर कधी ब्राह्मण भारतात अशा माकडउड्या मारत असतात. हिंदू भारत हा विदेशीशी नाळ जोडतो तर ब्राह्मण भारत स्वदेशीचा नारा लावतो. आंबेडकरांची प्रतिमासुद्धा विदेशी, पाश्चात्त्य मॉडेलची करण्याची त्यांची धडपड आंबेडकरांनाच हिंदू भारतात ढकलणारी असते. विदेशी म्हणजे आधुनिक अशी दिशाभूल करून बुद्धाची देशी परंपरा विसर पाडण्याचा हा प्रकार असतो. देशी परंपरा बुद्धाची, नागांची आहे. ब्राह्मण परंपरा वैदिकांची, ब्राह्मणांची आहे तर विदेशी परंपरा ही हिंदू परंपरा आहे असा व्यूह जर आपण आपल्या आकलनात ठेवून पुरोगाम्यांची चलाखी शोधण्याचा प्रयत्न केला तर भामटे पुरोगामी उघडे पडतात. मुदलात हिंदू परंपरा, हिंदू धर्म नाकारणाराच खरा पुरोगामी असतो हा मनोहरांच्या आकलनातील आंबेडकरांचा वैचारिक वारसा आहे. खरे पुरोगामी आणि खोटे पुरोगामी, सच्चे आंबेडकरवादी आणि भामटे आंबेडकरवादी असा रूपबंधच यातनादायी आहे याचे भान मनोहरांना असल्यामुळे त्यांना आंबेडकरांच्या वारशांचे सत्यशोधन करावे लागते. पुरोगामी म्हणवून घेणारे आंबेडकरांनी सांगितलेल्या तीन भारतात : ब्राह्मण भारत, बौद्ध भारत आणि हिंदू भारत कशारीतीने संचार करतात हे मनोहरांनी त्यांच्या आनुभविक सत्यशोधनातून कसे दाखविले आहे, ते पाहा :

परदेशातले चलन वापरणे इथे होते सोपे
पुरोगामी ठरायला ते होते सोयीचे
त्यामुळे जुने सोडायची नव्हती गरज
पुरोगामी न होताही पुरोगामी म्हणवण्याची

ही त्यांनी पाहिलेली सोय होती.
म्हणून त्यांनी दिवसा- मोर्चात केला उच्चार क्रांतीचा
आणि सायंकाळी भक्तिपूर्वक ते शिरले
सत्यनारायणाच्या पोथीत
त्यांच्या पोरापोरींच्या लग्नात वैदिक मंत्रानीच
त्यांना आधार दिले.
जातींच्या सीमांपाशी त्यांनी क्रांतीची कागदी घरकुले
सजवली.

मनोहरांची पुरोगाम्यांविषयीची ही उद्विग्नता म्हणजे आंबेडकरांच्या Annihilation of Caste चा काव्यात्म आविष्कार होय. सहभोजन आणि आंतरजातीय विवाह हेसुद्धा पुरोगाम्यांचे ढोंग आहे हे जात-पात तोडक मंडळानेच सिद्ध केले होते तर आताच्या पुरोगाम्यांची तर बातच करू नये. जातीअंत केवळ हिंदू धर्माचा त्याग करण्यातच आहे ही आंबेडकरांची विचारसरणी मनोहरांच्या आकलनातील असल्यामुळे त्यांनी पुरोगाम्यांचा पर्दापाश केला आहे. तुम्ही हिंदू धर्मात राहून जातिव्यवस्थेला विरोध कसा करू शकता असे म्हणणारे गांधीसुद्धा आंबेडकर विचाराने शेवटी आंबेडकरवादी झाले. पण पुरोगामी म्हणविणारे एका बाजूला जातीअंताची भाषा करतात आणि दुसऱ्या क्षणी पटकन हिंदू भारतात रममाण होतात. यावरून आंबेडकरांची जीवनगाथा मांडणारे काव्य लिहिणे किती अवघड आहे, हे आपल्या लक्षात आल्यावाचून राहात नाही. असे काव्यभीमायन रचण्याचा किमान यशवंत मनोहर यांचा प्रयत्न महत्त्वपूर्ण असा आहे.
मनोहरांचे आणि आंबेडकरांचे नाते त्यांच्या वयाच्या १३ व्या वर्षापासूनच दृढ झाले होते. त्या नात्याला शब्दबद्ध करण्याची सुरुवात त्यांनी मिलिंद महाविद्यालयापासून केली होती. 'युगंधरास', 'जयजयकार' आणि 'त्याच्या आठवणीशी डोळे भिडवताना', या दीर्घ कवितांपासूनच खऱ्या अर्थाने काव्यभीमायन सुरू होते. मनोहरांची कोणतीही आणि केव्हाही लिहिलेली कविता काव्यभीमायनचे एक उपाख्यान (episode) म्हणूनच येते आणि आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर २५ वर्षांनी, १९८२ साली, लिहिलेल्या काव्यभीमायनाशी आपसूकपणे जोडले जाते. उदाहरणार्थ, १९६८ साली 'भीमदीप'मधील 'जयजयकार' या कवितेत ते लिहितातः

चौदा एप्रिल हा दिवस इतिहासाचे वळण
एक जीवननिष्ठ महाकाव्याला इथून प्रारंभ (पृ.११)

मनोहरांची काव्यात्म ऊर्मी ही भीमायन हे महाकाव्य रचण्याचीच असल्याने त्यांच्या सुरुवातीच्या कवितासुद्धा दीर्घ कविता म्हणूनच उतरत राहिल्या आणि त्यांचा आशयसुद्धा आंबेडकरांची न संपणारी संघर्षमय जीवन कहाणी असाच राहिला आहे. या संघर्षमय जीवनाशी स्वतःला जोडताना मनोहरांना 'अपराध्यासारखे वाटते'. ही अपराधी भावना सामाजिक पातळीवर चळवळीतल्या राजकारणाचा भाग म्हणून अस्तित्वात येते. या अपराधी भावनेचा निचरा करत करत संघर्ष आणि परिवर्तनाच्या संधिसाधू राजकारणाच्या गदारोळात मनोहर आंबेडकरांची An endless story लिहीतच राहिले. लिहिता लिहिता आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणाला पन्नास वर्षे पूर्ण झाली. धम्मक्रांती आता पन्नास वर्षांची झाली.
आंबेडकरांचे महापरिनिर्वाण आणि धम्मक्रांतीनंतरच्या पन्नास वर्षांनी मनोहर अंतर्मुख होऊन भोवताल पाहतात तेव्हा 'आपण काय काय शिकलो?' याची जाणीव अधिक गडद होत जाते, अधिक चिंतनशील होत जाते. या पन्नास वर्षांची कमाई म्हणून मनोहर सांगतात :
प्रतीत्यसमुत्पादाच्या शाळेत जायला लागलो.
आम्ही काय शिकायचे नाही ते शिकलो
काय काय शिकायला हवे ते शिकलो.
आम्ही दुधातील पाणी निवडायला
आणि मधातील जहर अधोरेखित
करायला शिकलो (पृ. ६५)

मनोहरांच्या प्रतिमासृष्टीला केवळ 'शब्दसंग्रह' किंवा 'शब्दांची सर्कस' अशी शेरेबाजी करून हिंदू देवदेवता, कर्मविपाकाचे सिद्धांत आणि ब्राह्मण्यवादाचे रक्षण करू पाहणाऱ्या अवलगावकरांसारख्या थोर समीक्षकांना मनोहरांच्या प्रतिमासृष्टीची झेप आकलनात येण्याजोगी नसावी असे वाटते. प्रतीत्यसमुत्पादाची पाठशाळा काय शिकवते याचा थोडा जरी अंदाज आला तरी त्यांच्या 'दुधातील पाणी निवडणे' आणि 'मधातील जहर अधोरेखित करणे' याचा उलगडा आंबेडकरांच्या समग्र व्यक्तिमत्त्वातून आणि संघर्षातून तर होतोच होतो; पण आपण धम्मक्रांती संदर्भात जरी या प्रतिमा समजून

अनुक्रमणिका

घेतल्या तर अन्य सर्व मनोहरांच्या प्रतीके आणि प्रतिमांच्या वापराबाबतचा उलगडा होऊ शकतो. या प्रतिमा दुर्बोध तर नक्कीच नाहीत. याउलट सुबोध तर नक्कीच आहेत; पण त्यासाठी काव्य वाचणाऱ्याला आंबेडकरांच्या जीवनसंघर्षाची जाणीव असणे गरजेचे राहते.

मनोहरांचीच प्रतिमा वापरून आंबेडकरांच्या संशोधनाचे वर्णन करायचे झाल्यास असे म्हणता येईल की आंबेडकरांचे संशोधन किंवा सत्यशोधन हे 'दूध का दूध आणि पानी का पानी' याच पद्धतीचे होते. धम्मक्रांतीच्या संदर्भात आपण 'दुधातील पाणी निवडणे' आणि 'मधातील जहर अधोरेखित करणे' या दोन्ही प्रतिमांचा विचार केल्यास आपणास लक्षात येते की आंबेडकरांची धम्मक्रांती ही दुहेरी बंडखोरी होती. ती बंडखोरी एकाच वेळी हिंदू धर्माविरुद्ध आणि प्रस्थापित बौद्ध संस्थेविरुद्धसुद्धा होती. हिंदू धर्माविरुद्ध आंबेडकरांनी आयुष्यभर संघर्ष केला तेव्हा त्यांनी हिंदू धर्माच्या 'मधातील जातिव्यवस्थेचे जहर अधोरेखित केले.'धर्मांतर करतानासुद्धा आंबेडकरांनी प्रस्थापित बौद्ध संस्थेविरुद्ध बंडखोरी केली. आशिया खंडात पसरलेल्या आणि सरंजामी, लष्करी, भांडवलदारी राजसत्तांची पाठराखण करणाऱ्या प्रस्थापित बौद्ध भिक्खू संघाविरुद्ध ही बंडखोरी होती. अगदी धम्मदीक्षेच्या आदल्या दिवशी आंबेडकर भंते चंद्रमणी आणि इतर भिक्खू आणि वली सिन्हांच्या तोंडावर म्हणाले :

'मी बुद्धम् गच्छामी म्हणेन
मी धम्मम् सरनम् गच्छामी म्हणेन
पण संघम् सरनम् गच्छामी म्हणणार नाही.'

कारण संघ फार नीतिभ्रष्ट आहे, मी म्हणतो की तुम्ही मला दोनच शरणाने दीक्षा द्यावी. मी मनाचा निश्चय केला आहे.' (गोडबोले, २०१७ :१३६). यालाच म्हणतात 'दुधातील पाणी निवडणे.'

भारतातील महाबोधी या प्रसिद्ध नियतकालिकातील आणि ब्रह्मदेशातील लाईट ऑफ धम्म या मासिकातील 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथावरील टीका लक्षात घेता जगातील बुद्धिस्ट संस्थांनी बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथास मान्यता दिली नाही, याउलट बुद्ध आणि त्याचा धम्म असे शीर्षक असण्यापेक्षा आंबेडकर आणि त्यांचा धम्म असे असायला पाहिजे होते, असे त्यांचे म्हणणे होते. त्यांचे म्हणणे एका अर्थाने बरोबरच होते; कारण आंबेडकरांनी बुद्ध धम्मातील पाणी निवडून फेकून देऊन फक्त दूधच त्यातले घेतले म्हणून ते हीनयानही नाही आणि महायानही नाही तर ते नवयान आहे असे खुद्द आंबेडकरच म्हणाले होते. त्याला आता आपण भीमायनच म्हटले पाहिजे. मनोहरांनी ते भीमायन या रूपात आपणासमोर मांडले आहे. काव्यभीमायनच्या पानोपानी जी प्रतीके आणि प्रतिमा वापरल्या आहेत त्यांचा अत्यंत काळजीपूर्वक अभ्यास केल्यावर आपणास मनोहरांच्या प्रतिमासृष्टीचे सामर्थ्य लक्षात येईल.

मनोहरांची प्रतिमासृष्टी केवळ काव्याचा उत्सव साजरी करणारी नसून प्रदीर्घ अशा चिंतनातून वास्तव जीवनाला जोडणारी असल्याने मनोहर या चिंतनाचा आणि जगण्याचा सांधा प्रत्यक्ष जगतानासुद्धा जोडतात. 'दुधातील पाणी निवडणे' आणि 'मधातून जहर अधोरेखित करणे' या प्रतिमा मनोहरांनी त्यांच्या प्रत्यक्ष आचरणातसुद्धा आणलेल्या दिसतात. त्याचे अत्यंत उत्कृष्ट आणि महत्त्वाचे उदाहरण देण्याचा मोह इथे आवरत नाही. भालचंद्र नेमाडे यांनी जेव्हा 'साहित्यातील देशीयता' हा निबंध वाचला त्यावेळी एकमेव यशवंत मनोहर हे होते की त्यांनी मधातील जहर अधोरेखित केले. म्हणजे काय? तर मनोहरांनी स्पष्टपणे सांगितले की 'या निबंधाची मांडणी हिंदुत्ववादाकडे घेऊन जाण्याचा धोका संभवतो!' यशवंत मनोहरांची साहित्यिक जाण ही नेमाडेंसारखीच उच्च कोटीतली आहे, याचं हे उदाहरणच आहे. अर्थात नेमाडे यांनी त्याच निबंधात मनोहरांनी बजावलेला धोकासुद्धा स्पष्टपणे सांगितला होताच. मुद्दा एवढाच की रावसाहेब कसबे यांच्यासारख्या विचारवंतालासुद्धा याचा शोध लागायला पस्तीस वर्षे लागली. दरम्यान पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले होते. अनेक जण देशीवादालाच हिंदुत्ववादी ठरवून/शिक्का मारून मोठे समीक्षक झाले, कुणी कुणी सटरफटर पदे आणि पारितोषिके पटकावली. नेमाडे आणि यशवंत मनोहर या दोघांनाही दुधातलं पाणी कसं निवडायचं आणि मधातलं विष कसं ओळखयचं याचं पुरेपूर भान असल्यामुळे ते कधीही इतर विद्वानांसारखे भरकटले नाहीत. दोघांनीही पाणी बाजूला काढून दूध पीत राहिले आणि विष काढून टाकून मध चाखत राहिले. याउलट कसबेंसारखे विद्वान दूध बाजूला

काढून नुसतं पाणी पीत राहिले आणि मध चाखण्याऐवजी विष प्राशन केले. नेमाडे आणि मनोहर यांच्या युक्तिवादशास्त्रातूनच प्रस्तुत लेखकाने स्वदेशी (ब्राह्मण) - देशी (बुद्ध) - विदेशी (हिंदू) या भारतीय साहित्यातील त्रिस्तरीय संघर्षाची मांडणी आंबेडकरांच्या तीन भारताच्या सिद्धांतावर उभी केली आहे. हे तीन भारत म्हणजे ब्राह्मण भारत, बुद्ध भारत आणि हिंदू भारत. स्वदेशी-देशी-विदेशी या त्रिस्तरीय भारतीय साहित्याविषयी प्रस्तुत लेखकाने आंबेडकरवाद या पुस्तकात विस्ताराने चर्चा केली आहे. यशवंत मनोहर यांनी देशी (बौद्ध) संस्कृती बळकट करून देशीवादाचा विकास करण्यामध्ये महत्त्वाचे योगदान दिलेले आहे याची काव्यभीमायनमध्ये उत्तरार्धात प्रकर्षाने जाणीव होते.

काव्यभीमायनच्या उत्तरार्धात मनोहरांच्या मनावर आंबेडकर आणि बुद्ध धम्माची प्रतिमा अधिक तेजस्वी बनलेली दिसते. आंबेडकरांच्या आयुष्यातील उत्तरकाळात बुद्ध आणि त्याचा धम्म हीच मुख्य प्रेरणा बनली होती. राजकारण हे आंबेडकरांच्या आयुष्यातील महत्त्वाचा भाग जरी असला तरी त्यांनी उत्तरार्धात राजकारणाला दुय्यम स्थान दिले होते. मनोहरांनीसुद्धा उत्तरार्धात आंबेडकर संस्कृती बळकट करण्याचाच प्रयत्न केलेला आढळतो. उदाहरणार्थ, मनोहर म्हणतातः

क्रांतिनायका...!
आम्ही तुझ्या नावाने उभी केली एक प्रखर
संस्कृती
तिचे नाव ठेवले आम्ही
आंबेडकरसंस्कृती (पृ. ७३)

मनोहरांना आंबेडकरसंस्कृतीबद्दल इतका आत्मविश्वास उत्तरार्धात निर्माण झाला आहे की जागतिकीकरणाच्या फेऱ्यातून या देशाला आंबेडकरसंस्कृतीच वाचवू शकते अशी त्यांची भूमिका आहे. मनोहरांना वाटतं की जागतिकीकरणाचा हा डायनोसॉर दुर्बलांना गिळून टाकत आहे. त्याच्या पायाखाली गरिबांचे संसार चिरडले जात आहेत. पूर्वी अथेन्समध्ये ज्याप्रमाणे दुर्बल, अपंगांना मारून टाकले जात असे त्याप्रमाणे जागतिकीकरणाची शोषणसत्ता एकविसाव्या शतकात गरिबांशी अथेन्ससारखीच वागू लागली आहे. जागतिकीकरणाच्या फेऱ्यातून निसटण्यासाठी मनोहरांनी निर्माण केलेली प्रतिमासृष्टी पाहा :

जागतिकीकरणाच्या उतारावरून
स्मशानात अधिकच वेगाने गडगडत चालली आहे
दुनिया
आम्ही सांगतो या उतारावर उतारा आहे
सगळीच जमीन समपातळीत अंथरता येते (पृ. ८०)

मनोहरांना जागतिकीकरणाच्या अरिष्टांवर आंबेडकरप्रणीत लोकशाही-राज्य समाजवाद उतारा ठरू शकतो असा विश्वास वाटतो; परंतु आंबेडकरांच्या या राज्य समाजवादाला मनोहर धम्माच्या मार्गाने जाणारा सांस्कृतिक समाजवाद मानतात. आंबेडकरांच्या विचारव्यूहातील लोकशाही आणि राज्य समाजवाद ही संकल्पना बुद्ध आणि त्याच्या धम्माशी नाते सांगणारी देशी स्वरूपाची होती. आधुनिक समाजात चांगले आणि वाईट ठरविण्याचा मूल्यनिकष 'न्याय' आहे आणि न्यायावर आधारित भारतीय समाज हा बुद्धाकडेच घेऊन जाणारा आहे, याची मनोमन खात्री झालेले यशवंत मनोहर आंबेडकर आणि त्यांच्यामुळे नरकामध्ये जागलेली माणुसकी ही बोधिवृक्षाखाली जमा होऊ लागलेली आहे याच भावनेने म्हणतात :

क्रांतिनायका...!
तुझ्या बुद्धत्वाचे अवकाश
दिवसेंदिवस आता अधिकच असीम होत चालले
आहे.

धम्मदीक्षेच्या आदल्या दिवशी म्हणजे १३ ऑक्टोबर १९५६ ला 'हितवाद' या इंग्रजी दैनिकाच्या प्रतिनिधीने विचारले की बौद्ध धर्माचा स्वीकार केल्याने नवबौद्धांची आर्थिक परिस्थिती सुधारेल काय? तेव्हा आंबेडकर म्हणाले, 'स्वाभिमान गमावण्यापेक्षा उपाशी राहणे मला आवडेल. इज्जत ही प्रथम व सर्वाधिक महत्त्वाची आहे. आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांनी स्वतःच प्रयत्न करणे भाग आहे. हिंदूंचा किती पाठिंबा मिळेल हे त्यांच्या प्रवृत्तीवर अवलंबून आहे. परंतु पुढे येणाऱ्या कालावधीत सर्वच हिंदू बौद्ध धर्मात येतील. जाणिवेपासून किती काळ हिंदू हे फारकत ठेवून राहतील?.... ख्रिश्चन धर्म आपल्या अस्तित्वाकरिता जेव्हा संघर्ष करीत होता, तेव्हा गरीब लोकच पहिल्यांदा त्या धर्माचे अनुयायी झाले आणि वरच्या वर्गातील लोकांनी त्यांची उपेक्षा केली. येथेसुद्धा अशीच इतिहासाची पुनरावृत्ती होणार. परंतु सरतेशेवटी.

अनुक्रमणिका

मला वाटते, अखिल भारताला बौद्ध राष्ट्र व्हावेच लागेल आणि हिंदू कोणीही राहणार नाही.' (गोडबोले, २०१७ :१४७). आंबेडकरांच्या या विधानाचा अर्थ असा आहे की आंबेडकरांच्या जीवन संघर्षाची कहाणी अद्याप संपलेली नाही तर धम्मक्रांतीनंतर खऱ्या अर्थाने सुरू झालेली आहे. यशवंत मनोहरांनी आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणाच्या पंचवीस वर्षांनंतर लिहिलेले काव्यभीमायन अपूर्णच होते, त्यानंतर पन्नास वर्षांनी लिहिलेले काव्यभीमायनसुद्धा अपूर्णच राहिले आहे.

लिखित साहित्य परंपरेपेक्षा मौखिक साहित्य परंपरेचं टिकून राहण्याचं सामर्थ्य जास्त असते आणि मौखिक परंपरेचा वैश्विक बनण्याचा कल मोठ्या प्रमाणात असतो. मौखिक प्रसाराचे महत्त्वाचे उदाहरण म्हणजे रामायण आणि महाभारत होय. एक ब्रिटिश अधिकारी भारतात नोकरीला येण्यापूर्वी भारतीय संस्कृती समजून घेण्यासाठी रामायण आणि महाभारत वाचून भारताला आला. भारतात आल्यावर त्याच्या असे लक्षात आले की भारतातल्या कुणीच रामायण आणि महाभारत वाचलेलं नाही; पण या भारतीयांच्या तोंडी रामायण आणि महाभारतातल्या सर्व कहाण्या तोंडपाठ आहेत. पूर्वी पोथ्यापुराणे वाचत असत त्यातूनही कहाण्या टिकत असत. आता इलेक्ट्रॉनिक माध्यमांमुळेसुद्धा त्या कहाण्या लोकांना जास्त माहीत आहेत.

भीमराव कर्डकांपासून ते वामनदादा कर्डकांसारख्या असंख्य लोककलावंतांनी भारतीय इतिहासाच्या सत्यशोधनातून आंबेडकरांनी मांडलेल्या बुद्ध आणि ब्राह्मण यांच्यामधील जीवघेण्या संस्कृती संघर्षाला केंद्रस्थानी ठेवून भीमायन रचण्याचा जो पाया घातला त्याच पायावर यशवंत मनोहरांचे काव्यभीमायन उभे आहे. मौखिक साहित्य संस्कृतीमधील कवी, गायक आणि कलावंतांनी आंबेडकरांना भीमा म्हणून साद घातली तशीच साद मनोहरसुद्धा घालतात. अशिक्षित स्त्रिया आंबेडकरांना बाबा म्हणून हाक मारतात तशीच मनोहर बाबांना हाक मारतात. तरीही यशवंत मनोहरांना वामनदादांप्रमाणे श्रावण यशवंते किंवा कृष्णा शिंदे जसे गायक मिळाले तसे मिळाल्याशिवाय काव्यभीमायनचे मोठेपण लक्षात येणार नाही. काव्यभीमायन हे श्रेष्ठ काव्य आहेच; पण काळाच्या ओघात आंबेडकरांचेही महत्त्वही दिवसेंदिवस वाढतच आहे. म्हणून मनोहर म्हणतात :

दिवसेंदिवस वाढतच आहे तुझी उंची
तू होत चालला आहेस अथांग
आणि आमची मापे ठरत आहेत थिटी.

रामायण किंवा महाभारत ही महाकाव्ये काही एकट्या-दुकट्याने लिहिली नाहीत तसे भीमायन रचणे हेसुद्धा भारतीय समूहाने रचण्याचे काम आहे. मनोहरांनी केलेला प्रयत्न महत्त्वाचा आणि मौलिक असाच आहे. मनोहरांच्या लेखणीत आणि वाणीत मौखिक संस्कृतीने आळवलेला भीम आहे तसा त्यांच्या श्वासातही भीम आहे तोपर्यंत ते भीमायन रचत राहणार, असे मात्र निश्चितपणे म्हणता येईल. भीमायन ही एक आंबेडकरांची न संपणारी कहाणी आहे.


• • •

अशोक बावर, पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली - ४१६४०५



श्रद्धांजली...

पी. टी. लुले	वसंत नरहर फेणे
सुधा करमरकर	स्टीफन हॉकिंग
सुरेश पैठणकर	जेमिनी कडू
मनोहर तल्हार	नलिनी गोळवलकर
अनिल नितनवरे	पद्मश्री पानतावणे
श्रीदेवी	के. रं. शिरवाडकर





मूर्तिभंजन : वेदनेतून सर्जकता करणारी कविता

अक्रम पठाण

कवी यशवंत मनोहर यांच्या कवितेचा रंगमंचावरील प्रवेश हा रोमांचकारी स्वरूपाचा आहे. 'उत्थानगुंफे'ने एकूणच मराठी कविताप्रवाहाचा चेहरा पालटून टाकला. हे अगदी खरे आहे. 'उत्थानगुंफा' या कवितासंग्रहाने अनेक आव्हानांना आव्हान देऊन कवितेच्या प्रांतात स्वतःला सिद्ध केले आहे. आव्हानांना आव्हान वाटेल अशीच वैचारिक चिंतनाची बैठक या कवितासंग्रहात दिसून येते. याच काळात कवी यशवंत मनोहर यांनी एका हातात 'उत्थानगुंफा' आणि दुसऱ्या हातात 'मूर्तिभंजन' अशा दोन विचारसौंदर्यांना सहजपणे फुलविले आहे. या दोन्ही कवितासंग्रहांतील वैचारिकता ही आस्वादकांना अस्वस्थ करणारी आहे. या दोन्ही कवितासंग्रहांतील वैचारिकतेमुळे येथील सर्वसामान्यांना व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचे बळ मिळाले आहे हे नाकारता येत नाही. या दोन्ही कवितासंग्रहांतील आशयाने आस्वादकांना येथील मानसिकतेचे नीट आकलन व्हायला मदत मिळाली आहे. 'उत्थानगुंफे'तील विषय हा सामाजिक क्रांतीने ओतप्रोत आहे तर 'मूर्तिभंजन' या कवितासंग्रहातील आशय हा विफल प्रेमाने बहरलेला आहे. दोन्ही कवितासंग्रहांचा निर्मितिकालखंड हा वास्तविक पाहता एकच आहे. तांत्रिकदृष्ट्या 'मूर्तिभंजन' या संग्रहाचा प्रकाशन काळ हा १९८५ असला तरी, 'उत्थानगुंफा' आणि 'मूर्तिभंजन' या दोन्ही कवितासंग्रहांच्या निर्मितीचा काळखंड हा समांतर प्रवास करीत होता. कवी मनोहर यांच्या मनात एकाच वेळेस सामाजिक परिवर्तनाची आग आणि विफलतेची धग धुसमत होती. एकाच वेळेस प्रखरता आणि हळवेपणा या दोन्ही गोष्टींचा मनोरम फुलोरा त्यांनी फुलविला आहे. यशवंत मनोहर यांच्या दोन्ही कवितासंग्रहांचा विषय जरी वेगवेगळा असला तरी दोन्ही कवितासंग्रहांवर एकमेकांचा प्रभाव पडलेला आहे.

'मूर्तिभंजन' या कवितासंग्रहाची १४ एप्रिल १९८५ ला प्रथम आवृत्ती तर द्वितीय आवृत्ती १४ एप्रिल २००७ ला प्रकाशित झाली. 'मूर्तिभंजन' हा कवितासंग्रह दोन विभागांत विभागता येतो. पहिल्या विभागात विफल प्रेमाच्या कविता आहेत तर दुसऱ्या विभागात दाहक सामाजिक ज्वालाग्राही जाणिवेची विचारकविता आहे.

'मूर्तिभंजन' या कवितासंग्रहातील पहिल्या भागात विफल प्रेमाच्या कविता या सलग मालिकेप्रमाणे आहेत. विफल प्रेमाने कवीच्या तारुण्यसुलभ भावनेला कशा प्रकारे रक्तबंबाळ केले याची तरल जाणीव व्यक्त करणाऱ्या कविता आहेत. भग्नतेच्या भावनेतील क्लेश हा कवीला सतत बेचैन करीत आहे. त्यामुळे एक वेगळ्या पद्धतीचा ताण कवीच्या मनावर सतत आघात करीत आहे. या आघाताच्या स्थित्यंतरातून जे ताणाचे तरंग

उमटले ते मूर्तिभंजनाच्या दुसऱ्या भागात पाहावयास मिळतात.

मूर्तिभंजन : एक मालिकाकाव्य

'मूर्तिभंजन' या कवितासंग्रहातील पहिल्या विभागात आलेली कविता या विफल प्रेमकवितेची मालिका आहे. तर मालिकेचा प्रारंभ हा भावी जीवनाचे स्वप्न रंगविणारा आहे. तर मध्य हा संघर्षाचा आहे आणि शेवट हा विलगतेचा आहे. पहिल्या भागातील कविता सलग वाचल्या तर आस्वादकांच्या डोळ्यांसमोर एक मालिकाच येते. ही मालिका भग्नप्रेमाची मालिका आहे. ही मालिकाकविता म्हणजे भग्न स्वप्नाची कविता आहे. या मालिकाकाव्यामध्ये प्रत्येक क्षणाला कवीचे काळीज जळत आहे. जळत्या काळजाने लिहिलेल्या कविता 'मूर्तिभंजन' या कवितासंग्रहात आहे. कवितेतील आशय हा कवीच्या प्रत्यक्ष जीवनात घडलेल्या प्रसंगांना दिग्दर्शित करणारा आहे. या कवितेमध्ये कवीच्या उत्कट तरुणपणाची कथा आहे. तरुणपणाच्या उत्कट भावनेने कवीच्या जीवनावर किती आणि कसा परिणाम केला? या उत्कट भावनेने कवीला उद्ध्वस्त करून सोडले हे जरी खरे असले तरी कवी यशवंत मनोहर यांनी आपला पराभव स्वीकारला नाही. उपेक्षेच्या चक्रव्यूहातून बाहेर पडण्यासाठी त्यांनी कशी धडपड केली? सर्व दुःखाच्या चौकटी कशा तोडल्या? मरणाच्या दारातून स्वतःला कसे सोडविले? भग्नतेच्या भावनेला आपल्या रक्तातून कसे वेचून काढले? याचे संश्लेषण 'मूर्तिभंजन'मधील पहिल्या भागातील कवितेत पाहावयास मिळते. ज्या प्रेयसीवर जीव ओवाळून प्रेम केले त्या प्रेयसीने कवीच्या प्रेमाच्या प्रस्तावाला नाकारले; पण कवीचा प्रेमप्रस्ताव नाकारण्याचा निर्दयी निर्णय प्रेयसीचा मुळात नव्हताच. प्रेयसीच्या तारुण्यसुलभ मनाने जो निर्णय घेतला होता तोच तिचा खरा निर्णय होता. कवीच्या प्रेमात पडण्याचा प्रेयसीचा निर्णय हा तिच्या निर्मळ मनाने घेतलेला निर्णय होता. पण वर्गीय भावनेपुढे तिला तिचा निर्णय बदलावा लागला. आर्थिक, वर्गीय जाणिवेमुळे येथे निर्णय बदलला गेला. म्हणजे येथे आर्थिक आणि वर्गीय मनाच्या मगरुरीने तो निर्णय घेतला. अशा मगरूर मनाच्या निर्णयाने झालेली मनाची अवस्था कवी यशवंत मनोहर यांनी या कवितासंग्रहात मांडली आहे.

'मूर्तिभंजन' या कवितासंग्रहातील पहिल्या विभागातील कविता सलग वाचल्या की आपल्या लक्षात येते की, या कविता मालिकाकाव्याच्या स्वरूपाच्या आहेत. या सर्वच कविता भग्न मनाचा प्रवास पुढे नेताना दिसतात. भग्नतेच्या प्रवासात कवी यशवंत मनोहरांच्या भग्नतेचे वर्तुळ पूर्ण होते. त्यांनी आपल्या व्यथावर्तुळाजवळ थांबणे मान्य नाही. व्यथावर्तुळाजवळ थांबणे म्हणजे पराभवाशी दोस्ती करणे होय. पराभवाशी दोस्ती करणे हे कवी यशवंत मनोहरांच्या स्वभावातच मुळात बसत नाही. म्हणूनच त्यांनी या व्यथावर्तुळाला छेद देऊन मूर्तिभंजनाच्या दुसऱ्या भागात दाहक सामाजिक भावनेची कविता लिहिली. त्यांची दुसऱ्या भागातील कविता ही ज्याप्रमाणे फिनिक्स पक्षी राखेतून भरारी घेतो त्याप्रमाणे आहे. शून्यातून स्वतःचे भावविश्व निर्माण करण्याचा पुरावा देणारी ही कविता 'मूर्तिभंजन'च्या दुसऱ्या भागात आहे. स्वतःच्या अस्तित्वाची नीती कवीच्या कवितेने ठरविली आहे. कोणीही आर्थिक आणि वर्गीय जाणिवेच्या मगरुरीने आपला निसर्गदत्त स्वाभिमान हिरावून घेणार नाही याची डोळ्यांत तेल घालून कवीने काळजी घेतली आहे. वैचारिक गरिबी ही आपल्याला लाचार करणारी आहे. हे कवी यशवंत मनोहर यांना चांगल्या पद्धतीने माहिती असल्यामुळे त्यांनी आपल्या कवितेमधील प्रत्येक शब्दातून वैचारिक श्रीमंती पेरली आहे. त्यांनी आपल्या वैचारिक श्रीमंतीचे सूत्र 'मूतिभंजन' या संग्रहात मांडले आहे.

'शब्द माझे आंधळे भिक्षेकरी, जीव अंथरती तुझ्या वाटेवरी थांब केव्हा आसवांच्या उत्सवाशी, माळू दे मज चांदणे दुःखावरी' (थांब केव्हा : ७)

वरील ओळींमधून कवी यशवंत मनोहर यांनी आपली यातना अधिक समजूतदारपणे व्यक्त केली आहे. या यातनेतून त्यांनी आपल्या प्रेमभावनेचा समग्र अभ्यास केलेला आहे आणि यात काही दुरुस्तीही केलेली आहे. ती दुरुस्ती म्हणजे आपल्या दुःखावर चांदणे पसरविणे हे होय. प्रेमाच्या भग्नतेमुळे कवीने आपला संयम ढळू न देता आपल्या दुःखावर शीतल लेप लावलेला आहे. अर्थात येथे कवीने आपल्या दुःखांनाही समजूतदारीचा पाठ पढविलेला आहे. जिला आपल्यासाठी थांबायचे होते ती थांबण्याच्या मनःस्थितीत नाही म्हणून कवी स्वतः आसवांचा उत्सव साजरा करतो. हा उत्सव कवीला अधिक सुसंस्कृत

अनुक्रमणिका

आणि सभ्य करणारा आहे. हा आसवांचा उत्सव मगरुरीच्या गुहेला सुरुंग लावणारा आहे.

'बोलली नाही तुझी प्राजक्तगुंफा, डंख पंखातील नाही पाहिले
मी तरी वाऱ्यात नक्षी काढिली, आसवांनी श्वास मी शृंगारिले' (मी तरी : ८)

कवीला आपल्या प्रेयसीशिवाय जगणे अवघड वाटत आहे. प्रेयसीशिवाय कवी दुसरा विचार करीत नाही. ही सर्व तगमग प्रेयसीसाठी आहे असे विलक्षण चित्र कवीने आपल्यापुढे चितारले आहे. प्रेयसीच्या जाणिवेने कवी मोहरतो आहे. पण याच वेळेस त्याला प्रेयसी आपल्या जीवनाची सहप्रवासी बनणार नाही हेही ठाऊक आहे. तरी तिच्या प्रेमाची भुरळ कवीला पडलेली आहे. भौतिक सुखाच्या लालसेने प्रेयसीचे प्रेम आता कागदी फुलाप्रमाणे झाले आहे. कागदी फुलांमधून जसा सुगंध येत नाही, त्याप्रमाणे प्रेयसीच्या प्रेमाचीही अवस्था सुगंधविरहित फुलाप्रमाणे झाली आहे. तरी कवी वाऱ्यात प्रेमाची नक्षी काढण्यात दंग आहे. वाऱ्यात चितारलेल्या नक्षीचे सौंदर्य टिकणार नाही हे कवीला चांगल्याप्रकारे माहीत आहे आणि त्याचे दुःखही बोचणारे आहे याचीही कल्पना आहे. म्हणून कवी आपल्या आसवांनी आपल्या श्वासांना शृंगारत आहे. कवीने आपल्या श्वासांना आसवांनी का शृंगारले? तर वाऱ्यावर काढलेली नक्षी ही वाऱ्यासंगे उडून जाणार आहे. ज्या नक्षीला चितारण्यासाठी कवीने आपल्या आयुष्यातील मौलिक शक्ती पणाला लावली होती, ती नक्षी वाऱ्यासोबत उडून जातानाचे शल्य कवी कसे सहन करणार! म्हणून कवीने आपल्या श्वासांना आसवांनी शृंगारले आहे. हे करीत असताना कवीने आपले अस्तित्वच पणाला लावले आहे. ही घटना मनाला अधिक चटका लावणारी आणि अस्वस्थ करणारी आहे.

'कसे कळेना तुलाच केवळ, तुझ्यासाठी ओसरणारा मी, माझ्या प्राणांचा, हिरवा नथवर मोहर' (कसे कळेना :९)

वरील ओळींमधून स्पष्ट होते की प्रेयसीविषयी कवीच्या मनात किती अपार प्रेम आहे आणि या प्रेमाची व्याप्ती पटवून देण्यासाठी कवीला किती झगडावे लागते? तरी या प्रेमाची महती प्रेयसीला का आणि कशी कळत नाही असा प्रश्न कवीला पडतो. हे वैफल्य अत्यंत उत्कटपणे वरील ओळींमधून स्पष्ट होते. आपल्या प्रेयसीला आपल्या मनातील तगमग कळावी. या तगमगीतील आंदोलने नेमक्या शब्दांत कवीने वरील ओळींमधून मांडली आहेत. कवीच्या हृदयातील प्रेमभावना वारंवार उचंबळून येतात. आपण कशासाठी प्रेम केले? या प्रश्नाचे उत्तर कवीला हवे आहे. आपल्या प्रेमभावनेतील सौहार्दाची दिशाभूल का करण्यात आली? या प्रश्नाचे कवीला उत्तर हवे आहे. ही वेळ आपल्या कसोटीची आहे. या कसोटीच्या क्षणाच्या तपशिलाचे नवे आकलन आणि अन्वयार्थ कवीने व्यक्त केले आहे. येथे कवीचे मानसिक विश्व आणि भावनिक विश्व यात अंतर्विरोध नाही. कवी भ्रमाच्या विश्वात स्वतःला गुरफटून घेत नाही. म्हणून कवी यशवंत मनोहर यांची तीव्र प्रतिक्रिया वरील ओळींमधून व्यक्त होते. ही प्रतिक्रिया मानसिक आंदोलनातून निर्माण झालेली आहे. जगण्याच्या रणधुमाळीत कवीचे सर्व लक्ष प्रेयसीकडे केंद्रित झाले आहे. कवीचे प्रेम हे सत्य आहे. तरी प्रेयसीच्या वागण्यातून कवीच्या प्रेमातील सत्य हे निसटू पाहात आहे. याचा अन्वयार्थ वरील ओळींमधून दिसून येतो. कवीने प्रेयसीच्या वाटेवर नक्षत्रांच्या पायघड्या अंथरल्या; पण त्या पायघड्यांकडे हेतुपुरस्परपणे दुर्लक्ष करण्यात आले तेव्हा कवीला आपल्या प्रेमाचा पराभव झाल्याची कल्पना येते. कवी यशवंत मनोहरांना हे चांगल्या प्रकारे माहिती आहे की सत्याला कधीच पराभूत करता येऊ शकत नाही. सत्याला नाना तऱ्हेने विद्रूप करता येते. जेव्हा आर्थिक अभिनिवेश डोक्यात शिरतो तेव्हा सत्याकडे माणसे पाठ फिरविण्यात तरबेज होत असतात. हाच अनुभव येथे कवी यशवंत मनोहरांना प्रेमामध्ये आलेला आहे. प्रेयसीनेही आर्थिक अभिनिवेशाने एका सत्यप्रेमाला विद्रूप करण्यात हातभार लावलेला आहे. अशा विद्रूपतेच्या दलदलीतून कवीने स्वतःला बाहेर काढले आहे; आर्थिक सुलभतेमुळे आणि वर्गीय भावनेमुळे प्रेयसीला सहज सुखी होता आले; पण आपल्या ध्येयामुळे आपला प्रियकर दुःखी होता कामा नये याची तसदी घेणेही महत्त्वाचे होते.

'कसा कधी झालो वादळीचा वारा. दिशांचा किनारा पार झालो
हरवल्या वाटा अतिताच्या बनी, काट्यांच्या कुरणी फाटलो मी' (मृत्यूचा दत्तक : १४)

अनुक्रमणिका

'मूर्तिभंजन' या कवितासंग्रहातील पहिल्या भागातील आशय हा विफल आणि भग्न प्रेमाचा आहे; पण या विफल प्रेमातील आशयाने कवीला स्वतःचे परीक्षण करायला लावले. या विफलतेत एका वेगळ्या पद्धतीचा आवेग आहे. आवेगातील तीव्रतेच्या लाटालहरींनी कवीच्या जीवनाचा सागर हेलावून गेला. त्यामुळे कवीने आपल्या भूतकाळाची उलटतपासणी केली आहे. या उलटतपासणीने कवीला अधिक सजग केले आहे. आपली चूक काय? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याची पाळी कवीवर येते ही बाब अर्थपूर्ण आहे. आपली चूक नाही हे ठासून सांगण्याची हीच महत्त्वाची वेळ आहे असे कवी यशवंत मनोहर यांना वाटते. जीवनावर कोसळणाऱ्या आघातांचा चिंतनगर्भ आशय वरील ओळींमधून व्यक्त झाला आहे.

'तू विषण्णतेची छांदसी
की कल्पांताने आधीच झाली होतीस घामाघूम
तू करीत होतीस लगट दुःखाशी
सकाळ दुपार सारखी बोलत बसत अस्ताशी
दुःखाच्या वर्दळीसाठी तू घडवीत होतीस स्वतःला
पक्क्या सडकेसारखी
तुला माहीत होती काळीज फुटणारी घटिका
तरी मरणाऱ्या सावलीतील प्रारंभाशी तू झिम्मा
मांडलास
या सुखाने मला अधिकच करकचून
जळत्या मेघांशी धरले'

कवी यशवंत मनोहर नागपूर जिल्ह्यातील येरला गावचे. घरात अठराविश्वे दारिद्र्य! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी औरंगाबाद येथे शिक्षणाचे महाद्वार उघडले. या महाद्वारामुळेच कवीने औरंगाबाद गाठले. परक्या ठिकाणी प्रेयसीने कवीवर जीव ओवाळून प्रेम केले आणि कवीनेही प्रेमाच्या अजिंक्य आणि प्रगमनशील वृत्तीशी नाते जोडले. या नात्याने कवी भारावून गेला. स्वतःच्या गावापासून शेकडो मैल लांब असणाऱ्या प्रदेशात आपल्याला जपणारे कोणी आहे, या भावनेने कवीचे मन गदगदून गेले. पण कालांतराने कवीला प्रेयसीने दिलेला शब्द बेइमान ठरला. त्या वेळेस कवीला वाटते की आपल्या प्रेयसीला आपल्या परिस्थितीची सर्व हकिकत माहिती होती तरी जीवापाड प्रेम करण्याचे धाडस तिने का केले? हे धाडस होते की लहरीपणा? हा उत्कटतेचा भाव होता की तारुण्यसुलभ मोह? की कवीला मुद्दाम आपल्या नादी लावायचे होते? या सर्व गोष्टींचा शोध घेताना कवी म्हणतो की ताटातूट अटळ होती तर उगाच प्रेमाचा खटाटोप कशासाठी? विलगतेचे नियोजन आधीच ठरले होते तर मनातली पहाट कशासाठी होती? ताटातूट ही अटळ होती तर माझ्या गरिबीला का आधी कवटाळले? सोडून जायचेच होते तर जीव कशाला लावला? या सर्व गोष्टींच्या यातनांनी कवी सतत पेटत राहिला. कवी यशवंत मनोहरांनी आपल्या मानसिक कोंडीचे अत्यंत भेदक चित्र वरील ओळींमधून चितारले आहे. त्याचप्रमाणे वरील ओळींमधून मनोहर यांनी आपली खंबीर सहनशीलताही सिद्ध केली आहे. त्यांना शारीरिक आकर्षणापेक्षा साहचार्यातून जीवनात येणाऱ्या सुखदुःखांना सहन करीत, जीवनाचा आनंद घेत जीवन व्यतीत करायचे होते. जीवनातील वास्तव आणि संभाव्य वास्तव याची नीट कल्पना प्रेयसीला होती. तरी कवीच्या जीवनातील वास्तवतेच्या निखाऱ्यासोबत चालण्याचे धाडस दाखवून तिचे माघार घेणे हे न उलगडणारे कोडे कवीला सातत्याने बेचैन करीत आहे. वरील ओळींमधून कवीने आपल्या प्रेमाचा बोलका आशय मांडलेला आहे. कवी यशवंत मनोहर यांनी एकूणच आपल्या प्रेमकवितांमध्ये आपल्या प्रेमाची अब्रू जाईल किंवा स्त्रीत्वाचा अपमान होईल असा कोणताही शब्द वापरलेला नाही. त्याचप्रमाणे कोणताही अश्लील शब्द कवितेत येत नाही.

'तक्रार नाही तुझ्याबद्दल,
पुनःपुन्हा तर भेटतच असतेस,
माझ्या पडक्या क्षणांना
कधी लपेटती पाने होऊन
कधी पेटती फुले होऊन
आता मीच झालो आहे तीव्र तक्रार माझ्यासाठी'
(रस्ता संपला आहे : २९)

'रस्ता संपला आहे' ही एक दीर्घकविता आहे. या कवितेत कवी यशवंत मनोहरांचे मन प्रेयसीसाठी आतून आणि बाहेरून धुमसत आहे. दोघांनीही रंगवलेली दुनिया प्रत्यक्षात साकार व्हावी यासाठी कवीची एकूणच तगमग दिसून येते. एकमेकांच्या हातात हात घेऊन नव्या दुनियेत प्रवेश करायचा होता; पण ते शक्य झाले नाही. म्हणून कवीला प्रेयसी अपराधी वाटत नाही. ती

अनुक्रमणिका

आपल्या जीवन प्रवासातील सहप्रवासी बनू शकली नाही याचे कवीला शल्य आहेच. पण ती आपली सहप्रवासी का बनली नाही याचा शोध घेताना कवी प्रेयसीविषयी कोणतीही तक्रार करीत नाही; कारण प्रेयसीने घेतलेला निर्णय हा तिच्या निर्मळ मनाने घेतलेला निर्णय नव्हता हे कवीला माहिती आहे. म्हणून कवी म्हणतो की, जरी तू माझ्या नजरेआड असली तरी तू माझ्या अवतीभवतीच आहेस. तुझा आभास मला सातत्याने सावध करीत असतो.

'तू कदाचित विसरलीही असशील
हिरवा चाफा
आणि मी विसरलो आहे विसरण्याचे बळ
चाफा पेरून माझ्या हातात
कदाचित तू मोकळी झालीही असशील
आणि कैदी मी कायम तुझ्या अदृश्य हातात'
(हिरवा चाफा : ३९)

वर्गीय जाणिवे दोन प्रेमीजीवांपुढे मोठे संकट उभे केले. या महासंकटाने एक हृदय असणाऱ्या जीवांची फाळणी केली. कवीला प्रेयसीची ज्याप्रमाणे तीव्रतेने आठवण येते, तशी प्रेयसीलाही आपली आठवण येत असेल का? याचा अंदाज वरील ओळींमधून कवीने व्यक्त केला आहे. प्रेयसीविना आयुष्य अपूर्ण राहिल्याची खंत कवीने बाळगण्याची गरज नाही. कवी यशवंत मनोहर यांचे जीवन हे प्रेयसीविनाही यशस्वी झाले आहे. आज ते ज्या वैचारिक शिखरावर उभे आहेत ते यशोशिखर अचंबित करणारे आहे. आज कवीने स्वीकार आणि नकार यांचे प्रमाणशास्त्र विवेकवादाने आपल्या साहित्यात मांडले आहे. काय स्वीकारावे, काय नाकारावे याचे सूत्र त्यांच्या साहित्याने मांडलेले आहे आणि हे सर्व प्रेयसीची साथ नसतानाही मांडले आहे! जर प्रेयसी सोबत असती तर कवींचे जीवन समाधानी स्वरूपाचे असते. जीवन समाधानी असते तर कवीकडून विपुल साहित्याची निर्मितीही कदाचित झाली नसती. असे मला नम्रपणे वाटते; कारण काळाबरोबर सर्व संदर्भ बदलत गेले आहेत. कवी यशवंत मनोहर यांनी बदलत्या काळाबरोबर प्रवास केला आहे म्हणून त्यांच्या भग्न प्रेमाच्या भावनेला त्यांच्या जीवनाचे विभाजन करता आले नाही; आणि कवीनेही भग्नतेमुळे स्वतःच्या जीवनाचे विभाजन होऊ दिले नाही. कवीला वारंवार आपल्या भूतकाळाची तीव्रता जाणवते ही बाब वेगळी आहे. आठवणीच्या तीव्रतेत स्वतःला गुरफटून घेतल्याने भूतकाळाचे वलय अधिक घट्ट झाले असते आणि वर्तमानही घायाळ झाला असता म्हणून कवी यशवंत मनोहर यांनी निर्णायक वेळी आपल्या जीवनाला निर्णायक दिशा दिली आहे.

'कदाचित माझा तिरडीवरचा प्रवास
सुरू असताना येशीलही
कदाचित पत्रांच्या फांद्यांना बिलगून
आकांत मांडशीलही
हवी तेव्हा धरती फाटलीच नाही तर
आकाशाच्या राखेचे घर बांधशीलही
कदाचित...
अवसेला डोळ्यांचेही कोळसे झाले
तर पाचोळा पेटवून देशीलही' (कदाचित : १६)

वरील ओळींमधून यातना, क्लेश आणि दुःख यांची चाहूल वेगवेगळ्या स्तरांकडून व्यक्त झालेली आहे. आपल्या मृत्यूनंतर प्रेयसी येईल. या प्रकाशाच्या माणसाला आपण तरुणपणी नकार दिला याचा तिला पश्चात्ताप होईल. हा माणूस सरसर चढत गेला सूर्यापर्यंत आणि आपले आयुष्य पालापाचोळ्यासारखेच राहिले. आपण या कवीवरच अन्याय केला नाही तर स्वतःवरही अन्याय केला. या पश्चात्तापाच्या जाणिवेने कदाचित पालापाचोळ्याप्रमाणे स्वतःला जाळूनही टाकील असे आपल्या प्रेमाच्या खरेपणाने कवीला वाटते. त्याचा उलट प्रत्यय इथे येतो. कवी यशवंत मनोहर यांनी प्रेयसीविषयी घेतलेली भूमिका ही फार मोलाची वाटते. प्रेमात विफल झाल्यानंतर प्रेयसीला दोष न देता तिच्या असहायपणाचाही सन्मान करायला हवा हेच वरील ओळींमधून व्यक्त होते.

'हे मृत्यूचे महाकाव्य
दऱ्याखोऱ्यातील हवेत हृदय पसरतो
तुझे सातासमुद्रापार जाणे
हे असे मृत्यूची प्रस्तावना असणे
एका खेड्यात उगवलेली निर्मळ पहाट
तुझ्या मिठीच्या मध्यरात्री साष्टांग दुपार झाली
आणि सातासमुद्रापार बुडून मेली
हृदयातील कणाकणांत कल्पांत
ओंजळीत उभे वाळवंट' (मृत्यूचे महावाक्य : ३९)

कवी यशवंत मनोहर यांची प्रेमाची ओंजळ ही रिकामी का राहिली? याचे उत्तर 'मृत्यूचे महावाक्य' या कवितेत अधिक स्पष्ट होते. भग्न प्रेमाच्या विचित्र मिश्रणाचे कारण याच कवितेतून मिळते. ध्येयाच्या दिशेने जाणारा प्रवास हा निराशेच्या गर्तेत का गेला? कवीचे मन सतत का तडफडत आहे? या सर्व प्रश्नांचे उत्तर एकच आहे. ते म्हणजे प्रेयसीचे त्याच्या जीवनातून जाणे. त्यामुळेच अंकुरलेल्या भावनांची येथे कत्तल झाली.

'मूर्तिभंजन' या कवितासंग्रहातील पहिल्या विभागातील कविता या मालिकाकाव्य आहेत. या मालिका काव्यामध्ये विविध टप्पे आहेत. एकएक कविता ही एक स्वतंत्र कविता ठरते; पण या सर्व कवितांना एकत्र केले की एक महाविफल प्रेमाची मालिका उभी राहते. या संग्रहात पहिल्या भेटीपासून तर प्रेयसीच्या दुरावण्यापर्यंतचा सर्व तपशील आलेला आहे. या तपशिलात कवीचे मन रेंगाळत असले तरी या तपशिलापाशी कवी विसावा घेत नाही. हा तपशील भूतकाळ आहे याची जाणीव कवीला आहे. म्हणून कवीने विफल प्रेमाच्या तपशीलापासून क्षितिजांतर केले आहे.

मूर्तिभंजनमधील अभंग

कवी यशवंत मनोहर यांनी मुक्तशैलीबरोबरच काही छंदबद्ध कविताही लिहिलेल्या आहेत. मूर्तिभंजन या कवितासंग्रहामध्ये 'मोडलो मी नाही' या शीर्षकाचा एक अभंग आहे. या अभंगाचे शीर्षक बोलके आहे. 'मोडलो नाही' हा करारीबाणा या अभंगातून व्यक्त होतो. मोडण्याच्या सर्व शक्यता असताना किंवा मोडून टाकण्याची सामग्री असताना कवी मोडत नाही. कवीने 'मोडावे' ही नियतीचीही अपेक्षा होती. चारही बाजूंनी संकटे अंगावर येत होती. या संकटांचे तट कवीने उद्ध्वस्त केले आहेत.

'जिथे थांबला दिवस। तिथे थांबलो मी नाही;
कधी उसवले श्वास। तरी विसावलो नाही।।
(मोडलो मी नाही : ७३)

अभंगाचे दोन प्रकार असतात. लहान अभंग आणि मोठा अभंग. वरील अभंग हा लहान अभंग आहे. लहान अभंगात दोन चरण असतात. प्रत्येक चरणामध्ये सामान्यतः आठ अक्षरे असतात. वरील अभंगातही दोन-दोन चरण असून प्रत्येक चरणात आठ अक्षरे आहेत. वरील अभंग छंदबद्ध असल्यामुळे शब्दांत वेगळ्या पद्धतीचा नाद आहे. त्यामुळे शब्दांच्या आशयाला या नादाने अधिक समृद्ध केले आहे. 'शब्द आणि अर्थ' या दोन्ही गोष्टींमुळे अभंगाचा आकृतीबंध उठावदार व मोहक झालेला आहे. कवी यशवंत मनोहरांच्या वरील अभंगातील शब्द व त्या शब्दांतील अर्थ हे पारंपरिकतेला आव्हान देणारे आहेत. या अभंगातून व्यक्त होणारा विचार हा विद्रोहाचा विचार आहे. ''यशवंत मनोहरांची कविता प्रायः मुक्तछंदातील विद्रोहाचा विचार मांडणारी कविता आहे.''१ असे वसंत आबाजी डहाके म्हणतात. डहाके यांचे म्हणणे योग्य आहे; कारण कवी यशवंत मनोहर यांनी मुक्तछंदामध्ये रचनेला वेगळे आयाम दिले आहेत आणि मुक्तछंदामध्ये त्यांनी व्यापक पातळीवर विद्रोह उभा केला आहे. मनोहरांच्या मुक्तशैलीतील रचनेतल्या विद्रोहाने मराठी काव्यप्रवाहातील आशयाला अधिक समृद्ध केले आहे. कालपर्यंत मराठी कवितेत मुक्तशैली वापरली गेली तशी मुक्तशैली मनोहरांनी वापरली नाही तर जुन्या शैलीच्या विरोधात नवीन शैली त्यांनी उभी केली. त्याचप्रमाणे छंदबद्ध रचनेतही त्यांनी विद्रोह केलेला आहे. छंदामधील शैलीही कशी सर्जनशील होईल यांचा पुरावा म्हणजे 'मोडलो मी नाही' हा अभंग आहे. अभंगातूनही विद्रोहाच्या ज्वाळा पेटू शकतात हा आशय वरील अभंगातून स्पष्ट होतो. कवी जेथे दिवस थांबतो तेथे थांबत नाही. कारण त्याला स्थितिवादी बनायचे नाही. परिवर्तनाचा सूर्य त्याच्या नेणीव मनात असल्याने त्याला थांबणे माहिती नाही. वरील अभंगातून कवीचा एक चिंतनशील प्रवास दिसून येतो. या चिंतनप्रवासात कवीने अत्यंत भेदकपणे जीवनाचे वास्तव मांडले आहे. अभंगाच्या दुसऱ्या चरणात कवीचा बाणेदारपणा दिसतो. 'कधी उसवले श्वास। तरी विसावलो नाही। या ओळी अधिक बोलक्या आहेत. आघातावर आघात कोसळत असताना आघाताच्या शृंखलेतून बाहेर येणे सोपे नव्हे. श्वास उसवणे म्हणजे मृत्यू अटळच होय. येथे मृत्यूवरही मात करण्याची जिद्द आहे. मृत्यूसमोर लाचारी पत्करणे म्हणजे कुरूपतेचे समर्थन करणे होय. असे बेगडी समर्थन कवीला कदापि मान्य नाही. कुरूपतेच्या विरोधात सौंदर्याचा गड सुरक्षित ठेवण्यासाठी कवी विसावा घेत नाही. वरील अभंगात दोन गोष्टी सांगितल्या

अनुक्रमणिका

आहेत. त्यातली एक ही की जिथे दिवस थांबतो तेथे कवी थांबत नाही. न थांबणे हे सर्जन आहे. नवी दुनिया निर्माण करण्याची जिद्द आहे आणि त्याचबरोबर स्वतः गतिशील होण्याची ती प्रक्रिया आहे आणि दुसरी गोष्ट म्हणजे 'उसवले श्वास तरी विसावलो नाही' ही प्रक्रियाही फार मोहक आहे.

सामाजिक क्रांतीचा आशय फुलविणारी कविता

कवी यशवंत मनोहर हे एक विलक्षण सामाजिक भान असलेले कवी आहेत. त्यांच्या एकूणच कविता या सामाजिक प्रश्नांसाठी संग्राम करीत असतात. येथील सामाजिक जीवनावर कोणी वरवंटा फिरविला की त्यावर त्यांची कविता तुटून पडते. कवीचे मन हे सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी सतत धडपडत असते. लोकशाहीवर विश्वास नसणारांना येथे कोणत्याही परिस्थितीत सामाजिक समता नको आहे. खरे पाहता लोकशाही ही सामाजिक समतेची सृजनशील जगण्याची समृद्ध शैली आहे. पण काही लोकांना ही शैली नको असते. त्यामुळे ते सामाजिक स्वास्थ्य कसे धोक्यात येईल याचा सातत्याने प्रयत्न करीत असतात आणि येथील सामाजिक जीवन हे गुलामीच्या अधिपत्याखाली ठेवले जाते. जो गुलामीचे जीवन जगतो त्यालाही आपण गुलाम झालो याची कल्पना येत नाही. अशा गुलाम मानसिकतेचे प्रबोधन कवी यशवंत मनोहरांच्या कवितेने केले आहे.

गुलामीत व शोषणात स्वतःला आकंठ बुडवून घेणाऱ्या मानसिकतेला जीवनाचे सत्य काय आहे? जीवनाचे मर्म काय आहे? हे माहीत नसते. म्हणून कवी यशवंत मनोहर यांची कविता ही जीवन वास्तवाच्या तळागाळात उतरते. वास्तवाच्या मुळापर्यंत ती पोहचते. येथील गुलामी आणि शोषणाचे समर्थन करणाऱ्या मानसिकतेला कोणते अदृश्य झरे पोषण पुरवीत आहेत यांचा अभ्यास मनोहरांच्या कवितेने मांडला आहे. समाजाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी आणि समाजातील अदृश्य अशी कुरूप मानसिकता यांच्यातील संघर्ष कवी यशवंत मनोहर त्यांच्या व्यक्तिमत्त्वात जाणवतो. त्यामुळे जीवनातील सौंदर्य आणि कुरूप वास्तवाचे भान यांच्यातील संघर्ष त्यांच्या काव्यशैलीचे रचनातंत्र ठरते. ''यशवंत मनोहरांच्या कवितेत विद्रोहाचे रौद्ररूप प्रतिबिंबित झाले आहे. बर्फालाही पेटवणारा तो विद्रोह आहे. खरे तर त्यांची कविता ही वादळवाहिनी आहे. वाचकांच्या भावनांना हातात निखारे घेऊन ती स्पर्श करते आणि त्याचबरोबर त्यांच्या डोक्यात विचारांचा कल्लोळ माजविते. विद्रोहाचा असा वर्षाव मराठी मुलखात मागे कधी झाला नसावा.'' हे डॉ. जनार्दन वाघमारे यांचे म्हणणे यथार्थ आहे. कारण कवी मनोहरांनी सामान्यांच्या दुःखाशी आपले नाते जोडले आहे. दुःखाशी नाते जोडल्यामुळे त्यांचे नाते विद्रोहाशी जुळले आहे. हे नाते सर्वांगसुंदर आहे.

'चोराला भेटती मलिदा म्हणून चोरी करू नको
जबर लागते किंमत म्हणुनी डोके आपुले विकू नको
दरिद्र तुझे महाभयानक, बोल नशिबा लावू नको
उमजून घे सैतानी कावा कुत्र्यावाणी मरू नको
लाख पिंजरे तुझियासाठी सावध बापा अडकू नको
चढाओढ ही भूलथापांची शहाणा हो तू फसू नको'
(अंधारातून फिरू नको : ७४)

ही कविता 'फटका' या काव्यप्रकारात मोडणारी आहे. फटका म्हणजे उपदेशपर कविता. वाईटप्रवृत्तीवर प्रहार करणारे ठसकेबाज काव्य म्हणून फटका हा काव्यप्रकार शाहिरी वाङ्मयप्रकारात प्रामुख्याने पाहावयास मिळतो. रामचंद्र, प्रभाकर, राम जोशी अशा शाहिरांनी फटके लिहिले आहेत. पण फटका या काव्यप्रकाराला अनंत फंदी यांनी अधिक लोकप्रिय केले. 'बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडू नको' हा अनंत फंदीचा फटका सुभाषितासारखा वाटतो. अनंत फंदीनी आपल्या फटक्याच्या माध्यमाने समाजाला सावध करण्याचे काम केले. समाजाचे संतुलन बिघडू नये म्हणून अनंत फंदीनी फटके लिहिले. आधुनिक मराठी काव्यामध्ये 'कानफाट्याचा फटका' हा कवी बा. भ. बोरकरांनी लिहिला आहे. बोरकरांनंतर मराठी काव्यामध्ये यशवंत मनोहर यांनी 'अंधारातून फिरू नको' हा फटका लिहिला आहे. कवी कुसुमाग्रजांनी 'स्वातंत्र्यदेवीची विनवणी' हा फटका लिहिलेला आहे.

कवी यशवंत मनोहर यांनी 'अंधारातून फिरू नको' हा फटका समाज किंवा मानवसमूह यांच्या व्यवस्थितीकरणासाठी लिहिलेला आहे. समाजाने आपल्या वागण्याच्या, विचार करण्याच्या पद्धती बदलाव्यात, स्वार्थासाठी माणूसपणाच्या सौंदर्याची मोडतोड आपण करू नये असे सांगणाऱ्या या फटक्यात जीवनाचे सौंदर्य आणि ममत्व या दोन्ही गोष्टींचा सुंदर

अनुक्रमणिका

मिलाप पाहावयास मिळतो. 'चोरी करू नको', 'डोके आपुले विकू नको', 'नशिबा बोल लावू नको', 'कुत्र्यावाणी मरू नको', 'अडवू नको', 'तू फसू नको', 'नादी लागू नको' ही सर्व शब्दरचना फटके मारणारीच रचना आहे. शेवटी हे फटके वाईट प्रवृत्तीवरच मारल्या गेले आहेत. वरील प्रबोधन हे आईच्या हृदयाने समाजाचे केलेले प्रबोधन आहे. ज्याप्रमाणे आई आपल्या लेकराला बरे काय आणि वाईट काय? काय निवडायचे आणि काय सोडून द्यायचे? कोणाशी मैत्री करायची? आणि कोणाशी फटकून वागायचे याचे निःस्पृहपणे प्रशिक्षण देत असते. आपल्या लेकराचे वाईट होऊ नये अशीच कोणाही माउलीची इच्छा असते. जीवनाचे सौंदर्य उलगडताना कवी यशवंत मनोहर यांनी मातृहृदयाने समाजाला समजाविण्याचा प्रयत्न केला आहे. या समजविण्यात आपुलकीचे मर्म दडले आहे.

'आता सांगावे तरी काय, ऐकावे तरी काय?
ही भयकथा तर आपल्याच दातांची
आणि आपल्याच ओठांची झाली
पण तरी दातांनी जरा डोके ठिकाणावर ठेवून
वागायला हवे.
काळोख म्हणजे परम नव्हे
नव्हे द्वेषही चिरंतन!

(सांगावे तरी काय? : ८४)

येथील माणूस हा आपल्या वाताहतीला पुरस्कार समजून गोंजारत आहे. ज्याला तो पुरस्कार समजतो तोच त्याच्या जीवावर उठण्याची शक्यता आहे. हेच त्याला कळत नाही. या पुरस्काराने त्याचे जीवन अंकित होत आहे याचे भान त्याला नाही. या वाताहतीच्या पुरस्काराने माणसाची माणूस ही ओळख अधिक अंधूक होत जाते. पण आपण डोके ठिकाणावर ठेवले तर शोषणाचा काळोख फार काळ टिकणार नाही. हा काळोख अभ्राच्या छायेप्रमाणे आहे. त्याचप्रमाणे द्वेष हाही चिरंतर टिकणारा नाही. काळोख आणि द्वेष ही दोन्ही वैचारिक संकटे आहेत. ही संकटे फार काळ टिकणारी नाहीत. म्हणून दोन्ही संकटांना आपण टाळले पाहिजे. या संकटातील पहिले संकट माणसाला उजेडाकडे जाऊ देत नाही आणि दुसरे संकट माणसाला माणसांशी संवाद साधू देत नाही. या दोन्ही संकटांनी वास्तव जीवनात धुमाकूळ घातलेला आहे. या दोन्ही संकटांचा गौरव समाज आज करीत आहे. कवी यशवंत मनोहर यांना वाटते की समाजाने आता अंतर्विरोध टाळायला हवेत. आता 'माणसांनी आपले डोके ठिकाणावर ठेवून वागायला हवे' या ओळीमधून कवी यशवंत मनोहरांनी विवेकवादाला उभे केले आहे.

'आकाश फिरले एकाएकी फाटत गेल्या रेषा
गंजून गेले काळीज पुढे थिजून गेली भाषा
जिवापाशी दिवा हवा म्हणून स्वप्न पेटत ठेवले
उरात जखम जपून ठेवली शब्दांचेही ओठ शिवले
खचून पडल्या दरडीखाली मरणासोबत लिहिली गाणी
आयुष्याला बिलगलेली अनोळखीशी नग्न ग्लानी.'

(मरणासोबत लिहिली गाणी : ६६)

वरील ओळींमधील आशय खूप बोलका आहे. जीवन जगताना नाना दुःखांनी छळ केला. जाणिवेच्या नेणिवेपर्यंत दुःखाने पिच्छा पुरविला. पण या दुःखाशी कवीच्या सर्जनशील मनाने मुकाबला केला आहे. येथील समाज सुखाने जगू देत नाही. म्हणून कवीने जगू न देण्याच्या जगण्याशिवाय वेगळे जगणे निर्माण केले. वेगळे जगणे निर्माण करण्यासाठी सतत स्वतःला अस्वस्थेचा जाळ बांधला. त्यामुळे कवीला जगू न देणाऱ्या जगण्यापेक्षा कवीने स्वतः निर्माण केलेले जगणे फार मोठे आहे. शब्दांचे ओठ शिवण्याची प्रक्रिया ही कवी यशवंत मनोहरांसाठी मोठी यातनादायी आहे. येथे कवीची नेणीव ही सामुदायिक नेणीव (Collective unconsciousness) झाली आहे.

'राखेसाठी नाही स्वप्नाशी सलगी
आगीत जिंदगी भाजिली म्या'

(लाव्ह्याचे आधण : ८९)

खाणे, पिणे, झोपणे या सर्व ऐषाराम करणाऱ्या घटना आहेत. जीवन अगदी आनंदात व्यक्त करण्यासाठी जगणे हे मुळात खरे जगणेच नव्हे. अशा आनंदी जगण्यासाठी वाटेल त्या वाटाघाटी करणे म्हणजे जीवनाला गहाण ठेवणे होय. अशा जीवनाला कोणीही अंकित करू शकतो. असे लाजिरवाणे जीवन जगण्यापेक्षा कवी यशवंत मनोहर यांनी तमाम ऐषारामाच्या जीवनाला तुडवून क्रांतीचे निखारे फुलविले आहेत. त्यांनी येथील सामाजिक स्थितिशास्त्राचे

अनुक्रमणिका

सभासद होणे नाकारले आणि सामाजिक गतिशास्त्राचे सभासदत्व स्वीकारले आहे. यातील पहिले शास्त्र हे प्रस्थापित समाजरचनेशी, तर दुसरे शास्त्र हे समाजाला उजेडाकडे नेणारे शास्त्र आहे. म्हणून कवी यशवंत मनोहरांनी आपल्या साहित्यामधून पर्यायी दुनियेची निर्मिती केली आहे. सर्व अन्याय सहन करून उजेडाशी त्यांनी दोस्ती केली आहे. सर्व उजेडाशी दोस्ती करताना खूप यातनांशीही त्यांना भांडावे लागले. यातनांशी भांडताभांडता आता यातनांनाही ओहोटी लागली आहे. यातनांना ओहोटी का आली असावी? तर यातनांनाही वाटू लागले असावे की आपण या माणसांची चारही बाजूंनी नाकेबंदी केली तरी हा माणूस आपल्या तटबंदीत सापडत नाही. त्यामुळे आता यातनाही बेजार झाल्या असाव्यात.

'माझ्या देशा-
तू आम्हालाही आपले मन
तू सख्ख्या आईसारखा आमच्यासाठी पान्हा हो'
(माझ्या देशा : ९२)

या ओळींमधून वेगळ्या पद्धतीची वेदना मुखर होते. भारत हा देश सार्वभौम देश आहे. या देशामध्ये कोणालाही सापत्न वागणूक देता येत नाही आणि ते माणुसकीच्याही तत्त्वात बसत नाही. प्रत्येक भारतीय हा या देशाचा नागरिक आहे. प्रत्येक नागरिकाला हा देश माझा आहे आणि मी या देशाचा आहे असे वाटायला हवे. पण देशामध्ये सतत घडत असलेल्या जातीय, धार्मिक उन्मादामुळे देशाचे देशपण हरवत जात आहे. 'या भयानक वास्तवतेत देशाच्या अंतर्गत तुकड्यांनी कवी जखमी झाला आहे.'३ असे डॉ. वंदना महाजन म्हणतात. आज देशासमोर फार मोठे आव्हान उभे आहे. स्वातंत्र्याच्या ७० वर्षांनंतरही देशाला समाजवादी लोकशाहीचे प्रारूप बनता आले नाही. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही मानवी मूल्ये अद्याप या देशात परिपूर्णपणे रुजलेली नाहीत; कारण या देशातील सामाजिक जीवन हे विषमतेच्या जोखडात अडकलेले आहे. विषमतेला मूल्य मानणाऱ्या मानसिकतेतून जोपर्यंत हा देश बाहेर येणार नाही तोपर्यंत तो समग्रहितलक्ष्यी होणार नाही. देशाच्या जमिनीचे सिंचन हे समाजवादी लोकशाहीने जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत विषमतेचे निर्मूलनही होणार नाही. सर्वांना सन्मानाने जीवन जगता येण्यासाठी देशाने सर्वांशी भगिनीभाव आणि बंधुभाव या तत्त्वाने वागले पाहिजे असे कवीला वाटते. असे वाटणे हे लोकशाहीला व देशाच्या देशपणाला बळ देणारे आहे.

कवी यशवंत मनोहरांचा 'मूर्तिभंजन' हा कवितासंग्रह भारतीय समाजरचनेची पुनर्रचना करणारा आहे. या कवितासंग्रहामध्ये ज्याप्रमाणे पहिल्या भागात विफल प्रेमाची मालिका आहे; त्याचप्रमाणे दुसऱ्या भागात अखंड परिवर्तनाची मालिका आहे. परिवर्तनाचा पराभव या देशात पुनःपुन्हा होणार नाही याचे सूत्र मूर्तिभंजनमध्ये पाहावयास मिळते. मूर्तिभंजनमध्ये कवी यशवंत मनोहर यांनी इतिहासाची कठोर चिकित्सा केली आहे आणि वर्तमानात परिवर्तनाचा प्रवाह हा सतत सुरू राहावा म्हणून कवीने या कवितासंग्रहात वैचारिक बंडखोरी केली आहे. सामाजिक लोकशाहीला बळकट करण्यासाठी 'मूर्तिभंजन'चा सिंहाचा वाटा आहे. मूर्तिभंजनमधील विचार हे प्रपाताप्रमाणे कोसळत आहेत. म्हणून 'मूर्तिभंजन' या कवितासंग्रहाला प्रपाती लय प्राप्त झाली आहे.

• • •

डॉ. अक्रम ह. पठाण, अंजुमन हायस्कूल व कला महाविद्यालय, सदर, नागपूर. भ्रमणभाष : ८६००६९९०८६





जीवनायनः श्वास मोकळे करणारा जाहीरनामा

डॉ. केशव सखाराम देशमुख

कविवर्य यशवंत मनोहर या प्रतिभासमृद्ध नावामागे एक भव्य चिंतनाचा पटही सामावलेला आहे. कवी म्हणून त्यांची नोंद सांस्कृतिक, वाङ्मयीन, सामाजिक, तात्त्विक या सर्व पातळ्यांवर अधिक गहन आणि अधिक वजनदार अशीच राहिलेली आहे. जवळजवळ अर्धशतकाचा प्रदीर्घ असा कालखंड यशवंत मनोहर यांनी आपल्या विशाल पण चिंतनगामी कवितेने अक्षरशः उजळूनच काढलेला आहे. वाङ्मयेतिहास त्याची साक्ष आहे. एक फिलॉसॉफर म्हणून, एक विचारवंत म्हणून, एक प्रोफेसर म्हणून, एक ज्ञानवंत वक्ता म्हणून, एक समीक्षक म्हणून आणि समूहांची आक्रंदने नमूद करणारा एक उमदा माणूस म्हणूनही यशवंत मनोहरांची यशवंत कीर्ती देदीप्य आहे. कवितेच्या प्रांतात तर त्यांनी स्वतःची शैलीच घडविलेली वाचायला मिळते. एखादा कवी चिंतनसागराच्या किती तळाशी जाऊ शकतो आणि तेथील तळठाव घेऊन तो शब्दांत कसा ताकदीने बांधू शकतो; हे बघायचे असेल तर मनोहरांची कविता वाचली म्हणजे कळून येतेच. कवितेसमवतेच मराठी समीक्षाव्यवहारातील त्यांचे योगदान मला खूप महत्त्वाचे वाटते. त्यांच्या या समीक्षाव्यवहारात त्यांनी स्वीकारलेली भूमिका आणि या भूमिकेच्या तळाशी असणारे बोधितत्त्वज्ञान, आंबेडकरी सारसूत्राचे तत्त्वज्ञान हेच अधिक गाभास्थानी आहे. याचा दुसरा अर्थ असा की, मनोहरांची समीक्षा ही केवळ साहित्यपूजक नाही अथवा वाङ्मयगौरवक नाही. तर या त्यांच्या समीक्षेच्या गाभास्थानी व्यक्ती आणि चिंतन, व्यवस्था आणि चिंतन, संस्कृती आणि चिंतन, मूल्य आणि विवेक हा सर्व शस्त्रसाठा आढळून येतो. ही समीक्षा शब्दप्रधान मुळीच नाही. ही समीक्षा जीवनवादी, जीवननिष्ठ, जीवनायन जबर ताकदीने तोलून धरणारी समीक्षा आहे. मनोहरांच्या या सर्वसांग-अथांग समीक्षेच्या फार तपशिलात मी जाणार नाही; पण त्यांच्या भाषणांवर केंद्रीभूत झालेले यशवंत मनोहर यांचे काही ग्रंथ; ज्या ज्या ग्रंथांचा मात्र इथे आवर्जून उल्लेख करायला हवा. 'बत्तीस भाषणे' अशा शीर्षकाचा त्यांचा ग्रंथ किंवा इहवादी भूमिका फार खोलात उतरून मांडणारे या कविवर्यांचे लेखन मला भान, भूमिका, भक्कमता या तिन्ही पातळ्यांवर अधिक श्रेष्ठ वाटते. याशिवाय, सत्वर; नव्या पिढीतील प्रतिभावंतांना मनोहर यांनी लेखन, सर्जन, चिंतन, भूमिका या अनुरोधाने वेळोवेळी केलेले लेखरूपांतील मार्गदर्शन. या सर्व ऐवजांतून यशवंत मनोहर यांचे थोरपण रसडोळस होत गेलेले वाचायला मिळते. अजून एका मुद्याचा विचार करायला हवा आणि तो मुद्दा आहे यशवंत मनोहर यांच्या नानाविध मराठी साहित्य संमेलनांच्या त्यांच्या अध्यक्षीय भाषणांच्या संदर्भातला! फुले-शाहू-आंबेडकर-सम्यक-पुरोगामी-परिवर्तनवादी-इहवादी-समग्र-

ज्ञानडोळस अशा विविध चळवळींच्या बॅनर्सखाली जी राज्यभर, देशभर संमेलने झाली; अशा चाळीसपेक्षा अधिक साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद या कविवर्यांनी भूषविलेली आहेत. या एकूण संमेलनांत त्यांनी केलेली भाषणे चिंतनसूत्र म्हणून आणि समूहांच्या उत्कर्षपहाटेचा प्रकाश ही त्यांची सगळी भाषणे दस्तऐवज आहेत. या भाषणांमधून यशवंत मनोहर यांचे प्रतिभावंत कवी म्हणून जाणवणारे मोठेपण पावलोपावली उजेडवंत होताना दिसते; शिवाय हे सर्व मांडण्यामागची त्यांची तळमळ, त्यांची ज्ञानसाधना आणि त्यांची आंबेडकरी उठावदार भूमिका वाचकांना बळच पुरविते.

मूलतः १९७० नंतरच्या कालखंडांत जी आंबेडकरी ताकदीची महत्त्वाची कविता मराठीत आली आणि ज्या कवितेने देश, जग यांच्यातही एक चेतना निर्माण केली. ज्या कवितेने समीक्षेचे पूर्व गंजलेले खांब उखडून टाकले. नवी समीक्षाच पैदा केली. अशी ही आंबेडकरी कविता मराठीत निर्माण झाली. त्यात अनेक कवी होते. जे, या मराठी संस्कृतीला ठाऊक आहेत. मी अधिक तपशिलात माहिती असल्यामुळे जात नाही. या समृद्ध परंपरेत 'उत्थानगुंफा'कार यशवंत मनोहर होते. त्यानंतर स्वतंत्रच एक समृद्ध परंपरा मनोहरांनी निर्माण केली. इतकी की, चिंतन आणि भूमिकेचे 'मनोहर स्कूल' महाराष्ट्रात निर्माण झाले. प्रतिभेचे विद्यापीठ या नावाभोवती सिद्ध झाले. स्पष्ट झाले. 'मौज' काय किंवा किती तरी बिनीच्या नियतकालिकांनी यशवंत मनोहर यांच्या भूमिकानिष्ठ काव्यशब्दयात्रेला सतत मानाची, प्रतिष्ठेची जागा दिली. कारण, व्यवस्थेला जाग प्राप्त करून देणारे, आग चेतवणारे उत्थानांचे शब्द या थोर कवीने दिले. या कवीची ताकद अशी की, मनोहरांचे अनुकरण करणेसुद्धा कुणाला जमू शकलेले नाही. नाहीतर एका ठश्शाची कविता परंपरेत अनेकांनी लिहिली आणि त्या कवितेची बेताल, सरफेस अनुकरणं पुढे अनेकांनी केली. याअर्थी मनोहर हे चिटिंग करणारे कवी नाहीत. त्यांचे कवितालेखनातील समृद्ध, संपन्न, श्रीमंत स्थान अढळच आहे. यशवंत मनोहर यांचे अनेक कवितासंग्रह यासंबंधीचे सज्जड पुरावे होत. 'जीवनायन' हा त्यांचा कवितासंग्रह अढळ तारा म्हणावा अशा गुणवत्तेचा आहे.

''विचार आणि भाव यांच्या अनावर अप्रतिहत आवेगाने कोसळणारा प्रवाह 'जीवनायन' मधील कवितांमधून रुंद, संयत आणि अधिक खोल झालेला आढळतो. उत्थानगुंफातील आक्रमक गद्यात्म मुक्तशैलीऐवजी येथे आढळणाऱ्या (जीवनायन) छंदात्म, छांदस अभिव्यक्तीमुळे खिन्नतेचे, दुःखाचे, अपेक्षाभंगाचे, क्रोधाचे, प्रक्षोभाचे विविध स्वर कवेत घेऊन त्यावर तरळत राहणारा एक आश्वासक गंभीर स्वर 'जीवनायन'मधून निनादत असल्याचा प्रत्यय येतो. दाहक जीवनानुभव आणि त्याचे प्रतिमांमध्ये रूपांतर करणारी ओजस्वी शब्दकळा असलेल्या, उजेडाचा शब्द उच्चारित, तिमिराचा तीव्र निषेध करीत, क्वचित उपरोधाचा आश्रय घेते. कुरूपतेचे उगम जाळायला आलेल्या यशवंत मनोहर यांच्या कवितेचे परिणत आणि प्रगल्भ रूप 'जीवनायन' कवितासंग्रहात पाहायला मिळते.'' अशी लक्षणीय नोंद जी 'जीवनायन' कवितासंग्रहाच्या मलपृष्ठावर करण्यात आली ती अगदी यथार्थ आहे. मोजून सत्त्याऐंशी पानांत बांधलेला 'जीवनायन' हा कवितासंग्रह प्रत्येक वाचनात वाचकांस अस्वस्थ केल्याशिवाय सोडत नाही. रचनेचे प्रयोग करत पुढेपुढे जाणारी ही मनोहरांची कविता प्रतिमांच्या बागा वाचकांच्या दारी उभ्या करते. आर. के. लक्ष्मण यांनी जो कॉमन मॅन आपल्या अजरामर रेषांमधून सतत संविधानवाचक ठेवला, अशा सामान्य माणसांची सर्व स्पंदने मनोहरांच्या कवितेच्या मुखांतून मला प्रकट होताना दिसतात. कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांनी सामान्य माणसांची स्वप्नं, त्यांची ध्येयं, त्यांच्या धारणा जशा कवितेतून शाबूतपणे धरून ठेवल्या; तशाच धारणा मनोहरही या कवितेतून धरून ठेवतात. मानव्याचा ध्यास हाच सर्वश्रेष्ठ ध्यास असतो आणि अशा ध्यासाला संलग्न झालेली ही जीवनायनी कविता शंभर टक्के आहे!

साऱ्या आसवांची एकच एक प्रमाण भाषा असते
साऱ्या उपाशी पोटांचा जाहीरनामा एकच असतो.
(जीवनायन, ३)

हा उच्चार घेऊन कविता लिहिणारे यशवंत मनोहर मानव्याच्या आगारात असणाऱ्या आसवांच्या भाषेत जेव्हा लिहितात तेव्हा त्यांच्या कवितेचे मूल्य मानवी, मानवतावादी व व्यथाहरणवादी हे असते आणि श्रेष्ठ कवी-कवितेचे हे गमकही असते. काळोखाचा निषेध नोंदवणारी ही कविता प्रकाशाच्या शब्दोच्चाराला जागा देते आणि जागही! जे जे वाईट; त्याचा धिक्कार

करणारी ही कविता मंगलतेच्या, चांगुलपणाच्या, विधायकतेच्या आणि महत्त्वाचे म्हणजे संविधानमूल्यजागराच्या बाजूने धाडशी स्वरूपात उभी राहते. म्हणूनच,

आम्ही आहोत नास्तिक, आम्ही आकाश उधडणारे,
आमच्या वाटाच निखाऱ्यांच्या, आम्ही सुरुंग तुडवणारे
(जीवनायन, ४)

अशी सतर्क, जागेपणाची भाषा घेऊन ही कविता उभी राहते. 'जीवनायन' मध्ये 'त्रिपदी' नावाची एक कविता त्रेसष्ट छोट्याछोट्या भागांत आलेली आहे. कविचिंतनाचे बहुमुखीपण स्पष्ट करणारी ही कविता तरुणाईंच्या, सामान्य माणसांच्या उरांत उजेडाची वसाहत वसविणारी अशीच आहे. ''बंधो!'' असा आरंभस्वर हरेक चरणात या कवितेत येतो. त्यात, मानुषता व आस्था आहे. या संविधनामागे समूहधारणा व समजूतदारपणाही आहे आणि महत्त्वाचे म्हणजे प्रबुद्धधारेचे संपन्न टॉनिकही ''बंधो!'' उच्चारउगमात आहे! एखाद्या चौकात भव्य होर्डिंग करून ठळक संदेश पोहचविणाऱ्या फलकाची फलश्रुती 'त्रिपदी' कवितेत सामावलेली बघायला मिळते. त्रिपदीसारख्या खूप जागा 'जीवनायन'मध्ये वैपुल्याने आढळतात. काळाच्या पटावर एकेक आणि पुढचे पाऊल सतत जे, यशवंत मनोहर यांनी टाकलेले आहे. त्या काव्यक्रांतीतील 'जीवनायन' कवितासंग्रह म्हणजे मला सर्वांत श्रेष्ठ पाऊल वाटते; कारण, बाबासाहेबांच्या फिलॉसॉफीचा वंश, संत तुकोबांच्या विचारांचा सार, जोतीरावांच्या असूडाची आठवण आणि कबीरांच्या दोह्यांचा संयत, गंभीर प्रवाह यांचे रसायन या कवितेतून चाखायला मिळत राहते. कोणत्या एका काळात या कवितेला बंदिस्त करता येत नाही. 'केवळ कविता' एवढेच म्हणून या कवितेची मानुषता खंडित करता येत नाही. अथवा, विचारकविता म्हणून एवढ्यावरच या कवितेचे महत्त्वमापन पूर्ण होणारे नाही. उलट, तथागत गौतम बुद्धांनी जी एक विशाल करुणा-मानवता स्वीकारली; रुजविली; त्या करुणेचे बहुपदर 'जीवनायन' मधून पेरलेले आहेत. उगवलेले आहेत. म्हणूनच ही कविता मोठी आहे.

'जीवनायन'ची भाषा आणि या भाषेमागे खच्चून भरलेली जगण्याची धग-रग मननीयच म्हटली पाहिजे. या कवितेची भाषा चाल करून येणाऱ्या योद्ध्यासारखी आहे. भाषेला एक पक्का पीळ आहे. या भाषेला एक नाद आहे. या भाषेचे खास तिचे म्हणून एक वजन आहे. हे वजन मूल्यप्रधानही आहे आणि ते मनोहर यांनाच जमू शकते. सुमार, सपक कवी त्यांच्या या भाषेचे अनुकरण बिलकूल करू शकत नाही. ही भाषा 'यशवंत' आणि 'मनोहर' भाषा आहे. वाचकांच्या मेंदूत ही भाषा स्थान मागते. वाचकांच्या मनांत ही भाषा वात होऊन शिलगत राहते. जीवच ओवाळून टाकावा एवढी मनोहर भाषा कविवर्य यशवंत मनोहर यांना लाभलेली आहे. व्वा, क्या बात है! कविवर्यांच्या या भाषेचे काही नमुने द्यावयाचा मोह होतो. उदा.-

पायाखाली सुरुंग आणि माथ्यावर आगीचा ढग, सुगंधाचा इतिहास लिहिणारे युग, जळता सूर्य उराशी कवटाळणे, खूप जखमांनी घरटी बांधली माझ्यावर, जात्यात भरडल्या जाणाऱ्या दाण्यांचा वर्ग एकच असतो, इतिहासाचे आदेश ठोकरून वणव्यात आम्ही घरे बांधली, मोडक्या गावाच्या हातांत दिलेले स्वातंत्र्य, कत्तलखान्यातील आक्रंदनाचा देश कुठे आहे? मयसभेचे उद्‌घाटन करणारे रखेल हात, नाकाने कांदे सोलणाऱ्या शिखंडीचे शिबिर, दुःखेच संग्राम होत आहेत, ऱ्हासाच्या वणव्यात जळणारी नपुंसक शेते, मातीच्या कुशीत स्वप्नांचा संकुलमहोत्सव पिकवणारा पाऊस, स्वातंत्र्याचे तिकीट काढतो आणि गुलामीच्या गाडीत बसतो आपण, इच्छा आहे तिथे, तिथे आहे बेडी, काही जखमांना पुरस्कारासारखे जपायचे असते, देश झाला आहे स्मशान अख्खा, दुःखे शस्त्रागारे होतील, चौक सारे रणभूमी होतील, माझ्याजवळ आहे अख्खा देश उजळून टाकण्याइतका उजेड, हे स्वातंत्र्या! कुठे उतरू जखमांचे गाठोडे, लाव्हा आमचा सहोदर, सूर्य आमचा केवळ बाप, भुकेल्यांच्या हातातून तोंडात धावणारी भाकर, संगीत म्हणून ऐकला जातो तो आवाज बेड्यांचा आहे, असोत लाटा भिन्न भिन्न पण सागर सारा एक हवा, धडांच्या मैफलीत जीव नाही, मी बाळंतिणीच्या वेणांचे अश्रूंनी भिजलेले सौंदर्य, मी उरात वणवा वागवणाऱ्या गरीब चुलीतला विस्तव, कात सांभाळीत बसण्याने काहीही होत नाही, मरणाच्या ताटात वाढलेला हा खेळ, उजेड हरवलेले चंद्रसूर्य असतो आपण एकमेकांशिवाय, न्यायासाठी संग्राम झालेली दुःखे म्हणजे सौंदर्य, आगीच्या ओठांनी काळजाचे चुंबन घेणारे चांदणे, मी जिवंत झालेली पहाट, पाखरांचे उडते

गळे, बांगडीसारखे पिचलेले आयुष्य, फाटणाऱ्या श्वासांच्या आसवांसारखा पाऊस, करपलेल्या श्वासांचा डोंगर ही कवितेतील अवघी भाषा प्रतिमामंडित, प्रतिमासौंदर्यी आणि या अवघ्या कवितांना गती आणि गुणवत्ता प्राप्त करून देणारी अशी आहे.

या जगण्यावर, या जीवनावर विलक्षण प्रेम करणारे मनोहर जगण्यातील संघर्ष आणि संघर्षामागच्या धारणा विविध कवितांमधून स्पष्ट करतात. पण हे सर्व खरे असले तरी मानवता नावाचे एक मूल्य आहे आणि ज्ञानधारक एक संस्कृती आहे. या दोन्ही मूल्य आणि संस्कृती महाविषयांना यशवंत मनोहरांची कविता जपते आणि रुजवतेसुद्धा! 'दीपोत्सव', 'जगून घेतो', 'देश', 'संग्राम', 'माणसाची जात', 'आपणच व्हॉल्टेअर व्हायला हवे', 'आपण', 'देतो' ह्या आणि इतर काही कवितांमधील मूल्यधारणा ठळक स्वरूपाची आहे. स्वतः कविवर्यांनी दुःखयात्रेचा अनुभव घेतला. दुःखयात्रेच्या खाईत सापडलेले भवताल पाहिले आणि अशा दुःखाचा निरास झाला पाहिजे. म्हणून, 'जीवनायन' संग्रहामध्ये उजेडाच्या शब्दांचा उच्चार जोरदार आढळतो आणि जागजागी तिमिराचा तीव्र निषेध केल्याचे दिसून येते. या दृष्टीने, यशवंत मनोहर यांच्या 'जपून रे माझ्या फिनिक्स पक्ष्यांनो', 'खूपदा', 'जगून घेतो', 'काही', 'हे लोक', 'एखादा आकान्त', 'स्वातंत्र्य', 'दुःखे शस्त्रागार होतील', 'हे स्वातंत्र्या', 'बाकी सर्व अंधार', 'हे गाव', 'आम्ही आहोत ऊर्जाघर', 'लोंढा', 'काही स्फुटे', 'इथे', 'बर्फानेही आग व्हावे', 'सारांश', 'शतकांची शेते', 'दुःख', 'माणूसच', 'प्राण घेणारी कुंपणे', अशा कितीतरी कवितांतून मनोहरांनी तिमिराचा सक्त निषेध केलेला आहे. बहुमुखी दुःखयात्रेची प्रखर पण समृद्ध मांडणी केलेली आहे.


मुक्तशैली, छंदात्म, छांदस, अभंग, गझल अशा एक नव्हे तर अनेक प्रकारांना स्वीकारत 'जीवनायन'मधील कविता मनाला भिडते. मेंदूला धडका मारते. रचना म्हणून आणि आशयदृष्ट्या काही कवितांचा दीर्घ पल्ला जाणवतो. उदा. 'चिंता वाटते', 'आयुष्य', 'आपण', 'मी', 'तर', 'हे गाव', 'सत्य', 'संहिता', 'एकमेकांशिवाय', 'आई', 'मी मुक्त झालो आहे', 'त्रिपदी', 'काही स्फुटे', 'कळतच नाही', 'याही वेळी', 'डोळ्यांचा उपयोग', 'इतका माणूस खुळा हवा', ह्या एकूण कविता रचनापट म्हणून दीर्घ रूपांच्या आहेत. पण. त्यातील चिंतन शतपटाच्या मापाचे आहे . प्रारंभी 'उत्थानगुंफा'मध्ये छोट्या कणिका, छोटे अभंग मनोहरांनी लिहिले आहेत. ते तेजावाच्या गुणांचे आणि विद्रोहाच्या समग्र शक्तींचे होते. त्यात, विचार होता व भावनावेग मस्त होता. 'जीवनायन' कवितासंग्रहातही अशा छोट्या कणिका, अभंग अथवा चारसहा ओळींत मनोहरांनी दुःखाचे जे वजन बांधलेले आहे; ते केवळ अप्रतिम अशा प्रकारचे म्हणायला हवे. दैनिकाच्या चिंतन अग्रलेखासारखा या छोट्या छोट्या कवितांचा घाट आहे. गोळीबंद अर्थ अशी या कवितेची ओळख नोंदवता येणारी आहे. वाचकांना मी विनंती करीन की, मनोहरांच्या 'हे लोक', 'सारांश', 'कवितांची वही', 'शतकांची शेते', 'महाअस्ताची नांदी', 'होईन उजेडच', 'हवे होते', 'उन्मळलो तर', 'जबाबदार पूल', 'देतो', 'सौंदर्य', 'काव्यनिर्मिती', 'माणूसच', 'या मोसमाला', 'नव्या स्वप्नांचे गर्भ', 'आम्ही आहोत ऊर्जाघर', 'हेही खरे आहे', 'लोंढा', 'इथे', 'गेल्या वाहून गावात' किंवा पृष्ठ ७९ ते ८३ वर प्रकाशमान झालेल्या ह्या सर्व कविता मुळातून वाचायला हव्यात.ह्या सर्व कविता विचारसमृद्ध सुरुंगांची स्थळं आहेत. 'जीवनायन' हा अख्खा संग्रह माझा प्रिय संग्रह आहे. त्यातला एक शब्द इकडचा तिकडं हलवता यायचा नाही. कविजाणिवांचा उत्कर्ष म्हणूनही 'जीवनायन'ची प्रतिष्ठा-पत श्रेष्ठ आहे. अर्थसघन शब्दसौंदर्य आणि सौंदर्यलक्ष्यी आशयघनता ही दोन्ही गुणवत्तेची वजनमापे या कवितेला द्यावी लागतात. स्व ते समष्टी आणि माणूस ते जग यांच्यातला आकार आणि आकांत ह्या कवितेच्या पोटात आहे. या समग्र कवितेच्या प्रीतीत अडकलेला मी माणूस आहे! काही कवितांची शीर्षकं तर मन लुभावून टाकतात. उदा. झालो निषिद्धांचा साथी, चूल विझली नाही, सूर्यचंद्राचे झुंबर, दुःखे शस्त्रागरे होतील, शतकांची शेते, महाअस्ताची नांदी, चिताचक्र, माती पेरावी, प्राणांची रांगोळी, आगीतल्या वाटा, या कुंठेच्या पुढे, दिवा झालेले दुःख, आज पेरतो सुगंध ह्या कवितांची शीर्षकं; इतकी देखणी यशवंत मनोहर यांच्याशिवाय कोण लिहू शकतं? कविता अर्थगर्भ आणि शीर्षकं त्याहीपुढं जाणारी! व्वा!

म्हणूनच फार मौलिक अर्थानं 'जीवनायन' हा कवितासंग्रह सोन्याची खाण आहे. अर्थसौंदर्याला इथे बहुआयाम मिळत गेले आहेत. परिवर्तनाचा स्वर इथे ठळक आणि ठाम असा आहे. भूमिका ही पूर्णतः

जीवनवादी आहे आणि धारणा आहे विज्ञानवादी. अंधार ठार करण्याची या कवितेची प्रतिज्ञा आहे आणि उजेडाच्या उच्चारासाठी पायघड्या घालण्याची ह्या कवितेची स्वागतशीलता आहे. प्रयोगशीलता म्हणूनही या कवितेला पैकीच्या पैकी गुण द्यावे लागतात. मोठ्या व छोट्या अशा आकार लाभलेल्या खूप कविता इथे भेटीला येतात. पण, विद्रोहाची आणि चिंतनाची क्षमता या कवितेतील कुठेही कमी झाले नाही. गांभीर्याची पूर्णतः गहनता उरीखांदी वागवणारा हा मराठीतील महत्त्वाचा कवितासंग्रह असून सामाजिक, वाङ्मयीन, सांस्कृतिक अशी तीनपदरी महत्ता 'जीवनायन'ची मोठी ओळख आहे.

• • •

डॉ. केशव सखाराम देशमुख, विद्यापीठ प्रोफेसर व मराठी विभागप्रमुख,
स्वा. रा.ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, महाराष्ट्र, भारत -४३१६०६. भ्रमणभाष : ९४२२७२१६३१





प्रतीक्षायन :
प्रेमशक्तीची विविध रूपे

नीरजा

प्रतीक्षायन हा कवी यशवंत मनोहर यांचा पाचवा कवितासंग्रह. उत्थानगुंफा या कवितासंग्रहानं वाचकांचे आणि समीक्षकांचे लक्ष वेधून घेतलेल्या या कवीचा प्रवास आज युगांतरपर्यंत सुरू आहे. 'माझे शब्द भिजून येतात माझ्या काळ्याठिक्कर रक्तात/जमत नाही मला शब्दांचे नक्षीकाम/दुःख रंगवून रंजक करणारे गुंजनवादी/कूळ नाही माझे' असं सुरुवातीलाच निक्षून सांगणारा हा कवी थेट बोलत होता तो समाजव्यवस्थेच्या या बंदिशाळेत उभा जन्म कडकडीत उन्हाळ्यात काढणाऱ्या माणसांविषयी. वर्षानुवर्षे ज्यांचं शोषण झालं त्या माणसांनी वादळून यावं आणि या व्यवस्थेच्या भिंती पेटवाव्यात असं आवाहन ह्या कवीनं आपल्या कवितेतून सातत्यानं केलं.

ज्या समाजात आपण जन्माला आलो त्या समाजानं जातिव्यवस्थेच्या उतरंडीवर अगदी खालच्या पायरीवर कायम उभं केल्याची सल व्यक्त करताना साहजिकच कोवळ्या तरल शब्दांना तो साद घालणार नाही. सोसल्याची आणि नाकारलं गेल्याची भावना मनात इतकी खोल रुतल्यावर कोवळी सळसळती पालवी मनात लहरणार नाहीच. उलट ज्वालामुखीच्या पोटात जसा लाव्हा उकळत राहतो तसेच एवढी वर्षे सोसलेल्या अन्यायाचे पडसाद खदखदत राहतात आतल्या आत आणि उमटत राहतात धगधगीत शब्दांतून. सामाजिक बांधिलकी मानणारा हा कवी कदाचित म्हणूनच सुरुवातीच्या संग्रहातून विशेषतः उत्थानगुंफासारख्या संग्रहातून भावकविता लिहिताना अजिबात दिसत नाही.

अर्थात ज्या ज्या वेळी एखाद्या माणसाला हा समाज जगणं नाकारत असतो तेव्हा या अशा समाजात कुठंतरी एखादा आश्वस्त हात त्याला सहज सापडून जातो. एकप्रकारची प्रेमशक्ती या अशा काळात आधाराचा हात देते. पोळलेल्या आयुष्यावर अलगद फुंकर घालत येते आणि संघर्षाच्या काळात समर्थपणे साथ देते आणि ही अशी प्रेमशक्ती यशवंत मनोहरांना वेळोवेळी भेटत राहते. मूर्तिभंजन या कवितासंग्रहात ती आलेली आहे. ती जेव्हा जेव्हा येते तेव्हा कवीचे स्वप्नस्मशान तिच्या श्रावणसहवासात आसवांनी नाचत राहते. ह्या प्रियेनं हात दिला तर कदाचित ॠतुपालट होईल असं कवीला वाटतं. पण अनेकदा असं होतंच असं नाही.

अचानकच बदलले तिचे स्वप्नरंग
अचानक बदलले हृदय
पुढे देश
आणि त्याचा पाचोळा देशोधडीला लागला.
(मूर्तिभंजन, पृ. २२)

मूर्तिभंजन या संग्रहात आलेली 'ती जीवनातून ओघळून गेली जसा अश्रू गालावरून' (मूर्तिभंजन, पृ.२५) पण प्रतीक्षायन या कवितासंग्रहात मात्र ती त्यासोबत कायम असलेली प्रेमिका होऊन आपल्यासमोर आलेली दिसते. मूर्तिभंजनमधील कवितांत कवीच्या भावविश्वाचे एक स्वगत आहे तर याच भावविश्वाचे आणखी एक स्वगत प्रतीक्षायनमध्ये आहे असं खुद्द मनोहरांनी प्रतीक्षायन या कवितासंग्रहाच्या सुरुवातीच्या मनोगतात म्हटले आहे. या स्वगतात जी 'ती' येते तिला त्यांनी प्रेमस्विनी असं संबोधलेलं आहे. या संग्रहातील साऱ्या कविता या प्रेमस्विनीला उद्देशून लिहिलेल्या आहेत. या कवितांत आलेली ही 'ती' कवीचं भावविश्व व्यापून राहिलेली आहे. त्यांच्या इतर संग्रहांत व्यक्त होणारा विद्रोह या संग्रहात दिसत नाही. या कवितांत युगानुयुगे वाट्याला आलेल्या शोषणाचा उद्‌गार नाही की शतकानुशतके झालेल्या फसवणुकीचा हिशेब नाही. उलट या अशा समाजवास्तवात जगणाऱ्या कवीच्या पोळलेल्या मनावर शांत शीतल गारवा होऊन येणारी प्रेमस्विनी आपल्याला प्रत्येक कवितेत भेटत राहते आणि कवीच्या वाट्याला आलेल्या 'जखमांची ती फुले करते.' ज्या वास्तवात हा कवी जन्माला आला आहे त्या वास्तवाविषयीचं भान या सर्व कवितांत व्यक्त होतंच; पण त्याबरोबर या वास्तवात जगण्यासाठीचं जे बळ लागतं ते बळही मिळतं आणि त्याचबरोबर एक सकून या कवीला मिळतो आहे जो या प्रेमस्विनीनं त्यांच्या ओंजळीत घातला आहे.

समाजासमोर आपले हंबरणारे काळीज पेश करणाऱ्या या कवीला भेटलेली ही प्रेमस्विनी नेमकी कोण आहे? ही पारंपरिक प्रेयसी नाही. रोमँटिक कवींच्या कवितेत येणारी नववधू प्रिया नाही किंवा प्रेमबावरी राधाही नाही तर ती वेगवेगळ्या रूपांत येणारी प्रेमशक्ती आहे. त्याच्या आत पेटलेल्या शब्दांना समजून घेणारी सखी आहे.

तू चौकशी केलीस माझ्या डोळ्यांतल्या राखेची
तेव्हाच माझ्यावर पसरलेल्या वाळवंटाने
स्वतःला गोळा केले आणि समुद्रात बुडवले.
माझी आसवे स्वतःच्या डोळ्यांत घेऊन म्हणालीस :
''मी सांभाळीन यांना
आपण आपल्या डोळ्यांत फुलवू एक नवा पर्याय
यापुढे आपण एका आयुष्याने जगू.
निर्मू तुझ्यामाझ्या नात्याला गौरव मानणारे जग.''
(पृ.१४)

हे नवं नातं निर्माण करण्याचं आश्वासन मिळाल्यानेच कदाचित या आकांताला छेद देत जगणाऱ्या कवीला जगण्याची ऊर्जा मिळाली असावी. तो म्हणतो :

मी जगेन प्रेमस्विनी!
आता मी मावळणार नाही
फक्त तुझ्यासाठी कायम झगमगत राहीन. (पृ. १४)

काळीज फोडणाऱ्या दुःखांना आणि घुसमटणाऱ्या वादळांना मुखर करण्यासाठी जन्माला आलेल्या या कवितेतून असा आश्वासक हुंकार कदाचित प्रेमाच्या अशा दर्शनामुळेच मिळू शकतो. केवळ उपेक्षा मिळालेलं आयुष्य जगल्यामुळेच मनात कायम एक चीड वागवून जगणाऱ्या माणसाच्या आयुष्यात आलेलं प्रेम त्याला मुळापासून बदलवून टाकतं. जगणं आपोआपच सकारात्मक होत जातं, प्रेम जगण्याचे अर्थच बदलवून टाकतं हे सांगताना कवी म्हणतो :

आपल्या भेटीआधी
मी संतापले होतो जीवनावर
फुल्या मारीत होतो प्रत्येक क्षणावर,
मेला होता विश्वास
मेले होते श्वास.
आता मी करतो प्रेमावरही अथांग प्रेम
प्रेम करतो जीवनावर
माझ्यात भिनलेले जहर वेचून जाळणाऱ्या तुझ्यावर
तू मला स्मशानातून जीवनात आणलेस प्रेमस्विनी...!
(पृ.१२)

अशक्यतेला खजील करणारा प्रेम नावाचा हा सर्जनशील प्रयोग सूर्यकाव्य जन्माला घालू शकतो याचा

अनुक्रमणिका

प्रत्यय आलेल्या या कवीला प्रेमाचे वेगवेगळे पदर उलगडताना दिसतात. अशा सहजीवनाच्या महाकाव्याची जबाबदार सर्गेरचली जातात हे या कवीला ठाऊक आहे.

आपण सत्याच्या आगीने
जाळून टाकल्या
काळोखाच्या साऱ्या सनातन भिंती
झालो आपण सौंदर्याचा झंझावात आणि
सापडलो आपण आपल्याला
आणि प्रेमापलीकडच्या एका अज्ञात नात्याचा जन्म
झाला. (पृ.२५)

प्रेमाचं नातं हे शरीरमनाचं असतं; पण अशी काही नाती असतात की ज्यात ती त्याची सखी होते. सहचर होते. आई होते. समजूतदार सच्चा मित्र होते. एवढंच नाही तर करुणेचा झरा होऊन त्याच्यामधून वाहात जाते. कवी म्हणतो :

परवानगीशिवाय
माझ्या पडझडीत शिरलीस.
माझ्या काळजाला पंख का फुटले
कोणाला कळलेच नाही.
गायब झाले खांद्यावरील मरणांचे ओझे
तेही कोणाला कळलेच नाही.
तू पिऊन घेतलेस मला डोळ्यांनीच
मी उरलोच नाही तुझ्याबाहेर (पृ. २६)

हा प्रेमाच्या अद्वैताचा अनोखा प्रयोग मात्र पारंपरिक नाही. त्यात शरीरमनानं एकरूप होणारे स्त्रीपुरुष आहेतच; पण त्याहीपलीकडे जाऊन साऱ्या जाणिवांसकट एकमेकांना समजून घेणं आहे.

जेव्हा कवीला
निरर्थक वाटतात मानवतावादाची देखणी वस्त्रे ...
निरर्थक वाटतात वणव्याचे विद्रोही कारखाने
होऊ न शकलेले त्याचे श्वास...
किंवा पोरके वाटते इथे माझे असणे
पोरकी वाटते माझी अगतिक कविता
पोरका वाटतो बिचाऱ्या माणुसकीचा माथा
(बांगला देशा - उत्थानगुंफा)

तेव्हा हे असं कोणीतरी भेटणं फार महत्त्वाचं असतं. त्या कोणा साथीदारानं समजून घेतल्यावर आलेलं पंखातलं बळ जगण्याची ऊर्जा देऊन जातं. पण कवीला हे पंख कशामुळे फुटले आहेत हे कोणाला कळत नाही आणि ते कळू नये असंही वाटत असतं त्याला. दोघांच्यात हळुवार अंकुरलेलं हे नातं त्याचं जन्मभराचं गुपित होऊन जातंच; पण जगण्यावरचा विश्वास वाढायला लागतो.

गेल्या शतकात आणि आजही लिहिल्या गेलेल्या पुरुषांच्या कवितेत जी स्त्री येते ती अनेकदा आई, मुलगी, आणि प्रेयसीच्या रूपात आलेली दिसते. वात्सल्य, प्रेम, प्रीती, समर्पण अशा भावना व्यक्त करणारी स्त्री पुरुषांना नेहमीच भावली आहे. कधी ती प्रेमस्वरूप आई होऊन येते तर कधी ती हट्ट करणारी मुलगी बनून येते. कधी आदिमाया तर कधी आदिशक्ती होऊन येते. कधी ती पुरुषाला मोहवणाऱ्या रतीरूपात येते. ती अल्लड प्रेयसी असते, कलिजा खलास करणारी, लाजरीबुजरी मोहक बाला असते. अगदी कधी आलीच तर त्याच्या सैरभैर अवस्थेत त्याला आधार देणारी सखी असते. पण तिच्याकडे मित्र म्हणून किंवा एक स्वतंत्र मुक्त स्त्री म्हणून फार कमी कवींनी पाहिलं आहे. यशवंत मनोहरांच्या या संग्रहात ती अशी मित्र बनून येतेच; पण त्याचबरोबर ती एक माणूस म्हणूनही येते.

आपण परस्परांचे मालक नव्हतो, गुलामही नव्हतो.
आपण परस्परांची एकजीव मित्रता आणि
अपरिहार्यतेचे निष्कर्ष होतो.
ही मैत्री आपल्या ओठांची, डोळ्यांची, श्वासांची:
हातांची, मोहोरांची, रक्ताची आणि भरतीची:
मैत्री देहाची आणि काळजातील काव्याची:
साऱ्या अलवार आणि धुवाधारही उद्रेकांची. (पृ. ५०)

मनोहरांच्या कवितेत येणारं स्त्रीपुरषांतील हे नातं आदिम नात्याकडे घेऊन जातं. ज्या वेळी स्त्रीपुरुषांत कोणतीही सत्तास्पर्धा नव्हती, पुरुषाला आपल्या सत्तेचा शोध लागला नव्हता, त्या वेळी बेभान जगताना, एकदुसऱ्यात सामावून जातानाच एकमेकांना अवकाश देणं, स्वतः स्वतःचे निर्णय घेताना त्याचे परिणाम भोगणं हे सहज होत होतं. स्त्री ही पुरुषाची संतती प्रसवणारी यंत्र झाली नव्हती त्या काळात आपल्याला ही कविता घेऊन जाते.

अनुक्रमणिका

विसाव्या शतकाच्या मध्यानंतर दोन दिशांनी
विजांसारखे झळाळत आलो.
आपणाला कोणतीही नावे असती; गावे असती
तरी हा सोहळा थांबला नसते.
तो आपल्या आदिम भुकेचा निर्णय होता.
तो युगानुयुगाच्या तहानेचा चीत्कार होता. (पृ. ४४)

ही आदिम भूक हे स्त्रीपुरुष नात्यातील चिरंतन सत्य आहे. ही ओढ, ही तहान त्यांना एकत्र आणते आणि सर्जनप्रक्रियेचा सोहळा सुरू होतो.

प्रशांत सागराच्या तळाशी
हालचालींचे उष्ण वादळ.
रक्ताच्या मिठ्या मारत
अनोख्या शिखरावर नेते ही ओढ.
प्रेमस्विनी...! (पृ. ३१)

ही ओढ निरंतर आहे. तिला कोणत्याही संस्कृतीचे किनारे बंदिस्त करू शकत नाहीत हे हा कवी जाणतो. त्यामुळेच तो म्हणू शकतो :

स्त्रीला असते ते शरीर तू नाहीस
तू आहेस पूर्णप्रकाशित प्रेमस्विनी...
परस्परांशिवाय सुरूच होत नाही.
असे आपण जगणे आहोत.
संस्कृतीचा चक्रव्यूह भेदून
आपण आपल्यात शिरलो. (पृ. ५१)

हे एकमेकांत शिरणे केवळ दैहिक पातळीवर राहात नाही तर सर्जनाचा स्रोत बनते. नवनव्या निर्मितीच्या शक्यता वर्तवते.

आपण शरीरापाशीही थांबलो नाही
मनांपाशीही थांबलो नाही
आपण बेरीज केली या दोन्ही अथांगांची.
आपली मनो एकमन
आपली शरीरे एकशरीर
मनच झाले उधाणलेले शरीर
शरीरच झाले उधाणलेले मन.
आपण ज्या शेंड्यावर पोचून
पौर्णिमांची अचूक बेरीज केली
तो शेंडा असलेलं झाड जगात कुठेच नाही. (पृ. ३०)

हे असं जग जगात कुठेच नाही, ते कवीच्या मनात आहे; पण तसं ते प्रत्यक्षात असावं असंही कवीला वाटतं आहे. आजपर्यंत या जगात स्त्रीच्या शरीराकडे केवळ उपभोगाचं साधन म्हणून या समाजानं पाहिलं. तिच्यातली सर्जनोत्सुकता नाकारली. तिच्या लैंगिक प्रेरणांचं दमन केलं. तिच्यातली ऊर्जा मारली. कवीला या सगळ्यांची जाणीव आहे आणि असं करणाऱ्या या समाजातील पुरुषाविषयी चीडही आहे. त्यामुळेच तो तिला सांगतो :

होऊ नकोस चांगुणा मुलाचे शिर शिजवून
दुष्टांना वाढणारी,
होऊ नकोस सीता स्वतःला भूमीत गाडणारी
नागव्याने जेवण वाढण्याचा प्रस्ताव मान्य करणारी
होऊ नकोस अनसूया
द्रौपदी होऊ नकोस
होऊ नकोस सहभागी आपल्याच मनाच्या मरणात...
तू हो मनुष्यायनाची ज्वलंत अधिनायिका
शिकव संघर्षाचे तत्त्वज्ञान तुझ्या फांद्यांना.
शिकव त्यांना बुद्धिवादाची अद्ययावत कलमे
डोक्यात वागवायला.
तुझे डोके होऊ दे भारतीय संविधानाची प्रास्ताविका.
(युगांतर, पृ. ८९)

स्त्रीला उजेडाच्या पंखांनी उडायला सांगणारा, तिला माणूस मानणारा हा कवी म्हणूनच आपल्या प्रेमस्विनीचाही आदर करताना दिसतो. तिच्या शरीरापलीकडे पहातो. कुंकवाऐवजी त्याच्या नावाची निळी ठिणगी कपाळावर रेखायला सांगतो. केवळ हातच हातात घेत नाही तर त्यांच्या डोक्याला तिच्या डोक्याची साथ हवी आहे. या अशा जगाशी लढण्यासाठी आपली मनं आणि आपले विचार एक झाले पाहिजेत असं त्याला वाटतं.

स्त्रीला रूढी, परंपरांच्या चौकटीत बंदिस्त करून तिच्या पायांत मनामनाच्या बेड्या घालणाऱ्या तथाकथित संस्कृतीला हा कवी नाकारतो आहे. या संस्कृतीनंच जातव्यवस्थेचा आणि लिंगव्यवस्थेचा घाट घातला. त्याच्या नावावर दलितांचं आणि स्त्रीचं शोषण आणि दमन केलं. अशा संस्कृतीनं अव्हेरल्याचं दुःख सातत्यानं

अनुक्रमणिका

व्यक्त करणाऱ्या या कवीला शोषणाचा अर्थ माहीत आहे. आज एकविसाव्या शकतातही हे मालकीहक्काचं, लिंगसत्तेचं राजकारण खेळणाऱ्या संस्कृतीविषयी त्याला शाश्वती नाही. या संस्कृतीत त्याला आपलं प्रेम रुजवायचं नाही.

या दुनियेला मंजूर नसलेली;
या दुनियेत न मावणारी;
एक मुक्त दुनिया आपण निर्मिली
हे फक्त तुला मलाच माहीत असलेले.
आपले विश्वातील विश्व! (पृ. ५५)

आज स्त्रीला पुन्हा एकदा काळोख्या कोपऱ्यात घेऊन जाऊ पाहणारी संस्कृती आणण्याचा प्रयत्न होत असण्याच्या काळात मुक्त दुनिया निर्माण करण्याचं धाडस हा कवी करतो आहे. ते केवळ स्वप्नरंजन म्हणून नाही. तर मनोहरांची एकूण कविताच या अशा नव्या जगाविषयी बोलते आहे. जिथं जात आणि लिंग यांच्या आधारावर असलेली विषमता नसेल तर आदिम काळात असलेल्या माणसामाणसांच्या आणि स्त्रीपुरुषांच्या नात्यात एक मुक्त संवाद असेल. मनोहरांची अलीकडे 'युगांतर' मध्ये आलेली मायबाई नावाची दीर्घकविता याची साक्ष देते. जातव्यवस्थेनं आणि पुरुषसत्ताक व्यवस्थेनं दलिताचं आणि स्त्रीचं नेमकं कसं शोषण केलं आहे हे सांगताना ते म्हणतात :

मायबाई...
आपण एकाच आगीत जळत आहोत
नव्हते आपणाला स्वप्न पाहण्याचे स्वातंत्र्य,
नव्हता आपल्याला आपल्या मर्जीचा
श्वास घेण्याचा अधिकार.
परिघाबाहेरच्या आपल्या निमूटपणाच्या डोक्यावर
नव्हते कोणते आभाळ...
आपण झडत राहिलो शिशिराशिवाय कायम बाहेर
आणि आपण आतल्याआत वहात राहिलो
ओंडक्यासारखे पुरात
आणि मरत राहिलो हजारो वर्षेमेल्याशिवाय.
(युगांतर, पृ.१०३)

पण आता मात्र आपल्याला युद्धभूमीच्या क्रांतीची कविता व्हायला हवं असं ते म्हणतात. या क्रांतीची कविता त्यांनी स्वतः लिहिली आहेच; पण स्त्रीनंदेखील आता निर्भय व्हावं, बंधनं तोडावी, मेंदूत गुदमरणारं सत्य सांगावं असं त्यांना वाटतं. ते म्हणतात :

मायबाई नवी संस्कृती, नवे युग जन्माला घालू
आपण.
तिथे असेल करुणेनं ओथंबणारी मैत्री. (युगांतर,
पृ.११५)

ही मुक्त निर्भेळ मैत्री या कवीला सतत आकर्षित करते. प्रतीक्षायन या संग्रहातही तो अशा या करुणेनं ओथंबलेल्या स्त्रीपुरुष नात्याविषयी बोलत असतो. दुनियेतील सर्व सुखांनी मांडलिकत्व पत्करावे असे सुखातील सुख झालेल्या या प्रेमस्विनाची वाट पाहताना तो म्हणतो :

तुझ्या काळजाला माझ्या नावाने पंख फुटले की समज माझा जीव फक्त तुझ्यासाठी प्रतीक्षायन झाला आहे प्रतीक्षायन, अखंड अखंड प्रतीक्षायन झाला आहे. ही प्रतीक्षा केवळ त्याच्या सखीची, मैत्रिणीची किंवा प्रेयसीची आहे असं मात्र नाही. ही प्रेमस्विनी केवळ याच रूपात येत नाही तर त्याच्या निर्मितिशक्तीच्या रूपातही येते. या शक्तीशिवाय त्याला नाही जगता येत. तो म्हणतो :

हृदयाचे ठोके सुरू होत नाहीत तुझ्याशिवाय
रक्ताला येत नाही मोहोर जिंदगीचा तुझ्याशिवाय
तू नसतेस तेव्हा चितांवर जळतो जन्म माझा
ज्यात तू नाहीस
असा श्वास घेता येत नाही मला, (पृ. ९)

कवितेशिवाय जन्म निरर्थकच होत जातो त्याचा. अनेकदा ती मनात कुठंतरी असते पण शब्दांत उतरत नाही. त्या वेळी ज्या अस्वस्थतेतून एखादा कवी जातो तेव्हा जगणंही मरणासारखंच होऊन जातं त्याच्यासाठी. ती त्याच्या मनभर वावरत असली तरच तो जगू शकतो. म्हणूनच हा कवी या त्याच्यातल्या सर्जनालाच विनवणी करतो :

मला जगू दे प्रेमस्विनी...!
लपवून ठेव तुझ्या कडेकोट बाहूत मला
परत जाऊ दे पराभूत होऊन माझ्या अस्ताचा क्षण
तुझ्याचसाठी आयुष्यातला प्रत्येक श्वास
तुझ्याचसाठी अखंड प्रतीक्षायन. (पृ. ९)

अनुक्रमणिका

पहिल्या कवितेत सुरू झालेलं हे प्रतीक्षायन शेवटच्या कवितेपर्यंत चालू राहातं. अगदी सुरुवातीला उपोद्घातातही मनोहरांनी म्हटलं आहे :

कुठेही नसली तरी हवेसम सर्वत्रची तू विलसत आहे
मृगज तू; पण तहान माझी सत्य; चिरंतन रडते आहे.
...तरीही वाटते पाऊस होऊन; समुद्रात येशील रुजाया
पंख लावुनी व्याकुळतेचे; येशील गगनामध्ये उडाया
अशी प्रतीक्षा अंतहीन ही; श्वास पेटवून कविता लिहिणे
आस तरीही सूर्यच येईल; कधीतरी घेऊन चांदणे...
या तहानेने कविता माझी नक्षत्रांनी फुलली आहे
जगण्यातील मरणांना साऱ्या; हसली आहे... (पृ.८)

प्रेमशक्तीची विविध रूपं या कवीनं या संग्रहातून आपल्यासमोर आणली आहेत. नेणिवेत लपलेली हवीशी वाटणारी पण कधी समोर न येणारी कविता ही कवीची खऱ्या अर्थानं प्रेमस्विनी असते आणि ती मनोहरांचीदेखील आहे. त्यामुले सुरुवातीपासून ते अंतापर्यंत कवीला प्रतीक्षा आहे ती त्याच्या आत लपलेल्या निर्मितिक्षमतेचीही. आत नेणिवेत लपलेली ही कवितासखी ही कवीला सतत साद घालताना दिसते. प्रेमशक्तीच्या विविध रूपांत ती येते पण त्याचबरोबर निर्मितीला प्रेरणा देणारी प्रेमस्विनी बनून कायम नेणिवेत बसून राहते.

या कवितासंग्रहातील साऱ्या कविता वाचताना एक गोष्ट विशेषत्वाने जाणवली ती म्हणजे तिच्यात आणि त्याच्यात असलेल्या या युगानुयुगांच्या नात्याची तो तिला सतत आठवण करून देतो आहे; जणू कवीच्या मनात काय चाललं आहे याची जाणीव तिला नाही आणि ती तिला करून देण्याचा प्रयत्न तो पुन्हा पुन्हा करतो आहे. जणू काही ही स्त्री त्याला समजू शकत नाही. त्याच्या मनात तिच्याविषयी असलेल्या भावना जाणू शकत नाही. अशा वेळी तिला कसं पटवायचं हा प्रश्न तर त्याला पडला नाही ना? आपल्या मनात नेमक्या काय भावना आहेत, तिचं त्याच्या आयुष्यात नेमकं काय स्थान आहे ते या कवितेच्या माध्यमातून तो जाहीरपणे या प्रेमस्विनीला सांगू पाहतो आहे. मनोहरांच्या साऱ्याच कविता खरं तर सतत या समाजाला काहीतरी सांगू पाहतात. मग ते माणसानं माणसाच्या केलेल्या शोषणाविषयी असेल. शोषितांच्या वेदनेविषयी असेल, त्याच्या दुःखाविषयी असेल की या कवितांत प्रेमस्विनीसमोर दिलेल्या विविध प्रकारे केलेल्या कबुलीविषयी असेल. ही त्यांची स्वतःची अशी शैली आहे. अशी कविता अंतर्मुखतेकडे न जाता श्रोतृसन्मुख जास्त होते. त्यामुळेच या साऱ्या कविता रेटॉरिकल झाल्या आहेत. जेव्हा तुम्ही कोणाला तरी सतत सांगू पाहात असता तेव्हा त्यात गद्यपरता जास्त येत जाते आणि प्रतिमा-प्रतीकांतून खोलवर पोचण्याची ताकद हरवून बसते. या कवितांच्या बाबतीत तसंच थोडंफार झालं आहे. यात येणाऱ्या प्रतिमा, प्रतीकंही त्यांच्या कवितांत अनेकदा आलेली आहेत. त्यामुळे या कवितांत आशयाबरोबरच प्रतिमा-प्रतीकांचीही पुनरावृत्ती होत राहते. अर्थात संपूर्ण संग्रह केवळ प्रेमस्विनीला अर्पण केल्यावर असे होणेही अनिवार्य आहे.

'दारात चंद्र नाही आला अजून माझ्या', असं खंतावून म्हणणाऱ्या या कवीच्या या संग्रहातून मात्र पौर्णिमेच्या चंद्रासारखी चांदण्याची पखरण करणारी प्रेमस्विनी, त्याच्याबरोबर आपल्यालाही भेटत राहते आणि केवळ सामाजिक बांधिकली मानणाऱ्या या कवीच्या मनाचा एक हळवा कोपरा आपल्यासमोर उलगडत जातो हे जास्त महत्त्वाचं वाटतं.

• • •





अग्नीचा आदिबंध

माधव पुटवाड

यशवंत मनोहर हे कवी-लेखक-समीक्षक-शिक्षक-विचारवंत-वक्ते म्हणून बहुपरिचित व्यक्तिमत्त्व. त्यांच्या ‘उत्थानगुंफा’ या पहिल्याच कवितासंग्रहाचे मूल्यमापन करताना रा.ग. जाधव यांनी म्हटले आहे- ''प्रज्ञा व प्रतिभा यांचे दंद्वात्मक नाते काव्यात्म उंची कोठवर गाठू शकते, याचे ज्ञानेश्वरांनंतर पुन्हा एकदा प्रत्यंतर घडविले आहे. यापुढचा मराठी विद्रोहविचार व वैचारिक कविता या दोहोंना उत्थानगुंफेचा टप्पा टाळता येणार नाही. कारण विद्रोहविचारात भावनेचा प्रभाव कसा दूरगामी व आदर्शकांक्षी ठरू शकतो आणि विचारकाव्यात विचारांची उंची व दीप्ती किती भव्यदिव्य असू शकते, याची कल्पना ‘उत्थानगुंफे’वरून येऊ शकेल आणि याची दखल विचारवंत व प्रतिभावंत या दोहोंनाही घ्यावी लागेल.'' रा.ग. जाधव यांचे हे मूल्यमापन साधार आहे. वस्तुस्थितीला धरून आहे. यशवंत मनोहर या कवीचा ‘उत्थानगुंफे’नंतरचा प्रवास रा.ग. जाधव यांच्या निरीक्षणाला अधिक ठळक करणारा आहे.

यशवंत मनोहर यांचा ‘अग्नीचा आदिबंध’ हा कवितासंग्रह २००८ ला प्रकाशित झाला. १०४ पृष्ठांच्या या कवितासंग्रहात ३२ कविता आहेत. ‘बंधो!’, ‘तर मी काय करू?’, ‘खैरलांजी’ या दीर्घ कविता आहेत. या कवितासंग्रहातील कवितांचा आशय वेगवेगळा आहे, मात्र या सगळ्या कवितांत या-ना-त्या स्वरूपात यशवंत मनोहर यांचे व्यक्तिमत्त्व उतरले आहे. त्यांची विवेकी भूमिका शब्दाशब्दांतून अभिव्यक्त होताना दिसते. समकालीन अनपेक्षित वास्तव आणि त्या वास्तवाविषयीची यशवंत मनोहर यांची थेट प्रतिक्रिया या संग्रहातील कवितांतून आली आहे. ''बंधो! वावर पडीक कसे दिसते? /इथे तर संविधान पेरले होते!/पेरले ते उगवले नाही/की उगवले ते जगवले नाही?'' (पृ. २३) या शब्दांत त्यांनी सभोवतालचे अनपेक्षित वास्तव नोंदवले आहे. सभोवतालच्या वास्तवात आपले अस्तित्व टिकवायचे असेल, तर संघर्ष अपरिहार्य आहे. आपण सावध असणे आणि आपली जबाबदारी नीट पार पाडणे आवश्यक आहे. ही वस्तुस्थितीही त्यांनी पुनःपुन्हा अधोरेखित केली आहे.

कविता कशी असते, कविता कशी असावी, कवितेची निर्मिती कशी होते, मानवजातीचा इतिहास काय सांगतो, वर्तमान काय सुचवतो, माणूस म्हणून आपले कर्तव्य काय इत्यादींविषयीचे यशवंत मनोहर यांचे मूलगामी चिंतन या संग्रहातील कवितांतून आले आहे. पण प्रामुख्याने कवितासंग्रहातील कवितांतून यशवंत मनोहर यांचे कवी असण्याचे चरित्र आले आहे. त्यांची कवी म्हणूनची जडणघडण आणि कवी म्हणून त्यांनी

अनुक्रमणिका

मांडलेली भूमिका याविषयी ते स्वतः भाष्य करताना दिसतात. ते त्यांच्यातल्या कवीची स्वप्ने आणि प्रत्यक्ष वास्तव याची तपासणी करताना दिसतात.

यशवंत मनोहर यांचे विचारशील कवी असणे उत्तरोत्तर अधिकच उजळून निघाले आहे. त्यांचे विवेकी असणे आणि तो विवेक कवितांतून व्यक्त होणे अधिक स्पष्ट झाले आहे. त्यांचे कल्पनाविश्व आणि विचारविश्व अधिक व्यापक झाले आहे. स्वातंत्र्य-समता-बंधुता-लोकशाही-माणुसकी-करुणा अशा जीवनमूल्यांवरील त्यांची निष्ठा या बाबी निखळपणे व्यक्त झाल्या आहेत. या संग्रहातील कवितांतून सभोवतालाविषयीचे त्यांचे सूक्ष्म निरीक्षण आले आहे. गुंतागुंतीच्या अनपेक्षित वास्तवाविषयीची प्रतिक्रिया आली आहे. त्यांचा आत्मविश्वास आणि त्यांचे आत्मभान व्यक्त झाले आहे. यशवंत मनोहर यांचे माणूस असणे आणि त्यांचे कवी असणे या दोन बाबी वेगळ्या नाहीत; कवितेतला आशय आणि प्रत्यक्ष जगणे-भोगणे या बाबी एकच असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले आहे.

''... म्हणून ज्या शब्दांना जिवंतायचे असते/ते मला माझे काळीज मागतात/ज्या रस्त्यांना चालायचे असते/ ते मला माझी पावले मागतात.'' (पृ.११) या शब्दांत त्यांनी कवितेतील आशयांचा संबंध थेट त्यांच्या जीवनानुभवाशी, जीवनविषयक विचारांशी आणि जीवनव्यवहारांशी असल्याचे सांगितले आहे.

''बंधो! आपली कविता/आपल्याच रक्तात असते/आणि आपले रक्तच/ आपल्या कवितेत असते.'' (पृ.१४) ही त्यांची मांडणी म्हणजे कवी आणि त्याची कविता यांतील नात्याविषयीचे भाष्य होय. कवितेचे नाते केवळ कौशल्याने केलेल्या शब्दरचनेशी नसते, तर त्या कवीच्या समग्र 'असण्या'शी असते. मुळात कवीला त्याच्या असण्याची, त्याच्या आत्मसन्मानाची, त्याच्या सभोवतालाची, मानवी जीवनप्रवासाची आणि जीवनवास्तवाची जाणीव असावी; त्या जीवनाकडे पाहण्याची त्याची म्हणून एक भूमिका असावी; आणि मग अशा कवीने त्याच्या 'असण्या'सह इतर घटकांची अभिव्यक्ती करावी, सभोवतालच्या घटकांसह स्वतःचे 'असणे' शब्दात उतरावे, ही कवीची भूमिका आहे. त्याची ही भूमिका या संग्रहातील कवितांतून व्यक्त झाली आहे.

यशवंत मनोहर यांच्यातल्या कवीची जडणघडण होणे आणि त्यांचे कवी असणे व ते कविपण शब्दांतून उमटणे यांतील संगती व्यक्त करताना ते लिहितात- *''बंधो! रात्रीची अखंड साखळी तुडवित/इथवर आलो./सूर्यांने पाठ थोपटली./आसवांनी उराशी कवटाळले./हे मी सांगायला लागलो आणि/माझ्या शब्दात काव्य वस्तीला आले.'' (पृ.२०)* अर्थात, त्यांच्या या लेखनातून त्यांच्या माणूस असण्यातील आणि कवी असण्यातील अतूटता व्यक्त होते. त्यांचे जीवनानुभव आणि त्यांच्या कवितांतील आशय यांतील अभिन्नता अभिव्यक्त होते. *''बंधो! पाण्यात दिसते आभाळ/तसा आहे मी माझ्या कवितेत./सूर्यात असावी आग/तसा आहे मी माझ्या कवितेत./चंद्रात दाटून असावे चांदणे/तसा आहे मी माझ्या कवितेत./शरीरात असावा ज्वलंत प्राण/तसा आहे मी माझ्या कवितेत./बंधो! ज्योतीत असावा उजेड / तसा आहे मी माझ्या कवितेत./तहानेने तडफडती जमीन/तसा आहे मी माझ्या कवितेत./बंधो! भुकेची आग भडकलेल्या पोटासारखा/आहे मी माझ्या कवितेत. /कधीही,/ कोणाकडूनही,/न विझणाऱ्या निखाऱ्यासारखा/आहे मी माझ्या कवितेत./ज्वारीत पीठ/आणि पिठात असावी भाकर/तसा आहे मी माझ्या कवितेत./...बंधो! मिठात खारटपणा आणि कारल्यात कडूपणा/तसा आहे मी माझ्या कवितेत./भाकरीला चव आणि रस्त्याला दिशा/तसा आहे मी माझ्या कवितेत./वावरात पीक आणि कवितेत काव्य/तसा आहे मी माझ्या कवितेत.'' (पृ.२५-२६)* या सगळ्या रचनांतून त्यांनी त्यांचे माणूस असणे कवी असण्यापेक्षा वेगळे नाही, हे सांगितले आहे.

माणसाने माणूस म्हणून जगत राहणे, त्याचे वय वाढत जाणे, त्या त्या समूहातील इतरांप्रमाणे त्याने विविध भूमिका वठवणे अशा बाबी कुतूहलाचा विषय होत नाहीत. पण एखाद्या माणसाचे त्या समूहातील बहुसंख्य माणसांपेक्षा वेगळे असणे कुतूहलाचा विषय असतो. कवी-लेखक वगैरे असणे इतरांपेक्षा वेगळे असणेच होय. त्या त्या समूहाच्या दृष्टीने या बाबी कुतूहलाच्या असतात. एखाद्याला लिहिण्यासाठी शब्द कसे सुचतात? कल्पना कशा सुचतात? अशा बाबींचे लोकांना कुतूहल असते. म्हणजेच लोकांना रचनाकौशल्याचे कुतूहल असते; पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे त्यांना लिहिणाऱ्याच्या विचारविश्वाचे कुतूहल असते. अर्थात, यशवंत मनोहर यांच्या कवी असण्याविषयी कुतूहल असणे स्वाभाविक आहे. त्याचबरोबर त्यांच्या भावविश्वाविषयी, त्यांच्या

अनुक्रमणिका

कल्पनाविश्वाविषयी, त्यांच्या विचारविश्वाविषयी, त्या विचारविश्वाच्या जडणघडणीविषयी आणि आविष्काराविषयी कुतूहल असणे साहजिक आहे. 'अग्नीचा आदिबंध' या कवितासंग्रहाचे महत्त्व हे, की या कवितासंग्रहातील कवितांतून यशवंत मनोहर यांनी स्वतःच वरील कुतूहलाच्या प्रश्नांविषयी भाष्य केले आहे.

भारतातील स्त्रियांच्या, दलितांच्या, वंचितांच्या 'माणूस' म्हणूनच्या जगण्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अर्थ प्राप्त करून दिला. आधुनिक भारतात महात्मा फुले, राजर्षी शाहू यांच्यानंतर इथल्या दलितांना-वंचितांना 'स्व'ची जाणीव करून दिली ती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच. भारतीय संविधानाच्या निर्मितिप्रक्रियेत जर डॉ. बाबासाहेब आंबेडकर नसते, तर इथला दलित-वंचित वर्ग स्वातंत्र्यानंतर तरी स्वतंत्र झाला असता का? त्याला या देशाचा नागरिक म्हणून इतरांप्रमाणे सन्मानाने जगता आले असते का? की ही माणसे नव्या पारतंत्र्यातच जगत राहिली असती, असा प्रश्न पडतो. कारण भारतीय माणसात रक्तापेक्षा जातीय अहंगंड जास्त आणि गडद आहे. तो तेव्हाही काही कमी नव्हता आणि आजही फार काही कमी झाला नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इथल्या स्त्रियांना, दलितांना, वंचितांना आत्मसन्मानाची जाणीव करून दिली. शिक्षणाचे, संघटित होण्याचे आणि संघर्षाचे महत्त्व पटवून दिले. त्याची आवश्यकता आणि अपरिहार्यता पटवून दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना त्यांचा गौरवशाली इतिहास सांगितला, त्यांच्यावरील अन्यायाची परंपराही सांगितली. त्या तशा अन्यायाला आपणही कसे जबाबदार आहोत, तेही त्यांनी सांगितले. इथल्या धर्मव्यवस्थेचे शोषणमूलक स्वरूप अधोरेखित केले. शोषणाच्या, अन्यायाच्या, अत्याचाराच्या अमानुष परंपरेचे प्रतीक असलेल्या मनुस्मृतीचे दहन केले, चवदार तळ्यातील पाण्याला स्पर्श केला. या घटना म्हणजे इथल्या स्त्रियांना, दलितांना, वंचितांना 'माणूस' असणे म्हणजे काय असते, ते सांगणे होते. त्यांच्यातले माणूसपण जागवणे होते. मनुस्मृती पेटवली त्या जाळाने इथल्या दलितांचा, पीडितांचा स्वाभिमान जागा झाला. पुढे ती धगधगती मशाल झाली. चवदार तळ्याच्या पाण्यावर इथल्या दलितांच्या, पीडितांच्या आत्मविश्वासाचे रोपटे वाढले.

धर्मांतर हा इथल्या धर्मांधतेवर, शोषणव्यवस्थेवर आणि अज्ञानावर घातलेला मोठा घाव आहे. इथल्या तथाकथित कुटिल धर्मरक्षकांना दिलेली ती जबर चपराक आहे. आधुनिक इतिहासातल्या या केवळ घटना नाहीत, तर या घटनांतूनच नंतरचा इतिहास घडला आहे. हे या घटनांचे वेगळेपण होय. या घटनांनी इथल्या माणसाला जागृत केले. त्याला त्याच्या माणूस असण्याची जाणीव करून दिली. गेल्या कित्येक वर्षांपासून इथल्या कुटिलांनी इतिहासातील लेखनातून ज्यांना वगळले होते किंवा खलनायक ठरवले होते ते आता आधुनिक इतिहासाच्या पानापानांवर दिसू लागले. त्यांचे कर्तृत्व ठळक झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नवा इतिहास घडवला. आंबेडकरी विचाराने नवा माणूस घडवला. यशवंत मनोहर त्या माणसांपैकीच एक होत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचे वेगळेपण सांगताना, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयीचा आदरभाव व्यक्त करताना आणि आपल्या काव्यलेखनाची प्रेरणा सांगताना यशवंत मनोहर यांनी लिहिले आहे - ''*तू उभारलास संग्राम/दुनियेला संग्राममुक्त करण्यासाठी/तू झालास सूर्य/दिवसांना अंधारमुक्त करण्यासाठी./तू चालत गेलास ती वाट निखाऱ्यांची होती/तू उड्डाण घेतलेस /ते अंतराळ पेटलेले होते./तुझ्या शूर शब्दांनी/निर्माण केले पंखांचे पर्व/तुझ्या जन्माने निर्माण झाला/ठिणग्यांच्या मुक्तिचा जाहीरनामा/माझे कलेवर कवी झाले/तुझ्या चवदार तळ्याच्या पाण्याने/माझी कविता अंगार झाली/तुझ्या नजरेतील क्रांतीने.'' (पृ.८०)* खरे तर यशवंत मनोहर यांनी रचलेल्या या कवितेतील आशय त्यांच्याप्रमाणेच इथल्या लाखो दलितांच्या, वंचितांच्या हृदयातला आहे. त्यांच्या अंतःकरणातल्या आवाजाला यशवंत मनोहर यांनी शब्दरूप दिले आहे.

यशवंत मनोहर यांच्या आईवडिलांच्या भावविश्वाची आणि विचारविश्वाची मशागत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी झालेली. त्यांनी जाणीवपूर्वक आपल्या मुलाला घडवले. यशवंत मनोहर यांनी आपल्या जडणघडणीतील वडिलांचे हे योगदान नोंदवताना लिहिले आहे - ''*तुझ्या खांद्यावरचे घर रात्र पांघरून निश्चिंत झोपायचे/तेव्हा पाहिले तुला मी माझ्या भविष्याचा दोर वळताना/तू होतास भाजी भाकरींच्या बारमाही झाडासारखा मी तुला पाहिले अंधारातही पहाटेशी गोष्टी करताना/गरिबीशी भांडत*

भांडत सूर्याच्या बोलानाच तू दिशा केलेस/आणि चार टिकल्या जमवून; माझ्यासाठी पाटीपुस्तक आणलेस/तुझ्या नकळत तू घरात ज्वाळांच्या पुस्तकांचे झाड आणलेस/आणि तुला छळणाऱ्या मयसभेला तू राख राख होताना पाहिलेस./बापा, तू तुझ्या जखमांच्या विद्यापीठातच शिकला होतास/तू घण झाला होतास आणि माझ्याभोवतीचा तुरुंग तोडत होतास./तू होतास अडाणी पण माझा हात तू प्रवाहाच्या हातात दिलास/बापा, हा सगळा आटापिटा तू कशासाठी करीत होतास?'' (पृ.८-९) किंवा

'उचलून सारे घरातील देव/जांबेत दिधले तुवा फेकुनी/महाक्रांतीचा लेक झालास बापा,/उरातील अवघी भीती गाडुनी/तुवा फेकल्या सर्वही जीर्ण रूढी/तुवा टाकिला धर्मही थुंकुनी/नास्तिक रक्तावरी पोसलेले/तुझे झाड मोहरून आले दिव्यांनी.../...कष्टात होते तुझ्या पंचशील/तुझा धम्म तुझ्या इमानात होता/करणीत होता स्वयंदीप तुझ्या/घामात तुझ्या तुझा भीम होता.'' (पृ.१४-१५) वडिलांच्या विवेकी भूमिकेचा आाणि प्रामाणिक व्यवहाराचा आपल्यावर प्रभाव असून ते पाहात पाहातच आपले व्यक्तिमत्त्व आकाराला आल्याचे कवीने सांगितले आहे. यशवंत मनोहर यांचे वडील दारिद्र्यात जगले. त्यांनी हालअपेष्टा सहन केल्या, मात्र स्वाभिमान गहाण टाकला नाही. आपल्या मुलाचे भविष्य उज्ज्वल असावे यासाठी ते प्रयत्न करत राहिले. आल्या संकटांना तोंड देत जगले. त्यांचे ते तसे जगणे यशवंत मनोहर यांच्या जडणघडणीत महत्त्वाचे ठरले.

कवीच्या आईने आपला मुलगा शरीराने वाढावाच, पण त्याच्यात स्वाभिमान असावा, आत्मविश्वास असावा, मनुष्यहिताचे कार्य करत जगणाऱ्या आपल्या मुलाचे नाव त्याच्या कर्तृत्वाने मोठे व्हावे, हे स्वप्न उरी बाळगले, आंबेडकरी विचारांची घुटी देऊन त्यांनी आपल्या मुलाचे विचारविश्व समृद्ध केले. आयुष्याला वळण देणाऱ्या आईचे हे अर्थपूर्ण असणे सांगताना यशवंत मनोहर यांनी लिहिले आहे - *''तिला मंजूर नव्हेत रडणे/जळतानाही गायची ती कष्टाचे गाणे/ती म्हणायची, 'वाकतात पहाड/आपलेच असावे कलदार नाणे.'/आईने मला अन्नाऐवजी निखारेच चारले/जिद्दी ठिणग्या पेरल्या श्वासात/तिच्यामुळेच मी जळत नाही वणव्यात/तिच्यामुळेच मी वाट चुकत नाही अरण्यात./ती उभी आहे मरणाच्या मढ्यावर/मी तिच्याच कष्टांची कविता आहे./तिला मारू शकत नाही कोणतेही मरण/तिचेच तर श्वास मी पुढे नेतो आहे.''(पृ.९२-९३)*

अर्थात, आईवडिलांचा आत्मविश्वास, त्यांची श्रमनिष्ठा, स्वाभिमानी प्रवृत्ती आणि विवेकी असण्याचे बाळकडू घेत घेत आपण माणूस म्हणून घडलो. त्या माणूस म्हणून घडण्याच्या प्रक्रियेचाच एक भाग होऊन आपल्यातला कवी आकाराला आला. हे यशवंत मनोहर यांनी वरील रचनेतून व्यक्त केले आहे. मुळात या कवितासंग्रहातील कवितांचा आशय प्रामुख्याने आत्मवृत्त स्वरूपाचा आहे. इथे कवीने त्याच्या कवी म्हणूनच्या जडणघडणीचे आणि त्याच्या असण्याचे रूप-स्वरूप सांगितले आहे.

'बंधो!' या कवितेतून मनोहरांनी आपल्या बांधवांना संघर्षाशिवाय पर्याय नाही, तेव्हा संघर्ष करा, आपला स्वाभिमान, आपले स्वातंत्र्य जपा, हिंमत हरू नका आणि नको त्याची भीती बागळू नका, विषमतेला जागा देऊ नका, स्वातंत्र्य-समता-बंधुता-लोकशाही ही जीवनमूल्ये जपा, विद्रोहाइतकीच नवनिर्मिती महत्त्वाची असते याचे भान ठेवा, 'स्वत्व' जपा, स्वकर्तव्याची जाणीव ठेवून केलेल्या कर्माने-कर्तृत्वाने मोठे व्हा. पुढे जा. हाच आपला अर्थपूर्ण जीवनप्रवास असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपणास हाच संदेश दिल्याचे सांगितले आहे. त्यांच्या 'बंधो!' या कवितेतील 'बंधो! कत्तलखोरांच्या मुलखात/आता केवळ माणसांचीच कविता लिहिली पाहिजे. हृदयशून्यतेच्या सत्कारसमारंभात/कवितेने असीम हृदयांचीच छावणी लढवली पाहिजे./जखम कोणाचीही असो/ती आपल्याला आपलीच वाटली पाहिजे./वाताहत कोणाचीही होवो/आपल्याही पायाखालची जमीन हालली पाहिजे./अश्रू कोणत्याही डोळ्यात येवो/पापणी आपलीही भिजली पाहिजे./...बंधो! आपण वाट हरवलेल्या नजरांपुढे /उर्जेचे फलक घेऊन निघालेली/वाट झालो पाहिजे./भरकटलेल्या गलबतांसाठी/आपण विश्वासार्ह/दिशा झालो पाहिजे./...बंधो! ओठात एक, पोटात एक/हे लक्षण खऱ्या माणसाचे नव्हे/एकाच तोंडात अनेक जिभा असणे/हे लक्षण खऱ्या सत्याचे नव्हे. /ओठात फुले आणि पोटात काटे/हे लक्षण सज्जन झाडाचे नव्हे/गावे दंगलीत जळतात आणि नेते पत्ते खेळतात/हे लक्षण जबाबदारीचे नव्हे.'' (पृ. २१-३०) अशा ओळी खूप

अनुक्रमणिका

बोलक्या आहेत. त्यांतून कवीची भूमिका अधोरेखित झाली आहे. 'तर मी काय करू?'सारख्या कवितेतून त्यांची अगतिकताही व्यक्त झाली आहे.

मुळात बदलण्याची ऊर्मी असणे, आल्या संकटाला तोंड देण्याची हिंमत असणे, योग्य-अयोग्य काय याची, सत्य-असत्याची व आत्महित आणि आत्मनाशाची ज्याला त्याला जाणीव असणे आवश्यक आहे. ज्याला याची जाणीव नाही त्याचे करायचे तरी काय, हा कवीला पडलेला प्रश्न आहे. *''मी बियाणे सोडतो आहे सरत्यामधून/तुम्ही जमिनीलाच आग लावली असेल/तर मी काय करू?'' (पृ.४६)* अशा ओळी वाचताना संत तुकारामांच्या अभंगांतील 'अथवा सेती बीज पेरिले भाजोन। सारा देईल कोण काका त्याचा।।२।।' किंवा 'न करी निगा कुणबी न काढिता तण। कैची येती कण हातासी ते।।२।।' अशा ओळी आठवतात.


''मी तुमच्या प्रत्येकाच्या धडावर सूर्य ठेवले आहेत./त्याची तुम्हाला अडचणच होत असेल/तर मी काय करू?'' (पृ. ४६) या ओळी वाचताना संत तुकारामांच्या अभंगातील 'ढालतलवारे गुंतले हे कर। म्हणे तो झुंजार कैसा झुंजे।।१।।' हा अभंग आठवतो. अर्थात, इथे संत तुकाराम आणि यशवंत मनोहर यांची तुलना केली नाही. यशवंत मनोहर यांनी अशा रचनेतून कोणत्याही माणसाच्या विकासात वा बदलात त्या माणसाचे 'असणे' खूप अर्थपूर्ण असते हे सत्य सांगितले आहे.

या कवितासंग्रहातील अभिव्यक्तीचे सांगण्यासारखे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कवीने अनेक अर्थपूर्ण वाक्प्रचारांचा उपयोग केला आहे. जसे- रडण्याचे उगम बुजवणे, मृगजळाच्या नद्या ओलांडणे, डोळ्यांतून निखाऱ्यांचे ढग सांडणे, पहाड छातीवर घेऊन डोंगर चढणे, कष्टाळू हातात दगड वितळणे, चिखलात फसलेले बंडीचे चाक उपसणे, काळोख नांगरणे, अनवाणी पायाची काट्यागोट्यांना भीती वाटणे, जिवंत सूर्याची किरणे पेरणे, मातीला नक्षत्रे देणे, भविष्याचा दोर वळणे, ज्वाळांच्या पुस्तकांचे झाड लावणे, मयसभा राख राख होणे, जखमांच्या विद्यापीठात शिकणे (पृ.८-९), मस्तवाल भिंत तोडणे, क्षितिजांची ठिकाणे बदलणे, जमिनीला निळे रक्त देणे, जाळणाऱ्या आगीला आग लावणे, विझून शांत न होणे, मनाने उलथापालथीचा धडा होणे, वाटेला किरणाची पालवी फुटणे, पावलांना समुद्रांची भरती येणे, अवकाशाला काळजाचे चांदणे येणे (पृ.१२-१३), रक्तात कविता असणे, कवितेत रक्त असणे, धरण तोडून बाहेर पडणे (पृ.१४). अगतिकांच्या आसवांसाठी डोळे होणे, जखमांसाठी औषध होणे, दिव्यांसाठी तेल होणे, गुणकारी मायेची वेल होणे, दुष्टपणाची भीती होणे, मन विकायला न काढणे, काळीज गहाण न ठेवणे (पृ. १६-१७), अंधाराची भाटगिरी करणे, ठिणग्यांचे वादळ उठणे, मगरुरीचा जीव पाणी पाणी होणे, सूर्याशी हात मिळवणे, निखाऱ्यांशी खेळणे, हातावर सूर्य खेळविणे (पृ.१८-१९) इत्यादी. या संग्रहातील कवितांत अशा अर्थपूर्ण वाक्प्रचारांचा कौशल्याने उपयोग केला आहे. त्यातून अपेक्षित अर्थ व्यक्त केला आहे. या कवितांतील वाक्प्रचारांचा उपयोग हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय होऊ शकतो.

यशवंत मनोहर यांच्या 'अग्नीचा आदिबंध' या कवितासंग्रहाविषयी खूप लिहिता येईल. विविध दृष्टीने या कवितांचा विचार करता येईल. इथे प्रामुख्याने यशवंत मनोहर यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीविषयी जे भाष्य केले आहे त्याबाबत लिहिले आहे. त्यांची ही अभिव्यक्ती त्यांचे समग्र साहित्याचा व्यक्तिमत्त्व समजून घेण्यासाठी आणि त्यांच्या समग्र साहित्याचा अन्वयार्थ नीट लावण्यासाठी आधारभूत ठरणारी आहे. त्यांचे स्वजीवनाविषयीचे व वैचारिक जडणघडणीच्या प्रवासाविषयीचे हे स्वकथन आणि त्या निमित्ताने त्यांनी व्यक्त केलेले मानवहिताचे हे चिंतन कलात्मक रूपात आविष्कृत झाले आहे. मराठी वाङ्मयाच्या इतिहासात ही अभिव्यक्ती नक्कीच महत्त्वाची आहे. यशवंत मनोहर यांचे काव्य वगळून मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिता येणार नाही.

• • •

माधव पुटवाड, प्राध्यापक, मराठी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. भ्रमणभाष : ९४२३७५०६०२





स्वप्नसंहिता : यशवंत मनोहर यांच्या स्वप्नसंहिताचे अंतरंग

डॉ. शैलेंद्र लेंडे

यशवंत मनोहर हे नाव मराठी साहित्याच्या क्षेत्रातील एक सर्वपरिचित असे नाव आहे. समकालीन मराठी साहित्यप्रांतातील ते अत्यंत महत्त्वपूर्ण असे लेखक, कवी विचारवंत आहेत. मागील पाच दशकांपासून ते आजतागायत निष्ठापूर्वक साहित्यनिर्मिती करीत आलेले आहेत. ऐन तारुण्याच्या कालखंडापासून लेखनारंभ करणारे यशवंत मनोहर हे मराठीच्या प्रांतात सातत्याने व अखंडपणे साहित्यनिर्मिती करीत राहिलेले साहित्यिक आहेत. त्यांनी केलेल्या साहित्यनिर्मितीला विविध पैलू व विविध परिमाणे आहेत. महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षणाच्या कालखंडापासून त्यांनी कवितालेखनाच्या रूपातून मराठी साहित्याच्या प्रांतात प्रवेश केला. ऐन तारुण्यकाळामध्ये त्यांना मराठी साहित्याच्या क्षेत्रातील एक प्रखर आंबेडकरवादी कवी अशी ओळख प्राप्त झाली. पण त्यांची ही ओळख केवळ कविता ह्या साहित्यप्रकारापुरती मर्यादित राहिली नाही. पुढे त्यांनी प्रवासवर्णन, कादंबरी, पत्रलेखन, ललित गद्य, वैचारिक साहित्य, समीक्षा इत्यादी विविध साहित्यप्रकार गंभीरतापूर्वक हाताळले. मराठी साहित्याच्या क्षेत्रातील विविध साहित्यप्रकार लीलया हातळत त्यांनी त्या साहित्यप्रकारांवर खास स्वविशिष्ट स्वरूपाची नाममुद्रा उमटविली.

यशवंत मनोहर हे कवी, कादंबरीकार, प्रवासवर्णनकार, ललित लेखक, वैचारिक साहित्यनिर्माते, समीक्षक इत्यादी विविध नात्यांनी ते मराठी साहित्यविश्वाला ज्ञात आहेत. त्यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व हे चतुरस्र व बहुआयामी स्वरूपाचे आहे, हे स्पष्टच आहे. त्यांनी विविध वाङ्मयप्रकार समर्थपणे हाताळले असले तरी विद्रोही व आंबेडकरवादी जाणिवेचा कवी या नात्याने ते मराठी साहित्याच्या दालनात पहिल्यांदा प्रविष्ट झाले. त्यांचा मूळ मनःपिंड हा कवीचा आहे. कवी हीच त्यांची पहिली व ठसठशीत अशी ओळख आहे. औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालयातील व तेथील विद्यापीठातील अध्ययनकाळात त्यांच्या कविपणाची व त्यांच्या कविमनाची जडणघडण झाली. महाविद्यालयीन विद्यार्थिदशेपासूनच ते कवितालेखन करू लागले. मिलिंद महाविद्यालय हे तत्कालीन आंबेडकरी चळवळीचे महाराष्ट्रातील एक अतिमहत्त्वपूर्ण असे केंद्र होते. ऐन तारुण्यकाळातील मनोहरांवर तत्कालीन आंबेडकरी जाणिवांच्या वैचारिक जागरणाचा साहजिकपणे परिणाम झाला. त्यांच्या भावसंवेदनांना, विचारजाणिवांना तेथे नवा आकार मिळाला. महाविद्यालयीन व विद्यापीठीय गुरुजनांच्या मार्गदर्शनातून त्यांचे तेथे वाङ्मयीन भरणपोषण होत गेले आणि त्याचबरोबर तेथील समाजनिष्ठ चळवळींच्या वातावरणातून त्यांचे अपारंपरिक कवित्व आकारास येत गेले. एक बंडखोर आशयाचा कवी म्हणून 'उत्थानगुंफा' कवितासंग्रहाच्या रूपातून त्यांनी मराठी साहित्यप्रांतात प्रवेश केला.

यशवंत मनोहर यांचा 'उत्थानगुंफा' हा पहिला कवितासंग्रह १९७७ मध्ये प्रकाशित झाला. त्यांचा हा पहिलाच कवितासंग्रह आशयाच्या व अभिव्यक्तीच्या दृष्टीतून अपूर्व स्वरूपाचा ठरला. 'मी आंबेडकरांच्या ओठावर उगवलेला प्रलयंकारी सूर्य आहे' असे आत्मविश्वासपूर्वक म्हणत त्यांची कविता या कवितासंग्रहातून मराठी वाचकांच्या पुढे आली. 'उत्थानगुंफा'मधून ते 'ज्वालांचे निःश्वास हुंकारत पुढे येणारा कवी' या रूपाने मराठी काव्यप्रांतात प्रविष्ट झाले. या कवितासंग्रहातील त्यांची परिवर्तनवादी, प्रगतिवादी व आंबेडकरवादी विचारदृष्टी मराठी काव्यपरंपरेमध्ये अनन्यसाधारण स्वरूपाची ठरली. या कवितासंग्रहातील विचारशयाचा आविष्कार हा मोठा आकर्षक, सौंदर्यपूर्ण व शैलीदार ठरला. या कवितासंग्रहातील उग्र उत्कट चिंतनाने व प्रखर वैचारिकतेने 'एक स्वतंत्र प्रज्ञा-प्रतिभेचा आंबेडकरवादी कवी' अशी त्यांची ओळख मराठी साहित्यक्षेत्रात निर्माण झाली. या कवितासंग्रहाच्या रूपातून येथील दलित-वंचित समाजाबरोबरच भारतीय समाजव्यवस्थेवर आंबेडकरी विचारदृष्टीतून चिंतनशील भाष्य करणारा विचारकवी महाराष्ट्राला गवसला. यशवंत मनोहर यांच्या 'उत्थानगुंफा' कवितासंग्रहाने मराठी काव्यप्रांतामध्ये 'सर्वंकष विद्रोहाचा रौद्रसुंदर युटोपिया' साकार केला. या कवितासंग्रहामधून पहिल्या पिढीची आंबेडकरवादी कविता जाज्वल्य स्वरूपात आकारास आली. आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टिकोनातून हा कवितासंग्रह आंबेडकरी कवितेमध्ये वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाचा ठरला.

'उत्थानगुंफा'नंतर यशवंत मनोहर यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक चिंतनकाव्य' (१९८२), 'मूर्तिभंजन' (१९८५), 'जीवनायन' (२००१), 'प्रतीक्षायन' (२००७), 'अग्नीचा आदिबंध' (२००८), 'स्वप्नसंहिता'(२००८), 'युगांतर'(२०१५), 'बाबासाहेब' (२०१६), 'युगमुद्रा' (२०१६) हे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. 'उत्थानगुंफा' ते 'युगमुद्रा' या एकूण दहा कवितासंग्रहांमधून त्यांचा काव्यप्रवास मराठी वाचकांच्या समोर प्रकट झालेला आहे. यशवंत मनोहर यांचे सर्वच कवितासंग्रह वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाचे आहेत. त्यांच्या या सर्व कवितासंग्रहांमधून त्यांचे कविपण व कविमन प्रगाढ स्वरूपात अभिव्यक्त झाले आहे. यशवंत मनोहर यांचा २००८ मध्ये प्रकाशित झालेला 'स्वप्नसंहिता' हा कवितासंग्रह असाच एक लक्षणीय स्वरूपाचा कवितासंग्रह होय. या कवितासंग्रहानंतर त्यांचे 'युगांतर', 'बाबासाहेब' व 'युगमुद्रा' हे कवितासंग्रह प्रकाशित झाले. 'तुरुंग तोडणाऱ्या उठावाची कविता' हा त्यांचा अगदी अलीकडच्या काळातील कवितांचा संग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे. 'उत्थानगुंफा', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक चिंतनकाव्य', 'मूर्तिभंजन', 'जीवनायन', 'प्रतीक्षायन', 'अग्नीचा आदिबंध' यांच्यानंतरचा एक अत्यंत सशक्त काव्याविष्कार या नात्याने त्यांचा 'स्वप्नसंहिता' हा कवितासंग्रह अत्यंत उल्लेखनीय स्वरूपाचा कवितासंग्रह ठरतो.

यशवंत मनोहर यांच्या स्वप्नसंहिता कवितासंग्रहाची पहिली आवृत्ती २ ऑक्टोबर २००८ रोजी प्रकाशित झाली तर दुसरी आवृत्ती १८ जानेवारी २०१० रोजी प्रकाशित झाली. मराठी प्रकाशनसृष्टीमध्ये नावलौकिक प्राप्त असलेल्या मौज प्रकाशन गृहाने हा कवितासंग्रह प्रकाशित केला. एकविसाव्या शतकातील पहिल्या दशकाच्या शेवटच्या टप्प्यावर प्रकाशित झालेला हा कवितासंग्रह त्यातील कविविशिष्ट अनुभवसृष्टीमुळे व समकालीन जीवनजाणिवांमुळे वैशिष्ट्यपूर्ण असा कवितासंग्रह ठरलेला आहे. यशवंत मनोहर यांच्या एकंदर जीवनानुभवाचे संचित या कवितासंग्रहामधून मोठ्या प्रभावीपणे अभिव्यक्त झाले आहे. या कवितासंग्रहातील कवितांनी त्यांची मराठी काव्यक्षेत्रातील नाममुद्रा अधिकच गहिरी व गडद केली. आशयत्व व अभिव्यक्तिरूप या दोन्ही दृष्टिकोनातून हा कवितासंग्रह मूल्यगर्भ ठरलेला आहे. त्यांच्या या कवितासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट साहित्यनिर्मितीचा २००९ चा केशवसुत पुरस्कार प्राप्त झाला. आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी येथील २००९ चा इंदिरा संत उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार प्राप्त झाला. त्याचबरोबर २००९ चा सहकार महर्षी काव्य पुरस्कारदेखील प्राप्त झाला.मनोहरांची कविता त्यांच्या आयुष्याच्या प्रौढकाळातदेखील कशी सतत लोकमान्य व राजमान्य राहात गेली, हे या कवितासंग्रहाच्या रूपातून सहजपणे लक्षात येते.

यशवंत मनोहर यांची कविता सतत आपल्या अवतीभवतीच्या सामाजिक व सांस्कृतिक पर्यावरणावर भाष्य करीत आकारास येत गेली आहे. आपण ज्या पर्यावरणामध्ये राहतो व जगतो, त्या पर्यावरणाच्या

अनुक्रमणिका

विविधांगी रूपा-प्रारूपांना समजून घेणे आणि त्याचे काव्यात्म पातळीवर आविष्करण करणे, हे त्यांच्या कवितेचे एक प्रमुख वैशिष्ट्य राहिले आहे. या वैशिष्ट्याचे प्रत्यंतर स्वप्नसंहितामधील कवितांमधून प्रभावीपणे येते. या कवितासंग्रहाच्या सुरुवातीला त्यांनी आरंभ नावाचे मनोगत लिहिले आहे. या मनोगतामधून त्यांची एकंदर जीवनभूमिका स्वच्छपणे व्यक्त झाली आहे. या आरंभामध्ये मनोहर लिहितात, ''भोवतीच्या मूल्यऱ्हासाच्या दुःखात मी जळतो आहे. पैशांची श्रीमंती आणि मनांचा कंगालपणा; तोंडात शोभेसाठी सर्वहितैषी मूल्य आणि वागण्यात असीम संधिसाधुपणा; आयुष्ये अंधारनिष्ठ आणि मुखवटे उजेडाचे - अशा अनेक अंतर्विरोधांनी माझ्या जीवाचा भडका उडतो आहे. या सर्वांनी निर्माण केलेले माझ्या अस्तित्वावरचे विराट अशांततेचे ओझे मला शांत होऊ देत नाही. कळायला लागले तेव्हापासून भोवतीच्या अथांग कुरूपतेने आयुष्य धुमसत आहे. हे धुमसणे संपत नाही. भोवतीचे जीवन विषमतेच्या अमानुष आगीत जळताना मला दिसते. ही आग जातीय विषमतेची आहे. स्त्री-पुरुष विषमतेची आहे. आर्थिक विषमतेची आहे. भोवतीचे काही जीवन जंगलांच्या अंधारात जळत आहे. खेड्यांमधल्या, शहरांमधल्या आणि रस्त्यांवरच्या अंधारात जळत आहे. खूप प्रश्नांच्या आगीत इथे माणूसपण जळत चाललेले आहे. जगात नुसतीच विषमता नाही, तर तिने अनेक पातळ्यांवर चालवलेले अत्याचार आहेत. प्रश्न स्त्रियांवरील अत्याचाराचा आहे. स्वतःचे अस्तित्व निर्माण करू पाहणाऱ्या दुर्बलांवरील अत्याचारांचा आहे. प्रश्न अकराळविकराळ भ्रष्टाचाराचा आहे. प्रश्न जगणे कठीण झाल्याने मरणाला कवटाळणाऱ्या शेतकऱ्यांचा आहे. प्रश्न व्यसनांचा आहे. अहंकाराचा आहे आणि धर्मांध राजकारणाचा आहे. वंचितांना गतिशून्यतेशी बांधून ठेवणाऱ्या शोषणयंत्रणेच्या खुंटांचा आहे- हे आणि यांसारखे इतरही प्रश्न दुष्ट उत्तरांच्या पोटी जन्माला आलेले आहेत, येत आहेत; आणि या प्रश्नांची गिधाडे माणुसकीला टोचून टोचून खात आहेत.'' (स्वप्नसंहिता : यशवंत मनोहर, 'आरंभ' - मनोगत, मौज प्रकाशन गृह, मुंबई, २००८, पृ. ८) मनोहरांनी या कवितासंग्रहाच्या आरंभीच व्यक्त केलेले हे मनोगत मोठे बोलके आहे. या मनोगतामधून आपल्या अवतीभवतीचे सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरण आणि सर्वच प्रकारचे पर्यावरण कसे भयावह स्वरूपाचे बनले आहे, याची आपणास कल्पना येते. अशा या भेसूर व बेसूर पर्यावरणाने यशवंत मनोहर यांच्यासारखे प्रज्ञावंत व प्रतिभावंत कवी तळामुळापासून अस्वस्थ झाले असल्यास ते नवल ठरणार नाही. त्यांची स्वप्नसंहितामधील कविता नेमकी या अकराळविकराळ पर्यावरणाच्या विराट व व्यामिश्र पार्श्वभूमीवर आकारास येते.

'स्वप्नसंहिता'मधून साकार होणाऱ्या कवितेची पार्श्वभूमी केवळ कवीलाच नव्हे तर कोणत्याही विचारशील व विवेकशील व्यक्तीला अस्वस्थ करणारी अशीच आहे. यशवंत मनोहर यांचे कविमन आपल्या अवतीभवतीच्या विविधांगी स्वरूपाच्या शेकडो समस्यांनी प्रश्नांकित होते. पण केवळ प्रश्नांकित होऊन मौन धारण करून बसणे, त्यांना कोणत्याही परिस्थितीत मान्य नाही. संपूर्ण समाजजीवनाला जाळत जाणाऱ्या समस्यांना समजून घेणे, त्या समस्यांची पाळेमुळे उकरून काढणे, त्या समस्यांसंबंधी आकलन मांडणे आणि त्या समस्यांचा उत्तरशोध घेणे, हे त्यांना स्वतःचे अत्यावश्यक स्वरूपाचे कर्तव्य वाटते. यशवंत मनोहर आपल्या कवितांच्या रूपातून अवतीभवतीच्या विविधांगी जीवनसमस्यांचा उत्तरशोध घेत जातात. त्यांच्या स्वप्नसंहितामधून अशाच प्रकारचा उत्तरशोध घेतला गेला आहे.

आजच्या समाजाला भेडसावत असलेल्या जीवनसमस्यांच्या भयावहतेची व अकराळविकराळतेची यशवंत मनोहर यांना पूर्णपणे जाणीव आहे. सद्यःस्थितीतील व्यक्तिजीवन व समाजजीवन या अनेकरूपी जीवनसमस्यांनी किती आणि कसा समाज विदीर्ण झालेला आहे, याची त्यांना पुरती कल्पना आहे. आजचे व्यक्तिजीवन व समाजजीवन हे दिवसेंदिवस किती ओसाड व कोरडे बनत चालले आहे, याची त्यांना सखोल माहिती आहे. पण असे असले तरी मनातून कोलमडून जाणे, हे त्यांना कदापि मान्य नाही. आपल्या अवतीभवतीचे जीवन हे कितीही 'वेस्ट लँड' बनत चालले असले तरी या सभोवतालच्या जीवनाला कशाप्रकारे 'बेस्ट लँड'मध्ये परिवर्तित करता येईल, याचा ते ध्यास घेताना दिसतात. हा ध्यास ते आपल्या वैचारिक लेखनातून आविष्कृत करतात, ललितपर लेखनातून आविष्कृत करतात त्याचप्रमाणे ते आपल्या कवितांमधूनही आविष्कृत करतात. त्यांचा स्वप्नसंहिता हा कवितासंग्रह तर याच जीवनध्यासातून आकारास

आलेला कवितासंग्रह आहे. प्रत्यक्ष समकालीन जीवनवास्तव कितीही खडकाळ असले तरी हिरवे स्वप्न पाहण्याची व ते स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्याची जिद्द हे आपल्या ह्या काव्यरूपातून साकार करीत जातात. ते लिहितात, ''जळत्या प्रश्नांच्या गर्दीतही आपण या जळत्या मनांपुढे ड्रीमलँड निर्माम करायला हवी. स्वप्ने पाहण्याची आणि ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आयुष्ये पणाला लावण्याची वृत्ती जगवायला हवी. हे झाले नाही तर मग कशालाही काही अर्थ उरणार नाही. खूप माणसांना अडचणींवर मात करीत जगायचे आहे आणि जगातल्या काही थोड्या माणसांना मात्र त्यांची ही इच्छा मंजूर नाही. या स्थितीत जगू इच्छिणाऱ्या खूप लोकांमध्ये उभा राहून, त्यांच्या जगण्याच्या स्वप्नांची कविता मी लिहितो. आपले जगणे निर्भय होईल, सुसन्मानित होईल आणि सुंदर, सर्जनशील होईल ही या माणसांच्या मनातील उमेद मरू नये यासाठी मी लिहितो. दुनियेतील संपूर्ण उजेड माझ्या मताचाही आहे आणि बाजूचाही आहे. ही ताकदच माझ्याकडून कविता लिहून घेते.'' (आरंभ, पृ. ९) मनोहर यांची कविता नेमकी कोणत्या मनोभूमिकेतून व कोणत्या जीवनभूमिकेमधून साकार होते, हे यातून अगदी स्वच्छपणे प्रकट होते. मानवाचे मनुष्यपणच धोक्यात आले असताना व मानवी जीवन गलितगात्र होत असताना आहे त्या परिस्थितीकडे हताशपणे व निमुटपणे पाहत बसणे मनोहरांचे कविपण व त्यांचे मान्य करू शकत नाही. माणसाचे हरवत चाललेले माणूसपण कायम ठेवणे व मनुष्यत्वाची काव्यात्म पातळीवर प्रतिष्ठापना करणे, या हेतूने ते 'स्वप्नसंहिता'मधून काव्याविष्कार करतात.

यशवंत मनोहर यांच्या 'स्वप्नसंहिता'मधून साकार झालेला काव्याविष्कार येथील भेसूर स्वरूपाच्या समाजवास्तवाला बदलवण्यासाठी व त्याला जीवन जगण्यायोग्य बनवण्यासाठी प्रतिबद्ध आहे. अवतीभवतीचे व्यक्तिजीवन व समाजजीवन हे अंधःकारमय झालेले असताना ही व्यक्तिजीवनाची व समाजजीवनाची अंधःकारमयता कशी दूर करता येईल, याचा काव्यात्म पातळीवरील अथक प्रयास या कवितासंग्रहातून समूर्त झाला आहे. मनोहरांची प्रज्ञा व प्रतिभा ही युटोपियन स्वरूपाची आहे. हे जग मानवी मूल्यऱ्हासाने बाधित झालेले असले तरी अंतिमतः हे जग जीवनमूल्यांच्याच आधारे तग धरू शकते, यावर त्यांचा अपरंपार विश्वास आहे. हा केवळ त्यांचाच विश्वास नाही तर जगातील आजतागायतच्या सर्वच प्रागतिक व पुरोगामी विचारवंताचा हा विश्वास राहिलेला आहे आणि ह्या विश्वासाला तडा जाणार नाही, याप्रकारचे आविष्करण करणे हा कवीचा धर्म ठरतो, यावरही त्यांचा मोठा भरवसा आहे. त्यामुळेच येथील कुरूपजीवनवास्तवाला सुरूप जीवनवास्तवामध्ये कशाप्रकारे परिवर्तित करता येईळ व मनुष्याला कसे सन्मानाचे जगणे बहाल करता येईल, या विचारदृष्टीतून ते स्वप्नसंहिता निर्माण करू पाहतात. ''माझी कविता सर्व दिशांनी झेपावणाऱ्या नकारांशी भांडणारी नवनिर्माणाची कार्यशाळा व्हावी, अशी माझी नम्र इच्छा आहे. म्हणून एका मनोरम मानवी जीवनाच्या स्वप्नांची संहिता मी पेश करीत आहे. माणसांनी ही संहिता केवळ म्हणू नये, तर ती प्रत्यक्ष वागण्या-बोलण्यातून साक्षात करावी. तोच जगू इच्छिणाऱ्या माणसांचा शोषणविरुद्धचा संग्राम असेल आणि माणुसकीचा विजयही असेल. माणसाला मी हरलेल्या रूपाऐवजी मोहरलेल्या रूपात पाहू इच्छितो!... जगण्याची माणसाची इच्छा आणि अडचणींवर मात करण्याची त्याची उर्मी आजवर कोणालाही नष्ट करता आली नाही. म्हणून ही स्वप्नसंहिता प्रत्यक्षात सत्यसंहिता ठरेल ही खात्री मला आहे... स्वप्नसंहिता माणसांमधील कोणत्याही प्रकारच्या दृश्य-अदृश्य भिंती नको आहेत. भोवतीच्या वणव्याचे चांदण्यात रूपांतर करणे हा वसा स्वप्नसंहितेने पत्करलेला आहे.'' (आरंभ. पृ. ९) जीवनसंग्रामामध्ये हरत चाललेल्या व्यक्तिजीवनाला व समाजजीवनाला मोहरवण्याचा वसा व वारसा घेऊन ही कवितासंग्रह वाचकांच्या पुढे येतो. मनोहरांचा हा वसा आणि वारसा सिद्धार्थ गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारमार्गावरून प्रवास करणारा आणि एकंदर समाजाला देखील त्या विचारमार्गाचे दिशादिग्दर्शन करणारा असा वसा आणि वारसा आहे. सर्व विश्वाचे मंगल होवो आणि संपूर्ण विश्वामधील अंधकार दूर होऊन प्रकाशपर्व निर्माण होवो, अशी मनोरम सदिच्छा या कवितासंग्रहामधील काव्यरूपांमागे व काव्यरूपांमध्ये आहे. यशवंत मनोहरांची ही स्वप्नसंहिता ही त्यांच्या मनःकोशातील संहिता असली तरी ती त्यांच्या मनापुरती मर्यादित नाही. त्यांची ही स्वप्नसंहिता संपूर्ण विश्वाकरिता सत्यसंहिता व्हावी, ही त्यांची मनोकामना आहे आणि त्यांची ही मनोकामना

अनुक्रमणिका

त्यांच्या बुद्धनिष्ठ व आंबेडकरनिष्ठ व विचारदृष्टीतून आकारास आलेली आहे. त्यामुळे त्यांची ही मनोकामना खऱ्या अर्थाने वैयक्तिक अशी मनोकामना नाहीच, ती तर सर्वकल्याणकारी विश्वकामना आहे. या स्वप्नसंहितेच्या निर्मितीमागे 'अत्त दीप भव'ची तसेच 'सब्बे सत्ता सुखी होन्तू'ची मनोकामना व विश्वकामना आहे. मानवी जीवनासंबंधीच्या उदात्त व महन्मंगल दृष्टीतून स्वप्नसंहिता निर्माण झालेली आहे आणि ती संपूर्ण विश्वाचीच सत्यसंहिता व्हावी, या अतिव्यापक हेतूने काव्यसृष्टीमध्ये अवतीर्ण झालेली आहे.

स्वप्नसंहिता या कवितासंग्रहाला मराठीतील मर्मज्ञ समीक्षक रा.ग. जाधव यांची 'स्वप्नसंहिता : एक प्रतिसाद' या शीर्षकाची प्रस्तावना लाभलेली आहे. खरे तर रा.ग. यांच्या मते ही प्रस्तावना नव्हेच. त्यांनी या प्रस्तावनावजा लेखनाला प्रतिसाद असे संबोधले आहे. रा.ग. जाधव हे मराठी समीक्षाक्षेत्रातील प्रतिथयश समीक्षक आहेत, त्याचप्रमाणे ते यशवंत मनोहर यांचे शिक्षकदेखील राहिलेले आहेत. यशवंत मनोहर यांचा महाविद्यालयीन विद्यार्थिदशेपासूनचा कविपणाचा प्रवास त्यांनी जवळून पाहिलेला आहे. स्वप्नसंहितेतील कवितांच्या संबंधात व मनोहरांच्या कविपणाच्या संबंधात त्यांनी 'स्वप्नसंहिता : एक प्रतिसाद' या प्रतिसादात्मक लेखनातून अत्यंत मूलभूत स्वरूपाचे आकलन व विश्लेषण केले आहे. कवी या नात्याने मनोहरांचे मराठी काव्यसृष्टीतील व्यक्तिमत्त्व कशा प्रकारचे आहे व मनोहरांच्या कवितांची एकंदर गुणवैशिष्ट्ये कोणती आहेत, हे त्यांच्या प्रतिसादात्मक लेखनातून गोळीबंद स्वरूपात प्रकट झाले आहेत. ''कवी आणि कवीच ही मनोहरांची आद्य आणि अंतिम ओळख होय.'' या प्रकारची अचूक जाण असलेले रा.ग. जाधव मनोहरांच्या एकंदर कविधर्माचे व त्यातही स्वप्नसंहितातील काव्यरूपाचे विवेचन करताना लिहितात, ''हा कवीच नखशिखान्त झपाटलेला आहे. वयाच्या पंचविशीत असताना या कवीने उत्थानगुंफेत डोकावले आणि तेव्हापासून त्याचे झपाटलेपण उत्तरोत्तर वाढतच गेले. का बरे? तारुण्यातील वेड प्रौढ वयात कमी कमी होत जाते असे म्हणतात. माणसाची समज वाढत जाते, असेही म्हणतात. यशवंत मनोहर मात्र वाढत्या वयाबरोबर अधिकाधिक झपाटून गेले आणि वयाच्या पासष्टीतही स्वप्नसंहिता लिहून मोकळे झाले- झपाटून टाकणारी स्वप्नसंहिता!'' (स्वप्नसंहिता यशवंत मनोहर, 'स्वप्नसंहिता : एक प्रतिसाद' (प्रस्तावना) - रा.ग. जाधव. पृ. ११) स्वप्नसंहितेचे मर्मस्थान उलगडून दाखवणारी व मनोहरांच्या एकंदर कविव्यक्तित्वाचे सारतत्त्व उजागर करणारी रा.ग. जाधव यांची ही प्रतिसादात्मक प्रस्तावना ही अत्यंत मौलिक स्वरूपाची आहे आणि त्याचबरोबर ती या कवितासंग्रहाचे मोल अधिकच वाढवणारी आहे.

यशवंत मनोहर यांच्या 'स्वप्नसंहिता' या कवितासंग्रहामध्ये एकूण ७९ कविता आलेल्या आहेत. या कवितासंग्रहातील त्यांच्या कविता वैविध्यपूर्ण स्वरूपाच्या आहेत. या कवितासंग्रहातील त्यांच्या बहुतांश कविता स्फूट स्वरूपाच्या आहेत. या कवितासंग्रहामध्ये तीन कविता दीर्घकवितेच्या रूपातील आहेत. काही कविता दीर्घ स्वरूपाच्या आहेत. या कवितासंग्रहातील अनेक कविता स्वशोध घेणाऱ्या आहेत. या कवितासंग्रहातील काही कविता या काव्यदृष्टीला अभिव्यक्त करणाऱ्या आहेत. या कवितासंग्रहातील पाचसहा कविता व्यक्तिदर्शनपर स्वरूपातील आहेत तर दोन कविता गौरवगीताच्या स्वरूपाच्या आहेत. येथील अनेक कविता समाजभाष्य व संस्कृतिभाष्य करणाऱ्या आहेत. या कवितांमधून त्यांनी व्यक्तिजीवन व समाजजीवनाच्या संबंधातील विविध घटकावयवांचे आविष्करण केले आहे. समकालीन जीवनाची विविध रूपे-प्रारूपे त्यांनी या कवितांमधून उजागर केली आहेत. या कवितांमधून ते समकालीन व्यक्तिजीवनाचा व समाजजीवनाचा प्रभावीपणे धांडोळा घेतात. समकाळावर खास स्वविशिष्ट स्वरूपाचे भाष्य करीत त्यांच्या कविता अवतरत जातात. सद्यःस्थितीतील विविध प्रश्नोपप्रश्न त्यांच्या कवितांचे विषय होतात. या प्रश्नोपप्रश्नांच्या संबंधातील जीवनभाष्य मांडत त्यांच्या कविता आकारास येत जातात. त्यांच्या कवितांमधून प्रकट होणारे जीवनभाष्य हे अर्थातच काव्यात्म रूपातून व काव्यात्म पातळीवर प्रकट होणारे असते. त्यांच्या कवितांचे काव्यरूप हे आशयाप्रमाणेच चित्तवेधक असते. त्यांच्या कविता ज्या प्रकारे आशयाच्या दृष्टीतून मौलिक आहेत, त्याचप्रमाणे त्या अभिव्यक्तीच्या दृष्टीतून तितक्याच मनोवेधक स्वरूपाच्या आहेत. त्यांच्या या कवितांमधून त्यांचे समग्र कविव्यक्तित्व व कविचरित्र प्रत्ययकारी स्वरूपात प्रकट झाले आहे.

'स्वप्नसंहिता' या कवितासंग्रहामधून यशवंत

मनोहर यांचे प्रगट होणारे भावरूप मोठे लोकविलक्षण स्वरूपाचे आहे. त्यांच्या कवितेतील भावरूप हे सुट्या स्वरूपाचे नाही तर ते विचाररूपाशी लगडलेले आहे. यशवंत मनोहर हे भावभावनांचा व संवेदना-कल्पनांचा अत्यंत प्रभावी स्वरूपात आविष्कार करणारे कवी आहेत. पण त्यांच्या कवितून प्रगट होणाऱ्या भावभावना व कल्पना-संवेदना ह्या वरवर पाहता मनमुक्त स्वरूपाच्या वाटत असल्या तरी त्या तशा नाहीत. त्यांच्यामागे त्यांची पक्की व ठाम विचारदृष्टी आहे. त्यांच्या एकंदर व्यक्तित्वाला सुनिश्चित स्वरूपाच्या विचारसरणीचे भरभक्कम अधिष्ठान आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेतून भावभावनांचा, कल्पना-संवेदनांचा जसा प्रत्यय येत असतो तसाच विचार-तत्त्वांचादेखील प्रत्यय येत असतो. यशवंत मनोहर यांचे कविपण हे विचारशील स्वरूपाचे आहे. तसेच त्यांचे कविपण हे चिंतनशील स्वरूपाचे आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेमधून प्रकट होणारा कोणताही जीवनानुभव हा विचारशीलतेच्या व चिंतनशीलतेच्या मुशीतून आकारास येत असतो. म्हणूनच त्यांची कविता जशी भावकविता ठरते, तसेच ती विचारकविता ठरते व ती चिंतनकविता ठरते. 'स्वप्नसंहिता' कवितासंग्रहामधील कवितांची भावात्मकता, संवेदनात्मकता, कल्पनात्मकता, विचारात्मकता व चिंतनात्मकता वाचकांना पुरती भारून टाकणारी असल्याचे दिसून येते.

यशवंत मनोहरांची कविता मानवी भावभावनांना व मानवी विचारशीलतेला सतत आवाहन करीत राहणारी कविता आहे. त्यांच्या कवितेमधून व्यक्त होणाऱ्या भाव-भावना व व्यक्त होणारे विचार-चिंतन हे एका बाजूने त्यांच्या कविव्यक्तित्वाचे आविष्करण असते आणि त्याचबरोबर ते दुसऱ्या बाजूने समाजरूपाचे आविष्करण असते. यशवंत मनोहर यांची कविता एका अंगाने स्वभावनांचा व स्वविचारांचा आविष्कार करणारी असते आणि दुसऱ्या अंगाने ती समाजभावनांचा व समाजविचारांचा आविष्कार करणारी असते. अर्थात मनोहरांचा भावाविष्कार व विचाराविष्कार हा समाजाच्या भावाविष्काराला व विचाराविष्काराला इष्ट दिशेने परिवर्तित करण्यासाठी आकारास आलेला असतो. यशवंत मनोहर ज्या प्रकारे मानवी जीवनाच्या भावरूपाकडे व विचाररूपाकडे पाहतात, त्या प्रकारे समाजाला म्हणजेच समाजातील नाना घटकांना मानवी जीवनाच्या भावरूपाकडे व विचाररूपाकडे पाहणे शक्य नाही. कारण समाज व समाजातील विविध घटक हे बहुतांशपणे प्रवाहाच्या दिशेने वाहात जाणारे असे असतात. समाजाचे सामूहिक मन हे बव्हंशी स्थितिशील व परंपरामार्गी असते. समाजाच्या सामूहिक मनाला व सामूहिक जीवनाला यथायोग्य दिशा देण्याचे कार्य समाजधुरीण करीत असतात, समाजचिंतक करीत असतात; त्याचबरोबर लेखक व कवी. कलावंत करीत असतात. यशवंत मनोहर हे अशाच विचारदृष्टीचे विचारवंत, लेखक व कवी आहेत. समाजाच्या सामूहिक मनाला व जीवनाला कालसुसंगत स्वरूपाची दिशा कशी देता येईल, याचा सतत विचार करणारे व त्या विचारदृष्टीमधून कवितानिर्मिती करणारे असे ते विचारशील, चिंतनशील कवी आहेत. त्यांच्या या विचारशील, चिंतनशील कविवृत्तीचा उत्कट परिचय 'स्वप्नसंहिता'मधील बहुतांश कवितांमधून घडत जातो.

यशवंत मनोहर यांच्या कवितेमधून त्यांचे नानाविध भाव-भावनांनी, संवेदना-कल्पनांनी व चिंतन-विचारांनी ओतप्रोत भरून असलेले मन सतत प्रगट होत जाते. आपल्या अवतीभवतीच्या व्यक्तिजीवनाचा व समाजजीवनाचा विचार करण्याची व त्यासंबंधीचा आविष्कार करण्याची त्यांची पद्धत ही खास त्यांची पद्धत आहे आणि बाकीच्या कोणत्याही कवीपेक्षा स्वतंत्र स्वरूपाची आहे. आजूबाजूच्या जीवनासंबंधी विचार करण्याच्या व त्याचा आविष्कार करण्याच्या पद्धतीवर त्यांची आगळ्यावेगळ्या स्वरूपाची नाममुद्रा उमटलेली आहे. यशवंत मनोहर आपल्या अवतीभवतीच्या जीवनरूपांचा धांडोळा घेतात, ते त्यांच्या जिवंत, उसळत्या, धडधडत्या व तडफडत्या मनोवृत्तीमधून घेतात. त्यांचे कविमन हे नानाविध भाववृत्तींनी व संवेदनावृत्तीनी सतत कल्लोळीत राहणारे कविमन असल्याची साक्ष स्वप्नसंहितामधील त्यांच्या अनेक कवितांमधून पाहावयास मिळते. त्यांच्या कवितांमधून प्रकट होणाऱ्या विविधांगी विषयांवरील कवितांमधून याचे प्रत्यंतर येते. ते अवतीभवतीच्या समाजजीवनावर व समाजरूपांवर आपल्या अशा भावगर्भ, भावरम्य व भावोद्भुत कविवृत्तीमधून भाष्य करीत जातात. 'स्वप्नसंहिता'मधील सुरुवातीच्या कवितेपासून शेवटच्या कवितेपर्यंत त्यांच्या या कवितृत्तींचे उत्कटपणे प्रत्यंतर येते. अर्थात त्यांच्या या भावगर्भतेमध्ये, भावरम्यतेमध्ये व भावोद्भुततेमध्ये त्यांचे विचारतत्त्व अंतर्भूत असतातच. त्यांच्या

अनुक्रमणिका

काव्यव्यक्तित्वामध्ये अशा विविध घटकांचे एकजीवित्व पाहावयास मिळते.

यशवंत मनोहर यांचा विविध वृत्तींनी व विविध जाणिवांनी संपृक्त असलेला काव्याविष्कार हा खास त्यांच्या स्वविशिष्ट पद्धतीतून व स्वविशिष्ट शैलीमधून होत असतो. त्यांच्या या काव्याविष्कारामधून एका बाजूने समाजदर्शन घडत जाते आणि दुसऱ्या बाजूने त्यांचे व्यक्तित्वदर्शनही घडत जाते. स्वप्नसंहितामधील कविता म्हणजे यशवंत मनोहरांच्या भाव-भावनांचा, संवेदना-कल्पनांचा व विचार-चिंतनाचा जिवंत व जातिवंत स्वरूपाचा आविष्कार होय. त्यांचा काव्याविष्कार नानाविध समाजरूपांचे अंतरंग स्पष्ट करीत जातो, त्याचप्रमाणे त्यांच्या कविव्यक्तित्वाची नाना रूपे प्रकट करीत जातो. त्यांचा काव्याविष्कार आशयतत्त्वे व अभिव्यक्तिरूप या दोही दृष्टीने नावीन्यपूर्ण स्वरूपाचा आहे. गतकालीन विषमताग्रस्त समाजरूपांचे आविष्करण असो अथवा समकालीन अस्वस्थ युगाचे आविष्करण असो, त्यांची कविता स्वविशिष्ट भाव-संवेदनेमधून अभिव्यक्त होत जाते. समाजरूपांचे व समाजजीवनांचे आविष्करण करताना त्यांचे कविमन आपले संपूर्ण कविपण पणाला लावून भावाभिव्यक्ती करीत जाते. या कवितासंग्रहातील अगदी पहिल्याच कवितेमधून याचे आपणास उत्कटपणे प्रत्यंतर येते. 'तडफडती नाडी : अस्वस्थ युगाची' या पहिल्याच कवितेमध्ये ते लिहितात,

'मी कवी दुःखांचा, अपमानित माणसांच्या हक्कांचा,
मी शब्द जळता, माणुसकीच्या शोकाचा, साऱ्या अश्रूंच्या हाकांचा,
मी हकिकत, मी कैफियत मरणे झेलत जगणारांची :
मी जिवंत तडफडती नाडी या अस्वस्थ युगाची...
मी गुन्हा करतो, भूमिका घेण्याचा, भूमिका जगण्याचा,
मी वारा नव्या युगाचा आणि धरण तोडून धावतो;
उड्डाणे मावत नाहीत पंखांत माझ्या, मी युद्धाचा सांगाती :
मी जिवंत नाडी या अस्वस्थ युगाची तडफडती...'
(तडफडती नाडी : अस्वस्थ युगाची, पृ. १)

यशवंत मनोहर ह्यांची काव्यभूमिका ही त्यांची जीवनभूमिका कशा प्रकारे आहे, याचे प्रत्यंतर उपरोक्त काव्यपंक्तींमधून येते. आपल्या कवितेमधून प्रकट होणाऱ्या भाव-भावना व संवेदना-कल्पना ह्या सर्वसामान्य लोकांच्या सुख-दुखांशी व जीवन-जाणिवांशी कशा एकरूप झालेल्या आहेत, याची मांडणी येथे ते प्रभावीपणे करीत जातात. आपण आजच्या या अस्वस्थ युगाची तडफडती नाडी आहोत, हे स्पष्ट करताना ते जीवनविषयक नाना पातळ्यांवरील भूमिकांना उजागर करीत जातात. या भूमिकांना उजागर करताना ते आपली काव्यविषयक दृष्टीदेखील स्पष्ट करीत जातात. आपल्या सभोवतालच्या जीवनाचे व त्या जीवनात दिसून येणाऱ्या विविधांगी घटितांचे व घडामोडींचे आकलन हे त्यांच्या कविवृत्तीमधूनच वाचकांपुढे येत असते आणि ते स्वाभाविकदेखील म्हणावे लागते. कविवृत्तीतून ते साहजिकच कविता करतात, पण त्याचबरोबर कविवृत्तीनेच ते संपूर्ण मानवी जीवनव्यवहाराकडे पाहात जातात. त्यामुळे त्यांच्या कवितांमधून प्रकट होणारे जीवनभान व समाजभान हे काव्याच्या पातळीवरील जीवनभान व समाजभान राहते. त्यांच्या कवितांमधून प्रकट होणारे जीवनविषयक प्रश्नोपप्रश्नांचे व समाजसमस्यांचे आकलन आणि विश्लेषण हे काव्यवृत्तीमधून आकारास आलेले आणि काव्यात्म पातळीवर लागू पडणारे आकलन व विश्लेषण ठरते आणि त्याचबरोबर ते काव्यात्म पातळीवर वावरणारे असेही आकलन व विश्लेषण ठरते. या संबंधात रा.ग. जाधव यांनी कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेमध्ये मार्मिक विश्लेषण केले आहे. रा.ग. जाधव लिहितात, 'यशवंत मनोहर हे एक माणूस आहेत आणि या माणसातच एक कवीही आहे... या व्यक्तीमधील जो कवी आहे, त्याचेही एक जगणे आहे, सोसणे आहे; केवळ कविता करणे हेच तिचे सर्वस्वी जगणे नाही आणि मनोहर ही व्यक्ती जी काही जगते व सोसते, ते प्राधान्याने तिच्यातील कवीचेच आहे. कवी हेच मनोहरांचे व्यक्तिरूप व कविरूपही! त्यांना जणू कविनिरपेक्ष व्यक्तिमत्त्वच नाही. माणूस व कवी हे द्वैत अबाधित आहेच; पण माणूस म्हणून यशवंत मनोहर जे जे जगतात व सोसतात, ते ते माणसाचे नसून कवीचे असते. एलियटचा माणूस जगतो व सोसतो आणि कवी काव्य रचतो. उलट मनोहरांचा माणूस काव्य करतो आणि कवी जगतो, सोसतो.' (रा.ग. जाधव, पृ. १५) यशवंत मनोहर यांच्या रोमारोमांत व रंध्रारंध्रांत कविपण इतके भिनलेले आहे की ते व्यक्तिजीवन व

समाजजीवनाच्या कोणत्याही अंगासंबंधी कविपणातूनच पाहू शकतात आणि कविमनातून त्यासंबंधीचे आकलन मांडू शकतात. त्यामुळे त्यांच्या कवितेतून प्रकट होणारे कोणत्याही विषयासंबंधीचे आकलन अंतिमतः त्यांच्या स्वविशिष्ट भूमिकेतून व स्वविशिष्ट शैलीमधून आकारास येत जाते.

'स्वप्नसंहिता म्हणजे सुसन्मानित माणुसकीचे प्रमाणशास्त्र!' असे यशवंत मनोहर यांनी या कवितासंग्रहाच्या आरंभी म्हटले आहे. हे सुसन्मानित माणुसकीचे प्रमाणशास्त्र ते आपल्या विविध कवितांमधून काव्यात्म पातळीवर साकार करू पाहतात. ही स्वप्नसंहिता 'मानवी जीवनाला सर्वकल्याणकारक रूप देऊ पाहणारी स्वप्नसंहिता' असल्याची त्यांची भूमिका आहे. त्यांच्या या भूमिकेचे प्रत्यंतर या कवितासंग्रहामधील अनेक कवितांमधून येते. त्यांची प्रतिभा विविध कवितांच्या रूपातून सर्वकल्याणकारी मानवी जीवनाची स्वप्नसंहिता करण्याचा आटोकाट प्रयास करते. ही सर्वकल्याणकारी मानवी जीवनाची स्वप्नसंहिता सत्यसंहिता ठरावी, अशी त्यांची मनीषा आहे. आपण ज्या भूमीवर राहतो, ती भूमी वैराणभूमी न ठरता ती मरुद्यानभूमी ठरावी, ही त्यांची अपेक्षा आहे आणि ही अपेक्षापूर्ती करण्यासाठी ते कवितेच्या रूपाने व काव्याविष्काराच्या मार्गाने प्रवास करीत जातात. हा प्रवास त्यांच्या कविमनातून सुरू होतो व कविमनानेच अभिव्यक्त होत जातो. हा प्रवास म्हणजे त्यांच्या कविमनाचीच अभिव्यक्ती असल्यामुळे साहजिकच त्यांच्या कवितेमधून स्वची विविध रूपे-प्रारूपे साकार होत जातात. समाजाचा शोध घेताना हा शोध मुळात त्यांना स्वतःच्या शोधापासून सुरू करावा लागतो.

'स्वप्नसंहिता'मधील कवितांमधून यशवंत मनोहर यांच्या कविमनाची साकार होणारी रूपे-प्रारूपे मोठी लोकविलक्षण स्वरूपाची आहेत. ही रूपे-प्रारूपे अर्थातच त्यांच्या स्व ची रूपे-प्रारूपे आहेत. त्यांच्या कवितांमधून साकार होणारी अनुभवसृष्टी ही खास स्वविशिष्टतेमधून साकार झालेली अनुभवसृष्टी आहे. कविमनाला मानवी जीवनासंबंधीचा जो अनुभव येतो, तो त्यांच्या कवितांमधून प्रकट होत जातो. आपल्या अवतीभवतीच्या समाजजीवनाचे काही काही घडलेले अथवा बिघडलेले रूप असेल, ते कविमन पाहात असते आणि त्याला अभिव्यक्त करीत असते. सद्यःस्थितीमध्ये व्यक्तिजीवन व समाजजीवन यांच्या संबंधात जे काही विविध प्रकारचे प्रश्नोपप्रश्न दिसून येतात, ते प्रश्नोपप्रश्न कविमन पाहात असते आणि ते कवितांच्या रूपातून प्रकट करीत असते. त्यांच्या प्रश्नोपप्रश्नाचा उत्तरशोध मग साहजिकच कविमन घेऊ पाहते. संपूर्ण समाजजीवन मूल्यऱ्हासाच्या, भावशून्यतेच्या, संवेदनाहीनतेच्या व विचारसुन्नतेच्या मार्गावर असताना अशा परिस्थितीमध्ये मग कविमनच काव्यात्म पातळीवर अवतीभवतीच्या प्रश्नोपप्रश्नांचा उत्तरशोध घेत जाते. अशा अवस्थेत कवीचे स्वपण, त्याचे मीपण स्वाभाविकपणे अधिकाधिक विस्तारत जाते आणि ते मग विश्वाला कवेत घेण्याची भाव-भावना व्यक्त करीत जाते.

'मी मुक्त जगण्याची तेजोमय आसक्ती;
अथांग तहानभूक प्रज्ञानी प्रेमाची;
उपाशी पोटांचा आक्रमक आकान्त;
मी अजिंक्य आशा गरिबीने तुडवलेल्यांचा.
मी पहाडी निर्धार न्यायासाठी उफाळलेला;
लाचार मनांना आलेली निर्णायक धार;
अडथळे जाळत धावणारी उग्र वीज;
मी माणसांवर लक्ष ठेवून हिंडणारी घार.'
(मी, पृ. ६६)

'स्व'पणाचे व 'मी'पणाचे विकसन करणारा या प्रकारचा भावाविष्कार त्यांच्या कवितांमधून प्रकट होत जातो. समकालीन समाजस्थितीवर भाष्य करताना नजरेसमोर दिसून येणाऱ्या विविधांगी संकटांनुसार त्यांच्या कवितेमधील 'मी' अधिकाधिक प्रसरण पावत जातो. नजरेसमोर जर अग्नितांडवाप्रमाणे भीषण वास्तव असेल 'मी आगीत नक्षत्रे पेरणारी वाट' असल्याची भावना त्यांच्या कवितेमधून साकार होत जाते. नजरेसमोर हिमलाटेप्रमाणे अंगांगाला गोठवून टाकणारे वास्तव असेल तर मग त्यांच्या कवितेमधून 'मी बर्फ जाळत सुटलेला ऐतिहासिक अंगार' या प्रकारची भावना व्यक्त होत जाते. समोर ऐतखाऊ पांढरपेशे जीवन दिसत असेल तर मग 'मी कष्टांच्या घामाचा गर्भार सुगंध' अशी भाववृत्ती प्रकट होत जाते. समोर शृंखलांनी बंदिस्त झालेले जगणे दिसत असेल तर मग 'मी किनारे तोडून धावणारे पंखांचे वादळ' या प्रकारची भाववृत्ती व्यक्त होत जाते. यशवंत मनोहर यांच्या कवितांमधून या प्रकारे 'मी'ची अनेक रूपे-प्रारूपे साकार होत जातात. कधी संयत तर कधी स्फोटक, कधी शांत तर कधी उसळता,

अनुक्रमणिका

कधी विवेकी तर कधी विद्रोही, कधी विचारी तर कधी विकारी, कधी आवेशी तर कधी अभिनिवेशी, कधी आवाहक तर कधी आक्रमक अशा नाना प्रकारच्या 'मी'ची रूपे त्यांच्या कवितांमधून साकार होत जातात. अर्थात 'मी'ची ही नानाविध प्रकारची रूपे अंतिमतः व्यक्तिजीवनाच्या व समाजजीवनाच्या उन्नयनाशी संबंधित असतात.

समाजजीवनाची विस्कटलेली घडी समतावादाच्या, बंधुतेच्या, स्वातंत्र्यतत्त्वाच्या, लोकशाहीतत्त्वाच्या आधारे दुरुस्त करण्याच्या उद्देशातून त्यांच्या कवितेमध्ये 'मी'ची अशी उसळती, उफाळती, धडधडती, तडफडती रूपे आकारास येत असतात. यासंदर्भात त्यांच्या कवितेतील 'मी'पणाचे एक वैशिष्ट्यपूर्ण विकसन पाहता येईल.

'स्वातंत्र्याला संविधानाचे डोके आणि प्रकाशाचे पंख देईन मी,
त्याच्या आजारी नभात नक्षत्रांची झुंबरे लावीन मी,
जिवंत होण्याचे अभय देईन मोडलेल्या उमेदींनाही,
कापलेल्या गळ्यातही विद्रोहाची आग पेटवीन मी.
चोरांनी बुडविले स्वातंत्र्याला अंधाराच्या डोहात,
त्याच्या हातात धगधगत्या मशाली देईन मी.
त्याच्यापुढे अंथरीन उपेक्षित श्वासाकडे जाणारी वाट.
बॉम्बस्फोटातील मृतांना सवाल होण्याची हिंमत देईन मी.'
(स्वातंत्र्याला संविधानाचे डोके, पृ. २२)

यशवंत मनोहरांच्या कवितेमधील ही 'मी'ची स्फुरणे-प्रस्फुरणे अशी बहुविध स्वरूपाची आहेत आणि ती तितकीच लोकविलक्षण स्वरूपाची आहेत. या अशा 'मी'पणाच्या व 'स्व'पणाच्या नानाविध स्फुल्लिंगाच्या आधारे ते अभिव्यक्त होत जातात. त्यांचे हे अभिव्यक्त होणे एका बाजूने त्यांच्या स्वचा, कविपणाचा व कविमनाचा आविष्कार असतो व दुसऱ्या बाजूने तो अवतीभवतीच्या समाजाचा, त्या समाजाच्या सुखदुःखांचा, त्या समाजाच्या आशाआकांक्षांचा आविष्कार असतो.

यशवंत मनोहर यांच्या 'स्वप्नसहिता'मधील जीवनजाणिवा ह्या 'स्व'पासून सुरू होतात आणि अंतिमतः समजापर्यंत विस्तारित व विकसित होत जातात. समाजाच्या उन्नयनामध्ये ते स्वतःचे विकसन पाहतात आणि सोबत एकंदर मानवजातीचेही विकसन पाहतात अर्थात समाजाचे, समाजाच्या अधःस्तराचे व समाजाच्या तळपातळीवरील घटकांचे उन्नयन ही सहजसाध्य व सरळसोट स्वरूपाची प्रक्रिया नाही. आजच्या ढासळत्या मूल्यांच्या काळात तर शोषित-पीडितांचे व उपेक्षित-वंचितांचे उन्नयन हे सर्वसामान्य व्यक्तिच्या आवाक्यापलीकडील बाब ठरते. अशा परिस्थितीमध्ये उद्याच्या अभ्युदयावर विश्वास ठेवून स्वप्नसंहिता निर्माण करणे व त्या स्वप्नभूमीचा शोध घेणे कवीकरिता अत्यावश्यक ठरते. समाजाच्या तळपातळीवरील घटकांसाठी आजचे जीवनवास्तव हे महाकठीण स्वरूपाचे असले तरी कवी आपल्या मनःकोशातील 'ड्रीमलँड'चा शोध घेत जातो आणि उद्याच्या आशावादाचे चित्र रंगवीत जातो.

'चंद्र दचकणार नाही, समाजवादी काळजाने आपली पौर्णिमा सर्वांना वाटत राहील,
दिवसाही उजेडच राहील आणि रांगत्या धडपडींना सुगंधाचे अभय देईल,
कोणत्याही दहशतीमुळे सौंदर्याला कुरूपतेचा मुखवटा चढवावा लागणार नाही,
पूर्ण कपडे घालण्याची कोणत्याही सुसंस्कृत अंगाला लाज वाटणार नाही :
...येतील असे देखणे दिवस पृथ्वीवर भयमुक्त मोरपिसारे होऊन येतील.
साऱ्या दुनियेतील तहानलेले प्रवास एकाच चवदार तळ्याचे पाणी पितील,
गर्भातून बाहेर येणाऱ्या कोणत्याही स्वप्नाला स्मशानात आल्यागत वाटणार नाही,
उजेड वाटणाऱ्या वाऱ्यावर कोणताही अंधार अब्रुनुकसानीचा दावा करणार नाही,
हात पसरणेच माहीत नसेल खऱ्या माईच्या लालांना,
प्रत्येकच हात उधानून देणारा होईल,
...होतील, एखाद्या सुंदर कवितेतील शब्दांसारखी सारी अस्तित्वे एकजीव होतील.'

यशवंत मनोहर यांचे उद्याच्या भावी जीवनासंबंधीचे हे सुखस्वप्न उदात्ततेच्या पातळीवर जाणारे आहे आणि त्याचबरोबर ते त्यांच्या आशावादी जीवनवृत्तीला सुस्पष्ट करणारे आहे. त्याचबरोबर ते त्यांच्या निस्सीम काव्यवृत्तीला उजागर करणारे आहे.

'स्वप्नसंहिता' या कवितासंग्रहामधून कवी यशवंत मनोहर यांची काव्यविषयक भूमिका व त्यांची काव्यदृष्टी

मोठ्या मनोवेधक स्वरूपात प्रकट झाली आहे. त्यांच्या एकंदर कवितालेखनाचा एक महत्त्वपूर्ण विशेष हा आहे की, त्यांच्या अनेक कविता काव्यासंबंधी भूमिका मांडत अभिव्यक्त होत जातात. याही कवितासंग्रहामधून त्यांच्या काही कविता काव्यदृष्टी व्यक्त करणाऱ्या आहेत. या कवितासंग्रहातील मी लिहीन कविता, जळतच लिहिली कविता, कवितेतील चांदणे, शब्दांनो, लेखणी विद्युत झाली, कवितेनेच मला जगवले, नाही सुचत कविता, उधानून मी जळतो, लिहितो इत्यादी अनेक कविता कवीची काव्यविषयक भूमिका व काव्यदृष्टी व्यक्त करणाऱ्या आहेत. त्यांच्या या कवितांमधील भावाविष्काराकडे पाहिले तर त्यांची काव्यदृष्टी व जीवनदृष्टी परस्परांशी एकरूप असल्याचे दिसून येते. मानवी जीवनामध्ये सर्वत्र दिसून येणारी कुरूपता, बीभत्सता, अमंगलता पाहून मानवी जीवनातील ह्या सर्व विरूपांना दूर करण्यासाठी ते स्वतःच्या तडफडीची व तगमगीची कविता लिहितात. 'जाळते भुकेची आग इथे लोकांना;/ हे कुरण मोकळे इथे सर्व मरणांना,/ ही दहशत नाही जगू देत कोणाला;/ पारखा उजेडही झालेला दिवसांना./' अशा प्रकारच्या निबिड अंधाराच्या व दहशतीच्या कालखंडामध्ये कवी दुःखितांच्या कळवळ्यामधून व पीडितांच्या अश्रूंमधून कविता लिहिण्याची भाषा करतो.

'तोवरी लिहीन मी दुःखांच्या हातांनी, अंगार जाहल्या पीडितांच्या अश्रूंनी,
मी लिहीन कविता अब्रूच्या हक्कांची; सैनिक जाहल्या न्यायाच्या इच्छांनी.
मी वाट पाहतो करुणेच्या जन्माची; दुनियेतील साऱ्या दुःखांच्या मरणांची,
जी स्वप्ने पेरील तेजस्वी ममतेची;
मी लिहीन कविता माझ्या तडफडण्याची.'
(मी लीन कविता, पृ.५)

या अंतरीच्या उमाळ्यामधून ते कविता लिहीत जातात. आसमंतामध्ये विविध प्रकारचे अराजक माजलेले असताना व मानवी जीवन करपून जात असताना येथील जीवनाला फुलवण्यासाठी कविता हेच त्यांच्याकरिता अमोघ स्वरूपाचे साधन ठरते. कवितेच्या आधारे ते अवतीभवतीच्या दुष्टपणाला कधी धगधगणाऱ्या अंतःकरणाने सामोरे जाऊ पाहतात आणि कवितेचे चांदणे फुलवू पाहतात.

'इतिहासातील मोफत शीर्षके वाचविण्यासाठी
बेशरम युक्त्यांना लावल्या जातात अचाट चाली;
रस्त्यातून सांडणाऱ्या रक्तातून
उगवून येतात जगणे असह्य करणारी प्रश्नचिन्हे
आणि निखाऱ्यांप्रमाणेच धगधगू लागते
माझ्या कवितेतील चांदणे.' (कवितेतील चांदणे. पृ.३६)

या कवितेतील चांदण्याच्या आधारे यशवंत मनोहर येथील जीवनसंग्रामाला तोंड देऊ पाहतात.

काव्यतत्त्व हेच त्यांच्या एकंदर व्यक्तित्वाचे मुख्य अधिष्ठान असल्यामुळे त्याच्या आधारे ते मानवी जीवनव्यवहाराचा अर्थ लावत जातात आणि त्याचबरोबर ते काव्यतत्त्वाच्या आधारे मानवी जीवनव्यवहाराला अर्थपूर्णता देऊ पाहतात. मानवी जीवनव्यवहाराला अर्थहीन व दिशाहीन करणाऱ्या घटकांवर ते आपल्या कवितेआधारे शब्दप्रहारही करीत जातात.

'मी तोडतो जीवन तोडणाऱ्या गुन्हेगार कुऱ्हाडींना :
मरणांचे कारखाने उघडणाऱ्यांसाठी
माझ्या कवितेत आगीशिवाय काहीही नाही.
मी मुजरा करतो कष्टकऱ्यांच्या घामाला
फुले हुंगत बसलेल्यांसाठी
माझ्या कवितेत रंजन व्हावे असे काहीही नाही.'
(माझ्या कवितेत. पृ. ९८)

असे ते स्पष्टपणे म्हणतात. आपली कविता कष्टकऱ्यांच्या, श्रमिकांच्या तळपातळीवरील समस्त समाजाच्या कल्याणासाठी प्रतिबद्ध आहे, हा भावाविष्कार त्यांची कविता प्रभावीपणे करीत जाते. समाजकल्याणाच्या प्रतिबद्धतेचा भावाविष्कार करताना शब्द हेच त्यांच्याकरिता केंद्रवर्ती ठरतात. शब्दाच्या, काव्यातील शब्दांच्या आधारे ते अभिव्यक्त होत जातात. शब्द हेच आपल्या जीवाचे जीवन आहेत, याची मनोहर यांना स्पष्ट जाणीव आहे. त्यामुळेच शब्दांचे सामर्थ्य आणि शब्दांसमोरील स्वतःचे लीनपण स्पष्ट करताना ते लिहितातः

'आकान्ताने हाका घातल्या माझ्या
तेव्हा तेव्हा शब्दच धावून आले,
माझ्या निरुत्तर निखाऱ्यांना
माउलीने घ्यावे तसे पोटात घेतले...
मी भिकारी : मी शब्दांना काय देऊ


मी कर्जदार : शब्दांचा कसा उतराई होऊ
मी शब्दांत शिरलो आणि स्वतःला वाचविले
जहर मी प्यालो आणि शब्दांनी ते पचविले.'

(शब्द, पृ. ५८)

या शब्दांमध्ये ते शब्दशक्तीचे मोठेपण मांडतात आणि शब्दाच्या आधारे स्वतःला रचित जातात. त्यांचे हे शब्दांच्या आधारे स्वतःला रचणे हे अंतिमतः समाजाचीही शब्दशक्तीच्या आधारे नव्याने संरचना करणे असते.

यशवंत मनोहर यांच्या 'स्वप्नसंहिता'मधील कवितेमूधून त्यांचे शब्दशक्तीशी व शब्दसामर्थ्याशी असलेले नाते अतूट स्वरूपात प्रकट झाले आहे. शब्दांवर असलेला अपरंपार विश्वास व शब्दांच्या आधारे सर्व प्रकारचा भावाविष्कार व विचाराविष्कार करण्याची प्रक्रिया या कवितासंग्रहातील सर्वच कवितांमधून पाहावयास मिळते. आपल्या लोकविलक्षण स्वरूपाच्या शब्दशैलीमधून व काव्यशैलीमधून ते सर्व प्रकारचा काव्यव्यवहार साकार करीत जातात. त्यांच्या कवितेमधून साकार होणारे समाजजीवन व त्या समाजजीवनातील सर्व प्रकारचे ताणेबाणे हे अर्थातच त्यांच्या अपूर्व स्वरूपाच्या शब्दवैभवामधून व भाषावैभवातून आकारास येतात. त्यांच्या कवितांमधील प्रतिमा, प्रतीक, उपमेय, उपमान व विविध प्रकारचे अलंकार हे त्यांच्या काव्यभाषेचा व काव्यवृत्तीचा अविभाज्य भाग ठरतात. एका वेगळ्या अर्थाने त्यांच्या काव्यदृष्टीचाही ते भाग ठरतात. कवितांमधून व्यक्तिविषयक, समाजविषयक, जीवनविषयक व आणखीही अन्य प्रकारच्या घटकांविषयी जे काही प्रकट होते ते सर्व त्यांच्या अत्यंत मनोवेधक व अर्थरमणीय शब्दशैलीतून व काव्यभाषेतून प्रकट होत असते. त्यामुळेच त्यांच्या कवितेतील जीवनानुभव, काव्यानुभव व एकंदरीत सर्वच प्रकारचे अनुभव एक प्रकारच्या धुंदफुंद मनोवृत्तीमधून प्रकट होतात आणि ते वाचकांनादेखील त्यामध्ये पुरते गुंतवून ठेवतात. संबंधात रा.ग. जाधव यांनी अत्यंत मौलिक चिंतन व्यक्त केले आहे. रा.ग. जाधव लिहितात, 'शब्दजीवित्व व भाषाजीवित्व हा एक कैफ असतो... भाषामाध्यम हे जीवनमाध्यम केले की 'अमुचा प्याला दुःखाचा, डोळे मिटुनी प्यायाचा' असेच म्हणावे लागते, असेच जगावे लागते. ही पराकोटीची ऐकान्तिकता असते आणि पराकोटीची एकान्तिकता म्हणजेच झपाटलेपण! म्हणजेच पछाडलेपण! म्हणजेच धुंदी! म्हणजेच कैफ!...' यशवंत मनोहरांनी ऐन विशीतच आपले जीवन शब्दब्रह्मास समर्पित केले. हे काव्याचे ब्रह्मांड होते. मनोहरांजवळ एक अभिजात शब्दकळा आहे, व्याकरणिक पाटव आहे, विधाने करण्याची हातोटी आहे, प्रश्न व प्रतिप्रश्न करण्याची वावदूक कुशलता आहे, एक प्रभावी वक्तृत्व आहे आणि एक प्रदीप्त अंतराग्नीही आहे. एवढी साधनसामग्री जवळ बाळगणारा पुन्हा तरल संवेदनशीलता, अपूर्व कल्पनाशक्ती आणि उसळता विवेक याही गुणांचा धनी असेल, तर तो झपाटून जाणार नाही तर काय करणार?... भाषामाध्यमाची सर्व अलंकरणे, सर्व अंतःशक्ती, सगळी आभूषणे त्यांनी फक्त कवितेसाठी राखून ठेवली. याला कैफ म्हणायचे नाही तर काय म्हणणार?' (रा.ग. जाधव, पृ, १६) यशवंत मनोहर यांची कविता ही अशी अपूर्व अशा शब्दरूपावर व भाषारूपावर उभी आहे. त्यांच्या कवितेतील सर्व प्रकारची अनुभवसृष्टी व जीवनजाणीवसृष्टी ही त्यांच्या अनन्यसाधारण स्वरूपाच्या शब्दरूपातून व भाषारूपातून साकार होते. त्यांच्या कवितेतील सर्व प्रकारचे आशयविश्व हे शब्दजनित व भाषाजनित आहे. त्यांच्या सामाजिक आशयाच्या कविता, प्रेमविषयक कविता, काव्यविषयक कविता, व्यक्तिदर्शनपर कविता, संस्कृतिभाष्यपर कविता, विचार कविता, चिंतन कविता, स्फुट कविता, दीर्घ कविता ह्या सर्व प्रकारच्या कविता त्यांच्या अपूर्व स्वरूपाच्या, अनन्यसाधारण स्वरूपाच्या व अर्थरमणीय स्वरूपाच्या व अद्भुतरम्य स्वरूपाच्या शब्दरूपातून साकार झाल्या आहेत. मुख्य म्हणजे त्यांच्या कवितेतील या शब्दारूपाला व भाषारूपाला आंबेडकरवादी विचारसरणीचा भरभक्कम पाया लाभला आहे. त्यामुळे त्यांची 'स्वप्नसंहिता'मधील कविता ही मौलिक स्वरूपाची कविता ठरते. आशयाच्या दृष्टीतून ती मूल्यगर्भ स्वरूपाची कविता ठरते आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीतून ती लोकविलक्षण अशी कविता ठरते. मुख्य म्हणजे आशयगत मूल्यगर्भता आणि अभिव्यक्तगत लोकविलक्षणता हा केवळ त्यांच्या 'स्वप्नसंहिते'चाच गुणविशेष आहे असे नाही तर तो त्यांच्या समग्र कवितानिर्मितीचा केंद्रवर्ती गुणविशेष आहे. यशवंत मनोहर यांच्या युगसाक्षी प्रतिभेचा वेध घेताना रा.ग. जाधव यांनी त्यांच्या कविव्यक्तित्वाबद्दल म्हटले आहे, ''हा माणूस नखशिखान्त काव्यात्मता

(उर्वरित पृ. ७७ वर)





युगांतर

विलास खोले

'उत्थानगुंफा', 'काव्यभीमायन', 'मूर्तिभंजन', 'जीवनायन', 'प्रतीक्षायन', 'अग्नीचा आदिबंध' आणि 'स्वप्नसंहिता' या कवितासंग्रहांनंतर अलीकडेच प्रसिद्ध झालेला 'युगांतर' हा यशवंत मनोहर यांचा अतिशय महत्त्वाचा कवितासंग्रह आहे. त्यांच्या बहुविध काव्यगुणांचा आविष्कार ज्याप्रमाणे त्यामधून घडतो त्याचप्रमाणे कवीचे प्रदीर्घ चिंतन आणि त्याची प्रगल्भ जीवनदृष्टी यांचा एकत्रित प्रत्ययही या संग्रहामधून येत राहतो.

युगांतर ही अत्यंत संवेदनशील आणि म्हणूनच अतिशय अस्वस्थचित्त असणाऱ्या कवीची (''विझू देत नाही माझ्या डोक्याला अस्वस्थता'', पृ. ७६) कविता आहे. या कवीच्या डोळ्यांपुढे हजारो वर्षांचा मानवेतिहास आहे. दलित, पीडित, शोषित माणसांच्या यातनांचा, वेदनांचा आणि आक्रोशाचा सगळा भूतकाळ त्याच्या अंतःकरणात धगधगतो आहे. वर्तमानातही वरवर परिस्थिती बदललेली दिसत असली तरी शोषणाची, उपेक्षेची, अवहेलनेची तीव्रता कमी झालेली नाही. वेगवेगळ्या युक्त्याप्रयुक्त्या योजून वंचितांचे, उपेक्षितांचे बळी देण्याचे राजकारण सुरूच आहे. जीवनातले कुठलेच क्षेत्र याला अपवाद नाही. एकंदर जागतिक परिस्थितीत स्थित्यंतर घडविणारी जागतिकीकरणाची लाट या परिस्थितीची भीषणता आणखी वाढवते आहे. मात्र अशा स्थितीतही कवीने निर्मिलेले मी आणि आम्ही त्यांच्याशी शत्रुत्व घेतलेल्या तू आणि तुम्हीशी लढायला सर्व बळ एकवटून उभे आहेत, संग्रामसिद्ध आहेत. कवितेतील 'मी'ला एकंदर मानव्याची होणारी हेटाळणी सहन होत नाही. मानव्याची प्रतिष्ठा सांभाळली गेलीच पाहिजे हा 'मी'चा निश्चय आहे. त्यामुळे शतकानुशतके माणसानेच माणसाला दिलेल्या अमानुष वागणुकीकडे व अन्यायग्रस्त व्यक्तिसमूहाच्या अनुभवांकडे तो निरखून पाहतो आहे. त्या अनुभवांची कारणमीमांसा करतो आहे आणि त्यावर इलाजही शोधतो आहे.

हा जो मी आहे तो पृथ्वीच्या अंगाखांद्यावर विखुरलेल्या गरिबांपैकी एक आहे. तो त्या सर्वांच्यावतीने बोलतो आहे. आम्ही गरीब का? तर -

आम्ही लांड्यालबाड्या केल्या नाहीत;
कोणाला खोटे हसून लुटले नाही;
कोणाच्या आयुष्याला ओरबाडले नाही;
आम्ही गरीब आहोत म्हणजे आम्ही

अनुक्रमणिका

आमच्या सज्जनपणाची
शिक्षा भोगत आहोत.
आम्हाला दुष्ट नाही होता आले म्हणून गरीब आहोत;
आम्हांला खोटे नाही होता आले
म्हणून गरीब आहोत;
आम्हांला हृदयशून्य नाही होता आले;
दररोज पक्ष, रस्ते, विचार बदलता नाही आले.
आम्हांला हसत हसत चावे नाही घेता आले;
आम्हांला बदमाश, लुटारू, भ्रष्टाचारी, राजकारणी गुंड
भांडवलदार, साम्राज्यवादी नाही होता आले.
आमच्या या सरळपणाने
आम्हाला गरीब केले. (पृ.१६)

या 'आम्हां'मध्ये सगळ्या जगातलेच लोक आहेत. मग ते निग्रो असतील, अस्पृश्य असतील, भटके विमुक्त असतील तर कधी ज्यू, आदिवासी असतील, कधी त्या आम्हींत चितांमध्ये जळणाऱ्या स्त्रिया असतील. या आम्हींची वस्ती कधी आफ्रिकेच्या जंगलात असते, कधी हार्लेम व घेट्टोत असते, तर कधी व्हिएतनाम-क्युबा-जर्मनी-मिझोरम-बस्तरच्या जंगलात असते. पण संकटांमुळे, अन्यायांमुळे, अत्याचारांमुळे हे आम्ही भयभीत झालेले नाहीत. त्यांनी धीरही सोडला नाही. उलट आपल्या चितांवर त्यांनी संसार मांडले. जीव दिले नाहीत. इतकेच नव्हे, जागतिकीकरणाला उद्देशून त्यांनी ठासून सांगितले, ''आम्ही लाथांनी ठोकरलीत त्या संकटांहून मोठी संकटे'' (पृ.१८) ''संग्रामातच साजरा करीत आलो आम्ही जिंदगीचा उत्सव/आम्ही हतबल करीत आलो हिमालयाएवढ्या संकटांना/आणि घाबरण्याची सवय आम्ही जवळ केली नाही.''(पृ.१८)

हे आम्ही निधड्या छातीचे आहेत. एवढ्यातेवढ्या संकटाने ते बावरत नाहीत, घाबरत नाहीत. ते संकटे पायदळी तुडवतात. ही ताकद कुठून आली? नवे जीवन घडवण्याच्या ईर्ष्येतून आली. प्रगतीच्या वाटेवर प्रवास करण्याच्या निश्चयातून आली. ते म्हणतात, ''हजारो वर्षेगॅस चेंबर्समध्ये राहूनही आम्ही जिवंत आहोत/मरणे घाबरतात आम्हांला'' (पृ. २०) त्यांनी विज्ञानाला मित्र मानले आहे. जागतिकीकरणातून साधल्या जाणाऱ्या वैज्ञानिक प्रगतीचे आणि पर्यायाने मानवी संस्कृतीचे जे काही उन्नयन व्हायचे त्याचे स्वागत हा 'मी' किंवा हे 'आम्ही' करतात. आणि जागतिकीकरणाची सगळी चांगली फळे आपल्याला मिळाली पाहिजेत असाही या आम्हींचा आग्रह आहे. जागतिकीकरणालाच ते आश्वासन देतात, की आमची प्रशंसा तुला बुद्ध करील, सॉक्रेटिस करील, मार्क्स करील, मार्टिन ल्युथर करील, अब्राहम लिंकन करील, आंबेडकर करील. कवितेतील 'मी'ला, 'आम्हीं'ना आणि खुद्द कवीलाही आंबेडकरांविषयी नितांत आदर आहे. त्यांनी आपली घटना लिहिली, प्रिॲम्बल लिहिले आणि सगळ्या गरिबांना, सगळ्या दलितांना त्यांनी आधार दिला, संरक्षण दिले आणि सामर्थ्यही दिले. आंबेडकर हे सर्व मानवजातीचेच त्राते ठरले अशी कवीची भावना आहे. त्यामुळे युगांतरमध्ये आंबेडकरांविषयीचा आदरभाव आणि प्रेमभाव जागोजाग व्यक्त झाला आहे.

युगांतरमध्ये एकंदर अठरा कविता आहेत. त्यापैकी जिद्द, कविता, वळसे, सत्य, निर्मिती, युगांतर या सहा कविता सोडल्यास उरलेल्या सर्व कविता दीर्घ स्वरूपाच्या आहेत. 'मायबाई!' ही या संग्रहातील सर्वांत दीर्घकविता. कवीला वर्तमान वास्तवाचे स्वरूपवर्णन करण्यासाठी, भूतकाळावर भाष्य करण्यासाठी आणि वर्तमानात पालट घडविण्याच्या मार्गाची योजना करण्यासाठी दीर्घ शब्दावकाशाची आवश्यकता असल्यामुळेच दीर्घत्व प्राप्त झाले आहे. कवीला भूतकाळ विसरता येत नाही आणि वर्तमान त्याचे सारे स्वास्थ्य संपवतो आहे. अशा मनःस्थितीत कवी अस्वस्थ व प्रक्षुब्ध असणे अगदी स्वाभाविक आहे. त्या अवस्थेत कविनिर्मित जो 'मी' आहे त्याला सगळे जुने जावे यासाठी क्रांतीच व्हायला हवी आहे. त्या क्रांतीतून विवेकवाद जन्माला यावा, विज्ञाननिष्ठा वाढीला लागावी, नवी संस्कृती, नवे युग, करुणेने ओथंबलेली मैत्री, अंतर्बाह्य मधुर माणुसकी यांची निर्मिती व्हावी आणि सर्वांना सोबत घेऊन जीवनाचा मुक्त ओघ वाहू लागावा अशी 'मी'ची तीव्र इच्छा आहे. या सगळ्या परिवर्तनासाठी अपरंपार प्रयत्न करावे लागणार आहेत, या प्रयत्नांतूनच यशापर्यंत जावयाचे आहे आणि त्यासाठी जिद्द सोडून चालणार नाही असा आत्मप्रत्यय त्याला आला आहे. हे नवे जग समतेचे असेल, भौतिक विकासाचे असेल, झळाळते विलक्षण वास्तव घेऊन येणारे असेल, असा विश्वास या 'मी'ला वाटतो आहे. अर्थात यातले काहीच सहजशक्य होणारे नाही. त्यासाठी प्रचंड संग्राम करावा लागणार आहे. संकटांची संख्या वाढणार आहे, घातपाताच्या यंत्रणा कार्यरत होणार आहेत, सुखाच्या मृगजळाची मायाही वाढणे शक्य आहे. अशा परिस्थितीत यातले धोके ओळखून

अनुक्रमणिका

जीवनाचा ओघ मुक्त करण्याची प्रक्रिया सुरू करायची असा कवीचा निर्धार आहे.

'युगांतर' मधली कविता फार मोठ्या समूहाला आवाहन करणारी, संबोधित करणारी कविता आहे. मूलतत्त्ववादी विचाराला आव्हान देणारी कविता आहे. मानवतेची जपणूक करण्याची भावना प्रस्फुरित करणारी कविता आहे. त्यामुळे या आवाहनामध्ये आर्जव आहे तसेच अनुभवांतून स्फुरलेली अधिकारवाणीही आहे. विरोधकांना स्वसामर्थ्याचा, विश्वासाचा व कृतिशीलतेचा धाक दाखवणारी ही कविता आहे. इथला 'मी' हा नेतृत्व करतो आहे. त्यामुळे स्वविचाराशी सहमत असणाऱ्यांना एकत्र आणण्याचे, त्यांना आजवरच्या भूतकालाचे स्वरूप समजावून सांगण्याचे, वर्तमानाचे आव्हान उलगडून दाखवण्याचे आणि उज्ज्वल भविष्याच्या उद्दिष्टाने कार्यप्रवृत्त करण्याचे त्याचे प्रयत्न आहेत. हे प्रेरक कार्य तो भाषेच्या माध्यमातून करतो आहे.

त्यामुळे ही कविता नव्या क्रांतीची कविता आहे आणि तिची भाषा आपोआपच ज्वलज्जहाल रूप धारण करते. मानवत्वाची प्रतिष्ठा, स्त्रीत्वाची प्रतिष्ठा, जागतिकीकरणाविषयीची प्रतिक्रिया, मलालाचा गौरव, कविमनात असलेला मानवी कल्याणाचा प्रकल्प आणि कवीच्या आकलनावर व जीवनदृष्टीवर असणारा बाबासाहेब आंबेडकरांचा प्रभाव ही आशयसूत्रे युगांतरमधून व्यक्त झाली आहेत. या सगळ्या प्रक्रियेत ही कविता विलक्षण पृथगात्म झाली आहे. माणसाच्या मनात पराभूतपणाची भावना निर्माण होऊ नये यासाठी त्याची पाठराखण करणारी, त्याला दिशा आणि दिलासा देणारी ही कविता आहे. ''राजकीय टोळ्या, साम्राज्यवादी टोळ्या, एनजीओंच्या टोळ्या, बहुराष्ट्रीय टोळ्या, संवादमाध्यमांच्या धबधबा टोळ्या'' (पृ. ६२) माणसाचे सत्त्व हडपून घेत असताना त्याला आत्मविश्वासाचा पुरवठा करणारी, त्याला उमेद देणारी, त्याला विश्वासाचा खंबीर आधार देणारी ही कविता आहे. सत्त्व, सत्त्वहरण आणि सत्त्वप्रस्थापनेची दिशा दिग्दर्शित करणारी ही कविता आहे. ती संक्रमणकालीन अरिष्टग्रस्तांना नुसतेच इशारे नाही तर हिंमत देणारी कविता आहे आणि या दृष्टीने पाहता ती मानवेतिहासातील अवस्थांतरांवरचे प्रकाशदायी भाष्य ठरते.

तिचे सामर्थ्य तिच्या निखळ इहवादी दृष्टीत आहे. शोषणरहित वैश्विक नीतीची संकल्पना तिने आपल्या अस्तित्वातून मूर्त केली आहे. चार दशकांपूर्वी उत्थानगुंफेने तत्कालीन समाजजीवनातील आणि काव्यविश्वातील एक कोंडी फोडण्याचा प्रयत्न केला होता. युगांतरने विद्यमान जीवनातील आणि कवितेतील दिशादर्शक असण्याचे सामर्थ्य व्यक्त केले आहे. नागड्या शब्दांना मानवाला महान करणाऱ्या मूल्यांची वस्त्रे नेसविण्याची आकांक्षा कवीने बाळगली आहे. आजवरच्या आंबेडकरवादी कवितेला मागे टाकत सकल मानवी कल्याणाचा, विश्वकल्याणाचा मार्ग दाखवीत ही कविता पुढे गेली आहे. पारंपरिक आंबेडकरवादी कवितेचे फारफार विकसित रूप, नव्हे, नवेच रूप येथे व्यक्त झाले आहे. हिची भाषा प्रतिभेची भाषा आहे. त्यामुळे ती सळसळत्या शब्दांतून प्रकटते. तिचे तेज नव्या स्वप्नांचे तेज आहे. नव्या ताकदीचे तेज आहे, नव्या निश्चयाचे तेज आहे, सॉक्रेटिस-प्लेटोपासून मार्टिन ल्युथर किंग-बाबासाहेब आंबेडकरांपर्यंतचे सगळे महापुरुष या कवितेला ताकद पुरवताहेत. जे युगांतर घडवायचे आहे त्याची मूळाक्षरे म्हणजे ही कविता आहे.

वैचारिकता हा या कवितेचा मूलधर्म आहे. कवीला या कवितांतून नवा विचार द्यावयाचा आहे. तो समतेचा, मानवतेचा, करुणेचा, वत्सलतेचा व सर्वकल्याणाचा आहे. 'पावित्र्याची, सत्याची, संस्कृतीची, तत्त्वज्ञानाची, साहित्याची, सभ्यतेची, प्रेमाची आणि सौंदर्याची' व्याख्याच बदलून टाकायची आहे. 'एकमेकांच्या बळाने महाबळ' व्हायचे आहे. हा सगळा उद्रेक प्रकट करणारी ही कविता सहजपणे प्रक्षोभक होते. मूलतः आवाहन करणारी ही कविता कविस्वप्नांना सत्यात उतरविण्यासाठी प्रेरणा देते. ही कविता व्यापक मानवी विश्व कवेत घेण्याची आकांक्षा बाळगणारी असल्यामुळे तिच्यात हे विशेष उतरणारच.

या संग्रहातील कविता कमीअधिक लांबीच्या परंतु दीर्घतेकडे झुकणाऱ्या विस्तारशील आहेत. विस्तार ही आशयाची मागणी आहे. विस्तार ही कवीला साधावयाच्या प्रबोधनाच्या उद्दिष्टाची मागणी आहे. काही प्रमाणात वेगवेगळ्या शब्दांत आशयाची पुनरुक्ती वाटली तरी तीही उद्दिष्टानुवर्ती आहे. युगांतरमधील कवितेत वेगवेगळे, वेगवेगळ्या काळातील संदर्भ नाट्यात्म रूपात आले आहेत. उदा. गॅसचेंबर्सचा अमानुषतेचा परमोत्कर्ष गाठणारा संदर्भ. या संदर्भांतर्गत उत्कट भावावस्थेमुळे कविता आक्रमक व प्रक्षोभक बनते आणि त्याचवेळी चिंतनशीलतेमुळे ती गंभीर व

अनुक्रमणिका

कृतिप्रेरक होते. वैचारिकतेच्या भावनिक अंगाची ती अटळ परिणती आहे. ती वाच्यार्थप्रधान आहे व व्यंग्यार्थमूलकही आहे. म्हणूनच ती सामूहिक उत्थानाचा, सामूहिक उन्नयनाचा, सामूहिक उत्कर्षाचा विचार तळमळीने मांडते आहे. रूपके, प्रतिमा, प्रतीके यांचा आश्रय घेत ती स्पष्टीकरणात्मक होते. ती तपशीलबहुल आहे; कारण सगळ्या गोष्टी समाजाला समजाव्यात अशी तीमागील प्रेरणा आहे.

विचाराचा बौद्धिकतेशी, चिंतनाशी संबंध असतो. विचारांचा संबंध मूल्यांशी असतो. या कवितेतून प्रकटणारी भूमिका कोणती आहे? इथली वैचारिकता सुस्पष्ट आहे. ती मूलतत्त्ववाद्यांना प्रखर विरोध करणारी आहे. स्त्रीच्या अंतःकरणात पुरुषाबद्दल विश्वास उत्पन्न व्हावा या भावनेने लिहिली आहे. विश्वासाच्या पायावर ती उभी आहे. ती कधी उदाहरणांतून प्रकटते, कधी विधानांतून प्रकटते, कधी आश्वासनांमधून. ही कविता आहे असे म्हणताना हा निबंध नाही हे लक्षात घ्यायला हवे. एकाच विचाराचे सुसूत्र प्रतिपादन करणाऱ्या गद्यामधून निबंधाला आकार लाभतो. येथे अनेक सूत्रे असणारी, वेगवेगळा कालावकाश कवेत घेणारी, वेगवेगळ्या भावनांची अभिव्यक्ती करणारी, परस्परविरोधी वृत्तिप्रवृत्तींमध्ये निवड करणारी, मानवजातीच्या/विश्वकल्याणाच्या भावनेची अभिव्यक्ती साधणारी प्रातिभ काव्यनिर्मिती साकार झाली आहे. कवीच्या व्यक्तिमत्त्वातला नेतृत्वगुण इथे प्रभावी ठरला आहे. नेत्याला अधिकारवाणीने व उच्च रवाने बोलावेच लागते. तरच त्याचे आवाहन त्याला अपेक्षित जनसमुदायापर्यंत पोचू शकते.

विचारांचे विचार म्हणून अस्तित्व व महत्त्व जाणवावे असाच या कवितेचा प्रयत्न आहे. काही वेळा ही वैचारिकता भावनिकतेच्या अवगुंठनात आविष्कृत होते. एरवी ती शहाणपण (विस्डम) शिकविणारी आहे. समाज, संस्कृती, इतिहास यांवर भाष्य करणारी, स्वार्थी माणसांचे आपमतलबी वर्तन निर्देशित करणारी, सगळ्यांनाच भानावर आणणारी ही कविता आहे. त्यामुळेच कवितेतील भावनोद्रेक जहाल व ज्लालाग्राही आहे. निरुत्तर करणारी वस्तुस्थिती आणि मन सुन्न करून टाकणारे वास्तव यांनी ही कविता व्यापली आहे. वूंडेड कंट्री या कवितेत ''हजारो वर्षांच्या जखमांचे ओझे वाहणारा वाकलेला वर्तमान'' (पृ. ७५) वर्णितानाच या जखमांच्या गर्भाशयातूनच ''माणसाच्या महत्तेचे बॅनर हाती असलेले युगांतर'' (पृ. ७५) साकार होईल असे कवीला वाटते. कवी माणसाची प्रतिष्ठा केवढी मोठी मानतो ते यावरून स्पष्ट होते.

कवीला स्त्रीची प्रतिष्ठा अतिशय मोलाची वाटते. त्यामुळेच प्राणपणाने ती सांभाळणाऱ्या 'मलाला'चे गौरवगीत त्याने गायिले आहे. कवी तिला ''सावित्रीच्या निखाऱ्यांचा मोहोर'' या प्रतिमारूपात गौरवितो. (पृ. ३३) इतकेच नव्हे, ''तू घेतलीस भरारी फतवे फाडणारी/तशी गडगडायला लागली/वटवाघुळांची मयसभा'' (पृ. ३३) असा तिच्या धैर्याचा प्रभाव कवीने वर्णिला आहे. पुरुषाने फतवे काढावे आणि स्त्रीने गुमान खाली मान घालून आज्ञा पाळावी या परंपरेला मलालाच्या कर्तृत्वाने जोरदार धक्का दिला आहे. मलालाच्या रूपाने ''उन्मादाचा मृत्यू जगाने पुन्हा एकदा पाहिला'' (पृ. ३३) त्यामुळेच कवीने मलालाला ''तू नवी रेलेव्हंट कविता/उरात सूर्य पेटलेल्या कवीची'' (पृ. ३३) आणि ''तू निमंत्रणपत्रिका संग्रामाची'' (पृ.३३) असे संबोधले आहे. कवी येथेच थांबत नाही. तो तिला ''तू वीज हो''(पृ. ३४), ''तू विद्रोह हो'' (पृ. ३४), ''तू क्रांती हो'' (पृ. ३४), ''तू वादळ हो'' (पृ.३४), ''तू पंख हो उजेडाचे/तू प्रश्नांची पालवी हो'' (पृ.३४) अशा शुभेच्छा देतो आहे. मलालाच्या रूपाने स्त्रीमुक्तीचा आदिबंधच यशवंत मनोहरांनी सादर केला आहे.

'युगांतर'च्या कवीचा आणखी एक महत्त्वाचा विशेष आहे. तो म्हणजे कवी सत्याचा उपासक आहे. तो म्हणतो, ''सत्याच्या पोटी जन्म झाला माझा युद्धभूमीवर'' (पृ.७१)

त्याच्या बापाचे नाव सत्य;
यशवंत वल्लद सत्य असे दर्ज करू शकता तुम्ही
धर्माची, जातीची आणि विषमतेची शाळा
सोडल्याच्या दाखल्यात
देव-दैववाद पुनर्जन्म नाकारल्याचा
फार पूर्वीच मिळालेला दाखला आहे.
माझ्या रेकॉर्डला

असे तो अभिमानाने सांगतो आहे. त्यामुळेच

उद्ध्वस्त झाले तरी
सत्य होणार नाही पराभूत;
होईल तेजःपुंज अधिकच (पृ. ७३)

असा त्याला विश्वास वाटतो आहे. सत्याच्या तीक्ष्ण नजरेनेच त्याने भूतकाळाचा आरपार वेध घेतला आहे. सत्य हा नव्या जीवनाच्या उभारणीचा मूलमंत्र आहे.

अनुक्रमणिका

म्हणूनच तो ठणकावून सांगू शकतो की ''मी या माणसाला पराभूत होऊ देणार नाही.'' (पृ.७१) सत्याप्रती असणारी निष्ठा आणि सत्यावर असणारा अभंग विश्वास या 'मी'ला बळ देतात. सत्य कधीच पराभूत होऊ शकत नाही याची खात्री असल्यामुळेच या 'मी'चा कणा असत्याच्या आणि विषमतेच्या परिस्थितीतही ताठ आहे. (पृ. ७३)

प्रस्तुत कवितासंग्रहातील वैचारिकता ही वास्तवाच्या निर्देशातूनही प्रकटते. कवीला या सगळ्या परिस्थितीत बदल घडवायचा आहे. उदा. आई प्रतिभे! निराशेच्या प्रचाराने सुन्न झालेल्या/गर्दीत जगतोय तुझा लेक. (पृ.५३) प्रतिभेकडे 'मी'ने मागितलेले मागणे आशादायी आहे. विनाशानंतरच्या नव्या प्रारंभाची पहाट/उमलू दे माझ्या निरभ्र कवितेत. (पृ. ५५) चोरांच्या साम्राज्यावर फिरवू दे बुलडोझर/कवितेला माझ्या./ठरू दे कवितेला परिवर्तनाचे बॅनर,/शोषकांचे डी.एन.ए. फेकू दे धडाडत्या आगीत./करू दे तिला नव्या सदाचारी डी.एन.ए.ची लागवड(पृ.५५) या प्रतिमा, ही रूपे मांडू पाहतात.

युगांतरमधील कवितेची भाषा नाट्यमयता, प्रतिमा, रूपके, प्रतीके, अनुप्रास, यमके या भाषाविशेषांनी युक्त आहे. कवितेतील अनुभवांशी-विचारांशी ती एकरूप आहे, एकजीव आहे. त्यामुळे कवितेची अर्थवत्ता वृद्धिंगत होते. या कवितेतील काव्यखंड सप्रयोजकपणे सुरू होतात व योग्य त्या ठिकाणी संपतात. या कवितेचे आवाहन भावनेला आहे तसेच बुद्धीला आहे. ही कविता प्रेरक आहे. परिवर्तनाला बळ पुरवणारी आहे. कवितेतील अनुभवांना आणि विचारांना स्वसंवेद्य करण्याचे कार्य भाषा करत असते. ही भाषा कवीला वश आहे. त्यामुळे कवितेला ओघ आहे आणि ओजही आहे. ही भाषा केवळ शब्दांचे नादमधुर खेळ नाही, ती अर्थनिष्ठ आहे. हा अर्थ परंपरेपासून परिवर्तनापर्यंतच्या प्रवासातून लाभला आहे.

युगांतरमधला मी कवितांत जसे निवेदन करतो आहे तसेच त्या अनुभवांसंबंधीच्या प्रतिक्रियाही व्यक्त करतो आहे. या प्रतिक्रिया विधानात्मक स्वरूपाच्या असल्या तरी त्या तशा असणे अनुभवाचे स्वरूप लक्षात घेता अपरिहार्य ठरतात. उदा.

बंदुकीच्या गोळ्यांनी माणसे मारता येतात/
माणसांची जिद्द मारता येत नाही. (पृ.३४)
जिद्द अशी गोष्ट आहे मरणा/जो मरत नाही
कोणत्याही मरणाने कधीही (पृ.३६)
हे कवी! दमनयंत्रणेपुढे लोटांगण घालणारा शब्द
कवीचा नसतो, (पृ.४७)
कवीचे काळीज चंद्राचे आणि मेंदू लोकहितवादी
सूर्याचा असतो. (पृ. ४७)
अन्यायांना गुन्हेगार वाटत नाही तो कवी नव्हे
(पृ.४८)
कवी जळत ठेवतो स्वतःला निरंतर दिव्यासारखा (पृ. ४९)
कवी खोटे बोलत नाही, खोटे सहन करीत नाही
(पृ.४९)

विधानात्मक स्वरूपाच्या कवितेतला एक महत्त्वाची मर्यादा पडते ती म्हणजे किती विधाने अपरिहार्य आहेत ते कसे ठरवणार? विधाने कितीही करता येऊ शकतात आणि कोठेही थांबता येऊ शकते. अर्थात हा निर्णय कवीच घेत असतो. अशी विधाने हा सामान्यपणे कवीच्या बहिर्मुख वृत्तीचा आविष्कार असतो. परंतु विधानविस्तार आणि आशयसूत्र यांच्यातील नाते एकजीव असावयास हवे ही जी अपेक्षा कवितेकडून असते ती कवितेतून पुरी व्हावयास हवी.

आता 'मायबाई...!' या कवितेविषयी

ही स्त्रीमुक्तीची संहिता आहे. एकेकाळी विश्वजननी असणारी, सर्वसमर्थ असणारी समग्र स्त्रीजात पुरुषी सत्तेच्या कावेबाजपणामुळे कोंडवाड्यात अडकली आहे. दुय्यम स्थानावर जाऊन पोचल्यामुळे तिच्या वाट्याला केवळ मादीपण आले आहे. तिच्या या दुरवस्थेतून तिनेच स्वतःला बाहेर काढावयाचे आहे. तिनेच व्हायचे आहे क्रांतीची कविता. सोन्याच्या पिंजऱ्यातून मुक्त होऊन गगनभरारी घ्यायची आहे आणि ती हे करू शकते असा ठाम विश्वास कवीला वाटतो आहे. सगळी बंधने तटतटा तोडून स्त्रीने मुक्त होण्याचाच काय तो अवकाश की ती पुन्हा एकवार शक्तिशाली, बलशाली होऊ शकेल. कवी हे सर्व कोणत्या नात्याने सांगतो आहे? त्याचे काय नाते आहे मायबाईशी? ती त्याच्या 'जीवनाची पहिली पहाट' आहे. 'लाखो वर्षांच्या प्रवासाचा' ती आरंभ आहे. त्याची 'खर्व-निखर्वावी आजी' आहे. 'काळाचा लाखो वर्षांचा प्रवास तुडवून आलेल्या' या मायबाईच्या 'रक्ताच्या मोहरातला' तो 'एक रक्तथेंब' आहे.

हजारो वर्षांचा दमनाचा इतिहास कवीच्या नजरेपुढे आहे म्हणूनच समाजव्यवस्थेच्या चौकटींनी उभारलेल्या

अनुक्रमणिका

तुरुंगाबद्दलचा कविमनात धुमसणारा असंतोष त्याच्या शब्दाशब्दांतून प्रकटतो आहे. परंपरेविषयीचा क्रोध, परंपरेच्या पाठीराख्यांबद्दलचा संताप आणि परंपरेच्या भिंतींमध्ये चिणल्या गेलेल्या सगळ्या माणसांबद्दलची करुणा कविमनात सारखी उसळून येते आहे. या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा एकच मार्ग आहे तो म्हणजे स्त्रीजातीनेच धैर्य एकवटून गतानुगतिक समाजव्यवस्थेविरुद्ध क्रांतीचे निशाण घेऊन संग्रामाला सिद्ध व्हायचे. परंपरापूजक वृत्तीचा/मानसिकतेचा तीव्र शब्दांत निषेध कवीने जागोजाग केला आहे. आता स्त्रीनेच आपल्याला संसारात दुय्यम स्थान देणाऱ्या, गुलामाची वागणूक देणाऱ्या, आपल्या सात जन्म हाच पती मिळावा यासारख्या भ्रांत समजुतींच्या बेड्या तोडून टाकून मुक्त व्हायला हवे. या बिकट परिस्थितीत बाबासाहेबांनी तयार केलेली राज्यघटना हा कवीला फार मोठा आधार वाटतो. स्त्रीला प्रतिष्ठा देणारा, तिचा सन्मान करणारा, तिच्यातील सर्जनशीलतेला मनमोकळा वाव देणारा. त्यामुळे तो पुनःपुन्हा स्त्रीजातीला कळकळीची विनंती करतो आहे

मायबाई...! तूच हो आता युद्धभूमीवरील क्रांतीची कविता

स्त्रीला स्वातंत्र्यासाठी, बंधनमुक्तीसाठी उद्युक्त करणारी ही कविता आहे. स्त्रीला मादीपणात अडकवणाऱ्या सगळ्या आभासमय मायाजालातून तिने बाहेर पडावे असे कवितेचे सांगणे आहे. स्त्रीच्या ठायी असणाऱ्या मूळ सामर्थ्याला आणि शक्तीला आवाहन करणारी, जागे करणारी ही कविता आहे. पुरुषी सत्तेने स्त्रीला सोन्याच्या पिंजऱ्यातला पोपट केले, कैफाची पुतळी केले, दागिन्यांचे दुकान केले. पुरुषी कावेबाजपणाने स्त्रीचे काय केले त्याची नोंद 'मी'ने केली आहे. ती अशी -

त्यांनी तुला नाजूक म्हटले आणि दुबळे केले;
अर्धांगी म्हटले आणि अपूर्ण केले;
केल परावलंबी.
त्यांनी तुला शालीन ठरवले आणि निर्जीव केले.
त्यांनी तुला त्यागाची प्रतिमा म्हटले
आणि तुझ्यातील ऊर्जेला लावला ब्रेक.
त्यांनी तुला सहनशीलतेचे काव्य म्हटले
आणि तुझ्यातील संघर्षशीलतेच्या शक्यता पांगळ्या केल्या.
त्यांनी तुला अबोल व्हायला, मितभाषी व्हायला
सांगितले,
पूर्वजन्मीच्या पापामुळे वाट्याला आले
ते सहन करायला सांगितले;
तुला देवी म्हटले.
हा दगाफटका तुझ्या लक्षात नाही आला
आणि तू होत गेलीस माणूस म्हणून कंगाल;
तू आटत गेलीस उन्हाळ्यातील नदीसारखी;
सुकत गेलीस मुळे तोडलेल्या झाडासारखी.
पुरुषी अहंकाराने पायरीपायरी डांबले तुला
पिंजऱ्यात (पृ. ९५)

हे सर्व तिने स्वतःच तोडून मोडून टाकायचे आहे आणि 'परंपरेची मयसभा' तिनेच उद्ध्वस्त करायची आहे. खोटे बोलून, फसवून, भुलवून तिला बंदिस्त करणाऱ्या पुरुषसत्तेविरुद्धची क्रांती तिनेच करायची आहे. कवी स्त्रीला सावध राहाण्याचा इशारा देतो आहे :

स्वर्गाच्या गाजराने होऊ नकोस वेठबिगार.
नरकाच्या खोटारड्या भीतीने जाऊ नकोस करपून
तुझ्या नजरेला हवा विवेकवादाचा कणा : (पृ.१०६)

'माईबाई'मधला कवी/'मी' स्त्रीजातीला पुरुषशाहीचे उच्चाटन करायला सांगतो आहे आणि त्याच वेळी तो स्वतःचा निश्चयही व्यक्त करतो आहे.

माझा एकच ध्यास : अन्यायमुक्त समाज
माझे एकच ध्येय : सज्जन समाजाची निर्मिती...
मी बदलीन पुरुषाच्या अस्तित्वाची घटना,
बदलून टाकेन आशय तिचा.
मी पुरुषाला करीन माणूस.
माणूस सकल विषमतातीत (पृ. ९२)

'कोणालाही रडावे लागणार नाही अशी नवी दुनिया जन्माला' घालण्याचा निर्णय कवीने घेतला आहे. (पृ. १०९)

मायबाई! कवितेतील नाट्यपूर्णता व वक्तृत्वपूर्णता वेधक आहे. आंबेडकरांचे संविधान सर्वांना समतेचे, स्वातंत्र्याचे आश्वासन देते आहे; सगळा पूर्वेतिहास गाडून टाकून नव्या भूमीवर नवी पालवी उमलावी अशी व्यवस्था त्या संविधानाने केली आहे; या क्रांतिकारी घटनेचे स्मरण कवी आपल्या कवितांतून वारंवार देतो आहे. जे डोळसपणे पाहावे, जे डोळसपणे वाचावे असे हे संविधान आहे. त्याची प्रतिष्ठापना करण्याचे आवाहन हा युगांतरचा एक विषय आहे. स्त्रीपुरुषसमतेची नितांत गरज भासते आहे. कवीने तर परंपरेविरुद्ध,


चौकटीविरुद्ध, जातीधर्माच्या बंधनाविरुद्ध, सगळ्या पूर्वस्मृतींविरुद्ध, जगातल्या सगळ्याच प्रकारच्या विषमतेविरुद्ध युद्ध पुकारले आहे. त्याने मानव्याचे, माणूसपणाचे, भेदाभेदातीततेचे गीत गायिले आहे. बंधुभावाने व भगिनीभावाने एकत्र नांदणारा, सर्वांना समान वागणूक आणि संपूर्ण स्वातंत्र्य देणारा समाज हे त्याचे स्वप्न आहे. 'इतिहासाचे आणि वर्तमानाचे डिकन्स्ट्रक्शन' स्त्रीने करावे ही निकड कवीने मांडली आहे. इतकेच नाही, 'अन्यायाची अमानुष सत्ता' पेटवून द्यावी अशीदेखील अपेक्षा त्याने व्यक्त केली आहे आणि त्यासाठी त्याने त्याच्या पातळीवर कवितेच्या माध्यमातून क्रांतीचे सूर आळवले आहेत.

ही क्रांती घडायची तर सगळीच मोडतोड करावी लागणार याची त्याला जाणीव आहे. परंतु ती अपरिहार्य आहे. तीवाचून नवी रचना उभीच राहू शकत नाही. यात भौतिक विकासाला, प्रगतीला उत्तेजन देणारी, तिला साहाय्यभूत ठरणारी वैज्ञानिक दृष्टी स्वीकारण्यावाचून गत्यंतर नाही. बुद्धिवाद आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांवाचून प्रगती अशक्य आहे. 'तूच हो आता परिवर्तनाच्या हातातील पलिता' (पृ. ९०) असे कवी मायबाईला आर्जवाने सांगतो आहे. त्याचा सूर विनवणीचा असला तरी त्या विनवणीमागे परंपराउच्छेदाची शक्तिशाली प्रेरणा आहे. आजवरची आंबेडकरवादी कविता अशा उच्च रवात स्त्रीत्वाचा-स्त्रीशक्तीचा गौरव करीत नव्हती. यशवंत मनोहरांनी ही कविता लिहून फार पुढची मजल गाठली आहे.

जागतिकीकरणाच्या अपरिहार्यतेइतकाच मानवी मूल्यांचा सर्वोपरी स्वीकार ही नवसमाजरचनेची मूलभूत गरज आहे. मानवेतिहासातील स्थित्यंतरे/अवस्थांतरे समजून घेण्याची क्षमता असणारा हा कवी व्यापक सामाजिक शोषणाचा समग्र इतिहास जाणतो. त्या इतिहासाबद्दलची भावनिक व वैचारिक प्रतिक्रिया त्याच्या कवितांतून स्वाभाविकपणे व्यक्त होते. त्यामागचा उद्वेग आणि संताप ज्यांनी अधःपतित मानवी जीवनाची वर्तमान दशा करून ठेवली आहे त्यांच्याबद्दलच्या तिटकाऱ्यातून निपजले आहेत. या कवितेतील ओजस्विता व लखलखीत तेज सकल मानवजातीविषयी वाटणाऱ्या पोटतिडकीमधून उमलून आले आहे. हा काही केवळ शब्दांचा लयबद्ध रचनाबंध नाही, तो तर आहेच; पण सकल मानवी कल्याणाची जी आस कविमनास लागून राहिली आहे, भेदाभेदाच्या, देशकालाच्या सगळ्याच भिंती नामशेष व्हाव्यात आणि विषमताविरहित एकच एक मानवी समाज बंधुभगिनीभावाने एकत्र नांदावा अशा आकांक्षेतून युगांतरमधील कवितांना आकार प्राप्त झाला आहे. जिद्द हा परिवर्तनप्रकल्पातला परवलीचा शब्द आहे. सकल भेदातीतता, विषमतारहित समाजनिर्मिती हे या प्रकल्पाचे अक्ष आहेत. पाय ठेवू ऐसी/भूमी नाही कुठे! जे-जे भूत भेटे/ते-ते ढोंगी अशा दांभिकांचा समाचार त्यांनी चार दशकांपूर्वी घेतला होता. आता युगांतरमधून एकंदर मानवेतिहासात मानव्याची हेटाळणी करणाऱ्या भूतकाळाचा, संस्कृतीचा आणि वर्तमानाचाही वेध त्यांनी घेतला आहे.

• • •

विलास खोले, प्लॉट नं. ३७, स्वेदगंगा हाऊसिंग सोसायटी, वारजे, पुणे-४११०५८, दूरध्वनी : २५२३४६४२





युगमुद्रा : यशवंत मनोहर यांचा प्रगल्भ काव्यात्म आविष्कार

▫ नागनाथ कोत्तापल्ले

'युगमुद्रा' हा यशवंत मनोहर यांचा क्रमाने अकरावा कवितासंग्रह. चांगला जाडजूड आणि ८२ कविता संग्रहित असलेला. हा केवळ आकारानेच जाडजूड असा कवितासंग्रह नाही तर कवीच्या प्रगल्भ चिंतशीलतेचा काव्यात्म आविष्कार आहे. तो त्यांच्या कवी म्हणून झालेल्या वाटचालीतील एक प्रगल्भ आविष्कार आहे. काही नव्या जाणिवा येथे प्रकट होताना दिसतात. म्हणून मराठी कवितेतील एक लक्षणीय कवितासंग्रह म्हणून या कवितेची नोंद करावी लागते.

१.

कोणताही कवी कविता लिहितो, म्हणजे काय करतो हा एक महत्त्वाचा प्रश्न असतो. त्याचे एक उत्तर असे की कवी काहीतरी सांगत असतो. अर्थात काव्यात्म पद्धतीने. त्याने काय सांगावे, हा त्याचा प्रश्न असतो. तरीही एक म्हणता येईल की, तो त्याच्या अनुभवाचे बोल सांगत असतो. म्हणजे ती त्याची स्वतःची अभिव्यक्ती असते. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रकटन असते. त्याचा 'स्वतः'चा असा तो सूर असतो. विशेषतः सौंदर्यवादी ठोरपींळल) कवितेत हे अधिक खरे असते. परंतु इतर कवितेमध्येही हे पुष्कळ प्रमाणात प्रत्ययाला येते. म्हणजे कवीची अभिव्यक्ती ही त्याची स्वतःची, एकट्याची असते. परंतु यापेक्षाही कधी कधी वेगळा अनुभव येतो. विशेषतः समाजपरिवर्तनाशी बांधिलकी मानणाऱ्या कवितेसंदर्भात असे जाणवते की ती कविता एकाच वेळी कवीची स्वतःची अभिव्यक्ती असते, त्याच वेळी ती एखाद्या समूहाची, वर्गाचीही अभिव्यक्ती असते. तेथे कवी कवी तर असतोच, पण तो कोणाचे तरी प्रतिनिधित्वही करीत असतो. एका प्रकारे ही कविता दोन पद्धतीने बोलत असते. कवीच्यावतीने आणि समूहाच्यावतीने. समूहाच्यावतीने बोलताना कवीचे व्यक्तिमत्त्व दुय्यम होते असे मात्र नाही. याची यासाठी नोंद करावयाची की कवी कोणाचा तरी प्रतिनिधी होणे हे पुष्कळदा कवितेला मारक असते असे मानले जाते.

गेल्या अर्ध शतकापासून यशवंत मनोहर काव्यलेखन करीत आहेत. भारतीय जातिव्यवस्थेमध्ये ज्यांच्या वाट्याला दुःख आणि वेदना आल्या, त्या साऱ्या शोषितांचे प्रतिनिधी म्हणून ते उभे आहेत. म्हणजे या व्यवस्थेने जे दुःख दिले, ते दुःख एक व्यक्ती म्हणून त्यांनीही भोगले आहे. ते जेव्हा कविता लिहितात, तेव्हा ती त्यांनी भोगलेली दुःखाची अभिव्यक्ती असते. त्यांचा स्वतःचा अनुभव असतो. जसे एखादा निसर्गकवी जेव्हा निसर्ग जाणीव प्रकट करतो, तेव्हा ती त्याची स्वतःची अनुभूती असते. ती रसिकांच्या प्रतितीसही येते.

अनुक्रमणिका

पण ती कविता कुठल्या समूहाची नसते. समाजपरिवर्तनाची आस बाळगणाऱ्या कवितेत मात्र असे होत नाही. ती एकाच वेळी त्या कवीची स्वतःची अनुभूती असते आणि त्याच वेळी ती एका समूहाचीही कविता असते. हा अनुभव लोकगीते वाचतानाही काही प्रमाणात येतो. यशवंत मनोहर हे भारतीय समाजात सकारात्मक, मूल्यात्मक बदल व्हावेत, ही इच्छा असणारे कवी आहेत. रूढ भाषेत सांगायचे तर ते दलित कवी आहेत. परंतु या संग्रहात मात्र त्यांची कविता अधिक व्यापक होताना दिसते. ती जातिव्यवस्थेच्या पलीकडे जाऊन वर्गदुःखे बोलू लागली आहे; हे यशवंत मनोहरांच्याच नव्हे तर मराठी कवितेच्या दृष्टीने सुचिन्ह आहे.

म्हणजे ते शोषित वर्गाचे दुःख प्रकट करीत आहेत. इथल्या व्यवस्थेतील खोटेपणा, दंभ जसा ते उघड करतात, त्याप्रमाणेच या व्यवस्थेतील कटकारस्थानेही सूचकपणे प्रकट करीत जातात. उदाः

''नद्यांचे आटणारे पाणी रडणारे आसवांशिवाय
जंगलांमधून जंगले पळविणारे वरवारीचे नायक
शेतांमधून पेरले जात आहेत सामान्यांना जाळणारे कारखाने
आदळणारा प्रत्येक क्षण अनोखा, शब्दांची सारखी दमछाक करणारा''

(विस्तारणारे वाळवंट, पृ. ३२)

''देवदत्ताच्या दुष्ट सुखासाठी
पक्ष्याला व्हावेच लागते घायाळ
नपेक्षा पक्ष्याचा उपयोग काय जीवनाला?
हे तडफडीची डोंगर
हे आकांताचे मिनार
हे घायाळ उजेडाचे उगवणे अगतिक.
पक्ष्यांनी घायाळच व्हावे
असेच काही नसले
तरी तसेच असते सर्वत्र.''

(देवदत्तगिरी, पृ. ३९)

उपरोक्त दोन्ही कवितांमध्ये समान्यांच्या वेदना आणि दुःख प्रकट झाले आहे. मग हे सामान्य जन्म दलित असतील किंवा कुठल्याही जातीतील असतील. जे जे सामान्य आहेत, शोषित आहेत, ते ते सारे कवीच्या चिंतनाचे विषय आहेत. त्या त्या साऱ्यांचा कवी प्रतिनिधी झाला आहे आणि तेवढ्याच उत्कटतेने तो त्यांचे दुःख प्रकट करतो आहे. 'न पेक्षा पक्ष्यांचा उपयोग तरी काय जीवनाला?' सारख्या प्रश्नामधून एक तीव्र उपहास ध्वनित होत जातो आणि मूळ दुःख अधिक टोकदार होत जाते. बौद्ध साहित्यातील देवदत्ताच्या प्रतिमेच्या वापरामुळे मानवी दुःखाची प्रदीर्घ परंपराही ध्वनित होत जाते.

याचा अर्थ एवढाच की यशवंत मनोहरांची कविता अधिक व्यापक झाली आहे. जन्म दलितांच्या दुःखांना तरी आपल्या कुशीत तर घेतेच; पण जन्म दलित नसणाऱ्यांची दुःखेही ती मुखर करीत जाते आहे. म्हणून आपण सारेच एका 'अंधारयुगा'तून जात आहोत असे त्यांनी अनेक ठिकाणी सूचित केले आहे. 'आंधळे युग', 'अंधारयुग', 'वास्तव,' 'भारतीय ग्लोबल' यासारख्या कविता आपणास पाहता येतील.

हे आंधळे युग म्हणजे काय हा महत्त्वाचा प्रश्न. कवी भोवती पाहतो तेव्हा त्याला समाजात वेगाने झालेले अनेक बदल जाणवतात. वेगाने मूल्यविहिनतेकडे निघालेला, लोकशाहीच्या मूठमाती देण्याच्या तयारीत असलेला, संविधानाची अवहेलना करणारा, पारंपरिक जगणे सांभाळून ठेवू पाहणारा, पारंपरिक जातिव्यवस्था कवटाळू पाहणारा आणि माणुसकीशून्य भारतीय समाज भोवती पसरलेला दिसतो. जागतिकीकरणामुळे तो एकीकडे चंगळवादी, भोगवादी झाला आहे, तर दुर्बलांसाठी कमालीचा क्रूर झाला आहे. भारतीय समाजाची ही बहुविध रूपे कवी फार प्रभावीपणे व्यक्त करीत जातात. भारतीय समाज व्यवस्थेवरील त्यांचे हे भाष्य कुठल्याही संवेदनशील माणसाला नवी जाणीव देणारे असेच आहे.

या संग्रहातील पहिलीच कविता ''कसायाच्या तावडीत सापडलेले लोकशाहीचे जितराव'' ही पाहता येईल. लोकशाही म्हणजे माणसांच्या सौख्याची सनद (तत्त्वतः) असते, हा कवीचा विश्वास आहे. परंतु भोवती मात्र सारेच विपरीत घडताना दिसते. हितसंबंधी लोक लोकशाहीचा खून करायला टपून बसले आहेत, असे भोवती भयप्रद चित्र आहे, असे कवी नोंदवितात. त्यासाठी ते कुठलेही तर्क लढविताना दिसतात. उदा :

''दैववादाचे दाटून येतात ढग काळेकुट्ट
मूलतत्त्ववादाची नागडी हिंस्रता
फिरते वस्त्यांमध्ये अतिरेक्यांप्रमाणे मोकाट
...
काही क्षितिजांमधून सूर्याऐवजी उगवते मग स्मशान

अनुक्रमणिका

माणसांऐवजी मग उगवतात बंदुकांची झाडे
आणि कसायाच्या तावडीत सापडलेल्या
जितराबासारखी होते
लोकशाहीची गत-'' (पृ. ११)

येथे दैववाद आणि मूलतत्त्ववादाचा निर्देश झाला आहे. म्हणजे आपल्या हितसंबंधांच्या रक्षणासाठी कुठलाही तर्क पुढे केला जातो आहे. तो व्यापक मानवतेच्या दृष्टीने योग्य आहे की नाही, लोकशाहीसाठी उपयोगी आहे की नाही याची कोणालाच पर्वा नाही.

आपल्या हितसंबंधांच्या रक्षणासाठी पारंपरिक व्यवस्थेचे समर्थन देशीवादाच्या नावाखाली कसे केले जाते, याचीही जाणीव यशवंत मनोहर एका कवितेत व्यक्त करतात. ते म्हणतात :

''इथून तिथून लुटारूंचा डीएनए एकच
उभ्या पिकाचे वाळवंट करीत आहे मोकाट
तृष्णेचे जनावर
भारतीय ग्लोबलला फॅसिस्ट देशीवादाचे म्यान.''
(भारतीय ग्लोबल, पृ. ५३)

'उभ्या पिकांचे वाळवंट करीत आहे तृष्णेचे जनावर' ही त्यांनी निर्मिलेली प्रतिमा किती तरी गोष्टी सूचित करते. अशा असंख्य प्रतिमा कवितासंग्रहभर विखुरलेल्या आहेत. त्याचा स्वतंत्र अभ्यास होऊ शकेल.

कुणा एकाच्या हितसंबंधापेक्षा एकूण मानवी शांती आणि सौख्य कवीला महत्त्वाचे वाटते. खरे म्हणजे त्यांची प्रत्येक कविता नव्या काळासाठीचे पसायदानच आहे. एका ठिकाणी ते म्हणतात :

ज्यांना तुम्ही मेलेली समजता
ती माणसे कोणत्याही क्षणी पेटून उठू शकतात.
...
ही माणसे एकाच वेळी उभी राहिली तर
जग समाजवादी होईल. सेक्युलर होईल.
हे महापूर झालेत तर
सगळी जगप्रसिद्ध घाण वाहून जाईल.''
(ही माणसे, पृ.१०१)

ही जगप्रसिद्ध घाण म्हणजे जातीने निर्माण केलेली विषमता, तसेच आर्थिक विषमताही आहे.

जागतिकीकरणाच्या रेट्यात जे जे शोषित आहेत, ते भरडले जात आहेत, ही एक नवी जाणीव यशवंत मनोहर प्रकट करतात. 'पत्र' या कवितेत खेड्यातील जगणे आणि शहरातील जगणे यांच्यातील सारखेपणा प्रकट केला आहे. दोन्ही ठिकाणी दुर्बलांचे जगणे कठीण होत चालले आहे, ही अनुभूती ते फार प्रभावीपणे व्यक्त करतात.

ही कविता समजून घेताना आपल्या मनात ऐतिहासिक संदर्भ जागे होत जातात. साधारणतः १९३०,३२ च्या काळात महात्मा गांधी यांनी 'खेड्याकडे चला' अशी सुप्रसिद्ध घोषणा केली होती. त्याचा पुष्कळ परिणाम तत्कालीन जीवनावर झाला. त्याच वेळी दलितांनी खेडी सोडली पाहिजेत; कारण खेडी जातीयवादाचे अड्डे आहेत, अशी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतली होती. त्याचाही मोठा परिणाम झाला. असंख्य दलितांनी खेडी सोडली. तुलनेने शहरात जातीयवाद कमी असतो, निदान दृश्य स्वरूपात तरी नसतो, याचा अनुभव काही काळ दलितांना आला. परंतु आज काळ बदलला. खेडी अधिक बकाल झाली आणि शहरे जीवघेणी झाली. हे जागतिकीकरणाने अस्तित्वात आणलेले वास्तव आहे. या नव्या वास्तवाची अतिशय प्रत्ययकारी अभिव्यक्ती यशवंत मनोहरांनी 'पत्र' या कवितेत केली आहे. ते म्हणतात :

''ओरबाडणे तिथेही होते ओरबाडणे इथेही आहेच
छोट्यांना मोठे मासे तिथे नाल्यात गिळत इथे
समुद्रात गिळतात
खेड्यात जगतच नव्हतो श्वास घेत होतो
उकिरड्यावरचे
इथे मृत्यूने करपलेल्या शेतात जगणे वेचावे लागते.''
(पृ.१००)

म्हणजे शहर असो की खेडे असो, ओरबाडणे हाच इथल्या समाजाचा नियम झाला आहे, याची अतिशय तीव्र प्रतीती उपरोक्त कवितेतून येते. एकूण जीवनच मुळी जनावरांच्या पातळीवर पोचल्याची खंतही कवी अनेक ठिकाणी प्रकट करतात. एका कवितेत ते म्हणतात :

''आपल्या डोळ्यांपुढे जनावरे होत आहेत माणसांची
भूकंपाने घरे कोसळावीत तशी स्वप्ने.
आता उजेडाच्या चर्चेनेही मोसम भयभीत होतो
आणि वर्तमानही भूतकाळाचे विष चढल्यासारखा
वागतो.'' (जनावरे, पृ.९८)

माणसांचे जनावर होण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे. विशेष म्हणजे माणसांना जनावरे होताना मुळीच संकोच वाटत नाही. कारण उजेडाची चर्चा त्यांना नको आहे. विषस्वरूप भूतकाळच त्यांना प्रिय आहे.

अनुक्रमणिका

अशी सगळीकडूनच अवरुद्ध करून टाकणारी अवस्था, कवीला कमालीची अस्वस्थ करते. अशा अवस्थेत कवी आवाहन करतो. माणसांना, विशेषतः शोषितांना एकत्र येण्याचे आवाहन करतो. कारण कविता लिहिणारा कवी कवितानिर्मितीच्या क्षणी एकटा असला तरी शेवटी तो शोषितांचा, वंचितांचा प्रतिनिधी असतो; किंबहुना तो त्यांच्यापैकीच एक असतो. म्हणून तो दुनियेतील वंचितांना आवाहन करतो :

''एकमूठ व्हा, दुनियेतील वंचितांनो!
कुणाचे राहू नका गुलाम,
कुणाचे होऊ नका मालक.
तुमच्या हातानेच विषमतेला
चितेवर चढायचे आहे.
देशोदेशीच्या वंचितांनो
स्मशानातून बाहेर या.
स्वप्नांचे पंख वाट पाहात आहेत तुमची.''
(दुनियेतील वंचितांनो! , पृ. १०४)

म्हणजे आपल्या भोवतीच्या वंचितांचे दुःख जसे कवी व्यक्त करतो त्याप्रमाणेच त्यांच्यात चेतना ओतण्याचेही काम करतो; कारण या कवितेतील कवी नुसता कवी नाही. तो शोषित, वंचितांचा प्रतिनिधी आहे; किंबहुना त्यांच्यापैकीच तो एक आहे.

एकाच वेळी दोन पातळ्यांवर काम करणे हे यशवंत मनोहरांच्या कवितेचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. कारण ज्या ज्या कवीची समाज परिवर्तनावर श्रद्धा असते, ते सगळेच कवी केवळ आत्माभिव्यक्ती करीत नाहीत. ती आत्माभिव्यक्ती तर असतेच; पण त्याच वेळी समष्टीचीही आत्माभिव्यक्ती असते.

२.

कवी आत्माभिव्यक्ती करतो. पान्हा दाटून यावे तशी अवस्था आल्यावर म्हणजेच सांगितल्याशिवाय राहावत नाही, अशी भावस्थिती निर्माण झाल्यावर तो आत्माभिव्यक्ती करतो. मग ती जाणीव अगर भाववृत्ती आनंदाची असेल, अगर दुःखाची असेल, कधी ती क्लेशाची असेल किंवा आत्मपरीक्षणाची असेल, निषेधाची असेल, अगर आवाहनाची असेल, भाववृत्ती कुठलीही असली तरी निर्मितीची प्रक्रिया सारखीच असेल; परंतु ही भाववृत्ती निर्माण होण्यासाठी कवी जे अनुभवत असतो, ते त्याच्या भोवतीच्या वास्तवातूनच. हीही बाब सर्वत्र सारखीच असू शकेल. परंतु भोवतीच्या वास्तवातील'प्रत्यक्ष घटक' कवी काढून टाकत असतो किंवा ते घटक ओळखू येणार नाहीत याची तो काळजी घेत असतो; एका प्रकारे बाष्पीभवनासारखी प्रक्रिया कवितेतून घडत असते. तो अशा वेळी सूचकतेचा वापर करीत असतो; किंबहुना सूचकता हेच कवितेचे सामर्थ्य असते, अशी सर्वसामान्य धारणा असते. शिवाय प्रत्यक्षातील घटक तसेच राहिल्यास ती कविता प्रचारकी होईल की काय अशी भीती कवींना वाटत असते. विशेषतः राजकीय संदर्भ असतील तर कवी पुष्कळदा घाबरतातही. परंतु यशवंत मनोहरांच्या कवितेचे वैशिष्ट्य असे की ते भोवतीच्या वास्तवातील प्रत्यक्ष घटक तसेच ठेवतात. असे करताना एक निर्भीड वृत्ती लागते. दुसरे म्हणजे आपण जे सांगतो आहोत, त्यावर त्याचा विश्वास असावा लागतो आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशा कवितांची वैचारिक बैठक भक्कम असावी लागते. या तिन्ही बाबी यशवंत मनोहर या कवीकडे असल्यामुळे भोवतीच्या वास्तवातील प्रत्यक्ष घटक ते सरळ सरळ निर्देशित करतात.

ही खरे म्हणजे कवीसाठी फार धोकादायक वाट असते. ही धोकादायक वाट हा कवी जाणीवपूर्वक अवलंबितो. त्यामुळे त्यांची कविता सरळसरळ वास्तवाला भिडते. विशेषतः आज आपल्या भोवती जे वास्तव आहे, त्याची ते थेटपणे अभिव्यक्ती करतात. असे करूनही ती प्रचारकी वगैरे झाली नाही, हे मराठीतील वाचकांना सांगितले पाहिजे. अशी कविता कवितेच्या सर्व सामर्थ्यांनिशी व्यक्त होते, हे नोंदविणे आवश्यक आहे. म्हणजे धोकादायक वाट स्वीकारूनही कवीचा तोल गेला नाही.

त्यांच्या अनेक कवितांमधून भोवतीच्या वास्तवातील खुपणारे घटक थेटपणे कसे व्यक्त होतात पाहा :

''भांडवलदार, धर्मांध राजकारणी, धनदांडगे,
भ्रष्टाचारी हे सर्वच दरोडेखोर
....
बाबरी मशीद, फादर स्टेन्स आणि
त्यांच्या कळ्यांची राख,
गवईबंधू, पोचिराम, खैरलांजी,
खर्डा, शिर्डी
या सर्वच असतात लोकशाहीच्या हत्या.''
(कसायाच्या तावडीत... पृ. १३)

किंवा

अनुक्रमणिका

"चढवा मनू आणि हिटलर
देशोदेशीच्या चितेवर
दुनियेतील वंचितांनो!"

(दुनियेतील वंचितांनो, पृ. १०३)

"बंधो! पेरुमल मुरुगणनं आपला मृत्यू जाहीर केला
कारण आपण वाटलो नाही त्याला जिवंत"

(बंधो, पृ.२०)

"हे स्वतःला भारताचे लोक म्हणवतात
आणि त्यांना हवा आहे
याही वर्तमानात देश म्हणता येईल असा देश
....
देश हा शब्द स्वातंत्र्य, समता, बंधुता असाही
लिहिता येईल
असा देश हवा आहे त्यांना"

(अग्निपथ, पृ. २६-२७)

प्रत्यक्ष जीवनातील, भोवतीच्या वास्तवातील 'आशय घटक' सरळपणे किंवा सूचकपणे व्यक्त करताना कवी जवळ '....' असावे लागते, कारण त्यातून तो कोणा.. आहे, हे उघड होते. स्पष्ट होते.

कुठल्याही लेखकाला, कवीला कधी तरी आपण नेमके कोणाच्या बाजूने आहोत, हे स्पष्ट करावेच लागते आणि त्याने ते केले नाही तरी वाचकांच्या, समीक्षकांच्या ते लक्षात येतेच!

कवी या ठिकाणी स्वच्छपणे शोषित, पीडितांच्या बाजूने आहेत, आपण फॅसिझमचे विरोधक आहोत, हेही स्पष्टपणे सांगून टाकत आहेत.

जागतिकीकरणानंतर फॅसिझमचा उदय आपल्या देशात झाला. त्याला कारणे कोणती हा प्रश्न इतरांप्रमाणे कवीलाही पडला आहे आणि त्याचे कारण हितसंबंधात आहे, हेही कवी अनेक ठिकाणी सूचित करतो. त्यामुळेच आजच्या हितसंबंधी मंडळींना मध्ययुग जवळचे वाटते, अशीही कवीची धारणा आहे. कवी म्हणतात :

"बंधो! शरीर एकविसाव्या शतकात
आणि मन हेल्डप झालेले मध्ययुगात
ही आपल्या अस्तित्वाची फाळणी
हे दोन तुकडे साधणारे लॉजिक
दुनियते कुठेच नाही." *(बंधो!, पृ. १८)*

वरकरणी आधुनिकता आणि मध्ययुगीन मानसिकता हे आजच्या सर्व प्रश्नांच्या आणि शोषितांच्या दुःखाच्या मुळाशी असलेले कारण आहे, याची जाणीव यशवंत मनोहर आपल्या कवितेमधून ठायीठायी प्रकट करताना दिसतात. ही जाणीव वाचकांना जीवनासंबंधीची नवी जाण देते.

४.

मराठीमध्ये चिंतनशील कवितेची मोठी परंपरा आहे. आधुनिक काळाच्या प्रारंभापासूनच चिंतनशीलता हा मराठी कवितेचा विशेष झालेला आहे. परंतु ही चिंतनशीलता प्रायः रोमँटिक वृत्तीतून आलेली दिसते. त्यामुळे पारलौकिक जीवन आणि माणसाला येणारे अलौकिक अनुभव प्रकट करण्यामध्ये रमते. यशवंत मनोहरांची कविता ही मूलतः चिंतनशीलच आहे; पण ती अलौकिक अनुभवात मुळीच रमत नाही. उलट लौकिक जीवनातील प्रश्न, भोवती निर्माण होणारे जीवघेणे ताण, त्यातूनच्या मुक्तीचे मार्ग यामध्ये यशवंत मनोहरांची कविता रमते. म्हणून ही कविता चिंतनशील परंपरेतील असली तरी पृथगात्म आहे. तिच्या मुळाशी लौकिक जीवनासंबंधीच्या तात्त्विक भूमिकेचे भक्कम वैचारिक अधिष्ठान आहे. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल मार्क्स यांची जीवनदृष्टी आणि विचारव्यूह कवीला महत्त्वाचा वाटतो. लौकिक जीवनामध्ये स्वातंत्र्य, समता आणि बंधुता निर्माण करण्यासाठी पारंपरिक जीवनदृष्टी उपयोगाची नाही, यावर ते ठाम आहेत. म्हणून उपरोक्त महापुरुष त्यांना जवळचे वाटतात. महात्मा गांधी यांच्या व्यक्तिमत्त्वाचाही त्यांना विचार करावासा वाटतो. एकंदरीत लौकिक जीवनाचे रूप बदलण्यासाठी जो जो विचार आवश्यक आहे, तो स्वीकारला पाहिजे, असे त्यांना वाटते.

या दृष्टीने त्यांची कविता विचारानुभव प्रकट करणारी, तात्त्विक अधिष्ठान असणारी कविता आहे; किंबहुना ही वैचारिकता त्यांच्या जवळजवळ सर्व कवितांच्या मुळाशी आहे. 'वाढदिवस' या कवितेतील पुढील ओळी पाहा :

"... वाढदिवस म्हणजे ऑडिट
ऑडिट : आपल्या खरेपणाचे वा खोटेपणाचे.
आपण हरवल्याचे, सापडल्याचे
कुणातरी विझणाऱ्या दिव्यातील तेल होण्याचे,
आपण निर्मिलेल्या ताठ कण्याचे."

(वाढदिवस, पृ. १०७)

वाढदिवसासंबंधी काहीतरी भावुक जाणिवाही व्यक्त होऊ शकतात; पण यशवंत मनोहर यांना

विझणाऱ्या दिव्यातील तेल होणे आणि ताठ कणे निर्माण होणे महत्त्वाचे वाटते.

स्वतःसंबंधी, माणसासंबंधी विचार करताना त्यांना ''लोकांच्या मनातील निखाऱ्यांशी आणि विजांशी'' संबंध ठेवणे महत्त्वाचे वाटते (आपण, पृ. ११७)

जीवनातील कुठलाही अनुभव असो तेथे एक भक्कम वैचारिक अधिष्ठान आहे, निश्चित अशी तात्त्विक भूमिका आहे, याची जाणीव ही कविता वाचताना सतत होत राहते.

महात्मा फुले, डॉ. आंबेडकर आणि कार्ल मार्क्स यांच्या प्रागतिक विचारांच्या अभ्यासाने सिद्ध झालेली अन्वेषण दृष्टी सामाजिक प्रश्नांचा आणि वास्तवाचा शोध घेताना येथील वास्तवाचे शोषक रूप सिद्ध करीत जाते. विशेषतः जेव्हा समाजात संक्रमण सुरू होते, तेव्हा जे ताणतणाव निर्माण होतात, त्यांचे फार प्रत्ययकारी चित्रण यशवंत मनोहर करू शकतात, त्याचे कारणच मुळी त्यांची अन्वेषण दृष्टी आहे. या दृष्टीमुळेच-

''संकटांना भरवतात कापरे निर्धाराच्या निर्णायक हाका
संक्रमणाच्या क्षितिजातूनच नव्या रचनेची पहाट उगवते.''

(समीकरण, पृ. १३४)

असे त्यांना वाटते. जेव्हा संक्रमण सुरू असते तेव्हा समाजात सरळ सरळ दोन तट निर्माण होतात. ज्यांचे हितसंबंध पूर्वापार व्यवस्थेने पोसले आहेत, अशांचा एक गट आणि ज्यांनी माणूस म्हणूनही नाकारले आहे, अशांचा एक गट असे दोन गट अस्तित्वात येतात. ते जुने जाताना यातील काही लोक शोक करतात, प्रसंगी संघर्षही करतात तेव्हा परिवर्तन प्रक्रियेलाच धोके निर्माण होतात याची जाणीव कवीने 'धोका' या कवितेत फार समर्थपणे व्यक्त केली आहे. ते म्हणतात :

''शोषणाचे परवाने रद्दबातल होणे
सहन होत नाही शोषकांना
परस्परमारक हितसंबंधांचे भक्तिसंप्रदाय
एकवर्ग होऊ देत नाहीत शोषितांना प्रतिकारासाठी
हा खरा धोका असतो.''

(धोका, पृ. १२०-१२१)

'नोकर भरती', 'रस्त्यात उतरलेल्या रस्त्यात', 'द्रष्टेपणा', 'हे सिधेसाधे लोक', 'युगमुद्रा', 'प्रश्न' इत्यादी कवितांमधून ही जाणीव प्रकर्षाने प्रकट होते. तसे तर संपूर्ण संग्रहातील कविताच मुळी संक्रमणकालीन समाज वास्तवाचे प्रकटन करणारी आहे. संक्रमणाचे स्वरूप, त्यातील ताणतणाव, हितसंबंधाचा टकराव, त्यातून उडणाऱ्या संघर्षाच्या ठिणग्या आणि शोषितांना न्याय मिळणारच आहे, यावरील अभंग विश्वास ही 'युगमुद्रा'मधील कवितांची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

जी विचारदृष्टी कवीने स्वीकारली आहे, त्या विचारदृष्टीनेच कवीला आशावादी बनविलेले आहे. ज्यांचा संघर्षावर विश्वास असतो, श्रेष्ठतर मानवी मूल्यांवर विश्वास असतो, असे समाजचिंतक असोत की कवी असोत ते कधीच निराश होत नाहीत. तसेच ते कधीच जीवनाकडे तुच्छातावादी दृष्टीने पाहात नाहीत. ते नेहमीच जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहतात आणि अंतिम विजय परिवर्तनवादी विचारांचा होणार, समताधिष्ठित जगणे आकाराला येणार याबद्दल त्यांची खात्री असते. म्हणून तर त्यांच्या कवितेत संघर्षाला, एकजुटीला, क्रांतीला आवाहन करण्यात आलेले दिसते. ते म्हणतात :

''युगा, आम्ही बोलू शब्दांच्या शस्त्रांनी: तोंडे शिवून बसणार नाही
आम्ही धुव्वा उडवू निरर्थकाचा; कवीला निरर्थक ठरू देणार नाही
उद्याचा सूर्य उगवेल आमच्याच वळलेल्या मुठींमधून
आम्ही तोडू हिमनग, आमचे टायटॅनिक तुटू देणार नाही.''

(शब्दशस्त्रे, पृ. ४६)

'निमित्ताची ठिणगी' या कवितेतही कवीचा अभंग विश्वास फार प्रभावीपणे व्यक्त झाला आहे. ते म्हणतात-

''वस्त्या अंगांवरील पहाड फेकतील
नद्यांना येतील आंदोलनाचे पूर
आणि बंद पडतील उलट्या काळजाचे कारखाने
... निमित्ताच्या एखाद्याही ठिणगीने.''

(निमित्ताची ठिणगी, पृ. १५२)

५.

कवीचे जसजसे वय वाढत जाते तसतशी कविता समृद्ध होत जाते का? प्रौढ होत जाते का? यासंबंधी निश्चित उत्तर देणे अवघड असते. पुष्कळदा वाढत्या वयाबरोबर कवितेला ओहोटी लागू शकते किंवा कवी स्वतःलाच पुनरावृत्त करीत असतो. परंतु यशवंत मनोहर यांच्या कवितेबाबत मात्र असे होताना दिसत नाही.

अनुक्रमणिका

त्यांची कविता सतत विकसित होत जाताना दिसते. प्रत्येक कालखंडाचा अन्वयार्थ लावताना दिसते. असे दिसत असले तरी वयाबरोबर कवितेमध्ये काही परिवर्तने होतात की नाही हा आणखी प्रश्न उरतोच आणि त्याचे उत्तर होकारार्थी घावे लागते. मराठीतल्या अनेक महत्त्वाच्या कवींच्या कवितेत वयानुरूप बदल झालेला आहे असे दिसते. सर्वच आनंदाची अनुभूती घेणारे बालकवी आयुष्याच्या उत्तरार्धात 'कवी बाळे' सारखी कविता लिहिताना दिसतात. प्रारंभी काहीसे मार्क्सवादाकडे झुकलेले मर्ढेकर शेवटी नियतिवादाला शरण गेलेले दिसतात. अशी आणखीही काही उदाहरणे देता येतील; पण त्याची आवश्यकता नाही. यशवंत मनोहरांची कविताही वयोमानाप्रमाणे बदलली आहे, असे दिसते आणि त्यात अस्वाभाविक काही नाही.

'युगमुद्रा' या संग्रहामध्ये चौदा ते पंधरा कविता मृत्यूसंबंधीचे चिंतन प्रकट करणाऱ्या आहेत.

मृत्यूसंबंधीचे चिंतन प्रकट करण्याची एक परंपरा मराठी कवितेमध्ये आहे. आधुनिक काळात भा. रा. तांबे आणि वा. रा. कांत यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. परंतु मध्ययुगात मात्र मृत्यूसंबंधीच्या चिंतनाची एक प्रदीर्घ परंपरा आहे. ही परंपरा मृत्यू म्हणजे मुक्ती मानते. परमात्म्याकडे जाणे मानते. असार संसारातून सुटणे मानते. मायापाशातून सुटून अलौकिक जगाकडे जाणे मानते. परंतु या सगळ्या पार्श्वभूमीवर यशवंत मनोहरांचे मृत्यूचिंतन संपूर्णतः वेगळे आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे यशवंत मनोहर हे पारलौकिक जग मानतच नाहीत. संपूर्णतः इहवादी दृष्टी बाळगणाऱ्या या कवीची, मृत्यूचिंतनपर कविता वेगळी होणे हे अगदीच स्वाभाविक आहे. या संदर्भातील 'बेचैन' ही कविता विशेष महत्त्वाची आहे. तिच्या रचनेचा बाज एखादी मध्ययुगातील रचना वाचावी असा आहे. परंतु आशय मात्र समकालीन जीवनातील जिवंतपणी होणाऱ्या मृत्यूसमान वेदनांचा आहे.

''स्त्रिया -पुरुष अनंत जळताती दिनरात
कुढतात अंधारात मृत्यूसंगे.
मृत्यूस या बेलगाम नाही मरण कारण
ऐशा मृत्यूंनी बेचैन संज्ञा माझी.
किती मरती मुकाट जसे जळते कस्पट
ऐसे मृत्यूचे विराट दुर्बोध हे.'' *(बेचैन, पृ. ८३)*

मृत्यूकडे ते मुक्तिदाता वगैरे म्हणून पाहात नाहीत तर एक अनाकलनीय घटित म्हणूनच त्याच्याकडे पाहतात. मृत्यू म्हणजे काय आहे, हे सांगण्यासाठी कोणी परत येत नाही हाही त्यांचा ठाम विश्वास आहे. मृत्यूसंबंधीच्या त्यांच्या तात्त्विक चिंतनाचे वेगळेपण पुढील कवितेतून लक्षात यावे :

''मूठभर मातीचा
आणि चिमूटभर राखेचा निष्कर्ष आहेस तू.
मृत्यू, तू आहेस हेमलॉकच्या शेवटच्या घोटाचा
निर्णय,
तू आहेस सर्वच धमन्यांमधील दळणवळण मालवून
टाकणारी
अंतराळाएवढी फुंकर,
श्वासांची शाळा बंद करणारा
न दिसणारा वटहुकूम.

मृत्यू, तू नुसताच अंतहीन अंगार
नुसताच अंतहीन अथांग अंधार.''
(अंतहीन अंधार, पृ. ७८-७९)

'मृत्यूपूर्वी' या कवितेतून अंतिम क्षणी माणसाच्या मनात येणारे विचार फार समर्थपणे व्यक्त केले आहेत, तर 'मृत्यूस' या कवितेमध्ये मृत्यूकडूनही माणसाला शिकता येते ही जाणीव प्रकट झाली आहे. म्हणूनच ते एका ठिकाणी म्हणतात :

''माणसांनी हिटलर होऊ नये. मनू होऊ नये.
हीरोशिमा-नागासाकीवर बॉंब होऊ नये
वंशच्या वंश बेचिराख करू नयेत
माणसांनी माणसांसाठी जीवन व्हावे. मृत्यू होऊ
नये.''
(आसन्नमरण जीवन, पृ. ७३)

यशवंत मनोहर यांचे मृत्युचिंतन पाहताना असे दिसते की भोवतीच्या वास्तवाचा, त्यातील भीषणतेचा त्यांचा पदर कधी सुटत नाही; किंबहुना भोवतीच्या विपरीत वास्तवाचा परिपाक प्रकट करण्यासाठीच त्यांचे मृत्युचिंतन प्रकट होते. त्यात कोठे गूढता येत नाही, की पारंपरिक विचारांच्या छायाही त्यांच्या मृत्युचिंतनावर पडत नाहीत. हे यशवंत मनोहर यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. म्हणूनच माणूस मृत्यूवरती मात करू शकतो असे त्यांना वाटते. मृत्यूमुळे देह संपतो. परंतु त्या देहातील जिद्द मात्र अभंगच राहू शकते, ही जाणीवही ते प्रकट करतात.

'मृत्यूचे जीवनाळणे' या कवितेचा विशेष उल्लेख करावा लागेल; कारण या कवितेत कवीच्या काही

अनुक्रमणिका

आत्मगत नोंदी आलेल्या आहेत. एक प्रकारे मृत्यूवरती मात करीत जीवन कसे उभे राहिले याच्या नोंदी आहेत. अर्थात येथे व्यक्तिगत नोंदीही काव्यात्म होऊन जातात; कारण या व्यक्तिगत नोंदी प्रतिमांच्या आणि प्रतीकांच्या भाषेत येत जातात, तेव्हा त्यांचे व्यक्तिगत अंश गळून पडून त्या सार्वकालिक अनुभूतीचा भाग होऊन जातात. आणि काव्यात्मताही वाढते.

माणूस मृत्यूवरतीही मात करू शकतो, करतो याची जाणीव कवी प्रकट करतो, तेव्हा मृत्यूचा पराभव झालेला असतो आणि जीवनाचा विजय. यशवंत मनोहर म्हणतातः

''मी परतणार नाही पृथ्वीर पुन्हा
आणि मृत्यूही नेऊ शकणार नाही
माझ्या शब्दातून वेचून वेचून मला.
कदाचित मृत्यूचा इथेच उडाला गोंधळ
किंवा असे समजू या की
मृत्यूने जीवनाच्या प्रवाहात
फेकून दिले मला रद्दी समजून.''

(मृत्यूचे जीवनाळणे, पृ. ९५)

वरच्या ओळी वाचल्या की कवीचा पुनर्जन्मावर व कर्मसंचितावर विश्वास नाही (म्हणजे पारंपरिक तत्त्वज्ञान तो नाकारतो आहे.) हे तर स्पष्ट होतेच; पण लौकिक जीवनातील कर्मानीच माणूस मृत्यूवरती मात करतो हेही कवी प्रत्ययकारीरित्या सांगत आहेत.

याचा अर्थ असा की मूल्याधिष्ठित परिवर्तनावर आणि मानवी कर्तृत्वावर ज्याचा विश्वास असतो, तो कवी जीवनाच्या सर्व क्षेत्रांत एकच अन्वेषण दृष्टी वापरत असतो. (या अन्वेषण दृष्टीबद्दल यापूर्वी विवेचन केले आहे.) जीवनाच्या संदर्भात वेगळी आणि मृत्यूच्या संदर्भात वेगळी अन्वेषण दृष्टी असा प्रकार येथे नसतो.

या काव्यपंक्तीमधून कवीचा कवी म्हणून आत्मविश्वासही व्यक्त होते.

६.

कवी कविता लिहितो. आयुष्यभर लिहीत राहातो. मग त्याला कधीतरी स्वतःलाच प्रश्न पडतो, की आपण कविता का लिहितो? या लिहिण्याचा काही उपयोग आहे का? आणि या प्रश्नांच्या चिंतनातून त्याला त्याच्याच कवितेचे स्वरूप कळत जाते, प्रेरणा कळत जातात आणि त्या साऱ्यांची काव्यात्म अभिव्यक्ती होत जाते. अशी काव्यात्म अभिव्यक्ती अनेक कवींनी केली आहे. यशवंत मनोहरांच्या कवितेसंबंधीच्या कविता अतिशय लक्षणीय आहेत. या कवितांमधून त्यांच्या प्रेरणा, त्यांची बांधिलकी, त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि भोवतीचे वास्तवही प्रकट होत जाते. (भोवतीच्या विद्रूप वास्तवाचा पदर कोठेही सुटत नाही. येथेही नाही.)

कवितेसंबंधीच्या कवितांची संख्याही लक्षणीय आहे. म्हणजे अठरा कविता या संग्रहात संग्रहित झाल्या आहेत.

आपले जीवन आणि कविता या दोन स्वतंत्र बाबी नव्हेतच, असे त्यांना वाटते. ते म्हणतात :

''ही कविता नव्हे
ही आहे आग छातीत भडकलेली,
हे आहे बोलू न शकणाऱ्या माणसांचे रडणे,
जे पोचत नाहीत शब्दांपर्यंत
किंवा शब्द ज्याला येऊ देत नाहीत जवळ''

(जीवन आणि कविता, पृ.१४३)

याच कवितेच्या शेवटी पुन्हा ते म्हणतात :

''ही कविता नव्हे.
हे आहे जीवनच जीवनाने तुडविलेले
आणि कवितेला सोबत घेऊन
युद्धाकडे निघालेले.''

आपल्या कवितेचे वेगळेपण सांगताना ती सत्याच्या जखमांवर पट्ट्या बांधणारी (आवळलेल्या मुठी), माणसाचाच झेंडा खांद्यांवर घेणारी (स्वयंवर), माणसाला अत्तदीप व्हायला सांगणारी (मी कवी जाहलो आणि) अशी आहे असे ते सांगतात. आपल्या कवितेची बांधिलकी परिवर्तनाशी, जीवनातील श्रेष्ठतर मूल्यांशी आहे हेही ते पुन्हा पुन्हा नोंदवितात. म्हणूनच 'क्षणाक्षणाला मरणाऱ्यांच्या जगण्याचा आपण शायर आहोत.' असेही सांगतात.

कवीला हरेक क्षणी सावध राहावे लागते. मोहाचे प्रसंग येतच असतात, तेव्हा ते निष्ठुरपणे त्यागावे लागतात. एका प्रकारे कवितेसाठी कवीला आपले जीवनच पणाला लावावे लागते. तेव्हाच तो-

''मी स्वतःस विकले नाही
मी मिंधा झालो नाही
तुटलेल्या गगनाखाली
मी तुटलो कधीही नाही.'' *(नग्न, पृ. १०५)*

असे म्हणू शकतो.

कवीने आरपार कवीच असले पाहिजे अशीही कवीची अपेक्षा आहे. त्याच वेळी तो माणूसही असले

पाहिजे ही कवीची पूर्वअट असते, असेही यशवंत मनोहर यांना वाटते. म्हणून ते म्हणतात :

''आपण तर पूर्ण वेळ
हिंदू असतो, मुस्लिम असतो, ख्रिश्चन असतो
आणि फक्त माणूस असण्यासाठी आपल्याजवळ
वेळच नसतो.''

(लिहिण्याआधी, पृ. ५८)

याच कवितेच्या प्रारंभी कवीने 'प्रस्थापितांचे आपण किती पातळ्यांवर रखेल आहोत' हेही नीट तपासून पाहिले पाहिजे, असे बजावतात.

'कवितेचा जाहीरनामा', 'कवितेपुढील कडवी', 'आपल्या कवितेत', 'पहाट', 'माझी कविता', 'माझ्या शब्दांनी बांधवा' या कविताही या संदर्भातील महत्त्वाच्या कविता होत.

- परंतु मूल्यात्मकता हीच जीवनातील महत्त्वाची गोष्ट असते. (त्यामुळे ती कवितेसाठीही महत्त्वाची असते) हे प्रकट करणारी 'उगम' ही या संग्रहातील एक महत्त्वाची कविता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संपूर्ण जीवनच एक वादळभरली कविता होऊन जाते, (कवीच्या निष्ठाही व्यक्त करते) याची अनुभूती ही कविता देऊन जाते.

या महापुरूषाला आयुष्यात छळाशिवाय काही मिळाले नाही. तरी त्याने सृष्टीला एक नवीच चेतना दिली. म्हणून कवी 'त्याच्या पायापुढे मस्तकातील विजा ठेवू इच्छितो', 'त्याच्या हातातील निखाऱ्यांचे चुंबन घेऊ इच्छितो', 'त्याच्या अध्यापनापुढे काळीज अंथरू इच्छितो', 'आपली दुःखे त्याच्या गौरवाचा पाऊस करू इच्छितो' आणि शेवटी म्हणतो :

''स्वतः फाटत राहिला; जमीन शिवत राहिला
दुःखांची चरित्रे वाचत राहिला, जीवन वेचत राहिला
मी त्याच्या तडफडीतून दिवस उगवताना पाहिला.''

(उगम, पृ. ५१)

उपरोक्त कवितेतून कवी जे जे करू इच्छितो, ते ते त्याच्या कवितेची आभूषणे होऊन येतात. म्हणूनच यशवंत मनोहरांची कविता वेगळी होते. हेच वेगळेपण त्यांच्या कवितेसंबंधीच्या कवितांमधूनही व्यक्त झाले आहे.

७.

भोवतीच्या वास्तवाचे अचूक आकलन, निर्भय अभिव्यक्ती, इहवादी चिंतन, विचारांची भक्कम बैठक, योग्य प्रतिमा-प्रतीकांचा वापर, आशावादी दृष्टिकोन, ओजस्वी वाणी, मूल्यावरची निष्ठा आणि माणसावरचा विश्वास ही यशवंत मनोहरांच्या कवितेची ठळक वैशिष्ट्ये या संग्रहातून अधिक ठळकपणे अधोरेखित होतात; पण या संग्रहाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे यातील बहुसंख्य कविता दीर्घ आहेत. ही दीर्घता चिंतनाच्या सखोलतेमुळे पेलून धरली गेलेली आहे. म्हणूनच ती काव्यात्मकही झालेली आहे.

'युगमुद्रा' हा मराठी कवितेतील एक मोलाचा ठेवा ठरावा.


• • •

(पृ. ६० वरून)

आहे आणि तो प्रत्यक्ष दिसतोही कवी! काव्यात्मतेने कधी कधी मनुष्यरूप घेतलेच तर ते बहुधा यशवंत मनोहरांचेच असेल, असे मला वाटते.'' यशवंत मनोहर यांचे हे पराकोटीचे कविपण व कविमन त्यांच्या 'स्वप्नसंहिते'मधून कवित्वाच्या सर्व प्रकारच्या गुणविशेषांसह साकार झाले आहे आणि त्यांच्या ह्या पराकोटीच्या कविपणाला व कविमनाला आंबेडकरवादी तत्त्वज्ञानाचे वैचारिक अधिष्ठान लाभले असल्यामुळे या कवितासंग्रहातील त्यांचे कवित्व जीवनमूल्यदर्शक ठरले आहे.

• • •

डॉ. शैलेंद्र लेंडे, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर - ४४००३३. भ्रमणभाष : ७०३८७३१५३३





बाबासाहेब...!

डॉ. जनार्दन वाघमारे

'बाबासाहेब...!' ही यशवंत मनोहर यांची दीर्घ कविता! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कर्तृत्वशाली जीवनावरचं हे चिंतनकाव्य आहे. या दीर्घ कवितेपूर्वीही त्यांनी बाबासाहेबांवर कविता लिहिल्या आहेत. खरे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन हा महाकाव्याचा विषय आहे. गेल्या तीन-चार दशकांपासून त्यांच्यावर विपुल अशी काव्यनिर्मिती झाली आहे. बाबासाहेबांचं कर्तृत्वच एवढं मोठं आहे की कवींच्या प्रतिभा त्यापुढे लुळ्यापांगळ्या पडतील. पण बाबासाहेब आंबेडकरांचं नाव उच्चारताच यशवंत मनोहर यांच्या प्रतिभेला उधाण येतं.

'आंबेडकर' या नावातच एक झंझावात दडलेला आहे. त्यांचे नाव उच्चारताच मला तर पी.बी. शेली या इंग्रज कवीच्या Ode to West Wind या कवितेची आठवण होते. पश्चिमेकडून येणारा वारा हा वादळाचे भीषण रूप धारण करतो. झाडाखाली व झाडांवरची जीर्ण झालेली काळी-पिवळी व कुजलेली पाने तो दूर भिरकावून देतो. बाबासाहेबांनीदेखील समाजातील कुजलेल्या रूढी-परंपरा व जुने विचार या वादळाप्रमाणे दूर फेकून दिले. या झंझावाताचे आगमन म्हणजे नव्या युगाची भविष्यवाणी होती. शेलीच्या या कवितेच्या शेवटच्या दोन ओळी अशा-

The Trumpet of a prophecy ! O, Wind,
If Winter comes, can Spring be far behind?

बाबासाहेबांनी स्वप्राणाने क्रांतीची तुतारी फुंकली. त्यांनी नवयुगाच्या आगमनाचा संदेश दिला. वसंत ऋतूच्या आगमनाची चाहूल त्यांच्या शब्दांत होती. त्याचा एकएक श्वास म्हणजे वादळ! यशवंत मनोहरांची 'बाबासाहेब...!' ही कविता वाचत असताना माझ्या मनात हा विचार आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार निश्चितच वादळी होते. त्यांना स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तत्त्वांवर समाजाची पुनर्रचना करावयाची होती. त्यासाठी त्यांना प्रचंड संघर्ष करावा लागला. निरनिराळ्या चळवळी त्यांना उभ्या कराव्या लागल्या. जेव्हा संविधान तयार करण्याची ऐतिहासिक जबाबदारी नियतीने त्यांच्यावर सोपवली तेव्हा त्यांनी या संधीचे सोने केले. न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या चार स्तंभांवर त्यांनी भारतीय संविधान उभे केले.

अनुक्रमणिका

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन हा कवी यशवंत मनोहर यांच्या श्रद्धेचा व आराधनेचा विषय आहे. त्यांच्या सखोल व उत्कट श्रद्धेतूनच ही कविता स्फुरली आहे. बाबासाहेबांच्या विचारांनी हजारो लोकांना प्रेरणा दिल्या. त्या विचारांनी कालबाह्य तत्त्वज्ञाने जाळून खाक केली. कवी म्हणतो :

तुम्ही शिकविलीत आम्हाला क्रांतीची केमिस्ट्री,
आम्ही तुमची लेकरं
तुम्ही चारलेल्या निखाऱ्यांवर आम्ही वाढलो
आमच्या उरातला ज्वालामुखी
आम्ही येथील अंधाराच्या भांडवलशाहीवर
आणि विषारी संरजामशाहीवर
उधळला.

बाबासाहेबांचे विचार म्हणजे क्रांतीचे रसायन! ते आयुष्यभर क्रांतीच्या निखाऱ्यांवर अनवाणी पायांनी चालले. त्यातील प्रत्येक निखारा हा ज्वालामुखी होता.

बाबासाहेबांच्या विचारांनी त्यांच्या अनुयायांच्या मनात क्रांतीचे स्फुल्लिंग फुलविले. कवीने त्यांच्या अनुयायांना फिनिक्स पक्ष्याची उपमा दिली आहे. फिनिक्स पक्ष्याचे वैशिष्ट्य असे की, तो निर्माल्यातून निर्मितीकडे झेपावतो. त्याला तोडा, चिरा, जाळा व त्याची राखरांगोळी करा. त्या राखरांगोळीतून अग्नीचे पंख लेवून तो आकाशात झेप घेतो व सगळे आकाश पेटवून देतो. बाबासाहेबांचे क्रांतिकारी विचार हे त्यांच्या अनुयायांचे अग्निपंख आहेत. त्यांच्या उड्डाणांना त्यांच्या स्वप्नांचे पंख लाभले आहेत.

बाबासाहेब...!
रक्तपाताशिवाय क्रांती,
आमूलाग्र आर्थिक-सामाजिक बदल
हा क्रांतीचा धडा तुम्ही आम्हाला दिला

बाबासाहेबांना रक्तहीन क्रांती अभिप्रेत होती. रक्तहीन क्रांतीचा मार्ग लोकशाहीच्या प्रदेशातून जातो. बाबासाहेबांची श्रद्धा लोकशाहीवर होती. लोकशाही विचारावर व मार्गावर त्यांची अढळ निष्ठा होती. लोकशाही हा त्यांच्या मनन-चिंतनाचा विषय होता. भारताचे संविधान हे त्या चिंतनाचाच आविष्कार आहे.

बाबासाहेबांनी लोकशाहीच्या दोन व्याख्या केल्या आहेत. त्या समजून घेणे आवश्यक आहे. त्यांनी केलेली पहिली व्याख्या :

''लोकशाही ही केवळ शासन पद्धती नाही. मूलतः ती सहजीवन पद्धती आहे, परस्पर आदानप्रदानाचा तो अनुभव आहे. तो मूलतः सहकाऱ्यांप्रती आदर आणि श्रद्धेचा दृष्टिकोन आहे.''

लोकशाही म्हणजे सहअनुभवावर आधारलेले सहजीवन. आपल्या सहकाऱ्यांविषयी आदर असल्याशिवाय सहजीवन कसे निर्माण होईल? हजारो जातींवर आधारलेल्या समाजात सहअनुभवही शक्य नाही आणि सहअस्तित्वही शक्य नाही आणि म्हणून बाबासाहेबांनी जातिनिर्मूलनाचा विचार मांडला. त्यांनी केलेली लोकशाहीची दुसरी व्याख्या अशी :

''रक्तपाताशिवाय लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणणाऱ्या शासन व्यवस्थेच्या प्रकारास आणि पद्धतीस लोकशाही म्हणतात.''

या दोन्हीही व्याख्यांचा एकत्रित विचार केला पाहिजे. लोकशाही ही सहजीवनाचा पुरस्कार करते. पण ते सहजीवन लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात रक्तपाताशिवाय आणि क्रांतिकारी बदल घडवून आणल्याशिवाय शक्य नाही. रक्तपाताने घडवून आणलेले आर्थिक व सामाजिक बदल हे सहजीवन निर्माण करू शकत नाहीत. जोपर्यंत समाजात आर्थिक व सामाजिक विषमता आहे तोपर्यंत सहजीवन निर्माण करता येत नाही. बाबासाहेबांना केवळ लोकशाही शासन प्रणालीच अभिप्रेत नव्हती, तर लोकशाही समाज व संस्कृतीदेखील अभिप्रेत होती.

बाबासाहेबांनी आपल्या क्रांतिकारी विचारांनी अंधविश्वासांना आणि अंधश्रद्धांना सुरुंग लावला. आपल्या अनुयायांना त्यांनी सत्याला सत्य आणि असत्याला असत्य म्हणण्याचे सामर्थ्य दिले. जुलूमशाहीला विरोध करा पण कोणावरही अन्याय करू नका हेही त्यांनी शिकविले. त्यांच्या हातात त्यांनी तर्क आणि विवेकाचे शस्त्र दिले. बाबासाहेबांचे जीवन म्हणजे क्रांतीचे विद्यापीठ. ह्या विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना काय शिकवले जाते?

केवळच काळाबरोबर धावू नका
काळाच्या पुढे धावा.
केवळच स्वप्नाबरोबर धावू नका
स्वप्नांच्यापुढे धावा.
केवळ वाऱ्याबरोबर धावू नका
वाऱ्याच्या पुढे धावा.

डॉ. बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांना स्वाभिमान शिकवला. दलित-पददलितांचे ते शिल्पकार होते. त्यांनी सम्यक दृष्टी दिली. सम्यक विचार दिले. काळाच्या पुढे धावण्यासाठी प्रेरणा दिली.

बाबासाहेबांच्या जयंती दिवशी कवीचा जीव अक्षरशः मोहरून जातो. त्या दिवशी त्याला बोधिवृक्षाचे दर्शन घडते. त्या वृक्षाखाली बसून त्याला समतेची व स्वाभिमानाची स्वप्ने पडतात. बाबासाहेबांच्या जयंतीचा दिवस म्हणजे 'महाविद्रोही' दिवस असे त्याला वाटते. पण बाबासाहेबांची जयंती तो क्रांतीचा दिवस म्हणून साजरा करतो, तो म्हणतो :

क्रांती या शब्दाला वाटते
क्रांती हा शब्द
आंबेडकर असा लिहिला जावा.

बाबासाहेब जन्मालाच आले नसते तर? तर सभोवतालचा अंधार तसाच राहिला असता. उलट तो अधिक गडद झाला असता. बाबासाहेबांचा जन्म झाला नसता तर हा कवी, कवी तरी झाला असता का? तो म्हणतो :

बाबासाहेब...!
माझ्यातला कवी जन्मतो निखाऱ्यांच्या पोटी
तुम्ही उधळलेल्या.
शोषणसत्तेने दिलेल्या नकारासोबत खेळत वाढतो.
भूतकाळात जमा झालेल्या मरणांना हसणे
आणि वर्तमानातील मरणांना सुरुंग लावून
उडवून देणे
हे कौशल्य माझ्यातल्या कवीने
तुमच्या मेंदूलाच मागितले आहे.

मी कोण? हा प्रश्न कवी स्वतःला विचारतो. बाबासाहेबांमुळे त्याला स्वत्व सापडते.

बाबासाहेब...!
मी मोहोर तुमच्या संतापाचा,
मी बहर तुमच्या चांदण्याचा.
मी तुमच्या गांभीर्यातून उगवलेला एक झरा
तुम्ही दिलेल्या अनेक झऱ्यांमधला
मोडत नाही असा इशारा.

यशवंत मनोहर हे बाबासाहेबांविषयी कृतज्ञता व्यक्त करतात. कारण लाखो लोकांबरोबर त्यांनाही बाबासाहेबांनी प्रेरणा दिल्या आहेत, अस्मिता दिली आहे. त्यांनी या कवीला क्रांतीच्या लाटेवर स्वार व्हायला शिकवले. स्वाभिमानाने जगण्याचे तत्त्वज्ञान त्यांनी शिकवले. बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानाने त्याला राखेतून फिनिक्स पक्ष्याप्रमाणे उडायला शिकवले. अंधार पिऊन त्यांनी प्रकाशाचे अश्रू ढाळावयास शिकवले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सत्तेचे राजकारण केले नाही. त्यांचे राजकारण समतेचे होते. दलित, शोषित, पीडित व वंचित माणसांसाठी त्यांनी संघर्ष केला. त्यांना समतेच्या पायावर समाज उभा करावयाचा होता.

पाया बदला इमला बदलतो.
इमला बदलल्याने बदलत नाही पाया
आणि टाळता येत नाहीत दुष्परिणाम.
कारणे बदला कार्य बदलते.
ही सारी विषमतेची मीमांसा
आम्ही तुमच्या क्रांतिपीठात शिकलो.

समतेच्या पायावर समतेचा इमला त्यांना बांधावयाचा होता. त्यांचा लढा हा मानवी प्रतिष्ठेसाठी होता यात शंका नाही. बाबासाहेबांनी त्रिमितीय लोकशाहीचा सिद्धांत मांडला. राजकीय, सामाजिक आणि आर्थिक असे तीन आयाम लोकशाहीला असतात. अशा प्रकारची लोकशाही अस्तित्वात यावी हे त्यांचे स्वप्न होते. पण ते स्वप्न अद्याप साकार झालेले नाही. एक व्यक्ती एक मत यावर राजकीय लोकशाहीचा डोलारा उभा आहे. पण प्रत्येक व्यक्तीचे मूल्य हे सारखे नाही.

आणि म्हणून एक व्यक्ती एक मूल्य निर्माण करता आले पाहिजे. माणूस = माणूस. हे समीकरण अस्तित्वात आले पाहिजे. पण जागतिकीकरणाच्या या युगात ते स्वप्न अधिक धूसर होत चालले आहे. माणूस हाच लोकशाही जीवन पद्धतीचा आत्मा असतो. लोकशाहीचा केंद्रबिंदू हा माणूसच असतो. या माणसालाच अस्मिता देण्यासाठी बाबासाहेबांचा प्रयत्न होता. बाबासाहेबांना उद्देशून कवी म्हणतो :

तुमच्या आयुष्याचा एकच अर्थ
माणसाचा अपमान सहन करायचा नाही.
तुमच्या सत्याचा एकच निष्कर्ष
माणूस हेच परम सौंदर्य
माणूस हेच परम सत्य.

अनुक्रमणिका

बाबासाहेब,
तुम्ही याच माणसाच्या पुनर्रचनेसाठी
मला वणव्यातला कवी केलेत.

यशवंत मनोहरांनी आपल्या कवितेचे प्रयोजन इथे सांगितले आहे. त्यांची कविता माणसालाच सत्य, शिव व सुंदर मानते. त्यांची ही कविता कृतज्ञतेची कविता आहे.

बाबासाहेबांनी समाजवाद सामान्य माणसासाठी मांडला. त्यांच्या या समाजवादाबद्दल कवी म्हणतो :

तुमच्या समाजवादाचा बोधिवृक्ष आमच्याजवळ आहे.
आम्ही कंगाल असलो
तरी ही अजोड श्रीमंती केवळ आमची आहे.

बाबासाहेब म्हणजे प्रज्ञाशिखर. त्यावर चढणे कठीण. 'आंबेडकर' या शब्दाचा अर्थ 'अथांग' असाच आहे. त्याला पॅसेफिकची खोली आणि हिमालयाची उंची लाभली होती. या प्रज्ञेला त्यांनी अमेरिका व इंग्लंडमध्ये पैलू पाडले. त्यांच्या प्रज्ञेने सामान्य माणसाला 'अधिनायक' बनविले. वाङ्मयाच्या परिभाषेत सामान्य माणूस हा ॲन्टिहीरो (anti-hero) आहे. त्याच्यासाठी नवे युग व नवी संहिता त्यांनी निर्माण केली. हे युग शोषणमुक्त व न्याययुक्त असावे यासाठी त्यांचा प्रयत्न होता. प्रत्येक माणसाला प्रतिष्ठा मिळावी यासाठी त्यांचा संघर्ष होता.

तुम्हाला ठेवायचे होते प्रत्येकच माणसाचे नाव
पुनर्रचना,
निरंतर पुनर्रचना,
आणि क्रांतिकारी पुनर्रचना
हे तर तुमचेच नाव होते.

बाबासाहेबांना अभिप्रेत असलेला पुनर्रचनेचा आराखडा त्यांच्या ग्रंथात सापडतो. त्यांच्या या पुनर्रचित जगात त्यांना प्रकाशाच्या वाटा निर्माण करायच्या होत्या. त्या जगातल्या नद्या, नाले, वृक्ष, वेली, पक्षी सर्वच प्रकाशाचे असणार!

भारताला ते विज्ञाननिष्ठ बनवू इच्छित होते. त्यासाठीच संविधानाची रचना त्यांनी केली. आंबेडकर हे क्रांतीचे दुसरे नाव होते! त्यांच्या प्रज्ञेने सामान्य माणसांच्या प्रज्ञा पेटवल्या. त्यांच्या प्रज्ञेने सामान्य माणसाच्या प्रज्ञा पेटवल्या. त्यांच्या स्वप्नांनी सामान्य माणसांच्या डोळ्यांत तेज निर्माण केले.

यशवंत मनोहरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रॉमिथिअसची उपमा दिली आहे. प्रॉमिथिअस हे ग्रीक मिथ अतिशय प्रेरणादायी व आशयगर्भ आहे. प्रॉमिथिअस हा ग्रीकांचा अधिनायक होता. त्याने ग्रीक देवतांच्या विरुद्ध विद्रोह पुकारला. प्रॉमिथिअस हा अपार शक्तीचा व अलौकिक बुद्धिमत्तेचा मनुष्य होता. त्याने पृथ्वीतलावरील लोकांसाठी स्वर्गातून महत्प्रयासाने अग्नी चोरून आणला. त्यावर देवतांचाच केवळ अधिकार होता. ते मानवांना तो अग्नी देऊ इच्छित नव्हते. झीअस हा देवांचा देव. त्याने प्रॉमिथिअला या गुन्ह्याबद्दल एक हजार वर्षे पहाडाला बांधून ठेवण्याची शिक्षा ठोठावली, प्रॉमिथिअसने मरणयातना सोसल्या. त्याचा लढा हा मानवमुक्तीसाठीच होता. ज्ञान हे त्याच्या हातातले शस्त्र होते. डॉ. आंबेडकरांचा लढादेखील मानवमुक्तीसाठीच होता. स्वातंत्र्याचे ते चँपियन होते. त्यांनादेखील अनेक यातना सोसाव्या लागल्या. प्रॉमिथिअसप्रमाणे त्यांनीही ज्ञानाचा उपयोग शस्त्रासारखा केला. दोन्ही बाजूंनी जळणाऱ्या मेणबत्तीसारखे त्यांचे जीवन होते. अस्पृश्यतेचे हलाहल त्यांना प्यावे लागले. त्यांच्या अश्रूंच्या ठिणग्या झाल्या.

यशवंत मनोहरांनी ही दीर्घकविता या महामानवाला वंदन करण्यासाठीच लिहिली आहे. ते म्हणतात :

क्रांतीच्या माथ्यातले बाबासाहेब
उगवावेत लोकांच्या दैनंदिन वर्तनातून
म्हणून रचना करतो नवनव्या क्षितिजांची,
तुमच्या नावाने सुरू झालेले युद्ध
प्रत्येकाच्याच डोक्यात पेटवण्यासाठी,
प्रत्येकच अन्यायग्रस्त मनात
एकेक बाबासाहेब आंबेडकर निर्माण करण्याची
केली आहे मी प्रतिज्ञा
आणि या प्रतिज्ञेलाच मानतोय मी
माझी कविता.

डॉ. बाबासाहेबांच्या जीवनाचे तत्त्वज्ञान केवळ तीन शब्दांत सांगता येते. ते तीन शब्द आहेत : स्वातंत्र्य, समता व बंधुता. या तीन शब्दांतूनच मानवी जीवनाचे सार्वभौमत्व तयार होते. बाबासाहेब हे 'सार्वभौमत्व' प्रत्येक माणसाला देऊ इच्छित होते. मनोहरांची कविता या सार्वभौम माणसाची महानता गाण्यात स्वतःला धन्य समजते. माणूस हा जीवनाचा अधिनायक आहे. माणूसच माणसाचा, त्यांच्या ज्ञानाचा व तत्त्वज्ञानाचा

अनुक्रमणिका

विषय आहे. खरे तर बाबासाहेब या माणसासाठीच लढले, झगडले व जगले. सामान्य माणसाला न्याय देण्यासाठीच त्यांनी ग्रंथरचना केली. त्यांनी अनेक मौलिक ग्रंथ लिहिले. त्यांचा एक एक ग्रंथ म्हणजे 'संग्राम संहिता'च आहे. बाबासाहेब म्हणजे दीपस्तंभ. वाऱ्या-वादळात उभे राहून तो जगाला प्रकाशवाटा दाखवतो.

कवी आजच्या दारुण परिस्थितीवर भाष्य करतो. उन्मादाचे ढोल वाजवणाऱ्यांना तो उघडे पाडतो. 'कंबरेचे सोडून मस्तकाला गुंडाळण्याचा' प्रयत्न करणाऱ्यांच्या दांभिकपणावर तो कोरडे ओढतो. पायाखालच्या वाटा ह्या मागेही नेतात आणि पुढेही नेतात. पण पुढे न जाता प्रतिगामी लोक हे मागेच जातात. कारण मागे जाणे सोपे असते. प्रवाहाच्या विरुद्ध जाण्याची ताकद आपल्या अंगी असली पाहिजे.

कवी बाबासाहेबांनी सांगितलेल्या समाजवादाविषयीदेखील भरभरून बोलतो. समाजवाद हा बाबासाहेबांचा 'प्रज्ञावृक्ष' होता. पण त्यापासून लोक दूर जात आहेत याची कवीला खंत वाटते. धर्मपिसाट लोक इतिहासाची तोडफोड करतात. कवी हा स्वातंत्र्यावर आक्रमण करणाऱ्या, समतेवर बलात्कार करणाऱ्या आणि बंधुतेवर अत्याचार करणाऱ्यांवर तुटून पडतो. बाबासाहेबांनी 'फॅसिझमची जीभ उपटून फॅसिस्टांच्या हातात' दिली. त्यांच्या विचारांना नाकारायचेही नाही आणि स्वीकारायचेही नाही, अशी ही दांभिक मंडळी आहे.

बाबासाहेब...!
ते तुमच्यासाठी काहीही करीत नाहीत
ते करू शकतात फॅसिझमसाठी काहीही,
तुम्ही नकोत म्हणून तुम्हाला करतात
ते जवळ,
तुम्हाला नाकारायचे म्हणून
करतात तुमच्या नावाचा स्वीकार.
याचा अर्थ -
आंबेडकरांतून वजा केले जात आहेत
क्रांतिकारी आंबेडकर.
विचारांच्या निखाऱ्यातली केली जात आहे
आग वजा.

एकीकडे आंबेडकरांच्या नावाचा उदोउदो करायचा व दुसरीकडे त्यांचे विचार नाकारायचे. जे धर्मांध आणि जात्यंध आहेत ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना स्थितिवादात अडकवत आहेत; पण कवीला विश्वास आहे की-

तुमचा बोधिवृक्ष
नाही उद्ध्वस्त करता येणार शोषणसत्तेला.

यशवंत मनोहरांची ही कविता शोषणसत्तेच्या विरोधात उभी आहे.

अन्यायग्रस्तांच्या मोर्चात
असतील युग वाकवणारे
तुमच्या मस्तकातील निर्धार
आणि या निर्धारावर भाष्य करणारी
माझी कविता.
अशी लिहिता यावी मला कविता
म्हणून मी स्वतःच काळजाची
चिता पेटवून लिहितो आहे.

कवीने क्रांतीची बाराखडी गिरवली आहे. त्याच्या कवितेच्या ओठांवर फक्त क्रांतिगीत आहे. शोषणसत्तेचे मनसुबे तिला कळलेले आहेत, म्हणून कवी म्हणतो :

माझ्या शब्दांच्या हातात,
माझ्या अक्षरांच्या डोळ्यांत,
माझ्या कवितेच्या उद्रेकात
लखलखत्या तलवारी आहेत क्रांतीच्या

बाबासाहेबांना जाती-पोटजाती अशा गोष्टी मान्यच नव्हत्या, माणसाला झिंग आणणारी धर्मांधता त्यांना अजिबात मान्य नव्हती. ही सर्व जळमटे त्यांना साफ करायची होती. त्यांना ही सर्व संरचनाच नष्ट करावयाची होती. त्यांना संपवायचा होता साम्राज्यवाद, वर्णवाद आणि वंशवाद. त्यांना हवे होते सहजीवन. त्यांना उभी करायची होती पर्यायी संस्कृती. त्यांना हवा होता स्वातंत्र्य, समता व बंधुता या उदात्त तत्त्वांवर आधारलेला समाज.

बाबासाहेब...!
तुम्ही संविधान मृत्यूच्या पराभवाचं...!
लखलखतं पातं अन्याय कापणाऱ्या उजेडाचं,
तुम्ही महाकथन माणसाच्या महानायकत्वाचं
मृत्यू तुम्हाला नवीन नव्हते,
आणि ते तुम्हाला वचनकूनही होते.

डॉ. बाबासाहेबांची जीवनयात्रा ६ डिसेंबर १९५६ रोजी संपली; पण जगाने त्यांचा मृत्यू मान्यच केला नाही. मृत्युंजय म्हणूनच त्यांचा आज गौरव होतो आहे.

यशवंत मनोहरांची लेखणी डॉ. बाबासाहेब

अनुक्रमणिका

आंबेडकरांच्या क्रांतिवादावर परजली आहे. 'तू अखंड जळती वात...' या कवितेचा शेवट असा :

तुज आम्ही पाहिले नाही
तरी आम्ही नाही अनाथ
तू तेल दिव्यातील आमुच्या
अन् अखंड जळती वात.

'बाबासाहेब...!' ही कविता एका प्रतिभावंताच्या लेखणीला पडलेले स्वप्न आहे. २०१५ हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष होते. या वर्षात बाबासाहेबांना अभिवादन करणारे निरनिराळे कार्यक्रम झाले. सबंध जगाने या महामानवाच्या स्मृतीस विनम्र अभिवादन केले. ही कविता यशवंत मनोहरांनी बाबासाहेबांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठीच लिहिली आहे. अतिशय भारावलेल्या मनाने त्यांनी ही कविता लिहिली आहे.

बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी त्यांच्या मनात असलेली श्रद्धा या कवितेत अभिव्यक्त झालेली आहे. त्याचबरोबर बाबासाहेब ज्या मूल्यांसाठी जगले ती मूल्येच आज पायदळी तुडवली जात आहेत. त्याविषयीची खंत व अस्वस्थता ही त्यांनी व्याकुळलेल्या मनाने व्यक्त केलेली आहे. एकीकडे आज बाबासाहेबांचा गौरव केला जात आहे तर दुसरीकडे त्यांच्या मूल्यांची व आदर्शांची प्रतारणा होत आहे. एकीकडे त्यांची तोंड भरून स्तुती तर दुसरीकडे त्यांची शिकवण पायदळी तुडवणे चालू आहे. थोडक्यात बाबासाहेबांचा उपयोग स्वतःच्या स्वार्थासाठी केला जात आहे. खरे तर बाबासाहेब हे त्यांना नकोच आहेत; पण त्यांचेच आम्ही खरे अनुयायी आहोत असे दाखवण्याचा व्यर्थ खटाटोप ते करीत आहेत. त्यांच्या नावावर प्रचंड असा खर्च केला जातो आहे. त्यांच्या मार्गावर चालण्याची या ढोंगी लोकांची इच्छा नाही. उलट देशात फॅसिस्ट प्रवृत्तींना खतपाणी घातले जात आहे. बाबासाहेबांना वजा करण्याचेच गणित मांडले जात आहे. वरवरच्या स्तुतीचे क्लोरोफॉर्म वापरून लोकांच्या जाणिवा बधिर केल्या जात आहेत.

जगाचा इतिहास हा क्रांत्या व प्रतिक्रांत्यांनी भरेलेला आहे. भारत याला अपवाद नाही. बाबासाहेबांच्या महत्प्रयासाने या देशात क्रांती घडली. पण प्रतिक्रांतीचा या देशाला धोका आहे. हा देश अनेकदा पुढे जात असताना मागे ढकलण्यात आले आहे. त्याच्या गुलामीला या देशातील प्रतिगामी शक्तीच कारणीभूत आहेत. पुन्हा या उन्मत शक्तींना उधाण आले आहे. आज या शक्ती समाजाचे ध्रुवीकरण करीत आहेत. जातिभेदाने शतखंडित झालेला हा समाज पुन्हा छिन्नविछिन्न होत आहे. प्रतिक्रांती दुसरी काय असते?

आज देशात धर्मांधता आणि ज्यात्यंधता प्रचंड प्रमाणात वाढत आहे. फॅसिस्ट प्रवृत्ती बेफाम सुटल्या आहेत. स्वातंत्र्य, समता व बंधुभाव ही मूल्ये नाकारली जात आहेत. राष्ट्रवादाच्या नावावर मानवतावाद संपवण्याचे प्रयत्न होत आहेत. साम्राज्यवाद हा लोकशाहीच्या मुखवट्याखाली वावरत असतो. डॉ. बाबासाहेबांनी भांडवलशाही व ब्राह्मणशाहीच्या विरुद्ध आयुष्यभर संघर्ष केला; पण त्यांचे पुनरुज्जीवन करण्याचेच प्रयत्न आज होत आहेत. याचा इशारा देण्याचे काम यशवंत मनोहरांची ही कविता करते. हुकूमशाही ही लोकशाहीचा मुखवटा पांघरून येत असते. कवीच्या मनातील ही अस्वस्थता ओसंडून वाहते आहे. ही कविता वाचकांना अस्वस्थ तर करतेच करते; पण त्यांना ती अंतर्मुखदेखील करते.

ही कविता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख रेखाटते. ही कविता बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर लिहिलेला प्रबंध आहे. खरे तर ही 'प्रबंध कविता' आहे. विचार आणि भावनांचा सुंदर संगम या दीर्घकवितेत झालेला आहे. विचारप्रचुरता व भावप्रचुरता हे ह्या कवितेचे वैशिष्ट्य आहे.

यशवंत मनोहर यांची 'बाबासाहेब...!' ही दीर्घकविता नव्या युगाचे प्रिॲम्बल आहे असे मी मानतो. हे प्रिॲम्बल सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक निर्माण करू इच्छिते. ते सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य; प्रतिष्ठा व संधीची समानता आणि व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकता व एकात्मता यावर आधारलेली बंधुता यांचे भारतीय लोकांना अभिवचन देते. न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या ध्रुवमूल्यांचे सर्जन करणारी ही कविता आहे.

• • •

डॉ. जनार्दन वाघमारे, लातूर, भ्रमणभाष : ९४२३७७७२००





तुरुंग तोडणाऱ्या उठावाची कविता : नव्या माणसाचे घोषणापत्र

दा. गो. काळे

डॉ. यशवंत मनोहर एकूणच मराठी कवितेतील अत्यंत महत्त्वाचे कवी आहेत. त्यांनी डॉ. बाबासोहब आंबेडकरांच्या मौलिक आणि सर्वकष विचारधारेतून विद्रोहाची नव्याने मांडणी केली आहे. या त्यांच्या मांडणीला लोकायत आणि बौद्ध तत्त्वज्ञानातील विचारसामर्थ्याचा विलक्षण असा स्पर्श झाला आहे. शोषितांच्या या जगात दमन-प्रवृत्तीची बीजं सर्वदूर पसरलेली आहेत. ह्या प्रवृत्तीची निपज आणि कडे तोडण्यासाठी सततचा संघर्ष आवश्यक असतो. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' या युद्धाला तोंड देण्यासाठी सतर्कपणे चळवळीच्या दिशा व नव्या जीवन जाणिवांना भिडणारे काळाचे क्रांतिविज्ञान आवश्यक असते. त्यासाठी विश्वात्मक विचार-प्रेरणांची गरज असते. ही गरज आंबेडकरी विचारधारेतून, त्याच्या साधनेतून प्राप्त होणे शक्य आहे. ह्या विचारांची व्याप्ती एखाद्या देश, काळ, परिस्थितीशी निगडित नाही. आपणाकडे जात वास्तव प्रभावित असेल तर जगात तत्सम निरनिराळ्या प्रवृत्ती अस्तित्वात आहेत. म्हणजे हा विचार सार्वकालिक, सार्वभौम असा ऐवज आहे. ह्यात पोथीनिष्ठ कडवेपण नाही. लवचीक जाणिवेचे सतत भान आहे. 'माणूस' हे या विचारांचे मध्यवर्ती सूत्र आहे. म्हणून डॉ. यशवंत मनोहर यांनी आंबेडकरी कवितेची केलेली मांडणी उचित आणि विश्वात्मक अशी आहे. मला त्यांच्या नव्या 'तुरुंग तोडणाऱ्या उठावाची कविता' या कवितासंग्रहाच्या निमित्ताने आवर्जून सांगावेसे वाटते.

डॉ. यशवंत मनोहर यांचे उत्थानगुंफा, मूर्तिभंजन, काव्यभीमायन, अग्नीचा आदिबंध, प्रतीक्षायन, जीवनायन, स्वप्नसंहिता, बाबासाहेब, युगमुद्रा, युगांतर आणि ज्यावर आपण विचार करतोय तो 'तुरुंग तोडणाऱ्या उठावाची कविता' हे त्यांचे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. याशिवाय 'दलित साहित्य : सिद्धांत व स्वरूप,' 'स्वाद आणि चिकित्सा', 'साहित्य बांधिलकी आणि विद्रोह', 'मराठी कविता आणि आधुनिकता' हे समीक्षा ग्रंथ व 'समुचित' या नियतकालिकाचे संपादन त्यांनी केले आहे. चार्वाक, शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांचा वारसा ते पुढे नेत आहेत. 'डॉ. आंबेडकरांचा बुद्ध कोणता?' ही पुस्तिका बुद्ध-धम्माची यथोचित चिकित्सा करणारी आहे. एकंदर ते सिद्धांत प्रस्थापित करणारे, नव्या मूल्यांचा शोध घेणारे सर्जनशील विचारवंत आहेत. आंबेडकरी साहित्याची मांडणी करताना 'साहित्य-शास्त्रा'साठी नव्या संज्ञाची निर्मिती केली आहे. नवे साहित्य-शास्त्र उदयाला आणताना पारंपरिक दृष्टिकोन त्यांनी कधीही स्वीकारला नाही. नव्या जाणिवांसाठी सतत 'संज्ञांचा शोध' त्यांनी घेतला. सामाजिकतेचा विचार स्वीकारताना जगाच्या पातळीवरून समस्यांचा अभ्यास त्यांनी केला व आपल्या मताचा आग्रह सतत त्यांनी पुढे ठेवला आहे.

अनुक्रमणिका

'तुरुंग तोडणाऱ्या उठावाची कविता' म्हणजे डॉ. यशवंत मनोहर यांनी समकालीन वास्तवाला आपल्या जीवनदृष्टीची दिलेली जोड आहे. त्यांची चिंतनशीलता एका विचारवंताची असून 'माणूस' हे त्यांच्या जीवन-जाणिवेतील महत्त्वाचे, मध्यवर्ती असे सूत्र आहे. त्यांच्या कवितेतली प्रेरणा मानवी अस्तित्व व्यापून आलेली आहे. त्यातून केवळ माणसाचे असणे हाच अंतिम विचार आहे. कोणत्याही व्यवस्थेमध्ये माणूस हा सामाजिक, राजकीय पर्यावरणाचा एक घटक असतो. त्याला त्या व्यवस्थेकडून काही अपेक्षा असतात. त्यात त्याला दिल्या गेलेल्या सन्मानाचा, स्वातंत्र्याचा विचार होत असतो. हा विचार जेव्हा राजकीय प्रवृत्तीकडून नाकारला जातो, तेव्हा संघटित नेतृत्व आपला स्वाभिमान जागृत करून लढा उभारत असते. आपल्या कृतीतून निषेध नोंदवीत असते. त्याचवेळी या घटितांचे दस्तऐवजीकरण करण्याची मोठी जबाबदारी कवितेवर येत असते. त्यामुळे सुसंस्कृत समाजामध्ये कवितेचे महत्त्व अबाधित आणि अधिक असते. या अराजकाच्या राज्यामध्ये कवितेसारखी सृजनशील गोष्ट कोणतीही नाही. या काळामध्ये कविता ही विचारशील जाणिवेचा घटक असतो. ती रंजनवादी असू शकत नाही. त्यामुळे आंबेडकरी कवितेचे 'कविता' हे क्रांतिकारी अस्त्र आहे. यात कोणतीही अतिशयोक्ती नाही.

त्यामुळे डॉ. यशवंत मनोहरांची कविता 'उत्थानगुंफे'पासून सुरू होणारा हा विचार आहे. समाजाचे आणि माणसाचे प्रतिबिंब त्या कवितेत पडले आहे.

माणूस उगवण्याच्या शक्यता आता
उभारल्या पाहिजेत नव्याने
कवीने माणसाच्या रचनेची कार्यशाळा
करावे आपल्या कवितेला
सन्तांचे लांगुलचालन करणारी पोपटपंची करू नये.
वर्तमान जाळणाऱ्या आगीत-उतरावे कवीने
कवितेसाठी

ही महत्त्वपूर्ण अशी कवितेची आणि कवीची भूमिका आहे. ही बांधिलकी ज्ञानातून आलेली संहिता आहे. म्हणजे या सगळ्या घटितांना ज्ञानाचा आणि विचारांचा सुज्ञ स्पर्श आहे. ही माणसांची माणसांसाठी विचारसूत्रांतून, चळवळीतून, लढलेली लढाई आहे. कारण या माणसांच्या अस्तित्वाला, असण्याला बुद्धाच्या सम्यक विचारांचा पाठिंबा लाभलेला आहे. म्हणून ह्या कवितेतून होणाऱ्या उषःकालाला त्यांच्या सूर्यवंशी आगमनाला नव्या माणसाचे घोषणापत्र ही सुंदर संकल्पना कवितेतून आली आहे. कविता किंवा निर्मितीचे कोणतेही साधन आंबेडकरी कवितेचे दुःख शोधण्याचे, समजून घेण्याचे कृतिशील साध्य आहे. घोषणाही प्रत्युत्तर देणाऱ्या कविताच आहे.

शिका, संघटित व्हा, संघर्ष करा ही बाबासाहेबांनी प्रदान केलेली त्रयी आपल्या अस्तित्वाचे अधिष्ठान आहे. या मार्गातून माणसाने आपली एक दिशा, अस्मिता जोपासली आहे. ह्या तीन गोष्टी नसत्या तर, त्याची जाणीव नसती तर, ही जगण्याची, लढण्याची नवी उमेद केव्हाच हरविली असती. तशाही ह्या दहा दिशा शोषितांसाठी केव्हाच बंद झाल्या होत्या. कोणताही सुकर मार्ग दाखवण्याचे नेतृत्वही नव्हते. ह्या दहा दिशांना टाळून आपल्या कर्तृत्वातून नवी दिशा माणसाने निर्माण केली. या अराजकाच्या पार्श्वभूमीवर आपले नवे अस्तित्व निर्माण केले. या कवीने माणसासाठी 'अकरावी दिशा' अशी नव्या अर्थाची संज्ञा निर्माण केली. ही आंबेडकरी कवितेतून आलेली नवी जाणीव आहे. ह्या स्वतंत्र दिशेतून मानवी उत्थानाचा नव्या माणसासाठी नवा उषःकाल शक्य आहे. ही उमेद ह्या कवितेतून कवीने प्रदान केली आहे. ही त्यांच्या स्वतंत्र आणि मुक्त प्रतिभेची संभवी ग्वाही आहे. ही नाकारता येणारी गोष्ट नाही.

विनाशासोबत भांडलेल्या इच्छा
नव्या उमेदीने उगवत आहेत
अकराव्या दिशेतून.
उषःकाल म्हणजे
नव्या माणसाचे घोषणापत्र!

डॉ. यशवंत मनोहर एक कवी, विचारवंत आणि कार्यकर्ता म्हणूनही आपली भूमिका प्रगट करताना, साहित्यातून मानवी जीवनाचे महत्त्व अधोरेखित झाले पाहिजे असा आग्रह ते धरतात. आपण आज ज्या सामाजिक व राजकीय पर्यावरणामध्ये राहतो, त्या व्यवस्थेची शोषक आणि शोषित या संबंधातील साहित्याची भूमिका काय असावी, याचे सूचन त्यांनी वेळोवेळी आपल्या लेखनातून, भाषणांतून केले आहे. साहित्यात समाज-जीवनाचे प्रतिबिंब उमटले पाहिजे. त्यांच्या राजकीय व सामाजिक पर्यावरणाची चिकित्सा

अनुक्रमणिका

ही महत्त्वपूर्ण घटितं साहित्यातून वेळोवेळी मुक्तपणे प्रगट होणे अगत्याचे आहे; कारण साहित्य हा समाजशीलतेचा, त्याच्या विचारस्वातंत्र्याचा उमटलेला पडसाद आहे.

साहित्य हे समाजाचे त्याच्या स्वस्थतेचे विचार-पीठ आहे. ह्या माध्यमातून एक विचार व भयाचे सूचन होत असते. सतर्कता जोपासली जात असते. समाजामध्ये निर्भयतेचे वातावरण आणि राजसत्तेच्या गुणावगुणाची चिकित्सा केली जात असते. या दृष्टीने या कवीने आपली समाजाप्रती असलेली बांधिलकी जोपासली आहे. स्वतंत्र वृत्तीचे निर्भय नागरिक व्हा. विचारस्वातंत्र्याची गळचेपी आणि सत्ताधाऱ्यांची मनमानी खपवून घेऊ नका. ही आंबेडकरी सूत्रतेची शिकवण आणि संदेश त्यांच्या विचारांतून येत असतो. त्यातूनच आंबेडकरी कवितेचा सगर गेला आहे.

'तुरुंग तोडणाऱ्या उठावाची कविता' या शीर्षकसूत्राने या कवितांची बांधणी करण्यात आली आहे. ह्या कवितेत 'तुरुंग' दडपशाहीचे प्रतीक म्हणून आले आहे. या दडपशाहीला या गुलामगिरीच्या बेड्यांना झुगारल्याशिवाय मुक्ततेची पहाट उगवत नाही. त्यासाठी उठावाची गरज असते. तुरुंग म्हणजे व्यवस्थेचा कोणत्याही स्थितिगतीध्ये होणारा कोंडमारा, तो कोणत्याही अवस्थेत माणूसपणाला, त्याच्या क्रियाशीलतेला सील लावू शकतो. प्रतिबंध करू शकतो. या अराजकतेच्या ठायी अनेक शक्यता सामावलेल्या असतात. उदा. त्यांचा एक स्वतःचा एकमार्गी अजेंडा असतो. त्यातून एक पुरोगामित्वाचा चेहरा 'बीग बॉस' या यंत्रणेतून उदयाला येत असतो. यांच्या स्वामित्वाच्या ठळक बाजू जरी लक्षात घेतल्या तरी भयंकर असा उग्र चेहरा समोर येताना दिसतो. प्रज्ञांचे आणि प्रतिभांचे निर्बीजीकरण, स्वतःचा मेंदू आणि अन्यायाच्या उद्‌गारासाठी व्यक्तिस्वातंत्र्याचा गळा घोटणे, एकाधिकारशाहीचा नंगा नाच, बिनचेहऱ्याची स्वाभिमान गमावलेली किंवा टाकायला लावलेली माणसांची नुसती घुंड, ही सगळ्या माणूसपणाची त्याच्या हरण्याची गोष्ट तर आहेच, त्याचबरोबर निसर्गदत्त जाणिवांच्या जिवंत संवेदनाही या व्यवस्थेने दंडित केल्या आहेत. त्यांच्या स्वातंत्र्याचे प्रदेश नष्ट करून गुलाम बनविण्याची प्रक्रिया सुरू आहे. या काळात काळ्या वांझ ढगाचे साम्राज्य, मुखवटा पांघरलेली सरंजामी झाडं आपलं अस्तित्व पृथ्वीवरचं जीवन संपविण्यासाठी ते उत्सुक असतात. शोषणासाठी शोषकाला कोणत्याही स्तरावर जाता येते. हा शोषणकर्त्याचा इतिहास आहे. त्यातून...

माणसे पांगळी झाली की
गोठत जाते लोकशाही
माणसे मुकी झाली की
सार्वभौम होते हुकूमशाही

ही या अवस्थेची परिणती आहे. हाच या व्यवस्थेचा तुरुंग आहे. माणसांना पांगळी करणारी आयुधं शोधण्याची प्रक्रिया व त्याचे शोधकार्य ही हुकूमशाहीत चालणारी एकमेव यंत्रणा कार्यरत असते.

या अंधारसूक्त पांघरलेल्या काळात हा काळोख नष्ट करण्यासाठी काही उठाव अहोरात्र झटतही असतात. त्यात जीवन वाचवणारी माणसं, थांबणं ठोकरणारी माणसं निपजतात. ते वादळ पेलताना जीवाची पर्वा करीत नाहीत. वादळाची किंमत वादळ होऊन चुकविण्याची विद्या त्यांना अवगत झालेली असते आणि ती माणसं पहाट घेऊन गावात प्रवेश करतात आणि नव्या माणसाचे घोषणापत्र जाहीर केले जाते. हा सगळा अवकाश कवितेतून उतरला आहे.

ही कविता विचार, निर्मिती व तिचे वेगवेगळे आयाम त्याच्या सकारात्मक शक्यता प्रसवणारी आत्यंतिक आवेगाची कविता आहे. या आवेगातून विचारांची अखंडित मालिका जन्माला येते. त्यातून कोणतेही भरकटलेले क्षण निपजत नाहीत; कारण या विचारांना समृद्धतेचे, तर्कशुद्धतेचे प्रायोगिकतेचे अधिष्ठान लाभलेले आहे. स्वतःतून समष्टीकडे जाणारा या विचारांचा मार्ग असल्याने अस्तित्वभान सदैव जागृत असते. खरे तर कवीच्या किंवा आमच्या, तुमच्या सभोवतालात घडणाऱ्या ह्या घटना आहेत. त्या घटनांची कुठेतरी नोंद आपण घेतच असतो. परंतु ही नोंद एका कविमनाची, विचारवंताची आणि समाजासाठी, अन्यायासाठी रस्त्यावर येणाऱ्या एका चिंतकाची आहे. म्हणून ही नोंद राहात नाही. एक सामाजिक ऐवज म्हणून त्याचे वेगळे महत्त्व असतेच ते नाकारता येत नाही. ही विचारशलाका कोणत्या तरी महत्त्वाच्या सामाजिक घटितांनी हादरे देत असते. या विचारांचा पुन्हा विचार करण्याची पाळी राजसत्तेवर येत असते. त्यानुसार ही एकमेव राजकीय विश्लेषणाची. त्याचबरोबर एका जबाबदार घटकाची भूमिका असते. चांगल्या कवितेतून आलेला इतिहास करप्ट नसतो. परंतु कवितेतून प्रसवली गेलेली घटितं परिष्कृत करण्याचा

अनुक्रमणिका

गोरखधंदा राजसत्तेला व अधिनस्थ धर्मसंस्थेला नवा नाही. अशी उदाहरणे शेकडोंनी आहेत, हे नाकारता येत नाही. म्हणून ह्या कवितेचा अग्नी सतत प्रज्वलित ठेवावा लागतो. सतत सत्याजवळ आपल्या भूमिकेचा तळ ठोकावा लागतो व ती धगही सोसावी लागते. त्यामुळे यशवंत मनोहरांची कविता या धगीतून विचार-सन्मुखतेने पुढे येते, आपले व्यक्तिस्वातंत्र्य, अभिव्यक्तिस्वातंत्र्य कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता उपभोगून लोकाभिमुख होताना दिसते. तिचे असणे सर्वदूर, सर्वहारासाठी पारदर्शकपणे मांडून ठेवलेले असते.

या संग्रहातील एकेका कवितेचा विचार जरी केला तरी त्या समस्येचा तळ शोधून वर येतो. तेथे कोणत्याही संदिग्धतेला वाव उरत नाही. ज्या तपशिलातून तिचे येणे असते, त्यात 'कवितागत' अनुभवाला आणि त्या घटितांचा सभोवताल सामाजिक जाणिवेच्या कक्षेतील विचारांना धरूनच व्यक्त होत असतो. कलावंत आपल्या सर्वग्राही बुद्धिमत्तेचे बीज त्या निर्मितिप्रक्रियेला देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत असतो.

या कवितांमधील सगळ्या सर्गांना, घटक व उपघटक त्याच्या सूत्रा-उपसूत्रांना कवितीक बाज आहे. ती एक सुसूत्र मालिका म्हणून पुढे येते. ते तिचं तिच्या विचारशील घटकाचं मूलभूतपण घेऊन येते. या कवितांची शीर्षकं जरी आपण तपासली तरी, वेगळी कलात्मक, सृजनाची जाणीव झाल्याशिवाय राहात नाही. कविता वाचताना त्या शीर्षकांना परत परत अर्थस्थानी आणण्याची प्रक्रिया घडत जाते. ती त्या कवितांच्या आशयांना उपरी ठेवत नाही. शीर्षकाच्या सूत्रातूनच कविता मार्गस्थ होत असते. तिच्या आवाजाची लय घटितांपासून वेगळी होत नाही. समस्येचे मूळ, तिच्या उद्‌गमाची दिशा आदिबंधासह आभाळाला टेकण्याचे रूप घेऊन येते. त्यातून कोणत्याही आभासाची कल्पना जन्म घेत नाही. शब्दांशब्दांतून सत्य आकार घेत ही कविता आपले अस्तित्व अबाधित ठेवत पुढे निघून जाते. तिचा एक प्रवाह आपोआप तयार होतो. विचारासाठी लोकाभिमुख होत जाते. तीची कवीची एक भूमिका घेऊन राजसत्तेच्या आसनाला डळमळीत करू शकते ही कवितेची शक्ती आहे.

या कवितांची शीर्षकं विचारवृत्त करणारी, एका नव्या माणसाच्या संस्कृतीची, तिच्या विस्ताराची भाकितं आहेत. त्याला समजून घेतल्याशिवाय कवितेच्या विचारशृंखलेत पोहचता येत नाही. त्याचा मार्मिकपणा विचारवंताच्या घडणीतील आहे आणि महत्त्वाचा असा आहे. काही शीर्षकं आपणास पाहण्यास काही हरकत नाहीत. उदा. दिवस उगवण्याच्या खात्रीची कविता, वर्तमानात पर्याय उगवण्याची वेळ, सौंदर्याच्या प्रस्थापनेची कविता, मृत्यूतून झेपावणारा रोहित नावाचा फिनिक्स, कवितेभोवती हिंस्र दिवसांचा गराडा, जगणे विसरलेल्या झाडांची कविता, माणसे पहाटेसारखी उगवण्याची कविता, वाचवून ठेवलेल्या स्वप्नांच्या बिया.

या दृष्टीने विचार केल्यास आंबेडकरी कवितेला सुंदर स्वप्नाची आसक्ती आहे. सम्यक अशा लोकांसोबत जगण्याची उमेद आहे. या संघर्षांच्या तालमीतून, खाचखळग्यांतून तिचा प्रवास सकारात्मक आहे. तिला आपला विचार प्रस्थापित करावयाचा आहे.

या दीर्घ कवितांमधून समकालातील ज्वलंत प्रश्न अग्रभागी आलेले आहेत. ह्या कविता घटनावृत्त किंवा रिपोर्ताज पद्धतीने येथे आल्या नाहीत. त्यातील विचारांचा संपूर्ण पाया सत्यदर्शनाच्या जमिनीवर उभारलेला आहे. कल्पनांच्या अवाजवी आभासाचे 'कृतीच्या प्रतिकृती'चे प्रदर्शन नाही. हा विचारांना साक्षी ठेवून केलेला संघर्ष आहे. ही विचारांची लढाई लढताना कवितांचा आधार महत्त्वाचा वाटतो. कारण चांगली कविता इतिहासाने दिलेली ग्वाही असते. या लढाईत रोहित स्मृतिशेष असला तरी त्याने प्रसवलेला विचार हा जिवंत असेलच किंवा कवितांच्या पानापानांतून पुन्हा पुन्हा वाचला जाणार आहे. शोषितांपुढे तयार करण्यात आलेले संकट हे प्रत्येक क्षणी नवीन स्वरूपाचे असते. त्याचा सामना करण्यासाठी नव्या विचारांची मांडणी करणे अपरिहार्य असते. या सततच्या मांडणीतून या संपूर्ण चळवळीभोवती विचारांचे आवरण तयार होते आणि त्याचा एक इतिहास आणि नवी संस्कृती निर्माण होते. ही नव्या माणसाची त्याच्या असतेपणाची मांडणी ही कविता करते. त्यामुळे ही कविता म्हणजे ढासळत्या बुरुजी विचारांना गाडून पुन्हा नव्याने केलेली मांडणी होय. म्हणून यातील रोहित विचारांच्या शृंखलेतील सर्ग आहे. 'मृत्यूतून पुनः पुन्हा झेपावणारा फिनिक्स' आहे. त्याने सत्याला सत्य म्हटले आहे. 'know truth as truth untruth as untruth'.

या दृष्टीने या संग्रहातील प्रत्येक कविता त्या त्या घटितांची विस्तृत मीमांसा करीत पुढे जात असते. परिस्थितीचे संगतवार दर्शन हा या कवितेचा गाभा आहे.

अनुक्रमणिका

कारण ही कविता मनोरंजनवादी नाही. या कवितेच्या पायावर सगळी जुनी जाणती शास्त्रे शरण येतात, त्याचे अवशेष कोसळतात. हा या कवितेचा इतिहास आहे. ही कविताच मुळात अभिलेख आहे. ह्या कवितेचे सौंदर्यशास्त्र समाजाच्या संरचनात्मक बांधणीसाठी आहे. त्याच्या उत्थानासाठीचे नवे स्थापत्य आहे. हा नकार जुन्या सौंदर्यवादी जाणिवेसाठी आहे. म्हणून आंबेडकरी कविता पारदर्शकपणे समष्टीसाठी एका सम्यक विचारसूत्रातून प्रकट होत असते. संपूर्ण नकाराबरोबर ह्या कवितेने जुनी विचारसरणी नाकारली, सगळे संदर्भ नाकारले. सगळ्या संकल्पना मोडीत काढल्या, केवळ माणूस म्हणून उभे करणारे विचार स्वीकारणे आणि हे विचार माणूस केंद्रस्थानी असलेल्या बुद्धाच्या समतेच्या विचारशैलीतून आणि बाबासाहेबांच्या प्रेरणेतून प्राप्त झाले आहेत. म्हणून ह्या कवितेतून आलेले संदर्भ 'माणूसपणाच्या' जीवन जाणिवेचे प्रत्यंतर आहे. यात माणूस आणि उपकारक सर्व जीवसृष्टीचा विचार आणि अन्यायाविरुद्ध संघर्षाचा विचार अंतर्भूत असतो. म्हणून या कवितेची सामाजिक बांधिलकी आणि कवी 'मरणाने जन्माला घातलेला निर्णायक संग्राम असतो.' हे विसरता येत नाही कवितेला आणि कवीलाही हे सगळं वाचविण्यासाठी आपण काय करू शकतो ? माणूस म्हणून चांगला दिवस उगवण्याची खात्री नक्कीच देऊ शकतो. ही आशावादी भूमिका घेऊन ह्या वादळांतून, धुक्याच्या प्रदेशातून ही कविता प्रवासत असते.

माणसाच्या चेहऱ्याच्या अंधारात
विजा चमकाव्या.
प्रकाशाची इच्छा घेऊन
सूर्य उतरावा.
त्याच्या काळजाला
पहाट बांधावी पाखरांनी
आणि म्हणावे,
शस्त्र होऊ नको रे माणसा
शस्त्राने स्वप्ने कापता येत नाहीत
जिद्दींना जीवनातून
हद्दपार करता येत नाही.
शस्त्राने रस्ता नष्ट करता येईल
प्रवास नष्ट करता येत नाही.

या सगळ्या सकारात्मक जीवन-जाणिवेतून प्रसवत असताना माणसाने संबोधलेल्या सृष्टीच्या सर्जनशील शक्ती आणि प्रबोधन करणाऱ्या व्यक्ती अत्यंत महत्त्वाच्या आहेत. हा सर्जनशील उजेडाचा देश असून, लोकायत बुद्ध आणि आंबेडकर यांच्या विचारांना पुढे घेऊन जाणारी ही कविता आहे. 'अज्ञानाची निर्मिती म्हणजे ज्ञानद्रोह' हा सरळ आणि पारदर्शक विचार म्हणजे आंबेडकरी कविता असे म्हणता येईल. या अज्ञानाच्या अंधारातून, त्याच्याशी झुंजण्यातून कवितेचा जन्म झाला आहे आणि प्राप्त केलेल्या प्रकाशाचा विस्तार या कवितेला करावयाचा आहे. संघर्षाच्या बीजांना रुजण्यासाठी आपली जमीन हस्तगत करावी लागते. ती वारंवार नष्ट केली जाते हा इतिहास आहे. म्हणून हे कवितेचे बीज व त्याचे रक्षण करण्याची जबाबदारी 'माणूस' म्हणून आपली आहे. कविता तिचे काम करीतच असते. तिचे असणे आपल्यासाठी जिवंतपणाचे लक्षण आहे. कविता आपला स्वतंत्र अवकाश व्यापत असते. तिला उगवणे, जागे असणे, भरती येणे, ह्या सर्जनाच्या गोष्टी आणि माणसाचे सुखदुःख फक्त माहीत आहे. हा एकंदर नवनिर्मितिक्षम माणसासाठीचा सकारात्मक विचार ही कविता देत आहे.

ह्या संपूर्ण कवितेला जित्याजागत्या अवतीभोवती पसरलेल्या माणसाने प्रेम केलेल्या प्रतिमांचा सोस आहे. सूर्य, झाड, बोधिवृक्ष, पक्षी इत्यादी ह्या सृष्टीच्या निर्माणानंतर संरक्षण देणारा त्यांचा सुखाचा शोध लावणारा माणूसच आहे. ह्या सगळ्या गर्तीचे सौंदर्य शोधणाराही तोच आहे. कोणतीही अदृश्य शक्ती या पर्यावरणात जिवंत राहू शकत नाही. पर्यावरणाला पोषक असणारी तत्त्वे फक्त नांदतात. या नियमांना ओलांडून कुणीही पलीकडे जाऊ शकत नाही. परंतु तरीही दिवस उगवू न देणारी अराजक व्यवस्था येथे कार्यरत आहे. त्यांनी माणसामाणसांमधील भेदाभेदाचे पर्यावरण निर्माण केले आहे. सूर्यापुढे अंधार म्हणून ठाकण्याचे तंत्र त्यांनी रचले आहे. काळोखाचा मुजोर सूर्य येथे व्यवस्थेच्या रूपाने जिवंत आहे. आम्ही तर ह्या सूर्याला, सृष्टीला काळवेळाचे सुंदर भान आणि सुनियोजित स्थापत्यही प्रदान केले आहे. आमच्या श्रमावर पोसलेली भूमी आहे. सृष्टीच्या सौंदर्य भावनांचे प्रदेश आम्ही जपलेले आहेत. त्यामुळे सूर्य तेजाच्या सर्व संकल्पना आम्ही तनातनात मुखल्या आहेत. त्याची गरज नसण्याइतपतही सक्षम आहोत. व्यवस्थेने बंदी केलेला सूर्य निर्माण करणार नाही; कारण आमच्या प्रज्ञेच्या विद्रोही कळा स्वतःच सूर्यासारखे तेज घेऊन

येणार आहेत. एवढा माणसाला मोठा सन्मान फक्त आंबेडकरी कविता देऊ शकते. कोणत्याही साहित्याची कारण-मीमांसा माणसांजवळ जात नाही. त्यांना अद्‌भुत सृष्टी व माणसाचे नगण्य असणे, हात टेकणे, दैवच आड आले आहे, माणसाची शक्ती कोणत्याही आयामांतून फळाला आली नाही. ते एक नियतीच्या हातचे बाहुले म्हणून गणल्या गेल्याचे वर्तमान आजही ताजे आहे. फक्त आंबेडकरी जाणिवेची कविताच माणसाच्या सर्व क्रियाकलापांना, समोर असलेल्या व्यवस्थेला प्रश्न विचारून निरुत्तर करीत असते आणि उत्तरांतून दुःखाची सम्यक नस शोधून काढते. ती सगळ्यांसाठी सार्वभौम असते. समांतर असते. स्वाभिमानाची असते आणि व्यवस्थेला ही गोष्ट मान्य होण्यासारखी नसते म्हणून हा सततचा संघर्ष म्हणजे ही कविता आहे. तिला स्वतःच एक पर्याय म्हणून व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारावे लागते. ही समज उमेदीतून जन्म घेते.

'माणूस उगवणे दिवसाबदली
दिवस उगवले नाही तर
त्यांच्या बदली
माणसांनीच उगवण्याची तयारी करायला हवी.
नाही तर पुढल्या पिढ्यांना
दिवस म्हणजे काय
तेही कळणार नाही
आणि दिवसाचे झाडही
कळणार नाही.'

'निसर्गतः मानव स्वतंत्र आहे. म्हणून मी तुम्हाला सांगेन स्वतंत्र विचारसरणीचे, स्वतंत्र वृत्तीचे, निर्भय नागरिक व्हा' (प्रबुद्ध भारत, २१ जुलै १९५६) अशी स्वातंत्र्याची महती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितली आहे. हे संपूर्ण आंबेडकरी कवितेचे प्रमाणसूत्र आहे. या विचारांना ग्राह्य धरून आपली स्वतंत्र अशी मांडणी कवितेतून केली आहे. आजचे समकालीन प्रश्न त्यांच्या कवितेचे विषय झाले आहेत. या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी जुन्या विचारांचा स्पर्शही होत नाही. नव्या जाणिवेच्या शोधासाठी त्यांच्या प्रतिभेचा दृष्टीकोन कार्यरत असतो. त्यादृष्टिने त्यांनी नव्याने मांडलेला ''प्रतिभा स्वातंत्र्याचा सिद्धांत'' विचारप्रवृत्त करते. आजच्या परिस्थितीचे खरे मारेकरी कोण आहेत; कोणत्या, कोणाच्या अधिपत्याखाली आपण नांदत आहोत, हे त्यांनी या सिद्धांतातून दाखवून दिले आहे. ''प्रतिभा धर्मसत्तेच्या चालीने चालतात.'' प्रतिभा राजसत्तेच्या चालीने चालतात. प्रतिभांना आपल्या नैसर्गिक स्वातंत्र्याचा विसर पडतो. प्रतिभा आपापल्या विहिरीतच भजनाचा कार्यक्रम रंगवतात. आपापल्या डबक्यातच उड्या मारण्यात (ॲथलेटिक्स) रंगून जाण्यात आनंद मानतात. या विहिरीमधील वा डबक्यांमधील आनंदाची सौंदर्यशास्त्रेही ते मांडत असतात.'' हा सबंध सिद्धांत त्यांच्या कवितेची प्रचिती देतात. नवे सौंदर्यशास्त्र मांडण्यासाठी, नव्या संकल्पना मांडण्यासाठी ही कविता धडपडताना दिसते. नवे शब्द नव्या प्रतिमांच्या शोधात ती असते. एकंदर सनातन विचार प्रतिगामी वृत्तीला सदैव शह देण्यास ती अग्रस्थानी असते. एका स्वप्नासाठी तिचा लढा सुरूच असतो. अस्वस्थता हा तिचा कणा आहे. जगातील कोणत्याही व्यवस्थेसाठीचे समाधान कवितेजवळ नाही. कारण कोणत्याही सत्तेच्या प्रवृत्तीजवळ भ्रष्टतेची एक खिडकी सदोदित उघडी असते. त्यावर पहारा करणे आणि मानवी हक्काचे, त्याच्या सकारात्मक विचारसरणीचे संवर्धन ती करत असते. कोणत्याही नव्या निर्मितीजवळ कवितेच्या संदर्भाचा एक अंश सांडलेला असतो. ती व्यवस्थेसाठी नवा पर्याय म्हणून माणसातून सशरीर होऊन पुढे येते. एक स्वातंत्र्य ती घेत असते.

''कविता रचणे म्हणजे
रचणे स्वप्न.
स्वप्न रचणे म्हणजे
रचणे पर्याय.
पर्याय रचणे म्हणजे
रचणे नवी व्यवस्था
आणि नवी व्यवस्था
रचणे म्हणजे
सुरुंग लावणे पायात अव्यवस्थेच्या.''

डॉ. यशवंत मनोहर सर्वसामान्यांना परिचित अशा प्रतिमा आपल्या कवितेतून मांडतात. त्या प्रतिमांची स्पष्टता कोणत्याही काळात आपले अस्तित्व विसरत नाहीत. त्या वैश्विक जाणिवेच्या सर्व घटकांना स्पर्श करीत समानतेचा संदेश अहोरात्र प्रसवत असतात. त्या सदैव समाजवादी असतात. ह्या निसर्गातील लौकिक प्रतिमांचा त्यांना सोस आहे. कारण ही कविता सर्वसामान्याच्या हिताकरिता आहे. जो विचार त्यांना या

कवितेमधून रुजवायचा आहे, त्या विचारांच्या स्पष्टतेसाठी, सत्यासाठी सूर्य, चंद्र यांच्यासह कवेत घेणारे अंतरिक्ष या विचारांच्या विस्तारासाठी कवितेतून सहजपणे येतात. कारण ज्या माणसासाठी हे विचारविश्व खुले करायचे आहे. त्यात कोणत्याही संभ्रमाची अवस्था त्यांना नको आहे. कवितेचे असणे अर्थाच्या शक्यता शोधण्यासाठी नाही. विचारांची संदिग्ध वाट, संभ्रमाची वाट त्यांना सुलभ आणि सोपी करायची आहे. राजसत्तेचा हेतू सामान्य लोकांसमोर मांडायचा असतो. त्यातून एक प्रेरणा समाजापर्यंत पोहचविणे गरजेचे असते. सामान्य माणसाच्या विचाराच्या कक्षा रुंदावल्या तरच संघर्षासाठी अवकाश, एक स्पेस निर्माण होत असते. ती जागा ह्या कवितेला निर्माण करावयाची आहे. त्यातून कळणारा स्वातंत्र्याचा अर्थ चंद्र, सूर्यासारखा स्पष्ट आणि प्रकाशमान झाला पाहिजे हा उद्देश अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यासाठी या कवितेचे प्रयोजन आहे. त्या दृष्टीने या संग्रहात आलेल्या दीर्घ कविता म्हणजे समकालीन वास्तवाचा घेतलेला समग्र असा आढावा आहे आणि या विचारव्यूहातून प्राप्त परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठीचा अजेंडा हा चळवळीचा महत्त्वाचा ऐवज त्यातून पुढे आलेला आहे. हेच आंबेडकरी कवितेचे खरे सौंदर्यशास्त्र आहे. आंबेडकरी विचारांचे स्वप्न ह्या कवितेचे अंतिम ध्येय आहे. ह्या प्रतिमा नुसत्या राहणार नाहीत तर माणसांचा हेवा त्यांनी करावा आणि वैश्विक सौंदर्याने भारावून जावे ही स्थिती या कवितेने अपेक्षलेली आहे. त्यासाठी सतत स्वतःमध्ये माणसाचे स्वप्न बाळगले पाहिजे. संघर्षातून ही गोष्ट कठीण नाही.

''सूर्याने, चंद्राने
आणि अंतरिक्षानेही म्हणावे
आपल्याला पाहून
ती बघा वैश्विक माणसे
वैश्विक मनाचे सौंदर्य
जीवनाला देणारी!''

स्वातंत्र्याचे दोन अर्थ कोणत्याही सत्ताकारणाला अभिप्रेत असतात. 'गुलाम घडविणारे पद्धतिशास्त्र' हा त्यांचा स्वातंत्र्य अर्थ असतो. तुमच्या मौनाची भाषा त्यांना अभिप्रेत असते. त्यात सत्तेचे स्वातंत्र्य समाविष्ट असते. आपले अर्थ आपल्या जिवंतपणात असतात. नेमके जिवंतपण विसरण्यासाठी आपल्या मौनाचा कट शिजवण्यात येत असतो. हे स्वातंत्र्य हस्तगत करावयाचे असते. एकमूठ आणि एकजुटीतूनच या दुनियेची दिशा आपण बदलू शकतो. हा आशावाद ही कविता जगण्यासाठी सतत देत राहते. स्वातंत्र्याचा विचारही पेरत जाते. कारण या विचार-प्रेरणेतून चाकाचे आस फिरल्याचे आपण पाहिले आहे. ते पूर्णपणे फिरणे अशक्य नाही. कारण ही क्रांती विचारांची आहे. हिंसेतून येणारी नाही. हिला सूर्यसाक्षी संविधानाची ओढ आहे. तेथे सगळी महाकाव्ये गळून पडतात: कारण माणसासाठी, त्याच्या सार्वभौम उत्थानासाठी झालेलं दुसरं महाकाव्य कोणतेही नाही. कारण माणसाच्या गुलामीला, त्याच्या सर्वस्व घुसमटीला दिलेला हा शब्द आहे. त्या दृष्टीने आंबेडकरी कविता म्हणजे संविधानसन्मुख कृतिशीलतेची नांदी आहे. तिचे संरक्षण करण्याचे ब्रीदही ही कविता सामान्य लोकांमध्ये निर्माण करत जाते आणि एक मोठा परीघ कवेत घेण्याचा प्रयत्न करीत असते आणि यशवंत मनोहरांची कविता ह्या सबंध आजच्या मराठी कवितेला रसद पुरविणारी भूमिका ठरते. या पिढीवर त्यांचा मौलिक असा हस्तक्षेप नाकारता येत नाही. त्यांनी या कवितेसाठी केलेले काम मोठे आहे. त्यात 'समीक्षा' लेखनाची मोठी जबाबदारी त्यांनी पेलली आहे. या साहित्याचे महत्त्वपूर्ण सिद्धान्त त्यांनी केले आहे. साक्षेपी संपादन, प्रत्यक्षातील चळवळीसाठी एक विचारवंत म्हणून ते सदैव अग्रेसर राहिलेले आहेत. त्या दृष्टीने 'तुरुंग तोडणाऱ्या विचाराची कविता' या कवितांना खूप महत्त्व प्राप्त होते. त्यांच्या विचारस्वातंत्र्याची, निर्भीडपणाची विचारवंती अक्षयमुद्रा आहे. त्यातील मूलभूत जाणीव संपणारी नाही.

यशवंत मनोहर यांनी कवितेसंबंधी लिहिलेले चिंतन एकूणच मराठी कवितेसाठी, तिच्या भूमिकेसाठी, अस्तित्वासाठीची करुणा आहे. ''आपण कविता लिहितो म्हणजे हस्तक्षेप लिहितो. पर्याय लिहितो. नवनव्याने उगवण्याची प्रक्रिया लिहितो. माणूस म्हणून स्वतःचे निर्माण करण्याची प्रक्रिया लिहितो. सम्यक होण्याच्या मार्गातील अडथळे दूर करण्याचा निर्धार लिहितो. संभाव्य अस्तांच्या नोंदी लिहितो. अश्रू लिहितो. माणूस हरतो तेव्हा आणि जीवनाच्या पराभूत वळणावर माणसाला महान ठरवणारा शब्द लिहितो. आपण कविता लिहितो म्हणजे माणूस अजिंक्य आहे. हा निरोप जगासाठी लिहितो.'' (भाषणातील अंश)

• • •

(अल्पपरिचय)

नाव — **यशवंत राजाराम मनोहर**
जन्म — २६ मार्च १९४३
जन्मस्थळ — येरला, तह. काटोल, जि. नागपूर (महाराष्ट्र)

शैक्षणिक गुणवत्ता :

१. बी. ए. ऑनर्स (मराठी साहित्य), प्रथम श्रेणीत
२. एम. ए. (मराठी), प्रथम श्रेणीत, तृतीय, मराठवाडा विद्यापीठ, १९६७
३. पीएच.डी.ः नागपूर विद्यापीठ, १९८४

अध्यापन :

१. १-७-१९६७ ते १९६९ पर्यंत प्रतिष्ठान कॉलेज पैठण.
२. जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९६९ नूतन आदर्श महाविद्यालय, हिंगोली.
३. १९६९ पासून १९७९ पर्यंत नागपूर महाविद्यालय नागपूर आणि
४. १९७९ ते २००३ पर्यंत नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर मराठी विभागात अध्यापन.

साहित्यनिर्मिती :

कवितासंग्रह :

१. उत्थानगुंफा : कॉन्टिनेंटल, पुणे, तिसरी आवृत्ती २००१. पृ. ११०
२. काव्यभीमायन, दुसरी आवृत्ती, युगसाक्षी प्रकाशन, २००७. पृ. ११२
३. मूर्तिभंजन : श्रीविद्या, पुणे १९८५ पृ. ११४, दु.आ.युगसाक्षी, नागपूर, २००७
४. जीवनायन : मौज प्रकाशन गृह, मुंबई, २००१ पृ. ११४
५. प्रतीक्षायन, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर २००७ . पृ. ८०
६. अग्नीचा आदिबंध, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २००८. पृ. १०४
७. स्वप्नसंहिता, मौज प्रकाशन, मुंबई, २००८, दु.आ.२००९ पृ. १८८
८. युगांतर, मौज प्रकाशन, मुंबई, २०१५, पृ. ११९
९. युगमुद्रा, सायन पब्लिकेशन, पुणे, २०१६, पृ. १५२
१०. बाबासाहेब, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २०१६, पृ. १२०
११. तुरुंग तोडणाऱ्या उठावाची कविता : मौज, मुंबई, २०१८

वैचारिक साहित्य :

१. डॉ. आंबेडकरांचा बुद्धधम्म : डॉ. आंबेडकर प्रकाशन, यवतमाळ, १९८७ पृ. ७२
२. प्रबोधनविचार : महाबोधी, नागपूर १९८९ पृ. १७६
३. डॉ. आंबेडकर एक शक्तिवेध : संघमित्रा, नागपूर, १९९१ पृ. १२०
४. बुद्ध आणि त्याचा धम्म : सारतत्त्व : प्रियदर्शी, कोल्हापूर, दु.आ. २००४ पृ. ११९
५. आंबेडकरवादी विद्रोही निबंध : ऋचा, नागपूर, १९९२ पृ. १६८
६. आंबेडकरी चळवळीतील अंतर्विरोध : क्रांतीपर्व प्रकाशन, पुणे, १९९८ पृ. ७२
७. मूल्यमंथन, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, एप्रिल २००४, पृ. ११२
८. रिपब्लिकन पक्ष : बांधणीची एक दिशा, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर २००४, पृ. ६४

अनुक्रमणिका

९. समाजपरिवर्तनाची दिशा, धम्मभूमी प्रकाशन, २००५ पृ. १५०
१०. धम्मक्रांतीची पन्नास वर्षे, युगसाक्षी, २००६. पृ. ५६
११. प्रज्ञाविहार, युगसाक्षी, नागपूर, २००९, पृ. १२८
१२. विचारमुद्रा : युगसाक्षी, नागपूर,२०११, पृ.१३६
१३. बत्तीस भाषणे : युगसाक्षी, नागपूर, २०१२, पृ.३३२
१४. विचारसत्ता : युगसाक्षी, नागपूर, २०१२, पृ.१०८
१५. विचाराची पुनःस्थापना, कॉन्टिनेंटल प्रकाशन, औरंगाबाद, २०१६, पृ. १७१
१६. परिवर्तनाचे पडघम, भाषणे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २०१५, पृ. २६३
१७. क्रांतिकारी पुनर्रचना, डिंपल प्रकाशन, मुंबई, २०१८
१८. पुनर्रचनेचे पडघम, अथर्व, जळगाव, २०१७, पृ. २५०.
१९. भारताचे क्रांतिसंविधान : हर्मिस प्रकाशन, पुणे, २०१८
२०. संग्रामनायक जोतीराव फुले : हर्मिस प्रकाशन, पुणे, २०१८
२१. उजेडाची अकरा भाषणे : मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे, २०१८

पुस्तिका :

१. आपले महाकाव्यातील नायक : शंबूक - कर्ण - एकलव्य : संघमित्रा, नागपूर, १९९१ पृ. ४०
२. आपल्या क्रांतीचे शिल्पकार : आंबेडकर - फुले - बुद्ध : महाबोधी, नागपूर, १९९१ पृ. ४८
३. मंडल आयोग : भ्रम आणि सत्य : अशोक खंडाळे, चंद्रपूर, दु.आ. १९९१ पृ. ३२
४. आंबेडकर संस्कृती : कल्पना, नागपूर, १९९१ पृ. ४८
५. डॉ. आंबेडकरांचा बुद्ध कोणता? : युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, दु.आ. २००५, पृ. ४०
६. बहुजनक्रांतीचे महानायक जोतीबा फुले : क्रांतीपर्व प्रकाशन, पुणे, १९९८ पृ. ३९
७. डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती का जाळली?, युगसाक्षी, २००५, पृ. ३२
८. डॉ. आंबेडकरांनी विपश्यना का नाकारली? युगसाक्षी, २००५, दुसरी आवृत्ती, पृ. ३२
९. महाबुद्ध डॉ. आंबेडकर, युगसाक्षी, २००५, पृ. ४०
१०. आंबेडकरी क्रांतीचा जाहीरनामा, समता सैनिक दल, युगसाक्षी, २००५, पृ.२०
११. धम्मदीक्षा सुवर्णमहोत्सव तुम्हाला काय मागतो?, युगसाक्षी, २००५, पृ. २४
१२. आंबेडकरवादी बौद्धभिक्खू कसा असावा?, युगसाक्षी, २००५, पृ.१६
१३. डॉ. आंबेडकरांची धम्मसंकल्पना, युगसाक्षी २००७. पृ. ३२
१४. डॉ. आंबेडकर आणि स्त्रीमुक्तीचे युद्ध, युगसाक्षी २००६. पृ. २४
१५. बुद्धाचा आचारधम्म, युगसाक्षी, २००७. पृ. ३२
१६. अभिनव बौद्ध आचारप्रणाली, युगसाक्षी, २००७. पृ. ४४
१७. बौद्धांची राजकीय संस्कृती, युगसाक्षी २००७. पृ. ३२
१८. बुद्धाचे तत्त्वज्ञान आणि बौद्धांची भाषा, युगसाक्षी, २००७. पृ. ४४
१९. महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण : एक दृष्टिकोन, युगसाक्षी, नागपूर, २०१०, पृ.४०

समीक्षाग्रंथ :

१. दलित साहित्य : सिद्धांत आणि स्वरूप : नागपूर १९७८ पृ. १३४
२. स्वाद आणि चिकित्सा : धनंजय, नागपूर, १९७८ पृ. ११०
३. बाळ सीताराम मर्ढेकर : साहित्य अकादमी, दिल्ली, १९८७, १९९३ ति. आ. १९९७ पृ. ११९
४. निबंधकार डॉ. आंबेडकर : संघमित्रा, नागपूर, १९८८ पृ. १२०

५. दलित साहित्य चिंतन : संघमित्रा, नागपूर, १९८८ पृ. ११२
६. आंबेडकरवादी आस्वादक समीक्षा : (प्रस्तावना), प्रियदर्शी, कोल्हापूर, १९९१ पृ. १२२
७. समाज आणि साहित्यसमीक्षा : सुगावा, पुणे, १९९२ पृ. २६८
८. शरच्चंद्र मुक्तिबोधांची कविता : संपादन, साहित्य अकादमी, दिल्ली, १९९२ पृ. २३७
९. मराठी कविता आणि आधुनिकता : आंबेडकर धम्म, नागपूर दु.आ. १९९८ पृ. २७२
१०. आंबेडकरी चळवळ आणि साहित्य : अभय प्रकाशन, नागपूर, १९९३ पृ. १४४
११. परिवर्तनवादी जीवनमूल्ये आणि वाङ्मयीन मूल्येः ठिय्या प्रकाशन, नागपूर, १९९८ पृ. ४०
१२. आंबेडकरवादी मराठी साहित्य : भीमरत्न प्रकाशन, १९९९ पृ. ३२०
१३. युगसाक्षी साहित्य : श्रेयस प्रकाशन, हिंगणघाट, २००१ पृ. ४९६
१४. नवे साहित्यशास्त्र : युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २००९ पृ. ४१६
१५. आंबेडकरवादी महागीतकार : वामनदादा कर्डक, युगसाक्षी, २००५, पृ. १०८
१६. प्रतिभावंत साहित्यिक : आत्माराम कनीराम राठोड, युगसाक्षी, २००५, पृ. ४०
१७. साहित्य संस्कृतीच्या प्रकाशवाटा, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, २००५, पृ. १५०
१८. बुद्धिवादी सौंदर्यशास्त्र, युगसाक्षी, नागपूर २००७ पृ.१२०. दु.आ. २००८
१९. बौद्ध संस्कृती आणि साहित्य, युगसाक्षी, नागपूर, २००९, पृ.१२०
२०. साहित्य आणि समाजक्रांती, (भाषणे आणि मुलाखती), सुविद्या, पुणे, २००९, पृ.२०७
२१. काही कवितासंग्रहांच्या निमित्ताने, (प्रस्तावना), पद्मगंधा, पुणे, मार्च २०१०, पृ.२००
२२. इहवादी साहित्याची पूर्वदिशा, (प्रस्तावना), युगसाक्षी, नागपूर, २०१०, पृ.३२८
२३. आंबेडकरवादी साहित्य (संपा.दीपककुमार खोब्रागडे), युगसाक्षी, नागपूर,२०१०, पृ.१३६
२४. प्रतिसादबंध, (प्रस्तावना) मुक्ताक्षर प्रकाशन, वाशीम, २०१५. पृ. १५२
२५. हस्तक्षेपाचे स्वातंत्र्य आणि सौंदर्य, युरो वर्ल्ड पब्लिकेशन, मुंबई, २०१८, पृ. २५०

संकीर्ण :

१. संवादाचा आदिबंध : मुलाखती, संपादक : प्रा.प्रकाश राठोड, युगसाक्षी, नागपूर, २०१२, पृ.१६०

प्रवास वर्णन :

१. स्मरणांची कारंजी : समुचित, नागपूर, १९८७ पृ. ६८ दु.आ. युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २००५, पृ. ८८

कादंबरीलेखन :

१. रमाई, युगसाक्षी प्रकाशन, आवृत्ती १६ वी २००७. पृ. ९२, प्रतिमा पब्लिकेशन्स, पुणे, २०१६
२. मी सावित्री, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २००६. पृ. ४८
३. मी यशोधरा, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर. पृ. ४०
४. रमाई, मी सावित्री, मी यशोधरा (एकत्रित तिन्ही कादंबऱ्या) युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २००४, दु.आ.२०१२, पृ. १५२

ललित लेखन :

अ) पत्रसंग्रह :

१. पत्रप्राजक्त, अभिनव पब्लिकेशन, गडचिरोली, २००३ पृ. १५०
२. लक्ष्मण माने यांना धम्मपत्रे, युगसाक्षी, नागपूर २००६. पृ. १०४
३. निळूभाऊ फुले यांना दोन पत्रे : युगसाक्षी, नागपूर, २००६. पृ. १६

४. पत्रपौर्णिमा, युगसाक्षी, नागपूर, २००७. पृ. ९६

महाराष्ट्र राज्य पुरस्कार आणि इतर पुरस्कार :

१. उत्थानगुंफा : काव्य : महाराष्ट्र राज्य पुरस्कार १९८०
२. स्मरणांची कारंजी : प्रवासवर्णन : महाराष्ट्र राज्य पुरस्कार १९८९
३. निबंधकार डॉ. आंबेडकर : समीक्षा : महाराष्ट्र राज्य पुरस्कार १९८९
४. रमाई : कादंबरी : वासाडे पुरस्कार, वरोरा, १९९२
५. समाज आणि साहित्यसमीक्षा : महाराष्ट्र राज्य पुरस्कार १९९५
६. आंबेडकरी चळवळीतील अंतर्विरोध : म. फुले आणि डॉ. आंबेडकर पुरस्कार, पुणे ८-८-९९
७. आंबेडकरवादी मराठी साहित्य : आंबेडकर गौरव पुरस्कार, हिंगणघाट, २०००
८. फुले-आंबेडकर साहित्य पंचायत, सातारा पुरस्कार, ९ मे २०००
९. आंबेडकरवादी मराठी साहित्य, म.सा.प. डॉ. भालचंद्र फडके पुरस्कार, २००१
१०. जीवनायन : इचलकरंजीच्या आपटे वाचन मंदिरचा इंदिरा संत उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार १३-७-२००२
११. जीवनायन : पद्मश्री विखे पाटील साहित्य पुरस्कार, २२ ऑगस्ट २००२
१२. महाराष्ट्र शासनाचा, विद्यापीठ स्तरावरील बेस्ट टिचर अवॉर्ड २००२-२००३
१३. जीवनायन काव्यसंग्रहाला महाराष्ट्र फाऊंडेशनचा पुरस्कार, १७-१२-२००३
१४. परिवर्तनवादी साहित्यिक पुरस्कार, कुरुंदवाड, जि. कोल्हापूर, १५ फेब्रु. २००४
१५. आर. के. त्रिभुवन स्मृती गौरव पुरस्कार २००५, बहुजन प्रबोधन मंच, नांदेड
१६. सामाजिक जाणीव पुरस्कार, गडचिरोली, २००८
१७. स्वप्नसंहिता (कवितासंग्रह) अ) इंदिरा संत उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार, आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी २००९ आ) सहकार महर्षी क ाव्यपुरस्कार २००९, इ) महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट साहित्य निर्मितीचा केशवसुत पुरस्कार, २००९
१८. सुशील सोशल फोरम, सोलापूरचा वाङ्मयीन कार्यासाठी सुशीलकुमार शिंदे पुरस्कार, ४--९-२०१०
१९. 'सम्यक जीवन' पुरस्कार, परभणी २७-४-२०११
२०. साहित्य वैभव पुरस्कार, स.त्र्यं.कुल्ली, बुलडाणा, २३-११-२०१२
२१. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार, मारवाडी फाउंडेशन, १७ सप्टेंबर २०१२
२२. वसंत मून स्मृती पुरस्कार, उल्हासनगर, २०१४
२३. दिनकरराव जवळकर पुरस्कार, समता प्रतिष्ठान, पुणे, १-२-२०१५
२४. सुगावा पुरस्कार, सुगावा पुरस्कार, पुणे, ऑगस्ट, २०१५
२५. आबाजी सुबाराव आणि आकुबाई गवळी प्रतिष्ठान कोल्हापूर, ३ जानेवारी २०१७
२६. कवी कुसुमाग्रज पुरस्कार, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, २७ फेब्रुवारी २०१८, मराठी भाषा दिवस.

• • •



प्रिय अनिल...

प्रा. हेमंत खडके

प्रिय अनिल,

कधीही न पोचणारं पत्र तुला लिहितो आहे... हे खूप दुःखाचं आहे; पण इलाज नाही!

मित्रा, आपली पहिली भेट झाली ती दै. नागपूर पत्रिकेच्या संपादकीय विभागात. श्री. शरदभाऊ देशमुख यांच्या केबिनमध्ये. आम्ही दोघं काही चर्चा करीत होतो आणि गळ्यात शबनम लटकवून तू आलास. शरदभाऊंनी आपला परिचय करून दिला. ''हे अनिल नितनवरे...'' हे नाव कानावर पडलं आणि मनात, क्षणात तुझी कविता चमकून गेली. मी माझं नाव न सांगता तुझी 'मेंदी' कविता धडाधडा म्हणून दाखवली. तू प्रसन्न कौतुकानं हसत होतास. 'क्या बाSSSत है' म्हणून तू प्रेमानं माझे हात हातात घेतले... नि आपण खूप जुने मित्र असल्यासारखे कितीतरी वेळ बोलत बसलो. आपण दोघेही पहिल्याच भेटीत असे जवळ आलो. हे वर्ष होते १९८९ आणि आपली मैत्री शेवटपर्यंत म्हणजे तू या जगाचा निरोप घेईपर्यंत, कायम राहिली. अजूनही तू मनात, विचारात, भावविश्वात पक्का रुजलेला आहेस. अनिल, तुझ्या त्या मेंदी कवितेत एक कडवे तू असे लिहिले होते :

तुझ्या मेंदीची गं सय
येते फिरून फिरून
का गं रंगण्याआधीच
वेडे घेतली पुसून?

रंगण्याआधीच प्रेयसीनं मेंदी पुसून घेतली म्हणून आर्त भावानं तू तिला हा प्रश्न विचारतो आहेस... पण अनिल! तू तरी तिच्यापेक्षा काय वेगळं वागलास? तुझ्यावर प्रेम करणाऱ्या अनेकांच्यावतीनं मी तुला हाच प्रश्न विचारतो आहे :

अनुक्रमणिका

आयुष्याचा डाव अनेक अंगांनी रंगात आला असतानाच तू असा तातडीनं, अचानक का निघून गेलास?

नंतर मग आपली नागपूर विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये भेट झाली. योगायोग असा की मी एम.ए.(मराठी)च्या प्रथम वर्षाला तिथं प्रवेश घेतला तेव्हा तू तिथं अंतिम वर्षाला होतास. वर्गात आणि विभागातही तुझी एक हुशार अभ्यासू आणि मेरिटचा विद्यार्थी अशी प्रतिमा होती आणि ती तू पुढे शब्दशः खरी ठरवलीस. मग तर आपल्याला रोजच्या भेटीचंच निमित्त मिळालं. तुझं माझ्या खोलीवर येणं वाढलं. माझं तुझ्या जयताळाच्या घरी जाणं सुरू झालं. तुझ्या त्या छोट्याशा घरात तेव्हाही तुझी स्वतंत्र लायब्ररी होती आणि तिच्यात बरीच पुस्तकं होती. मग आपली पुस्तकांची-विचारांची-मतांची-भावनांची देवाण-घेवाण सुरू झाली. कधी धमासान चर्चा घडत. कधी एखाद्या मुद्यावर एकमत होई. कधी एखाद्या मुद्यावर मतभेदही होत. मात्र एकमेकांच्या भेटीची ओढ कायमच असे आणि भेटल्यावर घड्याळं केव्हा मरतं हे दोघांनाही कळत नसे.

आपण दोघेही तसे वेगवेगळ्या सामाजिक पर्यावरणांतून आलो होतो. मी खेड्यातील बहुजन समाजातल्या वारकरी शेतकरी कुटुंबातले संस्कार घेऊन... तर तू बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रखर विद्रोही विचारांनी झपाटलेला. मात्र ईश्वर, धर्म, श्रद्धा, रूढी, परंपरा याकडे आपण दोघेही बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टीतून पाहात असल्याने आपल्यात मतभेदांपेक्षा वैचारिक जवळीकताच अधिक होती. साहित्यप्रेम हा तर तुझ्या व्यक्तिमत्त्वाचा गाभाच. भेटल्यानंतर चर्चा होत त्या मुख्यतः वाङ्मयीन असत. या बाबतीत, मी सुरुवातीला बहुधा श्रोत्याचे काम करीत असे. कारण तुझं वाचन त्या विद्यार्थिदशेतही खूप होतं. त्यात एक सर्वसमावेशकता होती. केवळ दलित साहित्यापुरतं किंवा समीक्षेपुरतं तू स्वतःला कधीच मर्यादित करून घेतलं नव्हतं. मराठीतील सर्वच गाजलेले लेखक तू वाचायचयास. त्यांच्या गुणदोषांवर व्यापक दृष्टीने चर्चा करायचास. त्यांची पुस्तकं तुझ्या संग्रही असायची. संपूर्ण गडकरी, मुक्तिबोधांच्या कादंबऱ्या तूच मला पहिल्यांदा वाचायला दिल्या. तुझा संपूर्ण गडकऱ्यांचा एक खंड, मुक्तिबोधांची एक कादंबरी आणि टॉलस्टॉयची 'युद्ध आणि शांती' ही पुस्तकं अजूनही माझ्याजवळ आहेत. (मुक्तिबोधांच्या कादंबरीवर तर चक्क डॉ. यशवंत मनोहर सरांचं नाव आहे!) आणि माझीही काही पुस्तकं तुझ्या ग्रंथालयात जमा झाली आहेत. अलीकडे भेटलो की आपण या गोष्टीवर विनोदही करायचो... ''एकमेकांची पुस्तकं आता परत मागायची नाहीत... एकमेकांकडे असलेली आपली पुस्तकं पुस्तकवाचीच्या (वहिवाटीच्या धर्तीवर) हक्कानं आता एकमेकांची झाली आहेत'' असं म्हणून आपण खळखळून हसायचो.

तू कॅम्पसला विद्यार्थी असतानाच डॉ. यशवंत मनोहर सरांच्या 'समुचित' या त्रैमासिकासाठी काम करायचास. एखादं काम हाती घेतलं की त्याला वाहून घ्यायचं, हा तुझा स्वभाव होता. ते काम कमालीच्या काटेकोरपणे करणं, हाही तुझा अंगभूत गुणच होता. मग त्या कामासाठी कितीही शक्ती लागू दे. तुला त्याची पर्वा नसायची. विद्यार्थिदशेतच तुझ्यात एक कळकळीचा कार्यकर्ता भिनलेला होता. त्यानं पुढे विधायक स्वरूपाच्या अनेक चळवळी केल्या. एखाद्या नियतकालिकाच्या संपादक मंडळात तू असलास की इतरांना मग फारसं पाहावं लागत नसे. जबाबदारी स्वतःहून स्वीकारणं आणि उत्कृष्टतेनं ती पार पाडणं, ही तुझी कार्यशैली होती. या सर्व धबडग्यातही तुझं लेखन चालू होतं. तुझे लेख अभ्यासपूर्ण असत. तुझ्या कविता दर्जेदार असत. एखादी कविता तू पोस्ट करायचास. ''अरे व्वा! सुंदर... कुणाची आहे?'' असे विचारल्यावर तू लिहायचास. ''अरे! आणखी कोणाची?'' तुझ्या कवितांचा संग्रह... लेखांचा संग्रह सर्व राहून गेलं रे अनिल!!

डॉ. यशवंत मनोहर सरांकडे पहिल्यांदा मला नेणारा तूच होतास. सर तेव्हा अमरावती मार्गावरच्या विद्यापीठ क्वॉर्टरमध्ये राहात होते. सरांकडे आपलं छान स्वागत झालं. वाङ्मयीन चर्चा झाल्या. डॉ.द.भि. कुलकर्णी आणि डॉ. यशवंत मनोहर या आपल्या दोन्ही गुरुवर्यांच्या वाङ्मयीन भूमिकांमध्ये बराच विरोध होता. आपण दोघांकडेही आकर्षित झालो. तुझा कल डॉ. यशवंत मनोहर सरांकडे जास्त होता. मी डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावात जास्त होतो. पण दोघांच्याही भूमिकांवर आपण तास झाल्यावर, विभागासमोरील हिरवळीवर, मोकळी चर्चा करायचो. तू दोघांच्याही भूमिकांमधला फरक छान समजून सांगायचास. आक्रस्ताळेपणा न करता दोघांची बलस्थानं पटवून द्यायचास. डॉ. मनोहर सरांच्या सामाजिक भूमिकेतील प्रखरता तुला भिडायची, तशी द.

अनुक्रमणिका

भि. सरांची सौंदर्यदृष्टीही तुला महत्त्वाची वाटायची. अनिल! या दोघांनी आपल्याला खूप समृद्ध केलं रे! कुठल्याही एका चौकटीच्या अभिनिवेशात न अडकता आपल्या चर्चा चालत. त्यामुळे आपली अभिरुची व्यापक व संपन्न होत गेली.

एम. ए. मराठीच्या परीक्षेत कॅम्पसचा विद्यार्थी म्हणून मी मेरिटमध्ये यावं, असं तुला खूप वाटायचं. प्रवेश घेताना माझ्याही मनात ते स्वप्न अंधूकपणे का होईना, पण तरळत होतं. तू मात्र या बाबतीत जास्तच सिरियस होतास. त्यामुळे माझ्या रूमवर येऊन तू मला बारीकसारीक गोष्टी सांगायचास. पुस्तकांवरून नोटस् कशा काढायच्या, विद्यापीठाच्या उत्तरपत्रिका कशा लिहायच्या, उत्तरं लिहिताना सुरुवात कशी आकर्षक करायची, सुरुवातीलाच एखादे मार्मिक कोटेशन किंवा काव्यपंक्ती किंवा शायरी कशी वापरायची, रंगीबेरंगी पेन वापरून उत्तरपत्रिका कशी सजवायची, कोटेशनकडे लवकर लक्ष जावं म्हणून तिथं कसे आणि कोणते रंग वापरायचे... अशा कितीतरी गोष्टी तू मला जाणीवपूर्वक वेळ देऊन सांगायचास... मलाही वाटायचं रे... ते सर्व... की आपले गुरुवर्य आणि अनिलसारखे मित्र आपल्याकडून मेरिटची अपेक्षा करतात... तर करावा चांगला अभ्यास... पण काय करू मित्रा... मीही माझ्या स्वभावाचा गुलाम होतो... नेमका त्याच वेळी प्रेमात पडलो. मग कसला अभ्यास नि कसलं काय?... परीक्षाच दिली नाही... मग तू एक दिवस रूमवर येऊन माझी कडक हजेरी घेतली. तू वर्षभर अभ्यास केला नाहीस तर मग दुसरं काय केलं?... मी माझी सुटकेस उघडून दाखविली, ती बरीचशी माझ्या प्रेमपत्रांनी भरून गेली होती. मी खरंखरं उत्तर दिलं... ''प्रेम केलं नि पत्रं लिहिली... वर्ष कधी संपलं कळलंच नाही...'' मग तू कावला नि मला म्हणालास... ''कुसुमानिलसारखं आपण पुढे हे प्रसिद्ध करू; पण त्या आधी एकदाचा एम.ए. हो...''

विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालयात तूच माझा रीतसर प्रवेश घडवून आणलास. तिथं आपण सोबत अभ्यास करायचो. चंद्रकांत कुलकर्णी (नाना) तेव्हा तिथं होते. मग पुस्तक प्रदर्शनं भरवायला त्यांच्यासोबत जायचो. तू तेव्हाही, म्हणजे विद्यार्थिदशेतच, फार सर्वसमावेशक दृष्टी ठेवली होती. सगळ्या साहित्य संस्था, वाङ्मयीन उपक्रम, संमेलने तुला आपली वाटत. मात्र व्यासपीठ कोणतेही असो, तू तुझ्या विवेकवादी वृत्तीशी कधी तडजोड केली नाही. कुणाला दुखावले नाही; पण कुणाची विचारवर्चस्वाची प्रवृत्ती मान्यही केली नाही.

तुला आठवते? द.भि. कुलकर्णी सरांना उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार मिळाला तेव्हाचा आपला वाद? मी तेव्हा नागपूर-पत्रिकेत होतो. मी सरांच्या पुरस्काराची मोठ्ठी बातमी बनवली, चांगला फोटो टाकला आणि मोठ्या कौतुकानं दुसऱ्या दिवशी तुला पेपर दाखवला. तू बातमी वाचून माझ्यावर जाम भडकला हेमंत, तुझी बातमी वाचून असं वाटतं की हा पुरस्कार गेल्या शंभर वर्षांत फक्त द. भि. कुलकर्णी यांनाच मिळाला आहे. अरे! द. भि. मोठेच आहेत. पण त्यांच्यासोबत विदर्भातील आणखी काही लोकांची नावं त्या पुरस्काराच्या यादीत आहेत... त्यांचा साधा नामोल्लेखही तुझ्या बातमीत नाही... मग मीही माझी बाजू लढवली. मग त्या वादाचा समारोप आपण हॉटेलमध्ये जाऊन छोलेभटुऱ्यांवर ताव मारून केला! आणि मग आचार्य रजनीशांविषयीचे आपले मतभेद आठवतात तुला? मला रजनीशांची भाषणं - पुस्तकं आवडायची. तू सामाजिक दृष्टीतून हा कसा आत्मकेंद्री माणूस आहे, हे मला पटवू पाहात होता. नैसर्गिक आपत्तीनं देशात तेव्हा शेकडो माणसं मेली होती नि रजनीश त्याच वेळी ''मजा लो... मजा करो...'' म्हणून सभेला संबोधत होते. त्यामुळे तुझा भडका उडाला होता... अनिल, नंतर तुझी रजनीशांबद्दलची मतं बदलली होती का रे?... सौम्य तरी झाली होती का?... आता हे कळायलाही काही मार्ग नाही. नंतर मला फार वाईट परिस्थितीत नागपूर सोडावं लागलं. नंतर आपल्या भेटी कमी होत गेल्या... मग मोबाईल आल्यावर पुन्हा बोलणं वाढलं... पण त्याला समोरासमोरच्या गप्पांची सर कशी येणार?

...आणि अनिल, आपल्या भेटीही कशा टळत गेल्या पाहा. कविवर्य प्रमोद अणेरावांच्या कवितासंग्रहाच्या प्रकाशनाला तू मला बोलावलं होतं... तेव्हा मी नेमका काहीतरी कामात गुंतलो होतो. तू स्त्रियांच्या लेखन कार्यशाळेसाठी (अरुणा सबाने यांनी आयोजित केलेल्या) अमरावतीला आला होता. माझ्याकडे मुक्काम करीन म्हणून कबूल करून आला होता... आणि तुला रात्रीच तातडीनं नागपूरला परतावं लागलं. नरखेडला विदर्भ साहित्य संमेलनात मात्र आपण दिवसभर सोबत होतो. युगसंवादच्या (वाङ्मयीन आणि सांस्कृतिक चळवळ, नागपूर) पोस्टर-पोएट्रीच्या

अंकाचं प्रकाशन तिथं झालं होतं. या पोस्टर-पोएट्रीच्या उपक्रमातही तुझा भारी जीव होता. खूप सुंदर विषय घेऊन आणि नव्या पिढीच्या जाणकार साहित्यिकांना हाताशी घेऊन तू या उपक्रमात जीव ओतला होता. (तुझ्या संपादनात निघालेले पाच-सहा पोस्टर्स फ्रेम करून विभागात लावले आहेत.) अशा वाङ्मयीन-सांस्कृतिक चळवळींसाठी आयुष्यातला किती वेळ जातो, याचा तू कधी हिशेब केला नाहीस. यात आपला किती पैसा लागतो, याचाही तू हिशेब ठेवला नाही... तू संपादक म्हणून प्रकाशित केलेले पोस्टर्स मात्र एकापेक्षा एक सरस अशी तुझी निर्मिती आहे . मित्रा, त्यातील कवितांची निवड, रंगसंगती, लेआऊट या सर्वांवर तुझ्या रसिक जाणत्या सौंदर्यदृष्टीची छाप दिसते. तू काढलेले युगवाणीचे अंकही असेच दर्जेदार आहेत... शिवाय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या सर्वच उपक्रमांमध्ये, आयोजनांमध्ये तू हमखास असायचास. केवळ सक्रिय असायचा, असं मला म्हणायचं नाही, तर त्या उपक्रमाचा अगदी आरंभापासून म्हणजे त्याच्या संकल्पनाचित्रापासूनच तू त्याचा अविभाज्य भाग असायचास. विशेषतः डॉ. अक्षयकुमार काळे सरांच्या कारकीर्दीत तर तुझा तेथील सहभाग अटळ आणि अपरिहार्यच होऊन गेला होता. स्वतःमध्ये अभ्यासाच्या, वक्तृत्वाच्या, मांडणीच्या चांगल्या क्षमता असूनही तू अशा आयोजनांमध्ये पडद्यामागील भूमिका निभवायचास. तुझ्या उपस्थितीतला विभागाचा शेवटचा कार्यक्रम म्हणजे विभागाचा अमृत महोत्सवी कार्यक्रम. विषय, वक्त्यांची नावं, पत्रिका, छपाई, प्रूफरीडिंग, पत्रिका पोस्ट करणं, पाहुण्यांची व्यवस्था, मानपत्राचं लेखन... अशी कितीतरी कामं तू आनंदानं करायचास, त्या आयोजनातलं असं एकही काम नसायचं ज्यात तुझा सहभाग नाही!... या उपक्रमात मी परिसंवादात वक्ता म्हणून आलो होतो. विषय आवडीचाच होता... 'ते दिवस, ते क्षण'. मी विभागातील दिवसांबद्दल बोलायला लागलो आणि तीन-चार वेळा तुझ्या नावाचा उल्लेख सहजच झाला. ते ऐकायलाही तू तिथे सभागृहात नव्हता... मी नंतर तुझ्यावर चिडलोही... तू नुसतं हसून दिलं... ती आपली भेट शेवटची असेल असं मनातही आलं नाही... अनिल, खरं म्हणजे तुझ्यात खूप काही भरून होतं. एक लेखक म्हणून, संपादक म्हणून अजून तुला खूप काही करायचं होतं... आणि एकदम तू गेल्याची बातमीच आली... त्यावर विश्वासही बसेना. श्याम (धोंड) आणि तीर्थराज (कापगते) यांच्याकडून निश्चिती झाल्यावर काही सुचेना...

दुसऱ्या दिवशी तुझ्या अंत्यसंस्काराला आलो. तू जोडून ठेवलेल्या प्रेमाच्या लोकांची तिथं मोठी गर्दी होती... त्यात तुझे मित्र, चाहते, विद्यार्थी, शिक्षक, नातेवाईक असे सगळेच होते. डॉ. अक्षयकुमार काळे पुण्याहून विमानाने तातडीने नागपुरात पोचले होते. शोकसभा झाली. अनेक मान्यवरांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या. डॉ. यशवंत मनोहर सर म्हणाले, ''... लोकांना बोलताही येऊ नये अशी ही घटना आहे... आज शब्दांनीच हिंमत सोडली आहे... अनिल हे परिपूर्णतेच्या ध्यासाचे नाव होते. फार मोठमोठी कामे त्याची वाट पाहात असतानाच तो गेला...'' सर खरं तेच बोलत होते. उपस्थितांच्या भावनांना वाट करून देत होते... ते सर्व भयंकर होतं! असह्य होतं!! ... आणि तू तर नुसता झोपल्यासारखा शांत पडून होता...

अनिल, तुला निरोप देणाऱ्या गर्दीत परस्परविरुद्ध विचारधारेचे लोक होते... तू या सर्वांना प्रेम दिलं व त्यांचंही प्रेम मिळवलं, ही खरी तुझ्या व्यक्तिमत्त्वाची उंची होती. प्रेम सर्व विचारधारांच्या वरचं मूल्य आहे, याचा संदेश म्हणजे तुझं आयुष्य होतं... तुझ्या सर्वव्यापी प्रेमाला... मैत्रीला माझा भावपूर्ण प्रणाम... आणखी काय लिहू?

तुझा मित्र,
हेमंत

• • •

प्रा. हेमंत खडके, राजा अपार्टमेंट, गणेडीवाल लेआऊट, कॅम्प, अमरावती -४४४६०२, भ्रमणभाष : ९८२२८४११९०

विदर्भ साहित्य संघ

मकर संक्रांत १९२३

कार्यवृत्त

(नोव्हेंबर ते मार्च २०१८ या काळातील)

१३, १४ नोव्हेंबर - कविवर्य विंदा करंदीकर यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने वि.सा. संघातर्फे दोन दिवसांच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. १३नोव्हेंबरला 'विंदाचे काव्यकर्तृत्व' या विषयावर सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. सुधीर रसाळ, यांचे भाषण आयोजित करण्यात आले होते. वि.सा. संघाचे कार्याध्यक्ष वामन तेलंग अध्यक्षस्थानी होते. श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी प्रास्ताविक केले.

दि. १४ नोव्हेंबरला 'उर्वरित विंदा' या विषयावर डॉ. सुधीर रसाळ यांचे भाषण आणि त्यानंतर 'देणाऱ्याने देत जावे' हा विंदाच्या काव्यावर आधारित कार्यक्रम सादर करण्यात आला. कार्यक्रमाची संहिता, निवड आणि बांधणी डॉ. अरुणा ढेरे यांची होती. अभिवाचन रेणुका देशकर आणि प्रख्यात मानसोपचारतज्ज्ञ डॉ. सुधीर भावे यांनी केले. या कार्यक्रमात काही गीते भाग्यश्री बारस्कर यांनी सादर केली. प्रास्तविक नितीन सहस्त्रबुद्धे यांनी केले.

४ फेब्रुवारी - 'बाबुराव बागुलांच्या २ कादंबऱ्या' व 'कादंबरीकार राजन गवस' ह्या डॉ. अनिल बोपचे यांच्या दोन्ही समीक्षात्मक ग्रंथांचा प्रकाशन सोहळा विदर्भ साहित्य संघ आणि विजय प्रकाशन, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ४ फेब्रुवारीला विदर्भ साहित्य संघाच्या तिसऱ्या मजल्यावरील सभागृहात आयोजित करण्यात आलेला होता. साहित्यिक डॉ.वि.स. जोग अध्यक्षस्थानी होते आणि प्रकाशन डॉ. रविंद्र शोभणे यांच्या हस्ते करण्यात आले. दोन्ही ग्रंथावर डॉ. वसुधा वैद्य यांनी भाष्य केले. प्राचार्य अरुण मोटघरे विशेष अतिथी होते.

१९ फेब्रुवारी - ज्येष्ठ कादंबरीकार लेखक मनोहर तल्हार यांचे १५ फेब्रुवारील निधन झाले. त्या निमित्ताने विदर्भ साहित्य संघातर्फे श्रद्धांजलीचे आयोजन करण्यात आले होते. वि.सा. संघाचे कार्याध्यक्ष वामन तेलंग अध्यक्षस्थानी होते. उपाध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, साहित्यिक डॉ. रवींद्र शोभणे आणि मनोहर तल्हार यांचे स्नेही डॉ. ज.गो. चव्हाण उपस्थित होते. या श्रद्धांजली सभेत विदर्भ साहित्य संघाचे कार्यकारिणी सदस्य आणि तल्हार यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

६ मार्च - ग्रामीण समाज, त्यांची प्राचीन बांधणी, त्यांचे आर्थिक व्यवहार आणि त्यांचे शास्त्र कृषीव्यवस्था आणि त्यांचे विज्ञान इत्यादींवर भाष्य करणारा 'गावगाडा' हा ग्रंथ १९१५ साली त्र्यंबक नारायण आत्रे यांनी लिहिला. या ग्रंथावरील एक परिसंवाद विदर्भ साहित्य संघ, राजहंस प्रकाशन आणि आत्रे कुटुंबीय यांनी संयुक्तपणे आयोजित केला. कार्याध्यक्ष श्री. वामन तेलंग अध्यक्षस्थानी होते. परिसंवादात श्री.डॉ. श्रीनीवास खांदेवाले, डॉ. रवींद्र शोभणे, डॉ. शरद निंबाळकर यांची भाषणे झाली.

१२ मार्च - विदर्भ साहित्य संघातर्फे दरवर्षी आयोजित होणाऱ्या गणेश व्याख्यानमालेत प्रसिद्ध कवी-पत्रकार सुनील शिनखेडे यांचे 'माध्यमाचे जग आणि माध्यमग्रस्तांचे जग' या विषयावर व्याख्यान झाले. वि.सा. संघाचे कार्याध्यक्ष वामन तेलंग अध्यक्षस्थानी होते. श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी प्रास्ताविक केले.

२४ मार्च - तरुणांसाठी नाट्य चळवळ चालवणारे युवा रंगकर्मी रूपेश पवार यांनी ५७ व्या हौशी मराठी राज्य नाट्य स्पर्धेत प्रथम पारितोषिक प्राप्त केले. तसेच अभिनय (स्त्री आणि पुरुष) नेपथ्य, रंगभूषा, संगीत या क्षेत्रातील पारितोषिकही त्यांच्याच नाटकाला मिळाली. २४ वर्षाच्या कालावधीनंतर नागपूरच्या वाट्याला हे यश आले. याबद्दल विदर्भ साहित्य संघातर्फे ज्येष्ठ रंगकर्मी ज्योती सुभाष यांच्या हस्ते त्यांचा व त्यांच्या चमूचा जाहीर सत्कार करण्यात आला. डॉ. चंद्रशेखर मेश्राम आणि समाजसेवक सुरेशबाबु अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. वि.सा. संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर अध्यक्षस्थानी होते.

सत्कारानंतर रूपेश पवार यांची मुलाखत अजेय गंपावार, गणेश नायडू आणि अभय नवाथे यांनी घेतली. नागपूरकर रसिक व रंगकर्मी बहुसंख्येने उपस्थित होते.

२६ मार्च - नागुपरातील सी.पी.ॲन्ड बेरार महाविद्यालयासमोरील चौकास प्रसिद्ध वैदर्भीय कवी व गीतकार राजा बढे यांचे नाव देण्याचा कार्यक्रम नागपूर महानगरपालिकेतर्फे पार पडला. याच उपक्रमाचा दुसरा

अनुक्रमणिका

भाग म्हणून राजा बढे ह्यांची काही गीते आणि कविता ह्यांचा एक कार्यक्रम नागपूर महानगरपालिका आणि विदर्भ साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सादर करण्यात आला. ''हसले मनी चांदणे'' या शीर्षकाने हा कार्यक्रम रेणुका देशकर, भाग्यश्री बारस्कर, मंजिरी वैद्य-अय्यर, गुणवंत घटवाई यांनी सादर केला. या कार्यक्रमास रसिकांनी लक्षणीय उपस्थिती होती.

• • •

विदर्भ साहित्य संघाचे
ग्रंथ ॥ सहवास ॥
वाचन संस्कृतीचे निवांत स्थळ

महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी स्मृती सार्वजनिक वाचनालय आणि
विद्वत्‌रत्न डॉ. के. ल. (भाऊजी) दफ्तरी स्मृती संदर्भ ग्रंथालय
ह्यांचा संयुक्त उपक्रम : ग्रंथसहवास

कार्यवृत्त

(जानेवारी २०१८ ते मार्च २०१८ या काळातील)

१२ जानेवारी - दीप लाविला जाणा - संत साहित्याच्या अभ्यासकांसाठी विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालयाने 'दीप लाविला जाणा' या वाङ्मयीन उपक्रमात जेष्ठ समीक्षक डॉ. मदन कुळकर्णी यांना आमंत्रित केले होते. हे व्याख्यान विदर्भ संशोधन मंडळाच्या सिव्हिल लाईन्स येथील सभागृहात झाले. डॉ. मदन कुळकर्णी यांनी 'लोकप्रेमी, पारमार्थिक रामदास' या विषयावर त्यांनी आपली निरिक्षणे सादर केली. प्रास्ताविक डॉ. अरुंधती वैद्य यांनी सादर केले.

१२ जानेवारी - राष्ट्रीय युवा दिवस - वर्षारंभी येणाऱ्या दिनविशेषांच्या मालिकेत विवेकानंदांची जयंती देशभर 'राष्ट्रीय युवा दिवस' म्हणून साजरी होते. या दिवशी विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालयाने तरुण भारताच्या रामदासपेठ येथील सभागृहात 'एकमेवाद्वितीय, सेवाभावी भगिनी निवेदिता' यांच्या कार्यकर्तृत्वावर, जेष्ठ पत्रकार श्री. श्रीपाद कोठे आणि प्राचार्य रेखा दंडिगे घीया यांचे विशेषत्वाने व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची अध्यक्षता नरकेसरी प्रकाशनचे कार्यकारी अध्यक्ष श्री. अनिलजी दांडेकर यांनी भूषविले. उपस्थित श्रोत्यांसाठी भगिनी निवेदिता यांच्या जीवनावर प्रश्नमंजूषेचे आयोजन करण्यात आले. त्यात सर्वाधिक अचूक उत्तरे देणाऱ्या कवी राज मेहर यांना श्री. दांडेकर यांच्या हस्ते विस्तारीत मराठी शब्द रत्नाकर भेट देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरव खोंड व प्रतिमा पाटील यांनी सांभाळले. कार्यक्रमाला रसिकांची उपस्थिती होती.

९ फेब्रुवारी - दुर्गापर्व (दुर्गाभागवत जन्मदिवस) - विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंतालयातर्फे 'विदुषी दुर्गा भागवत' यांचा जन्मदिवस सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आला. त्यासाठी मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद जोशी, डॉ. राजेंद्र नाईकवाडे, डॉ. विनिता हिंगे, श्री. गौरव खोंड यांना लघुव्याख्यानासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

मृत्यूची चाहुल लागल्यावर मरणभय जिंकलेल्या दुर्गाबाईंनी रचलेल्या देशोपनिषदाने कार्यक्रमाची सांगता झाली. डॉ. साधना शिलेदार या नागपूरच्या सुप्रसिद्ध गायिकेने या रचनेला चाल लावून उत्तम सादरीकरण केले. या कार्यक्रमात घेण्यात आलेल्या प्रश्नमंजूषेत डॉ. श्यामला मुजुमदार या विजेत्या ठरल्या. त्यांना मराठी शब्द रत्नाकर हा शब्दकोश पुरस्कार म्हणून देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्तविक, भूमिका आणि सूत्रसंचालन डॉ. अरुंधती वैद्य यांनी केले. कार्यक्रमाला ल.मा. मुजूमदार, विवेक गोखले, पुष्पा वाराणशीवार, स्वाती सुरंगळीकर, रत्नप्रभा भागवत, शैलजा पोफळी, मालविका देखणे, नरेन्द पितळे, श्रद्धा भारद्वाज, राजेश चवरे, अजय वैद्य, किर्तीवंत भारद्वाज उपस्थित होते.

२० फेब्रुवारी - मराठी भाषा दिवस - महाराष्ट्र भूषण म्हणून लोकप्रिय असलेल्या वि. वा. शिरवाडकरांचा जन्मदिवस २७ फेब्रुवारी हा आहे. महाराष्ट्रात मराठीवर नितांत प्रेम करणाऱ्या आपल्या या आवडत्या लेखकाचा जन्मदिवस राज्यभर 'मराठी भाषा दिवस' म्हणून उत्साहात साजरा करत असते. ग्रंथसहवासने या दिवसाचे औचित्य साधून 'माझ्या माय मराठीचे भवितव्य' या विषयावर चर्चा आयोजित करण्यात आली. नागपूरच्या सुप्रसिद्ध लेखिका सुप्रिया अय्यर, डॉ. गणेश चव्हाण आणि पत्रकार रेवती अंधारे जोशी यांचा

अनुक्रमणिका

या चर्चेच सहभाग होता. मनिषा अतुल यांनी कुसुमाग्रजांची एक कविता सादर केली. ॲड. गौरव खोंड यांनी शिरवाडकरांच्या नाटकातील स्वगत सादर केले.

उच्चविद्या विभूषित ढोकळ कुटुंबियांनी आपल्या पाल्याला मराठी माध्यमातून शिक्षण दिले यासाठी त्याचा ग्रंथभेट व सदिच्छापत्र देऊन दिलीप म्हैसाळकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला डॉ. सुनंदा जुलमे, छाया ठोकळ, सुधीर ठोकळ, सुजाता लोखंडे, श्रीपाद काळे, विनायक तुमसरे सह विदर्भ साहित्य संघाचे पदाधिकारी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

२८ फेब्रुवारी - विज्ञान दिवस - विदर्भ साहित्य संघाच्या 'ग्रंथसहवास' ने राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा केला. नागपूर येथील महर्षी कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेच्या कमिन्स कॉलेज इंजिनिअरींग फॉरविमेन येथील अलाईड विज्ञान विभागाच्या विभाग प्रमुख असलेल्या डॉ. श्रीमती संजीवनी शास्त्री यांना विज्ञान या विषयावर व्याख्यानासाठी निमंत्रित करण्यात आले होते. विज्ञान विषयावर व्याख्यान देणाऱ्या त्या पहिल्याच महिला होत. नागपुरचे भूषम असलेल्या या किशोरवयीन बालकास संस्थेतर्फे मराठी शब्दकोश भेट देण्यात आला. तर संजीवनी शास्त्री यांनाही संचालक (ग्रंथालय) यांच्या हस्ते ग्रंथभेट देण्यात आली. कार्यक्रमाला विज्ञानप्रेमी रसिक उपस्थित होते.

८ मार्च - जागतिक महिला दिवस - फ्लॉरेन्स नायटींग सारखा प्रतिष्ठित पुरस्कार मिळविणाऱ्या श्रीमती सुजाता लोखंडे यांना यंदाच्या जागतिक महिलादिनी व्याख्यानासाठी आमंत्रित करण्यात आले होते. त्याचबरोबर नागपुरात महर्षी कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेच्या कमिन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरींग फॉर विमेन येथील अलाईड सायन्सच्या विभागप्रमुख असलेल्या डॉ. संजीवनी शास्त्री यांचा सत्कार श्रीमती शुभदा फडणविस आमंत्रक संमेलन समिती यांच्याहस्ते करण्यात आला. चवथ्या मजल्यावरील स्वच्छतेची जबाबदारी असलेल्या सरीता आणि भारती या महिलांचा सत्कार करण्यात आला. नंतर विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत सांघिक गटात दुसऱ्यांदा सुवर्णपदकाची नोंद करीत नेत्रदिपक कामगिरीसाठी षोड्शवर्षीय कन्या मनु भाकेर हिचे तसेच नागपुरातील अजनी रेल्वे स्थानकावर स्टेशनमास्तरसह २२ महिला कर्मचाऱ्यांना स्थानक सांभाळण्याची सुरवात झाल्याने मध्यरेल्वेच्या नागपूर विभागाचे व्यवस्थापक आणि संबंधित रेल्वेबोर्ड यांच्या अभिनंदनाचे ठराव प्रस्ता... शुभदा फडणविस तसेच डॉ. विभा क्षीरसागर यांनी टीम ग्रंथसहवासाच्यावतीने मांडले. त्याला माधुरी वाडीभस्मे यांनी अनुमोदन दिले. डॉ. स्मिता माहुरकर यांनी विशेषत्वाने उपस्थिती देत बेटी बचाव अभियानातंर्गत स्वरचित कविता नाट्यपूर्णरित्या सादर केली. संस्कृतानुरागी डॉ. विभा क्षीरसागर यांनी तुटत चाललेल्या कुटुंब व्यवस्थेवर हळहळ व्यक्त करीत चिंतन मांडले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन युवा प्रतिनिधी प्रतिमा पाटील हिने केले.

१० मार्च - ग्रंथचर्चा - महाराष्ट्राला परिचित असलेले नाट्यविद्येचे मर्मज्ञ डॉ. पराग घोंगे या 'भरतमुनींचे नाट्यशास्त्र : एक रसास्वाद' या ग्रंथावर ग्रंथसहवासने 'ग्रंथचर्चा' आयोजित केली होती. त्यात डॉ. पराग घोंगे यांना गुरुस्थानी असलेले डॉ. विनोद इंदूरकर प्रा. सुपंथ भट्टाचार्य, जेष्ठ वक्ते प्रकाश एदलाबादकर, डॉ. विलास देशपांडे, डॉ. सोनू जेसवाणी यांचा समावेश होता. सिमा गोडबोले यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले.

२६ मार्च - जागतिक रंगभूमी दिवस - जागतिक रंगभूमी दिनाच्या पूर्वसंध्येला सांस्कृतिक सभागृहात 'एक दशम' हा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. पूर्वाधात संवादक, लेखक, सांस्कृतिक विश्लेषक श्री. संजय आर्वीकर यांना 'मराठी नाटक सामाजिक सांस्कृतिक वेध' या विषयावर व्याख्यानासाठी आमंत्रित करण्यात आले. उत्तरार्धात 'अभिवादन' या शिर्षकांतर्गत जगविख्यात नाटककारांच्या विविध नाट्यकृतीतून निवडक स्वगते विविध कलावंतांकडून संस्कृत, इंग्रजी, मराठी आणि हिंदी अशा चार भाषांतून रसिकांना आविस्कृत केले. 'एकदशम' आणि 'अभिवादन'ची मूळ संकलपना व रूपांकन ग्रंथसहवासचे समन्वयक श्री. दिलीप म्हैसाळकर यांचे असून रंगभूषा - नकूल श्रीवास, नेपथ्य सलीम शेख आणि सुप्रिया राजगुरू, प्रकाश योजना - किशोर बत्तासे यांचे होते. अभिनयासाठी परिचित असलेल्या दिपाली घोंगे, गौरी सोनटक्के, सुपंथ भट्टाचार्य, गौरव खोंड, प्रकाश लुंगे, सीमा गोडबोले, डॉ. निलकांत कुलसंगे, श्रद्धा भारद्वाज, पुजा पिंपळकर, सलीम शेख, अभय नवाथे आणि विनोद तुंबडे यांनी स्वगतांचा आविष्कार सादर केला. नटीची भूमिका सोनू जेसवाणी यांनी पार पाडली. • • •

अनुक्रमणिका



पु.ल. देशपांडे आणि वामन निंबाळकर यांच्यासोबत (२० जानेवारी १९८९)



मधुमंगेश कर्णिक यांच्याहस्ते 'जीवनायन' या कवितासंग्रहाला इंदिरा संत उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार स्वीकारताना उल्हासदादा पवार आणि इतर मान्यवर, (इचलकरंजी) १३ जुलै २००२



सुप्रसिद्ध कथाकार कमल देसाई यांचा सत्कार करताना सोबत प्राचार्य म.द. हातकणंगलेकर, रामदास फुटाणे, फ.मु. शिंदे आणि इतर मान्यवर



निर्मलकुमार फडकुले यांच्याहस्ते 'जीवनायन' या कवितासंग्रहाला मिळालेला पद्मश्री विखे पाटील पुरस्कार स्वीकारताना प्रवरानगर, सोबत रावसाहेब कसबे व राधाकृष्ण विखे पाटील आणि इतर २२ ऑगस्ट २००२.



नागेवाडी, सांगली येथे माय मराठी साहित्यिक संघाद्वारे आयोजित दुसऱ्या साहित्यिक मेळाव्याचे अध्यक्ष डॉ. यशवंत मनोहर, उद्घाटक म.द. हातकणंगलेकर आणि इतर मान्यवर.



यशवंतराव दाते स्मृती संस्था, वर्धा

कार्यालय : प्रदीप दाते, शिवबावाडी, साबळे प्लॉट, वर्धा – ४४२ ००१, दूरध्वनी : ०७१५२-२४१०५१/२५२५१०

- महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक व साहित्याच्या क्षेत्रातील एक अग्रगण्य संस्था.
- संस्थेद्वारे दरवर्षी दि. १ व २ फेब्रुवारीला यशवंतराव दाते स्मृती व्याख्यानमाला व साहित्यिक पुरस्कारांचे वितरण.
- २४ डिसेंबरला डॉ. भा. ल. भोळे व डॉ. यशवंत सुमंत स्मृति साहित्य पुरस्कार वितरण.
- पर्यावरण जागृतीपासून जागतिकीकरणापर्यंत... वर्तमानकालीन समस्यांवरील परिसंवाद, संमेलन आणि कार्यशाळांच्या आयोजनापासून नाट्यप्रयोग निर्मितीपर्यंत... संगीत मैफलीच्या सादरीकरणापासून आरोग्य शिबीर व क्रीडा स्पर्धांपर्यंत... अनेकानेक क्षेत्रात संस्था आपले योगदान सातत्याने देत आहे.

* संस्थेचे साहित्य पुरस्कार *

* यशवंतराव दाते स्मृती अनुवाद पुरस्कार * बाबा पद्मनजी साहित्य पुरस्कार
* डॉ. भा. ल. भोळे वैचारिक ग्रंथ पुरस्कार * डॉ. भा. ल. भोळे सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार
* डॉ. यशवंत सुमंत स्मृती युवा संशोधक प्रेरणा पुरस्कार * शिक्षणमहर्षी बापूरावजी देशमुख कथासंग्रह पुरस्कार
* संत भगवानबाबा काव्यसंग्रह पुरस्कार * अंजनाबाई इंगळे तिगावकर स्त्रीवादी साहित्य पुरस्कार
* पद्माकरजी श्रावणे स्मृती बालसाहित्य पुरस्कार * भाऊरावजी शिंगाडे विनोदी साहित्य पुरस्कार
* हरीश मोकलकर सामाजिक ऋण पुरस्कार